6


स्वावलंबन, आत्मसन्मान

•

स्त्री-पुरुष असमानतेची रूपं

अनिल भागवत

वैवाहिक आणि कौटुंबिक समुपदेशक



जीवनसाथ

दुसरी आवृत्ती

जीवनसाथ - 12 पुस्तकांच्या संचापैकी

पुस्तक क्र. 6

स्वावलंबन, आत्मसन्मान

•

स्त्री-पुरुष असमानतेची रूपं

जीवनसाथ

जीवनभर स्पष्ट विचारांची साथ म्हणजे जीवनसाथ

अनिल भागवत

वैवाहिक आणि कौटुंबिक समुपदेशक

प्रकाशक
अनिल भागवत
ई 3/21 गिरिजा शंकर विहार
कर्वे नगर, पुणे 411052


प्रथम आवृत्ती : 27 डिसेंबर 2015

मुखपृष्ठ : आभा भागवत

टाइपसेटिंग
स्मिता टाईपसेटर्स
1120, सदाशिव पेठ,
पुणे 411030

मुद्रणस्थळ
स्मिता प्रिंटर्स,
1019, सदाशिव पेठ,
पुणे 411030

किंमत 300 रुपये



अनिल भागवत – ओळख

- बांधकाम व्यवस्थापनाचं अमेरिकेत शिक्षण आणि नोकरी
- अमेरिकन ग्रीन कार्ड होल्डर असूनही भारतात परत येण्याचा निर्णय
- 8 महिने 50,000 कि.मी. आणि 35 देशांचा स्वतः गाडी चालवत बायकोबरोबर प्रवास
- भारतात अतिजलद आणि दर्जेदार बांधकाम व्यवस्थापनाचा अनेक वर्षं व्यवसाय
- तत्त्वज्ञान, मानसशास्त्र आणि व्यवस्थापनशास्त्र यांचा रोजच्या आयुष्यात उपयोग करण्याविषयी खास अभ्यास
- 'वैवाहिक आणि कौटुंबिक समुपदेशन' या विषयात डॉक्टरेटचं काम पूर्ण
- इंग्लंड आणि अमेरिकेत पालक-शिक्षण आणि विवाह-शिक्षणाच्या कार्यशाळा
- विवाह-शिक्षणाचे 500 च्या वर कार्यक्रम (1997 ते 2015)
- पालक-शिक्षणाचे 300 च्या वर कार्यक्रम (1980 ते 2015)

सामाजिक कामं -

- जीवनसाथ अभ्यासमंडळ – प्रमुख सल्लागार
- जीवनसाथ समुपदेशन केंद्र – प्रमुख समुपदेशक
- पालक विद्यापीठ – सल्लागार
- इंग्लिश संभाषण वर्ग – प्रमुख शिक्षक
- रोजच्या आयुष्याचं व्यवस्थापन – डायरी प्रशिक्षण – प्रमुख प्रशिक्षक
- सुंदर हस्ताक्षर वर्ग – प्रशिक्षक

- लेखन – वर्तमानपत्रांतून, नियतकालिकांतून अनेक वर्षं लिखाण

पुस्तकं -

1. घर पाहावं बांधून (5 वी आवृत्ती)
2. लग्न पाहावं करून (उपलब्ध नाही)
3. व्यवस्थापनशास्त्र तुमच्यासाठी (2 री आवृत्ती)

●



शोभा भागवत – ओळख

- मराठी, संस्कृत, इंग्लिश भाषेत पदव्या
- अमेरिकन ग्रीन कार्ड होल्डर असूनही भारतात परत येण्याचा निर्णय
- 8 महिने 50,000 कि.मी. आणि 35 देशांचा स्वतः गाडी चालवत नवऱ्याबरोबर प्रवास
- 2 वर्षं युनिसेफसाठी शैक्षणिक सल्लागार
- गरवारे बालभवन, सारसबाग, पुणे. च्या संचालक (1985 ते 2015)
- भारत सरकारतर्फे शैक्षणिक कार्यक्रमासाठी ब्राझिलला भेट
- इंग्लंड आणि अमेरिकेत पालक-शिक्षण आणि विवाह शिक्षणाच्या कार्यशाळा
- विवाह-शिक्षणाचे 300 च्या वर कार्यक्रम (1997 ते 2015)
- पालक-शिक्षणाचे 1000 च्या वर कार्यक्रम (1980 ते 2015)

सामाजिक कामं -

- पालक विद्यापीठ – प्रमुख सल्लागार
- जीवनसाथ अभ्यासमंडळ – सल्लागार
- अक्षरनंदन शाळा – सल्लागार
- महाराष्ट्र पालक शिक्षक संघ – कार्याध्यक्ष
- डॉ. स्नेहल अशोक स्मृती न्यास – विश्वस्त
- हुजूरपागा नियामक मंडळ – सदस्य
- लेखन – वर्तमानपत्रांतून, नियतकालिकांतून सातत्यानी लेखन

पुस्तकं

1. आपली मुलं (राज्य पुरस्कार प्राप्त)
2. गारांचा पाऊस (राज्य पुरस्कार प्राप्त)
3. मूल नावाचं सुंदर कोडं
4. दिवास्वप्न (अनुवाद)
5. दलित पुरुषांच्या आत्मचरित्रातील स्त्री प्रतिमा
6. बहुरूप गांधी (अनुवाद)
7. आनंदाच्या पाऊलवाटा
8. देणारं झाड (अनुवाद)
9. मांजरांची वरात (अनुवाद)
10. गंमत जत्रा
11. विश्व आपलं कुटुंब
12. स्त्रियांचे प्रश्न
13. खेळण्यांचा जादूगार - अरविंद गुप्ता
14. सिंह आणि चिंगुली लाल चिमणी (अनुवाद)
15. खट्याळ उंदीर (अनुवाद)
16. अमरपत्र (अनुवाद)
17. शहाणी मुलं छान मुलं (अनुवाद)
18. बियांचे प्राणी (अनुवाद)
19. अंगठ्याची चित्रं (अनुवाद)
20. बोलणारे दगड (अनुवाद)

आगामी पुस्तकं

21. सारं काही मुलांसाठी
22. शिक्षण आणि शांती (अनुवाद)

नाटक – आम्ही घरचे राजे (थिएटर अकादमी)

अनेक लेख, कविता, आकाशवाणी आणि दूरदर्शनवर कार्यक्रमांचं लेखन आणि सादरीकरण

●

प्रस्तावना – शोभा भागवत

आमचं 'जीवनसाथ विवाह अभ्यास मंडळ' 1997 मधे सुरू झालं. आमची दोन्ही मुलं तेव्हा लग्नाच्या वयाची होत होती. अनिलला तेव्हा असं सारखं वाटत होतं की, आपण दोघांशी लग्नाबद्दल सूत्रबद्ध बोलायला हवं, पण या वयातली मुलं कुठं आई-वडलांचं ऐकण्याच्या मनःस्थितीत असतात? त्यांच्या मित्र-मैत्रिणींचा गट जमवणं, त्यांच्या पालकांनाही बोलावणं आणि दर रविवारी 2-3 तास एकत्र चर्चा करणं ही कल्पना मात्र त्यांना आवडली, आणि आमच्या घरीच 'जीवनसाथ' सुरू झालं.

'जीवनसाथ' म्हणजे स्पष्ट विचारांची जीवनभराची साथ. खूप जणांना असं वाटतं की, अविवाहित मुला-मुलींसाठी हे गट चालवतात, म्हणजे हे वधूवरसूचक मंडळ आहे. पण असं लग्न जमवण्यासाठी मंडळ चालवण्यात आम्हा दोघांनाही रस नाही. अर्थात, मंडळाच्या निमित्तानं एवढ्या वर्षांत लग्नाचा अभ्यास करता करता परिचय होऊन बरीच लग्नं ठरली, झाली, टिकली आणि ती विचारपूर्वक झाली याचं आम्हाला समाधान वाटतं.

महत्त्वाची गोष्ट अशी की ही लग्न करणारी मुलंमुली स्वतःचे निर्णय स्वतः घेण्याएवढी स्वावलंबी आहेत. त्यांना स्वतःचा सन्मान स्वतःच सांभाळावा लागतो हेही कळलंय.

18 वर्षांच्या अनुभवानी आम्हाला असं वाटतं की, तरुण मुली लग्नाबद्दल खूप विचार करतात. कारण, त्यांना जाणीव असते की, लग्नानंतर पुरुषाचं आयुष्य फार बदलणार नाही, पण बाईचं सगळंच बदलून जातं. या उच्चशिक्षित मुली असं म्हणतात की, लग्न हे काही आयुष्यभराचं 'अल्टिमेटम' नाही हे आमच्या पिढीला कळलेलं आहे. त्याचप्रमाणे, एका व्यक्तीशी आयुष्यभर आपण

जोडले जाणार, तर ती कशीतरी उरकून टाकायची पण गोष्ट नाही. लग्नानंतर आपलं आयुष्य घडूही शकतं किंवा बिघडूही शकतं. त्यामुळं स्वतः विचार करून स्वतःच निर्णय घ्यायचा. मगाशी म्हटल्याप्रमाणे स्वतः निर्णय घेणं ही गोष्ट अनिलला आणि मला फार महत्त्वाची वाटते.

ठराविक 'कांदापोहे' कार्यक्रमाचं स्वरूप बदललं आहे. तरीही अजून परिचयात मोकळेपणा नसतो. शिक्षण, पगार, घरदार, दिसणं या व्यावहारिक गोष्टींकडेच झुकतं माप असतं. माणूस म्हणून एकमेकांची ओळख होत नाही.

एखाद्या जोडीत कुटुंबातल्या पार्श्वभूमीमुळे, वातावरणामुळे मनमोकळा संवाद असला, तरीही लग्नाच्या वेळी विचार नेमका कशाकशाचा करायचा याबाबतीत पालकांना काही कल्पना नसते. मुलांना वाटतं पालक काहीतरी सांगू शकतील. त्याचवेळी पालकांना वाटतं, आजकालच्या मुलांना सगळं माहिती असतं. शेवटी दोघांकडून मिळून आवश्यक असलेला स्पष्ट विचार कमी पडतो.

आज प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्याचा ध्यास आहे. अशा वेळी वरवर भेटून, बोलून आयुष्यभराचा निर्णय कसा घ्यायचा? लग्न म्हणजे काय एक दिवसाचा सोहळा आहे का? ती आयुष्यभराची दोघांनी केलेली 'कमिटमेंट' आहे.

लग्नाच्या वयात घरून प्रचंड मानसिक दबाव असतो, असंही मुली सांगतात. त्यात घरात आई-वडलांचंच आयुष्य अत्यंत असमाधानी पाहिलेलं असलं, घरात त्यांची एकमेकांना, मुलांना मारपीट पाहिलेली असली, तर लग्नाबद्दल प्रचंड साशंकता असते. अनेक कुटुंबांत दुर्दैवानी तरुण मुलांना मोकळेपणानी बोलता येत नाही. अनेकदा पालकांशी संवादच तुटलेला असतो.

याला उपाय म्हणून, आपल्या समाजात या मुला-मुलींसाठी काय सोयी उपलब्ध आहेत? वधू-वर सूचक मंडळं आहेत, ती पालकांना जेवढी आकर्षक वाटतात, तेवढी मुला-मुलींना वाटत नाहीत. मेळाव्याचा अनेकांनी धसका घेतलेला आहे. इंटरनेटचा आधार अनेकजण घेत आहेत, पण त्याची विश्वासार्हता अजून सिद्ध व्हायची आहे. इंटरनेटवर माहितीचा धबधबा असतो, पण त्यातली बरीचशी पाश्चात्त्य असते. स्वतःला उपयोगी असं फारच कमी सापडतं.

अशा वेळी परिचयोत्तर विवाह असा काही कुठे पर्याय आहे का, मैत्रीतून विवाह असा काही 'प्लॅटफॉर्म' आहे का, या शोधात तरुण आहेत. त्यामुळेच जिथे केवळ पैशांसाठी काम चालत नाही, पण जिथे समाजकार्य असाही आव नाही, जिथं कुणाचं दडपण विचारांवर नसेल आणि निर्णयासाठी दबाव नसेल,

जिथे तरुणांचा सन्मान जपला जाईल आणि मार्गदर्शन म्हणून उपदेशांचे डोस नसतील, अशा ठिकाणाच्या शोधात मुलं-मुली आहेत. ही गरज ओळखून 'जीवनसाथ'ची सुरुवात झाली. अनिलनी त्याचं वर्णन विवाह अभ्यास मंडळ असं ठरवलं.

'जीवनसाथ' सुरू केल्यापासून अनिलनी वैवाहिक जीवनात येणाऱ्या प्रश्नांची यादी करून अभ्यासाला सुरुवात केली. विवाहातल्या प्रश्नांचा अभ्यासक्रम तयार केला. त्याचं 'मॅनेजमेंट' या विषयाचं शिक्षणही आहे आणि व्यवसायही आहे. त्यातली तत्त्वं वैवाहिक जीवनात उपयोगी आहेत. आपण कसे आहोत हे कळणं आणि दुसऱ्याला पारखता येणं, यासाठी त्यानी व्यक्तिमत्त्वाच्या प्रकारांचा अभ्यास केला आहे. विवाहासाठी काय प्रकारची प्रगल्भता हवी हे शोधण्याचं त्याचं काम चालू आहे. त्याचं मानसशास्त्राच्या अंगानी 'वैवाहिक आणि कौटुंबिक समुपदेशन' या विषयातलं डॉक्टरेटचं काम पूर्ण आहे. पीएच.डी. हातात मिळणं बाकी आहे. क्रिटिकल ॲनॅलिसिस या पद्धतीनी तो तरुण मुला-मुलींना आपले प्रश्न सोडवण्याचा आत्मविश्वास देतो आहे. अतिशय सातत्यानी 'ग्रुप काउन्सेलिंग' आणि 'इंडिव्हिज्युअल काउन्सेलिंग' करतो आहे. त्याची अभ्यासू वृत्ती, शिस्त, चिकाटी, तरुणांशी संवाद साधण्याचं कौशल्य, हे काम करण्यासाठी 'ट्रेनर्स' तयार करणं, हे सगळं पाहणं, त्यात मदत करणं हा माझ्या आनंदाचा भाग आहे.

'जीवनसाथ'मधे अविवाहित तरुण-तरुणी तर येतातच, पण नवविवाहित, मध्यमवयीन विवाहित जोडपी, घटस्फोटित व्यक्ती, अविवाहित राहण्याचा निर्णय घेतलेली मंडळीही येतात. त्यांच्यामधल्या विचारांच्या देवाण-घेवाणीचा सर्वांनाच उपयोग होतो. इथल्या काहींच्या प्रतिक्रिया बरंच काही सांगतात.

'जीवनसाथ'मधे येणारी कॉम्प्युटर इंजिनिअर मुलगी एकदा सांगत होती– ''माणसाच्या दिसण्यापेक्षा माणसाचं असणं महत्वाचं असतं, ते कसं पारखावं याचं सहज, सोप्या शब्दांत मार्गदर्शन तुम्ही करता, ते मला आवडलं. केवळ नवरा-बायको या नात्यातच नव्हे, तर इतरही नात्यांत प्रत्येकाला 'स्पेस' देऊन ते नातं जोपासलं तर ते अधिक सशक्त ठरतं, हे मला इथं कळलं. लग्न करायचं तर अफाट अपेक्षा ठेवून कसं चालेल? आपल्याला आयुष्यात काय चालणार नाही, पेलणार नाही, कोणाला नाही म्हटलं पाहिजे याबद्दलचे माझे विचार इथेच स्पष्ट झाले. लग्न या प्रक्रियेकडेच जाणीवपूर्वक पाहण्याचा मार्ग मला इथे सापडला.''

चर्चेत एकदा एक मुलगा म्हणाला होता, ''एखाद्या सुंदर, मादक मुलीशी लग्न आणि मग हनिमून इथपर्यंतचा मुलग्यांचा 'प्लॅन रेडी' असतो, पण पुढं सगळी गडबड गडबड असते. खरं म्हणजे लग्न या विषयाच्या अभ्यासाची सुरुवात शाळेत आणि महाविद्यालयातच व्हायला हवी.''

एक मध्यमवर्गीय घरातला खूप न शिकलेला मुलगा. तो सांगत होता – ''आमच्या घरात जे विषय उच्चारले सुद्धा जात नाहीत त्यावर इथे मोकळेपणानी बोलतात हे पाहून मी चक्रावूनच गेलो. मित्राच्या सांगण्यावरून मी इथे आलो आणि मला कळलं की, इथे केवळ लग्नाविषयी नाही, तर इतर खूप विषयांबद्दल चर्चा होते. आयुष्य स्वस्थ आणि समाधानी कसं होईल हे कळतं. 'ग्रुप डिस्कशन'मधे अनेक माणसांचे विचार कळतात. इतरांच्या प्रश्नांची कल्पना येते.''

मॅनेजमेंटचा अभ्यास करणाऱ्या अतिशय संवेदनक्षम मुलीला काही वेगळेच फायदे जाणवले. ''प्रश्नाच्या मुळापर्यंत जाणं आणि मूळ प्रश्नाचं उत्तर शोधणं यांचे संस्कार इथे माझ्यावर झाले. वास्तवाची जाण आली आणि अपेक्षांचा क्रम लावता आला. इथल्या 'प्रेझेंटेशनचा' मला माझ्या 'मॅनेजमेंट स्टडीज'मधे उपयोग झाला. इतक्या वर्षांच्या अनुभवानंतरही अनिलदादा प्रत्येक कार्यक्रमाआधी मुद्दे लिहून तयारी करतात हे मला खूप विशेष वाटलं.''

दुसरी एकजण म्हणते, ''विवाहबाह्य संबंधांवरच्या चर्चा बैठक संपल्यावरही मनात ठसठसत राहिल्या. जे प्रश्न पूर्वी अगदी नगण्य प्रमाणात होते ते आता महत्त्वाचे मुद्दे बनतायत हे जीवनसाथमुळे लक्षात आलं. घटस्फोट होऊ नये यासाठी काय करावं, झालाच तर काय करावं, किती मुलं हवीत, संगोपन कसं करावं, आपलं मरण, जोडीदाराचं मरण, आप्तजनांचं मरण या अत्यंत अप्रिय अशा विषयांवरच्या चर्चांनी मनोधैर्य वाढलं. प्रत्येक बैठकीला येताना, आज काय नवीन शिकायला मिळेल अशी उत्सुकता असते.''

एक अतिशय गंभीर मुलगी आहे. तिनं अतिशय विचारपूर्वक लग्न केलं आहे. ती एकदा चर्चेत सांगत होती– ''लग्न म्हणजे तडजोड आणि ती बाईलाच करावी लागते. पण 'जीवनसाथ'मधे येऊन मुलांमधेही तडजोडीची जाणीव आणि इच्छा निर्माण होते. एकमेकांत खेळीमेळीचं वातावरण असण्यासाठी वैचारिक पातळी जुळणं आवश्यक आहे. विचार जुळले तर 'कम्फर्ट लेव्हल' वाढते. एकमेकांचे दोष स्वीकारणं सोपं जातं. प्रत्येक माणसात दोष असणारच, मतभेद

असणारच, पण ते कमी कसे करायचे ते इथे आल्यावर उमगलं.'' स्त्री-पुरुष समानतेविषयी इतके परखडपणी विचार मांडणारा पुरुष मी तर प्रथमच अनिलदादांच्या रूपात पाहिला.

''आम्ही दोघं लग्नापूर्वी एकमेकांशी करिअर, पैसे, मित्रमैत्रिणी, कुटुंब यांविषयी बोललो. आमचे बरेच विचार जुळत होते. यावेळी निर्णय घेताना आम्हाला अनिलदादांनी सांगितलेली 'क्रिटिकल ॲनॅलिसिस'ची पद्धत उपयोगी पडली. आता लग्न झाल्यावर हा विचार किती महत्त्वाचा होता, ते लक्षात येतं आहे.''

एक रोखठोक मुलगी सांगते, ''मी 'हेडस्ट्रॉंग' आहे. पटल्याशिवाय काही करणार नाही. मुलं बघताना मी खूप विचार करत होते. पण मुलगे 'टिपिकल माइंडेड' असतात. मग नकार सुरू झाले. बाबांना त्याचा त्रास होऊ लागला. अजूनही मला जे हवंय ते मला सापडत नाही. जीवनसाथमधे लग्न जमलं तर मला आवडेल, पण इथे स्वतःला समजून घेण्याचा आणि इतरांना समजून घेण्याचा एक दृष्टिकोन मिळाला. तो मला उपयोगी पडतो आहे. सर्वांना मतं असतात. ती एकमेकांवर लादू नयेत, हे मी इथं शिकले. आपल्या समाजात मुलग्यांची मतं खूप पारंपरिक आहेत. माझ्यासारख्या मुलींना फार निराशा येते. अशा वेळी जीवनसाथचा मला खूप आधार वाटतो.''

आमच्या एक घटस्फोटित सभासद म्हणतात ते मला फार महत्त्वाचं वाटतं– ''सध्या विवाहसंस्थेला आलेलं बाजारी बजबजपुरीचं स्वरूप घातक आहे. नको त्या गोष्टी लग्नसंस्थेत घुसून मूळ मूल्यांनाच छेद देत, पार बोजवारा उडवत आहेत. लग्नाच्या निमित्तानी एकूण मानवी सूक्ष्म, नाजूक, तरल नाती आणि भावभावना यांचा हळुवार गोफ गुंफला जात असतो. त्याचा नितांत सुंदर अभ्यास या मंडळात होतो. आजच्या नव्या विचारांनी कालचा मनस्ताप पुसता येतो, हे मला या अभ्यासाचं सामर्थ्य वाटतं.''

जीवनसाथमधे सातत्यानं गेली पाच वर्षं येणाऱ्या एक मध्यमवयीन पालक म्हणतात : ''लग्न ठरवताना पत्रिकेवर अनावश्यक भर असतो, पण मुलामुलींच्या गाठीभेटी, चर्चा जास्त आवश्यक असतात. दोन कुटुंबांच्या परिचयासाठी वेळ देणं आवश्यक असतं, ते होत नाही. जीवनसाथमधे येण्यापूर्वी माझी मतं पक्की नव्हती. 50-50 टक्के दोन्ही बाजू खऱ्या वाटायच्या. पण आता मी योग्य शब्दांत माझा मुद्दा पटवून देऊ शकते. पालकांनाही या अभ्यासाची गरज आहे.

लग्नात पालकांचा पुढाकार नसावा. मुला-मुलींनीच पुढं जबाबदारी पेलायची असते. त्यामुळे मुलांचा पुढाकार आणि पालक फक्त सल्लागार असं व्हायला हवं. पालकांनी योग्य गोष्टींना प्रोत्साहन द्यावं, अयोग्य गोष्टी स्पष्ट, योग्य शब्दांत त्यांच्यासमोर मांडाव्यात, निर्णय मात्र मुलांचाच असावा.

जीवनसाथमधे नकारात्मक गोष्टींचा विचारही करण्याचं तंत्र कळलं. म्हातारपण, आजारपण, मृत्यू यांबद्दलचे विचार पक्के झाले; अनेक अंधश्रद्धा गेल्या, साधी राहणी उच्च विचारसरणी म्हणजे काय हे कळलं. सर्वांत महत्त्वाचं म्हणजे इथे मुलांबरोबर पालकांनाही आपल्या वैवाहिक आयुष्यातल्या समस्या सोडवता येतात, याचा दिलासा वाटला. आमचंही आयुष्य 'जीवनसाथ'नी समृद्ध केलं.''

स्वतः अनेक प्रकारची प्रशिक्षणं देणारं आमचं एक अत्यंत उत्साही, कृतिशील सभासद जोडपं म्हणालं, ''वैचारिक देवाणघेवाण फार कमी ठिकाणी होते. इथलं पद्धतशीर विश्लेषण आम्हाला खूप गोष्टी शिकवतं. अनिलदादांचे खास खेळ गमतीबरोबर महत्त्वाचे संदेश सहज देतात. तुम्ही दोघं आधी भेटला असतात तर आम्हाला अधिक चांगले नवरा-बायको होता आलं असतं आणि अधिक चांगले पालकही.'' लग्न आणि मुलांना वाढवणं हे प्रत्येकाच्या जीवनातले महत्वाचे प्रकल्प; पण लोक त्यांच्याकडे पुरेशा गांभीर्यानी पाहात नाहीत. आज झट लग्न पट घटस्फोट ही पद्धत होऊ पाहते आहे. अशा वेळी अशी मंडळं समाजात काही नवं घडवत आहेत ही समाधानाची गोष्ट आहे.

तरुणपणी योग्य वयात जीवनसाथमधे नियमितपणे यायला सुरुवात केली तर फारच छान; पण समजा तसं नाही जमलं तर काय करायचं? ताण आधीच निर्माण झाले असले तर? मला वाटतं 'बेटर लेट दॅन नेव्हर.' मध्यमवयीन, वयस्कर असलं म्हणून काय झालं? दोघांची इच्छा असली तर ताण नक्की कमी करता येतील. घालवताही येतील कारण 'विवाहाचं बिघडलेलं यंत्र कुठच्याही अवस्थेत दुरुस्त करायचा प्रयत्न करता येतो.'

अनिल त्याच्या वैयक्तिक समुपदेशनाच्या कामात खूप व्यस्त असतो. लोकांना केवढ्या प्रकारचे किती प्रश्न आहेत हे त्यामुळे कळतं. जेवढे करावेत तेवढे प्रयत्न कमीच पडतील इतकी आपल्या समाजाला समुपदेशनाची गरज आहे हे लक्षात येतं.

असं हे जीवनसाथचं काम, वातावरण आणि फलितं! यातला पुढाकार अनिलचा. माझी इतर कामं सांभाळून मी साथीला असते एवढंच. लोक

रविवारच्या या कृतिसत्रांची वाट पाहात असतात याचं फार समाधान वाटतं.

आमची मुलं लहान होती तेव्हा आम्ही दोघांनी पालक-शिक्षणाचा अभ्यास केला. बऱ्याच पालकांपर्यंत तो पोहोचवला. ती वाढत असताना मला बालभवनच्या निमित्तानं चांगलं काम करता आलं. ती लग्नाची झाल्यावर अनिलनी विवाह-अभ्यास पुढं नेला. आता आम्हाला तीन छोटी नातवंडं आहेत. लहान मुलांची काळजी घेण्याची अधिक चांगली सोय समाजात व्हावी यासाठी खूप काही करायचं आहे. त्या त्या वेळी आपल्या समाजातले जे प्रश्न जाणवतात त्यासाठी काम करणं, हे आम्हाला आमचं कर्तव्य वाटतं. इतरांच्या कामाशीही त्यामुळे भरपूर संपर्क असतो. त्या नेटवर्कचा खूप फायदा होतो.

आम्ही दोघं गेली अनेक वर्षं पुण्यातच राहतो. पुण्याचे गुण, दुर्गुण आम्हाला आपोआपच चिकटलेले असणार. अनिलचं सगळं काम जास्तीतजास्त पुण्यातलंच आहे. बरेच संदर्भ महाराष्ट्र, पुणं, कर्वेनगर या भोवतालचे आहेत हे खरं आहे. हे पुस्तक वाचताना तुम्ही जगाच्या कुठच्याही भागात असलात तरी त्यामुळे जागेचे संदर्भ बदलतील. अभ्यासाचे विषय मात्र तेच राहतील.

आत्तापर्यंत स्त्री-पुरुष असमानतेची आयुष्यातली रूपं या विषयावर अनिलला बोलताना मी अनेक वेळा ऐकलंय. जी गोष्ट जमलेली नाही ती एवढ्या लोकांसमोर तपशीलात जाऊन मान्य करण्याचं त्याचं धारिष्ट्य थक्क करतं. जीवनसाथच्या 18 वर्षांच्या प्रवासात एक पुरुष म्हणून अनिलनी स्वतःच्या वागणुकीतदेखील खूप बदल केले आहेत. कायम शिकण्याची तयारी असणं हे त्याचं वैशिष्ट्य आहे.

– शोभा भागवत

अभ्यास मंडळात याविषयी नेमकं काय चालतं

या कल्पनेची थोडक्यात ओळख

मला कल्पना आहे की, विवाह आणि अभ्यास हे दोन शब्द एकापाठोपाठ बोलण्याची कल्पनाही लोक करू शकत नाहीत. मी भाषणं करण्याच्या विरुद्ध आहे कारण त्याचा काही उपयोग होत नाही, अशी माझी खात्री झाली आहे. त्यामुळे मी फक्त कार्यशाळाच घेतो. आत्तापर्यंत 500च्या वर ज्या कार्यशाळा घेतल्या त्याविषयी हे लिखाण आहे. यातला प्रत्येक लेख किंवा लेखाचा भाग म्हणजे एक कार्यशाळा आहे असं समजूया. पण त्या विषयाच्या अनेक कार्यशाळांचा गोषवारा इथे आहे. प्रत्यक्षातल्या कार्यशाळा 'पार्टिसिपेटरी' म्हणजे अनौपचारिक आणि प्रश्नोत्तरं पद्धतीच्याच असतात; पण तो मजकूर त्याप्रकारे नाटकातल्या संवादांसारखा लिहायचा तर तो खूप पानांचा होतो. म्हणून ते मुद्दे सलग पद्धतीनी मांडले आहेत.

कार्यशाळांचा मुख्य सूत्रधार बहुतेक वेळा मी असतो. सूत्रसंचालनासाठी आणखी काही लोक तयार करण्याचं काम चालू आहे. सूत्रधारांनी आधी त्या विषयाचा अभ्यास करून माझ्याबरोबर चर्चा करून मुद्दे लिहून तयार ठेवलेले असतात.

अगदी प्रथम माझी या सबंध कामामागची, कार्यशाळेमागची, पुस्तकामागची भूमिका स्पष्ट करतो. ही एक अनेक विषयांची कार्यशाळांची मोठी मालिका चालू आहे अशी कल्पना करून मी ही पुस्तकं लिहिली आहेत. आपण सगळे एका

खोलीत गोलात किंवा समोरासमोर बसलो आहोत आणि प्रत्येक विषयासंबंधी निरनिराळ्या लोकांची निरनिराळी मतं, शंका, गैरसमजुती आपण सगळे ऐकतो आहोत अशी कल्पना केली आहे. जीवनसाथमधला आत्तापर्यंतचा अभ्यास त्याबद्दल काय म्हणतो हे मी सांगतोय, अशी कल्पना मनात धरलीय.

मला कळायला लागल्यापासून गेली 59 वर्षं मी जे आसपासचं जग बघतोय, महाराष्ट्रात, भारतभरात, परदेशात जे अनुभवलंय ते मला आवडलेलं नाही. थोडक्यात, ज्या दिशेनी सबंध भारताचा, जगाचा प्रवास चाललाय ती दिशा मला योग्य वाटलेली नाही. कुठच्यातरी निराळ्या पद्धतीनी विचार केल्याशिवाय, मार्ग शोधल्याशिवाय मला धडगत दिसत नाही. ज्याला सध्याची परिस्थिती पसंत नसेल त्यानी ती परिस्थिती बदलण्यासाठी धडपड करावी, नाहीतर मुकाटपणी सहन करावं. मी मुकाटपणी सहन करणाऱ्यांपैकी नसल्यामुळे मी तशी धडपड करतोय, आयुष्यभर केली. त्या सगळ्या प्रयत्नांचा सारांश म्हणजे 'जीवनसाथ'. या अभ्यासाची सुरुवात विवाहाच्या अभ्यासानीच झाली. पुढे मात्र ती सबंध आयुष्याच्या अभ्यासाची संस्था बनली.

मी माझ्या आसपास बघितलं तर मला संतुलित लोकं सहज दिसतच नाहीत. उन्मत्त तरी दिसतात किंवा उदास लोक दिसतात. वागणारे मग्रूर तरी असतात किंवा केविलवाणे असतात.

प्रत्येक पर्वातल्या प्रत्येक काळात समाजाला विचार आणि भावना यांच्या समतोलाचीच गरज असते हे तत्त्व म्हणून सगळ्यांना मान्य असतं. पण पुढे माझ्यासारख्या कोणी म्हटलं की, सध्याचा समाज भावनेच्या बाजूला पार झुकलेला आहे, त्यामुळे या समाजाला विचाराच्या दिशेनी समतोलापर्यंत खेचूया तर ते मात्र मान्य होत नाही. समाज भावनेच्या बाजूला अतिरिक्त प्रमाणात कशामुळे झुकला हे बघायला गेलं तर दोन गोष्टी स्पष्ट दिसतात.

एक म्हणजे प्रत्येक माणूस स्वतःच्या भविष्याची चिंता या एका भावनेमुळे हवालदिल आहे. वरवर बघितलं तर तो गाताना, नाचताना, हसताना, मजा करताना दिसेल. पण ते दृश्य फसवं आहे. माणूस आतून घोर काळजीत आहे. त्या चिंतेच्या भावनेच्या ओझ्यामुळे तो झुकलेला आहे.

दुसरं म्हणजे प्रसारमाध्यमांनी सर्वसामान्य माणसाची बुद्धी किंवा विचार करण्याची क्षमता क्षीण केली आणि त्याच वेळेला अतिशयोक्त भावनांचं भडक

चित्रण करून त्याला भावनेच्या बाजूला आणखी ढकललं. ही दोन्ही कारणं जरी समजली तरी सत्य ते सत्यच आहे. प्रश्न तसाच आहे. समतोलापर्यंत त्याला पोहोचवण्यासाठी स्पष्ट विचारांचं बळ त्याला द्यायला हवं आहे. माझी त्याबद्दल खात्री झाली आहे. मला जर वाटलं असतं की, माणूस फार विचारांच्या दिशेनी झुकला आहे तर मी भावनांच्या दिशेनी त्याला खेचलं असतं कारण शेवटी समतोल हा उद्देश आहे.

या सगळ्या प्रयत्नात दोन मोठ्या अडचणी मात्र आहेत. विचाराच्या दिशेनी खेचणं म्हणजेच विवेकनिष्ठ विचारसरणीमधे खेचणाऱ्याला फार कष्ट आहेत कारण कोट्यवधी लोकांना खेचण्याचा तो लढा आहे. दुसरी अडचण म्हणजे विवेकनिष्ठ विचाराच्या पुरस्कर्त्याला लोक कोरडा किंवा भावनाहीन, असंवेदनशील समजतात. ते खरं नाही हे त्याला स्वतःला माहिती असतं. पण लोकांची तशी गैरसमजूत, उघड किंवा पाठीमागे टीका सहन करावी लागते. थोडक्यात, या कारणांमुळे हा मार्ग लोकप्रिय होऊ शकत नाही.

मी आता 72 वर्षांचा आहे. शोभा 69ची आहे. हे सगळं पुस्तकात उतरवणं शक्य आहे तोपर्यंत लिहिलेलं बरं असं वाटल्यामुळे मी इथे दोन गोष्टींवर भर देऊन लिहायचं ठरवलं.

1. समाजाचं वैवाहिक आयुष्य, त्याखेरीजचं रोजचं आयुष्य, त्यातले समाजाचे प्रश्न आणि त्यावर उपाय.
2. शोभाच्या आणि माझ्या वैवाहिक सहजीवनाचं चरित्र. सहजीवनाचं चरित्र या शब्दाकडे मला लक्ष वेधायचं आहे कारण हे माझं किंवा शोभाचं व्यक्तिगत चरित्र नाही.

या पुस्तकाबद्दलचा एक निर्णय पक्का केलाय तो असा. व्यवस्थापनशास्त्र, मानसशास्त्र, तत्त्वज्ञान या माझ्या अभ्यासातल्या तीनही विषयात मूळच्या अभ्यासातच असे अनेक शब्द आहेत की, त्यांचं ओढूनताणून मराठी भाषांतर करण्याच्या फंदात न पडणं चांगलं. काही भाषांतरित शब्द सोपे, काही आधीच प्रचलित असलेले आहेत ते वापरले. बाकीचे खुशाल देवनागरी लिपीत इंग्लिश शब्द वापरायचे असं ठरवलं, कारण हे पुस्तक लोकांनी वाचावं, त्यांना ते सोपं जावं,

त्यातल्या गोष्टी त्यांनी अमलात आणाव्यात ही इच्छा आहे. मग समजायला कठीण करून कसं चालेल? याबद्दलचे सोपे-कठीण वगैरेचे निर्णय मीच वाचकांबद्दलच्या माझ्या अंदाजानी घेतले आहेत. त्या माझ्या अंदाजात काही चूक आढळली तर नंतर ती जरूर दुरुस्त करीन.

आणखी एक निर्णय घेतला. हे पुस्तक वाचणाऱ्यांपैकी कॉम्प्युटर वाचणाऱ्यांचं प्रमाण जास्त असेल असं मला वाटतंय. त्यामुळे जीवनसाथच्या वेबसाईटवरून हे सबंध पुस्तक बघता येईल, छापता येईल अशी व्यवस्था करणार आहे. ज्यांना कागदावर छापलेली अक्षरंच सोयीची वाटतात त्यांच्यासाठी छापील पुस्तकाचीही सोय असणार आहे.

मी स्वतः व्यवस्थापनशास्त्र शिकलेलो असल्यामुळे आणि गेल्या अनेक वर्षांमधे तो विषय शिकवल्यामुळे विषयाचे भाग पाडण्याची मला सवय लागली आहे. वाचणाऱ्यांना ते सोयीचं जाईल याबद्दल माझी खात्री आहे.

एक प्रश्न सगळ्यांना पडेल त्याचं आधीच स्पष्टीकरण करतो. आपलं म्हणणं थोडक्यात मांडावं अशी शिफारस मी अनेक वेळा ठिकठिकाणी केली आहे, तर मग जीवनसाथ म्हणजेच जीवनभर स्पष्ट विचारांची साथ हा विषय समजावून सांगताना एवढी थोरली 3000 पानं आणि बारा पुस्तकं कशासाठी लिहिली? याचं उत्तर असं आहे. 18 वर्षं एवढ्या निरनिराळ्या लोकांशी बोलताना एक गोष्ट लक्षात आलेली आहे. कुठच्या शब्दांत कुठच्या पद्धतीनी कुठच्या वेळेला कोणाला मुद्दा समजेल याला कुठचाही नियम नाही. तो संवाद साधण्याची तीव्र इच्छा असल्यामुळे माहिती असलेले सगळे मार्ग वापरायचे, असं मी ठरवलं. त्यामुळे मजकूर वाढला.

किती बारकाव्यात शिरायचं, किती सविस्तर सांगायचं याबद्दल माझा विचार तळ्यात-मळ्यात होता. तो पक्का कशामुळे झाला तो प्रसंग सांगतो. सकाळी चार वाजता नियमितपणी रोज उठून मी हे पुस्तक लिहिण्याचं काम करतोय. मधे व्यायाम, रोजचं आवरणं आणि समुपदेशनाच्या ठरलेल्या वेळा हे सांभाळून, किंचित टी.व्ही. बघून मी रोज रात्री 10 वाजता झोपतो. त्यातला व्यायाम मला रोज 3 ते 4 वेळा करावाच लागतो, नाहीतर माझी कंबर, खांदे, मान दुखायला लागतात आणि ही सगळी कामं, लिखाण शक्यच होत नाही. व्यायामाबद्दलच्या अनुभवामुळे माझा निर्णय झाला. कसा ते सांगतो. माझ्या

डॉक्टरांनी मला जे व्यायाम सांगितले त्याबद्दल माझी जराही तक्रार नाही. ते सोपे आणि उपयोगी व्यायाम आहेत. ते व्यायाम त्यांनी मला रोज 6 वेळा करायला सांगितले होते. माझी अडचण निराळीच होती. पहाटे व्यायाम नक्की जमायचा. माझं 'काउन्सेलिंग शेड्यूल' सुरू झालं की, त्यात मला मधे दिवसा व्यायाम शक्यच व्हायचा नाही. थोडक्यात, पहाटे आणि रात्री दोनदाच मला व्यायाम जमायचा. अर्थातच तेवढा व्यायाम पुरायचा नाही. शेवटी मान, खांदे, कंबर दुखायचीच. साधारण दोन महिने मी निरनिराळ्या युक्त्या करून बघितल्या. पण त्यांतली एकही युक्ती उपयोगी पडली नाही. त्रास तसाच्या तसाच.

दोन महिन्यांनंतर मी तोच व्यायाम पहाटे आणि रात्री लागोपाठ दोनदा करायला लागलो. म्हणजे त्याची बेरीज झाली चार वेळा व्यायाम. दोन वेळचा प्रश्न उरला. मग मी त्या व्यायामाचे छोटे भाग केले. दिवसभरातल्या वेळापत्रकात जमतील तसे, तेवढ्या मिनिटांत बसतील तसे तुकड्यातुकड्यांत व्यायाम करत गेलो. या पद्धतीनी कधी पाच वेळा तर कधी सहा वेळा व्यायाम व्हायला लागला. माझा प्रश्न सुटला. मला त्यासरशी साक्षात्कार झाला की समुपदेशनार्थींचा प्रश्न, दिनचर्या, स्वभाव, कौटुंबिक प्रश्न, सगळ्या गोष्टी लक्षात घेऊन उपायांचे पर्याय सविस्तरपणी मांडले तरच त्याला त्याचा खरा उपयोग होतो. माझे गेले तसे दोन महिने त्रास सोसत वाया जात नाहीत. त्यामुळे या कार्यशाळेत म्हणजेच या पुस्तकात एकदम बारकाव्यात सविस्तर सांगायचं हा निर्णय एकदम पक्का झाला.

ही कार्यशाळा घेताना, हा मजकूर लिहिताना मला अनेक भूमिकांच्यात शिरावं लागणार आहे. दोन मुख्य भूमिका म्हणजे समुपदेशक आणि ज्येष्ठ अभ्यासू मित्र. पुन्हा या दोन भूमिकांमधून बोललेल्या, लिहिलेल्या मजकुराची सरमिसळ होणार हेही निश्चित आहे. कधी मित्र म्हणून गमतीगमतीत एखादी गोष्ट सांगितलेली असेल, तर कधी माझा समुपदेशनातला गंभीर अभ्यास त्यात डोकावेल.

समुपदेशन या सबंध विषयाविषयी खूप गैरसमजुती आहेत. वेड लागलेल्या माणसाला वेड्यांच्या हॉस्पिटलमधे ठेवतात ही गोष्ट सगळ्या भारतीयांच्या मनावर थेट कोरलेली आहे. समुपदेशकाकडे देखील वेड लागलेली माणसंच जातात असा त्यांचा विश्वास असतो. त्यामुळे समुपदेशकाकडे जायचा विषय निघाला की, 'वेड लागलंय का?' हा प्रश्न लोकांच्या मनात असतो. ज्याला समुपदेशन म्हणजे काय हे समजलं त्याचा बरोब्बर उलटा प्रश्न असतो, 'इतका त्रास होतोय तरी

अजून तू समुपदेशकाकडे गेला नाहीस? असा वेडेपणा करू नकोस.'

समुपदेशन या विषयाच्या अंतरंगाच्या पसाऱ्याची लोकांना कल्पना नसते. जीवनसाथमधे 60 विषयांची यादी आम्ही वापरतो. त्यांच्यापैकी विषय निवडण्याचं काम सभासदच करतात आणि दर महिन्याच्या पहिल्या रविवारी एक एक विषय गटचर्चेसाठी ठेवतात. लोकांना पडलेला प्रश्न असा असतो की, आयुष्यात एवढ्या साठ विषयांचा संबंध खरोखर येतो का? माझ्या दृष्टीनी निश्चित येतो. माझ्या 72 वर्षांत माझा तर त्यातल्या प्रत्येक विषयाचा संबंध आला बाबा! खरं म्हणजे प्रश्नांची म्हणजेच विषयांची यादी आणखीन वाढेलच.

आणखी एक प्रश्न अनेकांच्या मनात असतो. प्रत्येक व्यक्तीचा स्वभाव निराळा असतो. प्रत्येकाचा प्रश्न स्वतंत्र आणि खासच असतो. घडणाऱ्या घटनाही निराळ्याच आणि खास असतात. चांगल्या घटना आणि वाईट घटना दोन्ही त्या त्या व्यक्तीलाच फक्त तपशीलातल्या बारकाव्यासकट माहीत असू शकतात. मग निराळीच कुठचीतरी त्रयस्थ व्यक्ती तो प्रश्न कसा सोडवू शकेल? याचं खरं उत्तर असं आहे की, जगाची लोकसंख्या कितीही असली तरी व्यक्तिमत्त्वाचे प्रकार मोजकेच असतात. चांगल्या आणि वाईट घटनांचेही मोजकेच प्रकार असतात. समस्यांचंही तसंच असतं. व्यक्तिमत्त्वाचे, घटनांचे आणि समस्यांचे या तीन गोष्टींच्या प्रकारांची सांगड कशी घालायची हे समुपदेशकाला माहिती असतं. तेवढी दिशा त्यांनी दाखवली की, प्रश्न सुटण्याच्या दिशेनी एक एक पाऊल पडायला लागतं. समुपदेशनार्थींनी अभ्यास मात्र मनापासून करावा लागतो. अगदी कॉलेजमधे असताना जसा विषय, त्यातले मुद्दे, त्यांचा क्रम, त्यांची प्रश्नोत्तरं, त्यांबद्दल चर्चा, पडताळणी, लिखाण असतं तसं सगळं करावं लागतं.

मी व्यवस्थापनशास्त्र अमेरिकेत शिकलो ते बांधकामापुरतं. त्या ज्ञानाचं भारतीयीकरण केल्याशिवाय त्याचा इथे उपयोग नाही, हे मला पदोपदी जाणवलं. तेवढं केल्यावर मात्र व्यवसायात त्याचा खूप फायदा झाला. माझ्या आणि शोभाच्या वैवाहिक आयुष्यासाठी, कुटुंबासाठी उपयोगी असं त्यात फारसं नव्हतं. ते कसं शोधायचं याबद्दल माझ्या सुप्त मनात सतत विचार चालू होता. मी त्या माझ्या प्रयत्नांना 'रिलेशन्स मॅनेजमेंट' असं म्हणायचो. या नावाची काही लोक टिंगल करायचे. ते म्हणायचे, 'जी रिलेशन्स मॅनेज करावी लागतात त्यांच्यात अर्थच काय?' खरं असंय, मला शोभाशी बोलताना देखील कुठच्या शब्दांत,

केव्हा, कसं याचा विचार करावा लागतो. ती ‘मॅनेजमेंट’च आहे आणि त्यात वाईट काहीच नाही. पुढे जाऊन मला वाटतं मॅनेज करावं लागत नाही, असं रिलेशनच नसतं.

पुढे अनेक वर्षांनी वैवाहिक समुपदेशन या विषयात पीएच.डी. करायची ठरवून मी मानसशास्त्राच्या मार्गानी गेलो. मानसशास्त्रामधे समोर आलेली ‘थिअरी’ प्रचंड होती. काही गोष्टींचा खोलवर अभ्यास आणि बाकीच्यांचा तुलनेनी वरवर अभ्यास असं ठरवावंच लागलं. मी पूर्वी शिकलेल्या व्यवस्थापनशास्त्रातल्या अनेक मुद्द्यांचा निराळा अर्थ मला दिसायला लागला. त्यामुळे पीएच.डी. ‘थीसिस’ लिहिताना मानसशास्त्र आणि व्यवस्थापनशास्त्र या दोन्हींचा उपयोग विवाहानंतरच्या आयुष्यात कसा करता येईल याच्या मागे मी लागलो. त्यावेळेला सारखं मनात यायला लागलं की, सगळ्या शास्त्रांच्या, ज्ञानाच्या मुळाशी तत्त्वज्ञान आहे. त्यामुळे तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला पाहिजे. ‘थीसिस’मधे ते शक्य नव्हतं. कारण ठरलेल्या वेळेत आणि पृष्ठसंख्येत ते बसलं नसतं. त्या ‘थीसिस’मधे मी माझ्या स्वतःच्या काही कल्पना मांडल्या. गंमत म्हणजे त्यावर जो रिपोर्ट लिहून आला त्यात संशोधन करणाऱ्यानी मी स्वतःची कल्पना मांडली त्याबद्दल टीका केली होती. स्वतःचं डोकं चालवणं याला ‘ॲकॅडमिशियन्स’च्या जगात वाईट समजतात हे मला त्यावेळी थप्पड खाल्ल्यासारखं कळलं. मी तर ‘सेल्फ मेड’ आणि ‘अप्लाइड’ प्रकारचा माणूस आहे. मी त्याला मान झुकवली नाही. माझ्या दृष्टिकोनातून आत्तापर्यंत थोर लेखकांनी, संशोधकांनी म्हटलं तेच मानत राहणं, बोलत, शिकवत राहणं, यापेक्षा स्वतःचा विचार मांडणं जास्त चांगलं आहे.

त्यामुळे मी साधारण सहा-सात वर्षांपूर्वी ‘विवाहाचं आणि एरवीच्या आयुष्यातलं तत्त्वज्ञान’ या विषयाच्या मागे लागलो. मला हवं ते कुठे सापडेना. तत्त्वज्ञानाच्या प्राध्यापकांशी बोललो. ‘वैवाहिक आयुष्याचं तत्त्वज्ञान’ असा स्वतंत्र अभ्यास झालेला नाही असं कळलं. मग मीच त्या गोष्टी वाचून, माझ्या पद्धतीनी मांडायच्या ठरवल्या. मी ‘हार्डकोअर फिलॉसॉफी शिकवणारा ॲकॅडेमिशियन’ नसल्यामुळे मी जे या पुस्तकात मांडलंय ते तत्त्वज्ञानातल्या विद्वान, अनुभवी लोकांच्या दृष्टिकोनातून अर्धवट आणि निराळंच किंवा विक्षिप्त असू शकेल; पण आता मी थांबायला तयार नाही. मी मांडतो ते उपयोगी आहे याबद्दल मला शंका नाही, कारण मी ते अनेक वेळा बोलून, मांडून बघितलंय आणि तरी मी यामधे

कुठच्याही दुरुस्तीला तयार आहे. मी स्वतः कुठे कमी पडतो याचा माझा शोध अखंड चालूच आहे. तेव्हाच तर माझ्या वागणुकीत दुरुस्ती होईल. या पुस्तकात मी कसा कसा बदलत गेलो त्याचीच कहाणी आहे म्हटलं तरी चालेल.

स्वतःला स्वतःबद्दल नीट कळणं ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. कारण स्वतःच्या शोधाची प्रक्रिया समजली की, इतरांना समजणंही सोपं जातं. ते जमलं की बऱ्याच बाबतींतले छुपे/उघड संघर्ष संपतात, निदान कमी होतात आणि शेवटी माणूस मनःशांतीपर्यंत पोहोचण्याची शक्यता हळूहळू वाढत जाते.

प्रत्यक्ष अनुभवानंतर माझी खात्री झालीय की, लोकांना समजणं हाच काहीही समजावून सांगण्याचा मुख्य उद्देश आहे. तीच सांगणाऱ्याची खरी परीक्षादेखील आहे. त्या दोन्हींच्या वापराचं म्हणजे थिअरी आणि प्रॅक्टिसविषयी बोलण्याचं माझ्या दृष्टीनी प्रमाण थिअरी एक वाक्य, तर प्रॅक्टिसविषयी 100 वाक्यं असं आहे.

मला वाटणारी अगदी मुळातली गोष्ट प्रथम सांगतो. शब्दशः काहीही म्हणजे अगदी काहीही कोणीही करत असलं, तरी त्याचा हेतू दोन शब्दांत वर्णन करता येतो. 'समाधान मिळवण्यासाठी'. इतरांच्या दृष्टीनी ते कृत्य चांगलं, वाईट, 'ग्रेट' कसंही असो, तो माणूस ती गोष्ट स्वतः समाधान मिळवण्यासाठीच करत असतो. लहानपणीचा स्वतःचा खेळ, अभ्यास, धांगडधिंगाही स्वतःला आनंद मिळवण्यासाठीच असतो आणि तरुणांचे वात्रट चाळे, प्रेमप्रकरणं, चांगल्या शिक्षणासाठी केलेली धडपड, करिअरसाठी केलेले प्रयत्नही स्वतःला आनंद मिळवण्यासाठीच असतात. आई-वडलांवर असलेलं प्रेम, आदर, भांडणंही त्यासाठीच आणि अधिक पुढच्या वयातला लग्नाबद्दलचा निर्णयही स्वतःच्या समाधानासाठीच असतो. लग्न न करण्याचा निर्णय असो, अमुक एका व्यक्तीशी लग्न करण्याची कृती असो, शेवटी हेतू एकच. स्वतःच्या मनाविरुद्ध आईवडलांचं मन सांभाळण्याचा निर्णयही शेवटी त्यांचं मन सांभाळण्यामुळे स्वतःला मिळणाऱ्या समाधानासाठीच असतो. समाजासाठी निरपेक्षपणी काहीतरी करू हाही निर्णय स्वतःच्या समाधानासाठीच असतो. इतरांचा फायदा हे त्याचं 'बाय प्रॉडक्ट' असतं.

थोडक्यात, हा सगळा माझा प्रयत्न समाजाच्या जगण्याचा दर्जा सुधारण्यासाठी म्हणजेच 'क्वालिटी लाईफ'साठी आहे. जीवनसाथचं सगळं काम 'प्रिव्हेंटिव्ह' काउन्सेलिंगवर भर देणारं आहे. पण आपल्या समाजात 'क्युरेटिव्ह' कामच जास्त

लोकप्रिय आहे आणि मानसिक अस्वास्थ्याच्या बाबतीत काहीच न करता नुसतं सोसणं त्याहून लोकप्रिय आहे. त्याच्याहीपेक्षा वरच्या नंबरवर लोकप्रियतेच्या शिखरावर जोडीदाराला किंवा मुलांना छळणं आहे. त्याबद्दलचं हे प्रबोधनाचं प्रिव्हेंटिव्ह काम आहे.

लोकांचे अनेक प्रश्न असतात. त्या प्रश्नाचं मूळ शोधायला गेलं तर त्याची मुळं त्यांच्या लहानपणाच्या वाढीत सापडतात. लहानपणी त्यांची वाढ चुकीच्या पद्धतीनी झालेली असते. म्हणजेच पालकांची वागण्यात चूक झालेली असते. त्या पालकांच्या वागण्यातल्या चुकीची कारणं शोधली तर ती त्यांच्या सह-जीवनात सापडतात. त्या कारणांच्या आणखी खोलात शिरलं की स्वावलंबन आणि आत्मसन्मान याचा संबंध, खरा अर्थ, हे चुकतच नाही. नवराबायको दोघांच्यामधलं लोकशाहीचं मूल्य, स्त्री-पुरुष समानतेची समज हे विषयही महत्त्वाचे ठरतात. या पुस्तकात मी त्याच्या शक्य तेवढ्या खोलात जायचा प्रयत्न केला आहे.

माझा दृष्टिकोन कायम विवेकनिष्ठ बुद्धिवाद्याचा आहे. बुद्धी शब्दावरून आमच्याकडे नेहमी गंमत चालते. मी कुठलाच धर्म मानत नाही, हे सगळ्या जीवनसाथींना माहिती आहे. माझ्या विवेकवादाला ते ‘बुद्धिझम’ म्हणतात. तो गमतीचा भाग तात्पुरता सोडला तरी एक गोष्ट नक्की. विवेकनिष्ठ विचारांनी सहजीवनाकडे बघता आलं तरच उपाय सापडेल. म्हणून सहजीवनाबद्दल काहीतरी करता येतं का बघूया. त्यासाठी या पुस्तकसंचाचा महाप्रपंच.

महत्त्वाची गोष्ट अशी आहे की, माणसाला कुठचाही प्रश्न असो, त्यावरच्या उपायाला सुरुवात झाली किंवा केली तरी स्वस्थ वाटतं.

●

स्वावलंबन, आत्मसन्मान

●

स्त्री-पुरुष असमानतेची रूपं

जीवनसाथ

जीवनभर स्पष्ट विचारांची साथ म्हणजेच जीवनसाथ

अनुक्रम

पुस्तक क्र. 6

●●●

1

स्वावलंबन आणि आत्मसन्मान

1) लेखामागची मूळ कल्पना

माझा आत्तापर्यंतचा अभ्यास मला सांगतो की, स्वावलंबन आणि आत्मसन्मान हे निराळे शब्द असले तरी त्यांचा संबंध इतका जवळचा आहे की, स्वावलंबन म्हणजेच आत्मसन्मान असं म्हटलं तरी चालेल. आजच्या या कार्यशाळेसाठी जमलेल्या सगळ्यांना अशी विनंती आहे की, त्यांनी या बाबतीत स्वतःचं नेमकं काय झालं, त्याविषयी मोकळेपणी बोलावं. स्वावलंबनाविषयी मी केलेला अभ्यास मी सांगीन; त्या त्या संदर्भात माझी स्वतःची काय परिस्थिती होती, आहे, ते सांगीनच. या विषयाबद्दल तरीदेखील खूप शंका असतील. त्यापैकी बहुतेक शंकांची उत्तरं माझ्याकडे असतील. काही प्रश्नांचा माझाही शोध चालू असल्यामुळे उत्तरं नसतील.

स्वावलंबन हा विषय अतिशय महत्त्वाचा आहे, पण त्याचा पद्धतशीर अभ्यास एरवी होत नाही. तो इथे जीवनसाथमधे होतो. अगदी लहानपणापासून स्वावलंबन ही तर मानवाची गरज आणि इच्छा आहे. ती नैसर्गिक ऊर्मी आहे आणि त्यातच आनंदही आहे. नैसर्गिकपणी माणसाला प्रत्येक गोष्ट स्वतःलाच करावीशी वाटते. तीच सहजप्रेरणा असते.

नैसर्गिक विधी म्हणजे शू, शी या गोष्टी तान्हं मूल करतं तेव्हा त्याची सफाई ही कल्पना मुलाची नसते, सांभाळणाऱ्या मोठ्या माणसाची असते. भुकेसाठी आईच्या अंगावरचं दूध तान्हं मूल स्वतः पितं. त्यासाठी त्याला जे कष्ट

करावे लागतात ते मूल स्वतःहूनच करतं. इथून स्वावलंबनाला सुरुवात होते.

लहानपणी एक-दीड वर्षाचं मूल सगळ्या गोष्टी प्रथम स्वतः करायला बघतं. दुसरं कोणीतरी, कुठचीतरी कृती आपल्याऐवजी करेल असं त्या मुलाच्या डोक्यात येत नाही. जी वस्तू आवडेल तिकडे रांगत, चालत जाणं हे मूल आपणहून करतं. इतर कोणीतरी ती आपल्याला आणून देईल आणि आपण आहोत तिथेच बसून राहू, हा विचार मुलाच्या मनात येत नाही. ती चुकीची कल्पना बाकीचे मुलाच्या मनात भरवतात आणि त्याला परावलंबित्वाचे धडे मिळायला लागतात.

परावलंबित्वाच्या एवढ्या तगड्या शिक्षणातूनही काही छोटी किंवा मोठी माणसं मूळची नैसर्गिक प्रेरणा शाबूत ठेवू शकतात. सगळ्या कृती स्वतः कराव्यात असं त्यांना बरेच वेळा आतला आवाज सांगत असतो. स्वतःला काय आवडतं याचाही शोध नैसर्गिकपणी अखंड चालू असतो. काही गोष्टी मनात येतात, पण शब्दात मांडता येत नाहीत. तेवढी भाषा तयार नसते.

मला अगदी लहानपणापासून सौंदर्याचा ध्यास होता. मी तेव्हा ते अर्थातच बोललो नव्हतो, पण मला असुंदरतेचा तिटकारा होता. मी त्या विचाराचं आता वर्णन करू शकतो. मला वाटायचं की, कुठचीही गोष्ट असली तरी सुबकच हवी. त्यासाठी धडपड करून मला समाधान मिळायचं. स्वतःच्या समाधानाचा प्रयत्न करणं आणि ते समाधान मिळणं हा आत्मसन्मानातला महत्त्वाचा भाग आहे.

स्वतःचं समाधान झालंच पाहिजे, त्याचबरोबर सगळ्या कृतींमागचं आणखी एक तत्त्व अगदी साधं आहे. 'दुसऱ्या कोणाला स्वतःमुळे त्रास व्हायला नको'. तीही नैसर्गिक प्रेरणाच आहे. थोडक्यात स्वतःलाही त्रास होता कामा नये आणि दुसऱ्याचंही समाधान व्हायला हवं.

●

2) समाजाची सध्याची परिस्थिती

पुढच्या आयुष्यात कुठच्यातरी टप्प्यावर स्वतःचं काम दुसऱ्यानी करण्याचा विकृत आनंद माणसाला समजायला लागतो. इथला विकृत शब्द अनेकांना खटकेल, याची मला कल्पना आहे. दुसऱ्यानी आपलं काम करणं आणि स्वतः आपल्या करवून घेण्याच्या कसबाविषयी धन्यता मानणं हा मानगुटीवर बसलेल्या औद्योगिकीकरणाच्या भुताचा चमत्कार आहे. संपूर्ण स्वावलंबी असणं हे कठीण आहे, पण अतिशय श्रेष्ठ आणि आनंददायी आहे. हे विधान सध्याच्या काळात समजणं, पचणं कठीण आहे, पण तेच अंतिम सत्य आहे.

मुळात सबंध जगात विशेषतः भारतात स्वावलंबन हा सद्‌गुण आहे का दुर्गुण, हेच ठरत नाहीय. स्वावलंबनाशीच आत्मसन्मान जोडलेला असल्यामुळे तो सुद्धा सद्‌गुण का दुर्गुण हा तत्त्वज्ञानातला एक महत्त्वाचा प्रश्न मानला आहे. याबद्दलचं व्यक्ती म्हणून माझं मत पक्कं झालं असलं तरी आपल्या भारतीय वातावरणात हा निर्णयच अजून होत नाहीय. तो देश पातळीवर, राज्य पातळीवर नाही, जिल्हा, शहर पातळीवर नाही आणि कुटुंब पातळीवरही तीच स्थिती आहे. आपल्यासारख्या सर्वसामान्य माणसाचा जास्त संबंध कुटुंबातल्या स्वावलंबनाशीच येणार हेही स्पष्ट आहे.

शहर पातळीवरचं एक मोठं उदाहरण सुरुवातीलाच देतो. त्यामुळे समाजाची स्वावलंबनातली स्थिती लख्ख दिसते. भारतातल्या सगळ्या मोठ्या शहरांमधली 'झोपडपट्टी निर्मूलनाची' कहाणी तुमच्या-आमच्या, सगळ्यांच्या माहितीची आहे. झोपडपट्टीत राहणाऱ्यांना नवीन ठिकाणी जागा, ओटे, घरं, जमिनी देणं अशी योजना बनते. सगळे लोक नवीन घरं ताब्यात घेतात, थोड्याच काळात ते नवीन घर भाड्यानी देतात आणि स्वतः जुन्या झोपडीत राहायला लागतात. शेवट काय? दुप्पट झोपड्या तयार होतात. मी नगररचनाशास्त्र शिकलेलो असल्यानी अगदी खात्रीनी सांगू शकतो की स्वावलंबनानी, घरमालकानी स्वतः मेहनत करून, आत्मसन्मान शाबूत ठेवून कष्टकऱ्यांना मदत म्हणून घरांची काही योजना केली तरच ती यशस्वी होते. एरवी नाही. अनेक ठिकाणी असे प्रयोग यशस्वीही झाले आहेत. त्यापासून आपण शिकायला मात्र तयार हवं.

●

3) इतर सजीव सृष्टी, वनस्पती, प्राणी आणि मानव

स्वावलंबनाचा विचार करताना इतर सजीव सृष्टीकडे एक नजर टाकली तर फायदा होतो. वनस्पतींमधे दोन्ही प्रकार आपल्याला दिसतात. काही रानटी वनस्पती असतात त्या स्वतः उगवतात, हवेतूनच बाष्प शोषून घेतात, कोणाचीही मदत न घेता स्वतःहून वाढतात. त्या वनस्पतींना स्वावलंबी म्हणूया. काही वनस्पतींना जपावं लागतं, पाणी घालावं लागतं, आधार द्यावा लागतो. त्यांना परावलंबी म्हणता येईल, पण अशा फार कमी असतात.

जलचरांमधे, माशांमधे जन्म झाल्या क्षणापासून प्रत्येक जलचर स्वावलंबी असतो. कीटकांचंही जवळजवळ तसंच असतं. पक्ष्यांच्यात परावलंबित्वाचा काळ थोडा असतो, पण असतो. इतर अनेक प्राण्यांचं आयुर्मानही कमी असतं. आपल्या नेहमीच्या ओळखीचे पाळीव प्राणी म्हणजे कुत्रा, मांजर, शेळी, गाय, म्हैस यांच्या पिल्लांचं परावलंबन फार फार तर काही महिने असतं. काही प्राण्यांचं अगदीच दोन-तीन दिवस तर काहींचं काही तास.

एक गोष्ट आपल्याला पूर्णपणी मान्य आहे की, मानवाचं मूल जन्मल्यापासून जितका काळ परावलंबी असतं, तो काळ इतर प्राण्यांच्या तुलनेत फार जास्त असतो. एक गोष्ट निरीक्षणात स्पष्ट दिसते की, ज्या प्राण्याची बौद्धिक क्षमता जास्त, त्या प्राण्याचा परावलंबित्वाचा काळ जास्त असतो. त्या नियमाप्रमाणे मानवाचं मूल स्वावलंबी व्हायला खूप वर्षं लागतात.

त्यामधेही असं आढळतं की, आपल्या मध्यमवर्गीय घरातल्या मुलांपेक्षा कष्टकरी वर्गातली मुलं लवकर स्वावलंबी होताना दिसतात. आमच्या बांधकामाच्या साइटवर 5 वर्षांच्या मुलानी काहीतरी बारीकसं काम केलेलं आणि थोडेसे पैसे मिळवलेले मी बघितले आहेत. बाल कामगारांबद्दलच्या कायद्याला माझा विरोध नाही, पण अशा मुलांचं मला नेहमी कौतुकच वाटायचं.

●

4) स्वावलंबन आणि पालकत्व

पालकत्वातली काही निरीक्षणं सांगतो. मध्यमवर्गीय समाजापुरतं बघितलं तर अगदी तान्हेपणी पूर्णपणे परावलंबी असलेलं मूल हळूहळू जे बदलायला लागतं त्याचे टप्पे ठरलेले असतात. पालकांना स्पष्ट शब्दात कळो न कळो, पण मुलाचं पालनपोषण, शिक्षण, खेळ या सगळ्याचा मूळ उद्देश मुलाला 'स्वावलंबी' बनवणं हाच असतो. लहानपणी मूल स्वतःच्या हातानी जेवढ्या लवकर खायला लागेल, शी धुवायला लागेल, स्वतः आंघोळ करायला लागेल, कपडे घालायला लागेल तेवढं चांगलं. जरा घाण, पसारा, गैरसोय झाली तरी पालकांनी त्याला महत्त्व न देता उत्तेजन द्यायला हवं.

या कार्यशाळेत आणि पुस्तकसंचात पालक-शिक्षण याविषयी आपण स्वतंत्रपणी बोलणार आहोत, पण इथे एकच उदाहरण घेतो. लहान मूल वाढत असताना अडखळतं आणि पडतं. या मुलाशी वागण्याचे दोन प्रकार असतात. एक म्हणजे धावत जाऊन मुलाला उचलून पलंगावर झोपवून ठेवून त्याचे फाजील लाड करणं. दुसरा प्रकार म्हणजे खूप लागलेलं नाही ना एवढं तपासून त्याला शांत करणं. शक्य असलं तर जेवढ्या लवकर मूल जी गोष्ट करत असेल ती चालू ठेवायला प्रोत्साहन देणं. दोन्ही प्रकारांत मुलाला काहीतरी संदेश मिळतो, काहीतरी संस्कार होतो. पहिल्या प्रकारात थेट परावलंबनाचा संस्कार होतो तर दुसऱ्या प्रकारात स्वावलंबनाचा संस्कार होतो.

खुद्द माझ्या बाबतीत सांगायचं तर लहानपणी माझ्यात जी स्वावलंबनाची नैसर्गिक ऊर्मी असेल ती पालकांनी आणि शाळांनी मिळून मारून टाकली. माझ्या आई-वडलांचं माझ्यावर प्रेम होतं पण त्यांना योग्य पालकत्वाची समज नव्हती. कौशल्य तर नव्हतंच नव्हतं. मी माझ्या स्वतःच्या फायद्यासाठी स्वतः शाळेतला अभ्यास करायला हवा होता, तो तर केला नाहीच, पण आई-वडलांनी सांगूनही केला नाही.

शोभा आणि मी पालकांना हा विषय नियमितपणी शिकवतो. मुलाला स्वावलंबी बनवायचं हे सबंध पालक शिक्षणाचं मर्म आहे हे शब्द सगळ्या पालकांना ऐकू येतात, पटले असं ते म्हणतात, फक्त एका गोष्टीचा अपवाद

करून. ‘अभ्यास.’ या एका अपवादामुळे खूप मोठा घोटाळा होतो. ‘प्ले-ग्रुप’ शब्दाचा अर्थच ‘खेळ-वर्ग’ असा आहे. पण पालक शाळेला हट्टानी अभ्यास शिकवण्याची मागणी करतात आणि घोटाळ्याला सुरुवात होते. शाळा धंदाच करायला बसलेली असल्यामुळे ‘मागणीप्रमाणे पुरवठा’ करते आणि अभ्यास या एका महत्त्वाच्या विषयातल्या स्वावलंबनाचा प्रवास सुरूच होत नाही. शाळेत शिक्षक फक्त अभ्यासाच्या मागे लागतात, घरी पालकांना वेळ असला तर ते अभ्यासासाठी मुलांना छळतात, पालकांना वेळ नसला तर ते मुलांना क्लास लावतात. या सगळ्या प्रकारात ‘अभ्यासाची गोडी लागणं’ हा मुख्य विषय राहून जातो. छळ मात्र चालू राहतो.

या सगळ्या जाळ्यातून सुटून एखाद्या विद्यार्थ्याला अभ्यासाची गोडी लागली तरच तो स्वतःहून अभ्यास करतो आणि खरा स्वावलंबी बनतो. अशी मुलं नशीबवान आणि त्यांचे पालकही नशीबवान. अशा खास नशीबवान पालकांपैकी आम्ही दोघं होतो. आमच्या मुलांचा आम्ही कधी अभ्यास घेतला नाही आणि तरी दोन्ही मुलं भरपूर शिकली, समाधानी आयुष्य जगतायत.

मुलांच्या शाळेच्या वयात खेळाबद्दलचं सर्वांत चांगलं धोरण असं असावं. मुलाला जास्तीत जास्त प्रकारचे, निरनिराळ्या प्रकारचे मैदानी खेळ खेळू द्यावेत. त्या खेळांच्या वर्गांची फी भरणं मध्यमवर्गीयांना परवडते. त्यामुळे त्यांनी मुलांसाठी तेवढं करावं. मुलानी स्वतःच्या आवडीनी खेळ निवडलेला असला की पुढे त्या खेळासाठी मेहनत घेण्यात मूल स्वावलंबी बनतं हा मुख्य फायदा.

पुढे मुलांना कॉलेजमधला अभ्यास स्वतःच करावा लागतो. स्वावलंबनाशिवाय दुसरा मार्गच खरं तर नसतोच. नापास होणाऱ्याला पालकांनी मदत करायची ठरवली तरी उपयोग शून्य. एखाद्याला नोकरीवरून काढलं तर बायको काही करू शकत नाही, नि वैवाहिक आयुष्यात बेबनाव झाला तर सासर-माहेरची लोकं नवऱ्याला किंवा बायकोला त्यापासून वाचवू शकत नाहीत. प्रश्न सोडवायची धमक त्या माणसात स्वतःमधेच असावी लागते. ही धमक वाढवणं म्हणजेच स्वावलंबनाचे धडे. त्याचा प्रवास मात्र मोठा आहे. लहानपणापासून स्वतःचे निर्णय स्वतः घ्यायची सवय असली तर मधल्या प्रवासात मदत नक्की मागता येते आणि मग मोठेपणी मदतीची गरजच भासत नाही. आता मूळ प्रश्नाचं उत्तर यातच आहे. मदत शक्यतोवर मागायचीच नाही असं समोरच्यानी ठरवलं तर तुम्ही मदत करणार कशी? हे वर्णन चांगलं आहे का वाईट हे भारतीय समाजाचं

ठरत नाहीय, हा प्रश्न आहे.

मुलं आपल्यावर अवलंबून असली तर आनंद वाटणारे अनेक आई-बाप आपल्या आसपास आहेत. असे पालक खरं तर मुलाच्या स्वावलंबनाच्या प्रवासामधलं विघ्न बनतात. हे असं विघ्न स्वतः बनायचं नाही एवढं तर आपण ठरवू शकतो! पुढे मुलं आणखी मोठी होतात. स्त्री-पुरुष आकर्षण हा विषय त्यांच्या डोक्यात चालू होतो. तरीही मूळ मुद्दा माझ्या दृष्टीनी तोच राहतो. पालकांनी स्वतः विघ्न बनायचं नाही.

माझ्या लहानपणी वैचारिक स्वावलंबन आमच्या घरात होतं. अमुकच कर असं कधीच कोणी म्हणालं नाही. त्याचा चांगला परिणाम झाला. मी अभ्यास करायला लागलो आणि शाळेत माझी चांगली प्रगती दिसायला लागली. संपूर्ण नालायक आणि बिघडलेल्या मुलापासून मी आत्मनिर्भर, जबाबदार मुलगा झालो. तेव्हा मी साधारण 13 वर्षांचा होतो. मी माझे विचार मांडायला लागलो. मी बंडखोर तर होतोच. मग घरातला वैचारिक पुढारी बनलो. अनेक विषयांवर वादविवादांना मी सुरुवात केली. त्या काळात मी वैयक्तिक पातळीवरचे वाद घातले, ही मात्र मी चूक करत होतो. ते मला कळत नव्हतं.

कॉलेजच्या वयातही मला स्वावलंबनाच्या वातावरणाचा फायदाच झाला. स्वतःचा अभ्यास मी स्वतः करायचोच. त्याची तंत्रंही स्वतःच शोधून काढायचो. आमच्या घरातल्या वातावरणामुळे मुलींशी मैत्रीचं स्वातंत्र्य होतं. माझ्या आई-वडलांना त्याबद्दल पूर्ण मार्क द्यायला हवेत. याचा परिणाम म्हणून प्रेमप्रकरणाचं स्वातंत्र्य होतं, प्रेमभंगांचंही होतं. स्त्री-पुरुष आकर्षण या महत्त्वाच्या विषयात आई-वडलांनी मुलांना स्वावलंबी बनवणं माझ्या दृष्टीनी फार महत्त्वाचं आहे. स्त्री-पुरुष आकर्षण या विषयाच्या आयुष्यातल्या अभ्यासक्रमात काही प्रेमप्रकरणं, काही प्रेमभंग हे महत्त्वाचे धडे असतात. तेवढा अभ्यासक्रमाचा भाग मी व्यवस्थितपणी पूर्ण केला.

मी माझ्या 20व्या वर्षी कॉलेजचं शिक्षण संपवून नोकरी करायला लागलो. पैसे मिळवून घर चालवायला मदत करायला लागलो. एका सकाळच्या कॉलेजमधे शिकवायलाही लागलो. तरुण वयातच कार ड्रायव्हिंग शिकलो. मला त्यातलं उपजत कौशल्य आहे असं लक्षात आलं. पुढे आयुष्यभर मला उत्तम ड्रायव्हिंग येण्याचा फायदा झाला. मला वाटतं, ‘टू व्हीलर, फोर व्हीलर’ चालवता येणं ही स्वावलंबी बनण्याची एक महत्त्वाची पायरी आहे.

पुढे मी परदेशात जायचा निर्णय घेतला. घरातून तसा पाठिंबा असल्यामुळे अडचण काहीच नव्हती. माझ्या वयाच्या 22व्या वर्षी मी चक्क इंग्लंडमधे नोकरी करायला लागलो. मी केव्हा भारतात परतणार हे मलाच माहिती नसल्यामुळे आई-वडलांना मी माझं आर्थिक स्वातंत्र्य जाहीर करून टाकलं. आई-वडलांशी एकमत असल्यामुळे प्रश्नच आला नाही.

तरुण मुलं विवाहाच्या संदर्भात आम्हाला नेहमी विचारतात – 'आई-वडलांना पसंत नसलेल्या जोडीदाराबरोबर प्रेम जमलं तर पुढे काय करायचं?' खरं म्हणजे लवकरात लवकर ते पालकांना सांगायचं. पटलं नाही तर तर्कबुद्धीनी पटवून द्यायचं. वेळ लागेल तो एक वेळ चालेल. पळून जाऊन लग्न वगैरेमधे 'फिल्मी आनंद' मिळेल, शूरपणा दिसेल, पण त्यात सगळ्यांना त्रासच त्रास आहे.

पालकांचा आणखी एक नेहमीचा प्रश्न असतो – सक्ती केल्यामुळे समोरच्याचं भलं होतं त्याचं काय? क्वचित असं वाटतं हे खरंय. समोरचा द्विधा मनःस्थितीत असतो आणि आपण म्हणतो 'मी सांगतो. तू असं करून टाक.' आपल्याला वाटतं, आपण त्याला सक्ती केली. प्रत्यक्षात आपल्या या सल्ल्याच्या निमित्तानी त्यानी तो स्वतः घेतलेला निर्णय असतो. मनानी आजारी असताना त्याचा विवेक कमी झालेला असतो. अशा वेळी दुसऱ्याच्या हातात निर्णय सोपण्याचा निर्णय त्यांनी स्वतः घेतलेला असतो.

हे सगळं अभ्यास मंडळात आलेल्या समोरच्या सगळ्यांना पटतं. यातल्या बऱ्याचशा गोष्टी प्रत्यक्ष आयुष्यात अमलात सुद्धा येतील. पण एरवी समाजात काय चाललंय? आई-वडील मुलांना ठोकून काढतात. मुलांना अपमान होईल असं बोलतात. इतरांच्या देखत त्यांची लाज काढतात. भाषेतले अलंकारावर अलंकार वापरतात. शाळेतले मास्तर मुलांना वाईट वागवतात. मास्तरांना हेडमास्तरांनी छळलं की ते तो राग मुलांवर काढतात. आजकाल मुलांना पूर्वीइतके मारत नसतीलही पण इतर नवे छळ मुलांच्या वाट्याला येतात. कॉलेजमधेदेखील यापेक्षा फार निराळी परिस्थिती नसते. कॉलेजमधे रॅगिंग असतं. आई-वडील, शिक्षक आणि तरुण यांच्यातली जनरेशन गॅप प्रचंड असते. 'आजकालची मुलं' म्हणत चक्क ज्येष्ठ मंडळी त्यांना निकालात काढतात. घरातल्या, कामावरच्या नोकरांना शिव्यागाळी करणारे, अपमान करणारे सुशिक्षितही दिसतात. या मुलांची लग्न होऊन संसार चालू झाले की, नवरा-बायको एकमेकांची सालं काढतात. बऱ्याच ठिकाणी गुरगुराट करण्यासाठी हक्काचं कोणीतरी हवं म्हणूनच

लग्न केल्यासारखी अवस्था असते. घरोघरी सन्मानच चुलीत घातलेला असतो. आपण जीवनसाथशी संबंध आलेले लोक तरी यात बदल करूया ना! त्याची सुरुवात मात्र स्वावलंबनानी होते.

मध्यमवयीन जोडप्यांना उद्देशून याबद्दल जरा सांगतो. तुमच्या तरुण मुलाचं किंवा मुलीचं उदाहरण घेऊया. मुलगा किंवा मुलगी म्हणतेय की, सध्याचा चालू असलेला कोर्स अपेक्षेप्रमाणे नाही निघाला. त्यामुळे हे वर्ष झालं की, कोर्स, विषय बदलायचा त्यानी निर्णय घेतला आहे. दुसऱ्या योग्य कोर्सची माहिती काढणं चालू आहे. या सगळ्यामधे एक वर्ष वाया गेल्यासारखं वाटेल, पण पुढे फायदा होईल. अर्थात, या निर्णयाची सगळी जबाबदारी त्याची किंवा तिची. तसंच मुलीनी नोकरी बदलायची ठरवली, कारणं सांगितली आणि पूर्ण जबाबदारी तिची हे पण स्पष्ट केलं. काय वाटेल तुम्हाला? मला वाटतं, तुमचं उत्तर असं असेल – 'तिची किंवा त्याची वागणूक स्वतंत्र, जबाबदार, स्वावलंबी असेल आणि त्यामधल्या सगळ्या चांगल्या-वाईट गोष्टींना तोंड देण्यासाठी तो समर्थ असेल तर काहीच अडचण नाही.' अशा उत्तराची अपेक्षा आहे, प्रत्यक्षात काय ते पुढे बघूया.

आता याच तुमच्या स्वतंत्र, जबाबदार, स्वावलंबी आणि समर्थ मुलानी किंवी मुलीनी तुम्हाला सांगितलं की, त्याची आणि तिची अनेक मित्रांशी आणि मैत्रिणींशी चांगली ओळख आहे, पण ती मैत्री कायम ठेवून तिनी किंवा त्यानी निराळ्याच मुलाशी आणि मुलीशी लग्न ठरवलंय. आणि त्यात अशी कल्पना करा की, तो जोडीदार तुमच्या पसंतीला पूर्णपणे उतरलेला नाही. तुमचा मुलगा-मुलगी तुमच्यापासून काहीही लपवत नाहीयत. त्यांनी मैत्री, प्रेम आणि लग्न अशा व्यवस्थित पायरीपायरीनी जबाबदारीनी निर्णय घेतलाय. स्वतंत्र, जबाबदार, स्वावलंबी आणि समर्थ मुलांचा हा निर्णय तुम्हाला ते विचारत नाहीयत. फक्त सांगतायत.

या विषयाचा अभ्यासक म्हणून सांगतो, तुमचे त्या भावी जोडीदाराबद्दलचे जे आक्षेप असतील ते शांतपणी एकदा सांगण्यापलीकडे तुम्ही खरंच काही करू शकत नाही. तेवढं सांगून आणि घाईनी लग्न करू नये एवढी विनंती करून गप्प बसावं हे उत्तम. नव्याण्णव टक्के पालकांना हे कळत असतं की, ज्याचा निर्णय त्यानीच घ्यावा. अशीही शक्यता आहे की, त्यांनी आधी विचारलं असतं, तर तुम्हाला निर्णयप्रक्रियेत सहभागी असल्याचा आणि मान राखण्याचा मोठेपणा

मिळाला असता. पंचाईत अशी आहे की, इतर विषयांमधलं स्वावलंबन आणि जोडीदार निवडण्यातलं स्वावलंबन यात बहुतेकांच्या मनात फरक असतो. मला वाटतं, आधुनिकतेचे संस्कार भारतीयांवर पुरेसे झालेले नाहीत. हीच गोष्ट पाश्चात्त्य जगात झाली तर आई-वडील अजिबात विचलित होणार नाहीत. आत्ता दिसतो तो पारंपरिकतेचा पगडा आहे. दुसरं काही नाही.

●

मुलं आपल्यावर अवलंबून असली तर आनंद वाटणारे अनेक आई-बाप आपल्या आसपास आहेत. असे पालक खरं तर मुलाच्या स्वावलंबनाच्या प्रवासामधलं विघ्न बनतात. हे असं विघ्न स्वतः बनायचं नाही एवढं तर आपण ठरवू शकतो!

5) स्वावलंबन आणि वैवाहिक आयुष्य

वैवाहिक आयुष्यातलं स्वावलंबन हा जास्त गुंतागुंतीचा विषय होतो तो अशासाठी की एकमेकांवर अवलंबून राहण्यासाठीच तर लग्न केलेलं असतं.

स्वतंत्रपणे केलेल्या नातेसंबंधाच्या अभ्यासात आणखी एक दिसतं ते एकमेकांची मदत घेणं. त्यामुळे नातं खूप अर्थपूर्ण आणि मैत्रीचं होतं. यातला 'एकमेकांची' हा महत्त्वाचा शब्द विसरला नाही तरच जवळीक निर्माण होते, हा मुद्दा महत्त्वाचा. स्वावलंबनाचं तत्त्व आणि एकमेकांना जवळीकीसाठी मदत या दोन्हींचा समन्वय साधून वापर करण्याची समज हा तर विवाहाच्या प्रमुख कसरतींपैकी एक विषय आहे.

जीवनसाथ विवाह अभ्यास मंडळात असा एक प्रश्न आम्ही विचारतो – 'अशी कोण व्यक्ती आहे की जिला वेडंवाकडं बोललं, वागवलं तरी चालेल, अपमान केला तरी चालेल?' कोणी म्हणतं, लहान मुलं, कोणी म्हणतं नोकर, कोणी म्हणतं वेडा, भिकारी, कोणी चेष्टेत म्हणतं 'सेल्समन!' एकदा एका कार्यशाळेत एका ग्रामीण मुलानी सिरियसली सांगितलं होतं, 'बायकोला कसंही वागवलं तरी ती काही म्हणत नाही कारण ती पायातली वहाण असते.' ग्रुपमधले ऐकणारे अजिबात गप्प बसत नाहीत. मुलं-मुली सगळे आवाज उठवतात. अगदी नोकरच काय, भिकाऱ्याचा देखील अपमान करून वागवण्याचा हक्क आपल्याला नाही, हे सगळे शेवटी मान्य करतात. हे तर लोकशाहीचं मूलतत्त्वच झालं, पण निराळ्या भाषेत.

अगदी खरं सांगायचं तर एखाद्या व्यक्तीशी मैत्री न करायचा हक्क आहे. असलेले संबंध तोडण्याचा अधिकार आहे. नात्याच्या घटस्फोटाचा पर्याय आहे. पण अपमान करण्याचा अधिकार लोकशाहीच्या मूलतत्त्वातच नाही. 'डिसेन्सी इज द अल्टिमेट व्हॅल्यू' हे लोकशाहीचं 'बेसिक' आहे. एकापेक्षा दुसरी व्यक्ती बुद्धिमान किंवा बुद्दू असू शकते, पण तसं उघड बोलण्याचा अधिकार मात्र नाही. सुंदर, मध्यम, कुरूप, बारीक, जाड, सुदृढ, काळा, सावळा, गोरा असे रूपात फरक असणारच. पण त्याबद्दल हिणवण्याचा अधिकार लोकशाहीत नाही. अमेरिकेतले काळे-गोरे-सावळे असं वर्णद्वेषाचं वातावरण लोकांच्या मनात अजूनही

आहे, पण लोकशाही तत्त्वाला त्याचा उल्लेख मान्य नाही. अगदी मूर्खालाही मूर्ख म्हटलेलं चालत नाही. त्याचा तो अपमान असतो. मोठ्यांनाच काय, अगदी लहान तान्ह्या मुलालाही आत्मसन्मान असतो आणि तो जपावाच लागतो.

आता माझ्या आणि शोभाच्या वैवाहिक आयुष्यात काय झालं, ते मोकळेपणानी सांगतो. तरुणपणी आस्तिकता-नास्तिकता, कर्मकांड विरोध, जातिव्यवस्था, व्रतवैकल्यं, धर्मकल्पना अशा अनेक सामाजिक प्रश्नांवर कडाडून वाद चालायचे. बहुतेक वेळेला काहीतरी बोलून समोरच्याला दुखवलं जायचं. एकमेकांनादेखील. एवढ्या अनेक वर्षांच्यात आमच्या विचारांच्यात फार बदल झालेला नाही. पण मांडणीत मात्र खूप फरक पडला. कारण त्यातलं मुख्य मर्म खूप उशिरा कळलं. ते असं – 'कुठचीही गोष्ट एक माणूस दुसऱ्यानी सांगितल्यावरून करत नाही. तो जेव्हा स्वतः ठरवतो तेव्हाच ती गोष्ट माणूस करतो.' हे लक्षात घेऊन केलेली मांडणी म्हणजे योग्य मांडणी. दुसऱ्याच्या स्वावलंबनाचा, व्यक्तिस्वातंत्र्याचा, आत्मसन्मानाचा विचार करून केलेली मांडणी म्हणजे योग्य मांडणी.

याचा संबंध आणखीन एका गोष्टीशी आहे. तो म्हणजे प्रत्येकाचा स्वावलंबनातला आनंद कळणं. अगदी लहानपणापासून तुम्ही काय काय केव्हा केलंत ते आठवून बघा ना! स्वतः बशीनी दूध पिणं, बुटाची नाडी स्वतः बांधणं, रस्ता एकट्यानी क्रॉस करणं, एकट्यानी सायकल चालवणं, मग स्कूटर, कार चालवणं. एवढंच काय, पहिला स्टेजवरचा कार्यक्रम, पहिली नोकरी, पहिला पगार, या सगळ्या स्वावलंबनाच्या आणि आत्मसन्मानाच्या पायऱ्या आहेत. त्यात त्रास होवो, नुकसान होवो; स्वतः करण्याचा आनंद काही निराळाच.

याशिवाय एक महत्त्वाची गोष्ट आहे. एकमेकांवर खूप प्रेम असलेले नवरा-बायको, मुलांवर अतोनात जीव असलेली आई, वडलांवर माया असलेला मुलगा; कुठच्याही बाबतीत प्रत्येकाच्या दुसऱ्याला मदत करण्याच्या मर्यादा आहेत. आजारपणात दुसऱ्या माणसाची वेदना आपण शेअर करू शकत नाही. दुसऱ्याच्या भावनांवर आपलं काही नियंत्रण नसतं. प्रत्येकाला स्वतःचा श्वास स्वतःलाच घ्यावा लागतो. स्वतःचं पाऊल स्वतःच टाकायचं असतं. स्वतःचं आयुष्य स्वतःला एकट्यालाच जगायचं असतं. हे विधान म्हणजे पाश्चात्त्य व्यक्तित्ववाद नाही. हे चिरंतन सत्य आहे. ज्याला जखम झालीय त्याच्या इतक्या वेदना दुसऱ्याला कशा होतील? यावर हमखास प्रश्न येतोच. म्हणजे काय, दुसऱ्याला अजिबात मदत करायची नाही की काय? मदत अवश्य करायची.

सल्ला द्यायचा. स्वतःला काय वाटतं ते सांगायचं नि निर्णय त्या व्यक्तीवर सोडायचा. सल्ला घ्यायलाही हरकत नाही. पण 'ऐकावे जनाचे करावे मनाचे' ही म्हण अतिशय अर्थपूर्ण आहे, ती कायम लक्षात ठेवायची.

सर्वसाधारण भारतीय कुटुंबांच्यात स्त्रिया पैशांच्या व्यवहारामधे बऱ्याच प्रमाणात परावलंबी असतात. त्याचबरोबर पुरुष घरकाम, स्वयंपाक, मुलांचं संगोपन यामधे परावलंबी असतात. या बाबतीत स्त्रिया आणि पुरुष दोघांनी एकमेकांपासून शिकून स्वतः अधिक स्वावलंबी होण्याची गरज आहे.

एक निराळीच गोष्ट माझ्या निरीक्षणात आहे. आधुनिक आणि पारंपरिक वृत्तींमधला 'स्वावलंबन' हा मुख्य फरक मला दिसतो. भारत आणि पाश्चात्त्य देश यात हा फरक अनेक वर्षांपासून आहे. भारतातल्या उच्च मध्यमवर्गीयांवर इतर अनेक पाश्चात्त्य संस्कार झाले. पोशाख, खाण्याच्या तयार वस्तूंची यादी, सगळं बदललं. पण नवरा घरात आला की, त्यानी बायकोला दिलेली आज्ञा 'जरा पाणी दे गं मला!' तशीच राहिली. माझ्या आणि शोभाच्या संसारात आम्हाला याची पूर्ण जाणीव असल्यामुळे आजारपणाचा काळ सोडून आम्ही दोघंही स्वतः उठून स्वतःला पाहिजे ती वस्तू घेतो. स्वावलंबन हे मी आणि शोभा महत्त्वाचं मूल्य मानतो.

आणखी एक निरीक्षण सांगतो. स्वावलंबन म्हणजेच आत्मसन्मान हा विचार ज्याला पटला तो माणूस शक्यतोवर एकत्र कुटुंबात राहत नाही. आई-वडलांचा सहवास लग्न होईपर्यंत हवासा वाटतो आणि तशी रूढीही आहे. लग्न झालं की, या सगळ्यामधे बदल होणारच. खरं म्हणजे कुठच्याही व्यक्तीचा सहवास काही काळच ठीक असतो. अगदी नवरा-बायको झाले तरी त्यांना जोडीदाराच्या सहवासाची गरज असते तशी एकटं काही वेळ असण्याचीही गरज असते. त्याला मानसिक, भावनिक स्वावलंबन म्हणूया. पण ते स्वावलंबनच. ज्यांना हे कळतं ती माणसं स्वतःच्या हिमतीवर प्रगती करतात. थोडक्यात सेल्फ मेड असतात. याचा अर्थ काही लोकं आईवडलांविषयी कृतज्ञता वाटत नाही असा काढतात, पण ते बरोबर नाही. मी सेल्फ मेड प्रकारातच मोडतो.

आमच्या घरातल्या स्वावलंबनाला पोषक वातावरणामुळे लग्नासाठीचा जोडीदार स्वतः शोधायचा हे पण अध्याहृत होतं. माझ्या दृष्टीनी आई-वडलांनी जोडीदार शोधणं या प्रकाराला बालविवाहच म्हणायला हवं. एखादा मुलगा किंवा मुलगी लग्न करायला योग्य, पण जोडीदार निवडायला अयोग्य या विचारात

काहीच तथ्य नाही. 46 वर्षांपूर्वी माझा आणि शोभाचा फिलाडेल्फिया – ठाणे असा पत्रव्यवहार सुरू होऊन आम्ही एकमेकांशी लग्न करायचं ठरवलं. अनेक घरांच्यात जोडीदार निवडण्याचं स्वातंत्र्य असतं, पण लग्न करण्याच्या पद्धतीबद्दलचं स्वातंत्र्य नसतं याची मला कल्पना होती. मी पूर्णपणी निरीश्वरवादी, निधर्मी, कर्मकांडविरोधी, समारंभविरोधी असल्यामुळे त्यावर एकमत होईपर्यंत लग्नाचा निर्णय पक्का होत नव्हता.

त्याशिवाय माझा स्वावलंबनाचा आग्रह होताच. कोणाकडून कुठचीही वस्तू मी स्वीकारत नाही, मला लागेल ती गोष्ट मी स्वतःच्या पैशानी खरेदी करणार हे पक्कं होतं. हे सगळे प्रश्न सुटून शेवटी शोभानी आणि मी फिलाडेल्फियात अगदी साध्या पद्धतीनी पाऊण मिनिटात नोंदणीपत्रावर सह्या करून लग्न केलं. या गोष्टी अनेकांना माहिती असतात, पण हा स्वावलंबनातलाच एक भाग आहे हे त्यांच्या लक्षात येत नाही. खरं म्हणजे ‘मिळवती बायको का गृहिणी’ हा विषयदेखील स्वावलंबनाच्या संस्कारांशीच जोडलेला आहे.

शोभाच्या कुटुंबाच्या दृष्टिकोनातून माझा प्रत्येक विचार, आग्रह म्हणजे विक्षिप्तपणा होता. घरच्यांना पटवताना शोभाला मध्यस्थी करावी लागत होती. मी शोभाचा होणारा नवरा म्हणून कुठलीच वस्तू स्वीकारायला तयार नव्हतो. मी ठाम असल्यामुळे शेवटी त्यांनी सगळ्या ‘काहीही न घेण्याच्या’ माझ्या अटी मान्य केल्या.

भेटवस्तू देणं-घेणं याविषयी आपण जरा वेळानी सविस्तर बोलणार आहोत. त्यामुळे त्याबद्दल इथे आत्ता सांगत नाही.

●

6) रोजच्या आयुष्यातलं स्वावलंबन

आपण स्वावलंबन या विषयाच्या आणखी अभ्यासासाठी जमलेल्या सगळ्यांच्या आयुष्यातले तरुणपणापासूनचे सगळे प्रसंग घेऊ. त्या प्रसंगात अधिक स्वावलंबनाच्या पद्धतीनी काय करता आलं असतं असा विचार सगळे मिळून करूया.

शक्यतोवर सगळं स्वतःचं स्वतः करायचं, इथपर्यंत तर्कबुद्धीनी पटलं तरी पुढचा प्रश्न येतो, मदत मागायची नाही आणि मदत करायची नाही तर माणुसकीचं काय? आणि मदत करण्याच्या आनंदाचं काय? हा प्रश्न कठीण आहे खराच. उत्तर असं आहे. मदत मागणाऱ्यानी इमर्जन्सी येईपर्यंत शक्यतोवर मदत मागू नये हेच योग्य. आणि मदत करणाऱ्यानी 'मला तुला मदत करायला आवडेल, मदत मागायला संकोच करू नकोस' एवढं सांगणं यातच औचित्य आहे. दुसऱ्याला मदत करण्याचा आनंद मिळवण्यासाठी जरूर नसताना मदत करणं म्हणजे समोरच्याला पांगळं बनवणं आहे. मग त्या दोन व्यक्ती कुठच्याही असोत, दोन संस्था, दोन धंदे, नाहीतर दोन राज्यं असतो, देश असोत.

सारांश, आधी म्हटलं तसं 'भारतीय संस्कृती' नावाच्या एका मोठ्या छत्राखाली एक मोठा महत्त्वाचा प्रश्न भारतात अनिर्णित राहिलाय; स्वावलंबन हा सद्गुण का दुर्गुण.

आता खुद्द तुमचं उदाहरण तुम्हाला विचारतो, तुम्ही बाहेर कुठेतरी कामाला गेलात आणि तुमच्याजवळ कोणीतरी अनोळखी माणूस कागद मागायला लागला, पेन मागायला लागला तर तुमच्या मनात काय विचार येतो? मी तुमच्या मनातला विचार शब्दांत मांडतो. तो खरा आहे की नाही, तुम्ही सांगा. बँकेत यायचं तर स्वतःचं पेन घेऊन यायला नको का? काहीतरी लिहून घ्यायचं असेल तर स्वतःला लागणारा कागद स्वतःजवळ नको का? एवढं कसं कळत नाही? जर तुम्ही मनातल्या मनात हे असं वाक्य म्हणत असलात तर त्याची दुसरी बाजू अगदी स्पष्ट आहे. तुम्ही असंच वागलात तर बाकीचे दुसरे कुणीतरी असंच मनात बोलतील. आता पुन्हा मगाचाच प्रश्न विचारतो. स्वावलंबन हा सद्गुण आहे की दुर्गुण आहे? यावर सुद्धा जमलेले सगळेच्या सगळे लोक स्वावलंबन हा सद्गुण

आहे असं म्हणतात.

आम्हा मित्रामित्रांच्यात फार पूर्वीपासून वाद व्हायचे. याचे पैसे त्यानी दिले, मग केव्हातरी 4-5 मित्र जमलेले असताना खाण्यापिण्याचं बिल कोणी द्यायचं यावर कधी वादावादी व्हायची, कधी एकाच मित्राला सगळे मिळून कापायचे. यातलं काहीच मला कधी पसंत पडलं नाही. मी याला विरोध करायचो. ज्याचे पैसे त्यानी द्यायचे म्हणजेच 'सोल्जर्स काँट्रिब्युशन'. ही एकच गोष्ट मला पटायची. त्यानंतर मी इंग्लंडमधे आणि मग यू.एस.ए.मधे गेलो. ज्या गोष्टीबद्दल मला भारतात मित्रांशी हुज्जत घालायला लागत होती त्या गोष्टी पाश्चात्त्य देशांनी वागण्याची रूढ पद्धत म्हणून कायमची स्वीकारलेली होती. त्याच्या मागची मूळ कल्पना स्वावलंबन आणि त्याचा उद्देश आत्मसन्मान हाच असतो.

इंग्लंड आणि यू.एस.ए.मधे ऑफिसमधे 'शिपाई' नसतो, हे अनेकांना माहीत नसतं. 100 माणसांना नोकरीला ठेवणारा ऑफिसचा मालकही स्वतः पाण्याच्या पिपापाशी जाऊन स्वतः पाणी घेऊन पितो. कॉफी स्वतःच बनवून घेतो. विलायतेत घरी कामाला मोलकरीण नसते, हे कित्येकांना माहिती नसतं. सगळी कामं स्वतःच करायची असतात. यंत्रं मात्र मदतीला असतात. नीट विचार केला तर आपल्या घरच्या मोलकरणींच्या घरी कामाला कुठे कोण असतं? सगळं स्वावलंबनच तर असतं.

मुळात माझ्यावर स्वावलंबनाचे संस्कार होते. त्यात हा परदेशातला अनुभव. त्यामुळे विचार स्पष्ट होत गेले. माझ्या आणि शोभाच्या संसारात 'जरा पाणी दे गं!' असं वाक्य कधी वापरलंच गेलं नाही. माझे कपडे मी धुतो, माझ्या कपड्यांच्या दुरुस्त्या मीच करतो. हीच आमच्या घरची पद्धत आहे. मला स्वयंपाक न येणं, ही मात्र माझ्या स्वावलंबनाच्या कल्पनेत न बसणारी गोष्ट आहे. नुकतीच मी तांदूळ मुगाची खिचडी शिकलो आहे आणि ती मात्र मी अधूनमधून हौसेनी, आग्रहानी करतो.

थोडक्यात, विलायतेत संपूर्ण स्वावलंबनच असतं. फार कमी लोकांकडे गाडी चालवण्यासाठी ड्रायव्हर असतो. कमी लोकं म्हणजे अति श्रीमंतांकडेच फक्त. बाकी सगळे स्वतः गाड्या चालवतात. रस्त्यांवरच्या सोयी चांगल्या आणि जास्त प्रमाणावर असतात. मला वाटतं, स्वावलंबनाचं प्रमाण जिथे जास्त तिथे आत्मसन्मानाची समज आपोआप जास्त असते.

इतक्या वास्तववादी विचारांची सवय नसलेल्यांना एव्हानाच हे सगळं

नकारात्मक वाटत असेल, पण तसं नाहीय. निरपेक्षपणे दिल्या-घेतल्या जाणाऱ्याही काही गोष्टी असतात ना! त्याची यादी मात्र फार छोटी असते. आई-वडील मुलांवर करतात ते प्रेम निरपेक्ष असतं. नवरा-बायकोचं, आजी-आजोबा आणि नातवंडं यांच्यातलं प्रेम निरपेक्ष असतं. मुख्य म्हणजे त्याला पैसे लागत नाहीत. त्या निरपेक्ष प्रेम करणाऱ्या नात्यांच्यात कमी किमतीच्या वस्तू काही बदल करू शकत नाहीत, पण जास्त किमतीच्या वस्तू अशा नात्यांचाही घोळ करू शकतात. आपल्या मुलांचा लग्नाचा जोडीदार या नात्याच्या रचनेत आला की निरपेक्ष प्रेमात फरक पडू शकतोच. संपूर्ण आयुष्यात निरपेक्ष प्रेमाच्या व्यक्ती अगदी कमी असतात आणि संपूर्णपणे निरपेक्ष देणं-घेणंही कमीच असतं.

आधी म्हटल्याप्रमाणे मुलं त्यांच्या त्यांच्या आयुष्यात पूर्ण स्वावलंबी होणं, हेच सबंध पालकत्वाचं सार आहे. समजा, ते जमलं आणि मुलं पूर्ण स्वावलंबी बनली तर त्यासारखं सुख नाही. आमची दोन्हीही मुलं, त्यांची कुटुंबं पूर्ण स्वावलंबनाच्या वाटेवर आहेत आणि जवळजवळ तिथे पोहोचली आहेत याचा आम्हाला खूप आनंद होतो.

मधे एका कॉम्प्युटर क्षेत्रातल्या यशस्वी माणसाकडून एक कल्पना ऐकली. खरोखर थक्क झालो. तो म्हणत होता की, इतक्या निरनिराळ्या गोष्टी आपण आउटसोर्स करतो, तशी मुलंही करूया. मुलं वाढवायला दुसऱ्याकडे देऊया. मग लक्षात आलं की, श्रीमंतांची 'रेसिडेन्शल स्कूल'मधे वाढणारी मुलं म्हणजे दुसरं काय आहे? जन्म पालकांनी द्यायचा आणि एकदम 'रेडिमेड तरुणांचं प्रॉडक्ट' अनेक वर्षांनी ताब्यात घ्यायचं. मधली अनेक वर्षं 'आउट सोर्स्ड.'

●

7) स्वावलंबन, आत्मसन्मान आणि तत्त्वचिंतन

आपण ज्याविषयी चर्चा करतो आहोत त्या विषयाचे बरेच संबंधित भाग आहेत. स्वावलंबन आणि आत्मसन्मान यांचा संबंध आहे, आत्मसन्मानाचा आत्मविश्वासाशी आहे; स्वाभिमानाशी आहे, त्यामुळे मिळणाऱ्या समाधानाशी, आनंदाशी आहे. ते सगळं असं सुष्टचक्र आहे. स्वावलंबनानीच आत्मसन्मान सांभाळता येतो. आत्मसन्मानानीच निर्भयता येते. निर्भयतेमुळे नम्रता येते. नम्रतेनीच माणूस प्रगल्भ बनतो. त्यामुळेच समाधान मिळतं.

याउलट स्वावलंबन नसलं तर त्याला परावलंबित्वाची सतत भीती असते. भयगंडामुळे वागणुकीत मगरुरी येते. त्यामुळे प्रगल्भता शक्य नसते. तत्त्वचिंतनातली प्रगल्भतेची एक व्याख्या अशीही केलेली आहे. 'दुसऱ्यावर जो कमीत कमी अवलंबून' तो प्रगल्भ – म्हणजेच – 'मॅच्युअर.'

आत्मविश्वास अनेक निरनिराळ्या गोष्टींमुळे वाढत जातो. त्याची गुरुकिल्ली म्हणजे 'करून बघणं'. कुठचाही विषय असो, त्यातली एक बारीकशी गोष्ट करून बघायची. जमली तर आत्मविश्वास थोडासा वाढतो. नाही जमली तरी 'या पद्धतीनी ही गोष्ट जमत नाही' एवढं कळतं, यामुळे आत्मविश्वास वाढतो.

आचार्य विनोबा भावे यांनी संपूर्ण स्वावलंबनाच्या 3 पातळ्या वर्णन केल्या होत्या – 1) स्वतःची सगळी कामं स्वतः करणं, 2) ज्ञान मिळवण्यासाठी एकाग्रता, चर्चा, वाचन, चिंतन, संवाद यामधली क्षमता वाढवणं, 3) आपल्या आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक प्रश्नाबद्दल स्वतःचं मत बनवणं. आपण जीवनसाथ संस्थेतर्फे या तीनही पातळ्या गाठण्याचा जो प्रयत्न करतो तो याच प्रेरणेनी.

आत्मविश्वासाबद्दल मानसशास्त्रातली एक महत्त्वाची कल्पना सांगतो. आपण अनेक गोष्टी करायच्या ठरवत असतो. आपण काय करायचं ठरवलं होतं हे कधी कधी इतर कोणालातरी माहीत असतं. जास्त वेळा फक्त स्वतःलाच माहीत असतं. त्यातल्या काही गोष्टी आपण प्रत्यक्षात पार पाडतो, काही नाही करत, पण ते इतरांना कळत देखील नाही. ठरलेली गोष्ट आपण प्रत्यक्षात केली तर आपल्या स्वतःच्या नजरेत आपण पास होतो, नाहीतर नापास होतो. म्हणजे परीक्षा आपण स्वतः घेतो, परीक्षेला स्वतःच बसतो आणि परीक्षक आपणच

असतो. आपणच स्वतःला पास किंवा नापास करतो. हा सगळा परीक्षेचा प्रकार पूर्णपणे खाजगी, आपल्या मनातल्या मनात चालू असतो. असे परीक्षेचे अनेक पेपर आपण सोडवत असतो. सारखे, रोज परीक्षा घेत असतो. यातला मुख्य मुद्दा असा की, आपण या परीक्षेत पास झालो तर आपला आत्मविश्वास टिकतो. आपण त्या परीक्षेत उत्तम मार्क मिळवलेले असले तर इतरांकडे, त्यांच्या टीकेकडे लक्ष न देण्याइतपत आपला आत्मविश्वास असतो.

महात्मा गांधी हा माणूस म्हणजे स्वावलंबनाचं टोक होतं. स्वावलंबनाबद्दल त्यांनी असंही म्हटलं होतं की, स्वावलंबनच माणसाला पूर्ण नम्रतेकडे नेतं. नम्रतेशिवाय अधिकार मिळाले की, त्यातून हिंसाच उद्भवते. त्यांना आसपास सगळीकडे त्याची उदाहरणं दिसत होती. पुढे असंही झालं की, 'इतका अस्सल खरा विचार आपल्याला झेपणार नाही' असं अनेकांना वाटायला लागलं. बाकीचे सगळे राजकारणी होते. राजकारण आणि खरेपणा या दोन गोष्टींचं तेव्हाही जमत नव्हतं आणि सध्याही जमत नाही. गांधीजी प्रवाहाच्या फार पुढे गेले. त्यामुळे त्यांच्या शिकवणीचा परिणाम टिकला नाही. 'स्वावलंबन' या विषयातला गांधीजी हा महात्मा होता. पण तो स्वावलंबनाचा संदेश जनतेपर्यंत पोहोचून मुरला नाही, त्यामुळे टिकला नाही.

मी स्वतः गेली अनेक वर्षं स्वावलंबनाच्या मागे आहे. माझं मत एव्हाना अगदी पक्कं झालेलं आहे ते असं – 'स्वावलंबनातच खरं सुख आहे. परावलंबित्व म्हणजे दुःख.' आपल्या हातून वागणुकीत काही चूक झाली तर त्याबद्दल मला वाटतं ते मूलतत्त्व असं – 'स्वतः केलेली घाण स्वतःच साफ करायची असते.' या दोन विधानांबद्दल जीवनसाथमधे बरेच वेळा गटचर्चा होतात. त्या चर्चांचा खूप उपयोग होतो.

या सगळ्याबद्दलचं तत्त्वज्ञानाचं म्हणणं बघितलं तर दिसतं की, स्वावलंबन हे एक उच्च मूल्य आहे. स्वतःचं आणि दुसऱ्याचं स्वावलंबन या दोन्ही गोष्टी कळल्या तर फार चांगला संवाद होतो, चांगलं नातं निर्माण होतं. तत्त्वज्ञानामधे अनेक लोकांनी स्वावलंबनाचं महत्त्व पटवण्याचा प्रयत्न केलेला आहे. स्वतः स्वयंपूर्ण होणं म्हणजेच दुसऱ्याकडून काही न घेणं. त्याला अदबीनी नकार द्यायला शिकणं. नकार देण्याची कला या विषयावर स्वतंत्र लेख असल्यामुळे इथे मी एक-दोनच गोष्टींचा ओझरता उल्लेख करणार आहे. स्वावलंबन आणि आत्मसन्मान या दोन्ही गोष्टी एकच आहेत हे कळलं आणि त्याच्याशी 'जो नियम

स्वतःला तोच दुसऱ्याला' हे दुसरं तत्त्व जोडलं की, निर्णय घेणं कठीण बनतं, तरीही तीच खरी परीक्षा असते.

स्वावलंबन हे जगण्याचं महत्त्वाचं तत्त्व आहे, असं ठरवलं की, अनेक प्रश्न निघतात. कामाला माणसं नेमणं योग्य आहे का? घराची साफसफाई, धुणी-भांडी, स्वयंपाक ही तर स्वतः करण्याची कामं आहेत. आमच्या ओळखीत काही लोकं घरातली सगळी कामं स्वतः करतात. गरिबीमुळे नाही, तर स्वावलंबनाच्या तत्त्वामुळे. त्यांचं मला आणि शोभाला खूप कौतुक वाटतं.

एक काल्पनिक शंका मला एकानी विचारली होती ती सांगतो. खरोखर स्वावलंबनाचं तत्त्व पटून सगळ्यांनी स्वतःची कामं स्वतः करायची ठरवली तर अनेकांचा रोजगार बंद होईल, त्याचं काय? प्रत्यक्षात अगदी खात्रीनी सांगतो, काहीही बिघडणार नाही. शेवटी रोजगार तर चरितार्थ चालवण्यासाठी असतो. त्याची काळजी करण्याची गरजच नाही. ही पृथ्वी म्हणजे 'विपुलाच सृष्टी' आहे ना! चरितार्थाच्या काळजीचं कधीच कारण नसेल. भूकबळी ही गोष्ट इतर घटकांमुळे शक्य आहे, पण अन्न नाही या कारणामुळे ती अशक्य आहे.

आत्मसन्मानाविषयी एक छोटी गमतीची गोष्ट सांगतो. माणसाच्या आयुष्यातल्या अनेक गोष्टी बदलत असतात, वाढत असतात. वय वाढतं, शिक्षण वाढतं, पण चेहरा तोच राहतो, नाव तेच राहतं. नाव बदलण्याची कायद्यात सोय असते, पण ज्या स्वतःच्या नावामुळे कमीपणा येईल, दुःख होईल अशी नावं आई-वडील मुद्दामून ठेवत नाहीत. याउलट अनेक सुशिक्षित आई-वडील मुलाला आयुष्यभर स्वतःच्या नावाविषयी अभिमान वाटेल, खास वाटेल असा प्रयत्न करतात. काही नावीन्यपूर्ण तरी गोड, अर्थपूर्ण नाव शोधण्यासाठी आई-वडील खूप मेहनत करतात. माझ्या आधीच्या पिढीत देवांचीच नावं ठेवायचे. माझ्या पिढीत देवांच्याऐवजी संस्कृत भाषेवर लोकं जास्त अवलंबून राहायला लागले. पण नावीन्याची हौस तेव्हा नव्हती. नावांना अर्थ असायचा.

आम्ही आमच्या मुलांची नावं ठेवली तेव्हापासून आम्ही बघतो आहोत की, नावाला रूढ अर्थ नसला तरी चालतो. 41 वर्षांपूर्वी आम्ही आमच्या मुलांची नावं ठरवून ठेवली होती. अनिल आणि शोभा या नावांपासून बनलेली, त्या अक्षरांपासून तयार झालेली शोनील आणि अभा अशी आमच्या मुलांची नावं आहेत. नातवंडांची ओजस आणि तुहिन आहेत. खूप नवीन नवीन, छान नावं लोकं ठेवतात. छान वाटतं. या मुलांना आयुष्यभर स्वतः खास आहोत असं

वाटत राहील, असं वाटतं. थोडक्यात, त्यांच्या आत्मसन्मानासाठी त्यांच्या नावाचा थोडा उपयोग होईल. नाव खास असलं की, ते नाव, त्यामुळे ती व्यक्ती अनेकांच्या लक्षात राहते. आमच्या ओळखीत एक मुलगा 'अंतरिक्ष' नावाचा आहे. एक माणूस 'मेघनाद' नावाचा आहे. एक मुलगी 'सुरीली' नावाची आहे. ही नावं आणि त्यामुळे त्या व्यक्ती कायम डोळ्यासमोर राहतात.

आता आणखी एक निराळी महत्त्वाची गोष्ट सांगतो. स्वावलंबन पटलं, आचरणात आणलं तरी आत्मकेंद्री होऊ नये, याची काळजी सतत घ्यायला पाहिजे. अहंकारापासून दूर राहिलं पाहिजे. स्वाभिमान आणि अहंकार यातला फरक ओळखण्याचा एक सोपा मार्ग आहे. ज्याला आत्मसन्मान महत्त्वाचा वाटतो त्याला दुसऱ्याचा सन्मानही तेवढाच महत्त्वाचा वाटतो. हे ज्याच्या वागणुकीत दिसेल तो स्वाभिमान. नाहीतर अहंकार.

अहंकार आणि आत्मविश्वास यामधला फरक समजायला आणखीही एक चाचणी आहे. स्वतःमधल्या गुणांमुळे आत्मविश्वास असला तर तो उपयोगी असतो. दुसऱ्याला तुच्छ लेखायची छटा त्यात आली की, तो त्रासदायक अहंकाराचं स्वरूप घेतो. अहंकाराला मदत करणारे अनेक घटक असतात. सौंदर्य, श्रीमंती, भाषाप्रभुत्व, सामाजिक दर्जा, विशिष्ट पदाची ताकद, एखादं कसब यातलं काहीही माणसाला बिघडवू शकतं. त्यापासूनच सांभाळायला पाहिजे. जमिनीवर पाय राहण्यासाठी स्वावलंबनाची खूप मदत होते.

●

8) पैशाबद्दलचं स्वावलंबन

विवाह अभ्यास मंडळातला एक नेहमीचा प्रश्न असतो. स्वतःच्या मुलांना पैशाची मदत करण्यात काय चूक आहे? यावर आमचा प्रतिप्रश्न आहे. कल्पना करा, तुमच्या एकुलत्या एका मुलानी तुम्हाला सांगितलं की, त्याच्या धंद्यात तोटा झाला आहे आणि कुठूनतरी पैसे उभे करून तात्पुरता प्रश्न मिटवायला पाहिजे. पण आत्मसन्मान राखण्यासाठी मुलाला ते पैसे व्याजानी पाहिजेत. वडील किंवा आई म्हणून त्या मुलाचा तुम्हाला राग येईल का कौतुक वाटेल? जमलेल्या बहुतेकांना कौतुक वाटतं हे मी नक्की सांगतो आणि तशी प्रत्यक्ष वेळ आली की, मात्र लोक तसं वागणार नाहीत हेही नक्की सांगतो.

आता तुमच्या कुटुंबातलं दुसरं एखादं उदाहरण घेऊ. सर्वसाधारण मध्यमवर्गीय कुटुंबात असते तशी परिस्थिती आहे असं समजा. उच्च शिक्षणासाठी जेवढा पैसा लागतो तेवढा कुटुंबाकडे नाहीय आणि तरीही धाकटा भाऊ किंवा धाकटी बहीण हुशार, मेहनती, प्रतिभावंत अशी असल्यामुळे त्यानी किंवा तिनी उच्च शिक्षण घेऊन वैयक्तिक प्रगती करावी असं तुम्हाला वाटतं. तुमचं म्हणणं आहे की, उच्च शिक्षणाचा खर्च मी करीन. पण धाकटा भाऊ किंवा बहीण असं म्हणताहेत की, आम्ही मधे एक वर्ष कॉलेज सोडून नोकरी करू, पैसे जमवू आणि स्वतःच्या पैशांनी पुढचं शिक्षण घेऊ. तुमचं धाकटं भावंडं आणि तुम्ही यांचे संबंध उत्तम आहेत. एकमेकांसाठी करण्याची इच्छा आहे आणि तरी प्रश्न असा निर्माण झाला आहे की, तुमची मदत नाकारल्यामुळे तुम्हाला वाईट वाटणार. पण त्याचबरोबर धाकट्या भावंडाच्या स्वावलंबी वृत्तीचं म्हटलं तर कौतुकही करायला पाहिजे.

थोडक्यात, वैचारिक द्वंद्व चालू झालं आणि त्या द्वंद्वाचा निकाल या एका मूलतत्त्वाच्या आधारानीच लागणार आहे. ते मूलतत्त्व म्हणजे स्वावलंबन याला तुम्ही सगळे सद्‌गुण समजता का नाही? खरं सांगायचं तर या विषयात तुम्ही किती पैसे मिळवता आणि त्या तुलनेत किती फीच्या आकड्याविषयी बोलणं चालू आहे, याचाही काही संबंध नाही. आत्तापर्यंतच्या झालेल्या कार्यशाळेत इतका वेळ जो सार्वमतानी होकार येत होता तसा आता येईनासा होतो. कारण

स्वतःच्या कुटुंबातली परिस्थिती प्रत्येकाला माहिती असते आणि अशासारख्या प्रसंगात कोण कसं वागलं होतं, हे सगळं आठवत असतं. कार्यशाळेची हीच तर कल्पना आहे. जे जे मूलतत्त्व म्हणून आपण बोलतो ते आणि तुमचं आयुष्य या एकच गोष्टी आहेत. एकच असायला हव्यात.

आत्मसन्मान या विषयाच्या आपण खोलात शिरलो की, आणखी एका गोष्टीविषयी विचार सुरू व्हायला पाहिजे. माझं तसं झालं. वयाच्या 22व्या वर्षी मी मुंबईच्या माझ्या कुटुंबातून वास्तव्यासाठी इंग्लंडला गेलो. मी किती वर्षं परदेशात राहणार, हे मला माहिती नव्हतं. त्यामुळे मी आई-वडलांना निघताना सांगून निघालो की, आता आपला संसार स्वतंत्र समजूया. तेव्हा माझं लग्न ठरलेलं सुद्धा नव्हतं, तरी मी पैशाच्या व्यवहारासंबंधी माझी भूमिका वडलांना स्पष्ट करत होतो. त्याचे दोन्ही अर्थ होते. मी यापुढे तुमच्यावर पैशासाठी अवलंबणार नाही आणि पैसे देणारही नाही. माझे आई-वडील मध्यमवर्गीय होते, चरितार्थ नीट चालत होता आणि मी पैसे पाठवण्याची गरज नव्हती, त्यामुळे हे शक्य झालं.

इंग्लंडमधे आम्ही मुंबई-पुण्याचे मराठी भाषिक मित्र नियमित एकत्र भेटायचो. सगळेच जण नोकरी करून आपापला चरितार्थ सांभाळत होते. तिथे सोल्जर्स काँट्रिब्युशन या गोष्टीची समज वाढली, सवय झाली. पुढे मी यू.एस.ए.मधे गेलो तरी स्वावलंबनाची आणि आत्मसन्मानाची सवय नुसती तशीच राहिली नाही तर जास्त स्पष्ट आणि तीव्र झाली. एकटं राहिल्यामुळे विपश्यना भरपूर झाली. त्यामुळे स्वतःचे विचार धारदार झाले. दुसऱ्या कोणाकडून काही न घेणं, त्यासाठी आवश्यक तो स्पष्ट विचार आणि धारिष्ट्य माझ्याकडे होतं. दुसऱ्याकडून काही घेत नाही, स्वतःच्या वस्तू स्वतः विकत घेतो यातला आत्मसन्मान कळलेला होता. त्यातला आनंद, समाधान व्यवस्थित अनुभवायला मिळत होतं.

आपल्या कामाबद्दल माणूस कसा विचार करतो, यालाही महत्त्व आहे. त्याबद्दलचं एक महत्त्वाचं बोधवाक्य इथे सांगतो. 'स्वतःच्या कामावरचा विश्वास म्हणजे जगण्याचं इंधन आहे.' चरितार्थ चालवण्यासाठी पैसे मिळवावेच लागतात, पण त्याचबरोबर आपण करतो त्या कामावर प्रेम असणं खूप महत्त्वाचं आहे.'

पैशाचं स्वावलंबन कळायला हवं असलं तर पहिली महत्त्वाची गोष्ट माणसानी ठरवून टाकायला लागते. फुकट मिळणारं काहीही घ्यायला नकार

द्यायचा. पैसे उसने घेतले, दिले, तरी ते व्याजानीच द्यायचे, घ्यायचे. बिनव्याजी पैशाचं महत्त्व वाटत नाही, कारण काही ताणच जाणवत नाही.

वाहनानी जाणारी कोणी व्यक्ती निघत असली तर तिच्या मागे लागून लिफ्ट घेणं हे बहुतेक वेळा पैसे वाचवण्यासाठी असतं. मी अशावेळी पैसे विभागून घेणं मान्य असलं तरच त्या व्यक्तीबरोबर जातो. माझी आत्मसन्मानाची भावना त्यावर अवलंबून असते.

आमची मुलगी आभा, जावई श्रेयस पुण्यात असतात. आम्ही सहलींना जातो. सहलीचा खर्च वाटून घेण्याविषयी आमचा नेहमी आग्रह असतो. आमच्या सगळ्यांच्या आत्मसन्मानासाठी ही वागणूक म्हणजे शक्तिवर्धक असतं.

●

पैशाचं स्वावलंबन कळायला हवं असलं तर पहिली महत्त्वाची गोष्ट माणसानी ठरवून टाकायला लागते. फुकट मिळणारं काहीही घ्यायला नकार द्यायचा. पैसे उसने घेतले, दिले, तरी ते व्याजानीच द्यायचे, घ्यायचे. बिनव्याजी पैशाचं महत्त्व वाटत नाही, कारण काही ताणच जाणवत नाही.

9) आजारपण, म्हातारपण यातलं स्वावलंबन

स्वावलंबनाबद्दल आपण आत्तापर्यंत बोललो त्यातलं बरंचसं प्रत्येकाला पटेल. पण ते धडधाकट असताना. जरा पुढच्या वयात अनेकांना बिछान्यावर पडल्यावर खूप वेळ झोपच लागत नाही. शारीरिक श्रम कमी झालेले असतात आणि इतर चिंता वाढलेल्या असतात. त्यामुळे अशी जोडपी खूप असतात. कधी कधी बऱ्याच वेळानंतर नवरा-बायको एकमेकांची परिस्थिती बघून चौकशी करतात. पडल्यापडल्या एकमेकांच्या चिंता समजावून घेतात, शांत करण्याचा प्रयत्न करतात, कधी प्रणय, कधी लैंगिक संभोग करतात. काहीजण उठून एखादा पदार्थ खातात, पितात, टीव्ही बघतात. बहुतेक वेळा त्यानंतर जरा वेळानी त्यांना झोप लागते आणि त्या रात्रीपुरता प्रश्न मिटतो.

त्यानंतरच्या उतारवयात एकाच जोडीदाराचे झोपेचे प्रश्न वाढू शकतात. तिथे मात्र स्वावलंबनाच्या प्रवृत्तीचा संबंध येतो. स्वतःला झोप येत नाही म्हणून झोपलेल्या जोडीदाराला उठवणं स्वावलंबनाच्या कल्पनेत बसत नाही. याखेरीज ज्येष्ठ जोडप्यांपैकी एकाला पाय दुखणं, ताप येणं, मळमळ, उलट्या, बद्धकोष्ठता, कितीतरी अडचणी येऊ शकतात. अशावेळी जोडप्यानी एकमेकांना मदत करणं स्वावलंबन-तत्त्वाच्या आड येत नाही, पण एकानी दुसऱ्याकडून सेवा करून घेणं मात्र त्यात बसत नाही. स्वतःच्या वेदना स्वतःलाच सोसाव्या लागतात.

अभ्यास मंडळातल्या चर्चेत आजारपण, म्हातारपण याबद्दल विचार करताना मात्र अनेकजण एकदम निराळंच बोलायला लागतात. या बाबतीतल्या विचारांच्यात स्पष्टपणा यावा म्हणून काही उदाहरणं मुद्दामून आजच्या कार्यशाळेत अभ्यासाला घेऊ.

अशी कल्पना करा की, तुमचे म्हातारे आई-वडील आहेत. कायम पलंगावर असणारे अत्यवस्थ वगैरे नाहीत, पण चालताना काठी लागणारे, दृष्टी अधू, मध्यम ऐकू येतं, गोष्टी कळायला आणि व्यक्त करायला वेळ लागतो अशा मध्यम परावलंबित्वाच्या वाटेवर आहेत आणि ते दोघंही असं म्हणताहेत की, आपल्या घराजवळ जी बँक आहे तिथे आमचं खातं उघडून टाकू. त्या बँकेतून आम्ही स्वतः पैसे काढू आणि आसपासच्या दुकानातल्या वस्तू स्वतः विकत घेऊ. आमच्या दोघांच्या स्वतंत्र संसाराला लागणाऱ्या गोष्टी आम्ही स्वतः

करू शकतो तोपर्यंत स्वतःच करण्याचा आम्हाला आनंद वाटतो. हे म्हातारे आई-वडील जवळच्या बँकेपर्यंत पोहोचायला सावकाश सावकाश चालत 15-20 मिनिटं लावतात. आपल्या दृष्टीनी जे पाच मिनिटाचं काम ते काम ते अर्धा-पाऊण तास घालवून सावकाश करून येतात.

साहजिकच घरात संभाषण होतं – 'जर तुम्ही रस्त्यावर बाहेर कुठेतरी धडपडलात तर आम्हाला अयोग्य वाटेल. त्यामुळे तुम्ही नुसतं सांगा, आम्ही सगळी कामं करून टाकू.' तेव्हा हे दोघंही आई-वडील म्हणतात, 'आम्ही सांभाळून इकडेतिकडे जातो आणि तरीही वाईटात वाईट काही अपघात झालाच तर आमच्या गळ्यामधे सगळे तपशील असलेलं आयडेंटिफिकेशन कार्ड असतं, त्यावर हॉस्पिटल रजिस्ट्रेशन, तुमचे पत्ते, फोन नंबर्स सगळं लिहिलेलं असतं. त्याखेरीज आम्ही दोघांनी लिव्हिंग विल जे केलेलं आहे त्याची कॉपी पण तुम्हाला दिलेली आहे. त्यामुळे आम्हाला दोघांना याची जराही चिंता वाटत नाही आणि तुम्हीही काळजी करू नका.'

आता पुन्हा तुम्हाला सगळ्यांना प्रश्न विचारतो की, या म्हाताऱ्या आई-वडलांचा स्वावलंबनाचा आग्रह हा सद्‌गुण आहे की दुर्गुण आहे? या प्रश्नाचं उत्तर आधीच्या प्रश्नांच्या तुलनेत सरळपणे मिळत नाही. हो, नाही, विचार करायला पाहिजे, परिस्थितीवर अवलंबून आहे, अशी उत्तरं यायला लागतात. तुम्हाला याची उत्सुकता असेल म्हणून सांगतो, तत्त्वज्ञानात हा एक खूप चिंतनाचा, महत्त्वाचा विषय मानला जातो.

तुम्हाला जी भीती आहे, ती आई-वडलांच्या जिवाला काय होतं याची नसून लोक काय म्हणतील, याची वाटण्याची एक शक्यता आहे. दुसरी गोष्ट – स्वतःच्या मनाला हे आपले जन्मदाते असल्यामुळे ते कुठेतरी भलतीकडे जाऊन धडपडले तर त्यांना आणण्यात, हॉस्पिटलमधे पोहोचवण्यात स्वतःची खूप गैरसोय होईल, याची पण भीती तुमच्या मनात असण्याची शक्यता आहे. तिसरी शक्यता – खर्चाची. त्यासाठी आईवडलांनी केलेल्या 'लिव्हिंग विल'चा मजकूर तुम्ही आत्ताही वाचू शकता. खरं सांगायचं म्हणजे निव्वळ प्रेमापोटी तुम्हाला त्यांच्याविषयी जेवढी काळजी वाटते, त्याच्यापेक्षा जास्त त्यांना तुमच्याविषयी वाटते आहे, हा सर्वसाधारण नियम लक्षात घ्या. याखेरीज काही शक्यता उरल्या असल्या तर आपण त्याविषयी कितीही स्पष्ट चर्चा करायला तयार आहोत. पण मला निश्चित असं वाटतं, की तुमच्या आई-वडलांचा स्वावलंबनाचा आग्रह हा

निश्चित सद्‌गुण आहे.

स्वावलंबन यातला व्यक्तिगत सेवा-शुश्रूषा हा आणखी एक उपविषय आहे. मी माझ्या लहानपणी आजोबांच्या पायावर पाय दिल्याचं, कंबर चेपल्याचं मला आठवतंय. मी आता त्या वयाचा झालो आहे, पण याबद्दलचा माझा विचार स्पष्ट झाला आहे. व्यक्तिगत शुश्रूषा मी करवून घेत नाही आणि करत नाही. मला अनेक वर्षं डोकेदुखीचा त्रास आहे. पण मी कोणालाही डोकं चेपायला सांगत नाही. कंबरदुखीचा त्रास असून कंबर चेपून घेत नाही. मला वैयक्तिक शुश्रूषा करायलाही आवडत नाही आणि करवून घ्यायलाही आवडत नाही. मी कोणा मसाजरकडून मालिश करून घ्यायला तयार नसतो. कारण हा माझ्या तत्त्वाचा प्रश्न आहे.

आणखी एक सांगतो. म्हाताऱ्या जोडप्यापैकी एकाला स्वतःच्या स्वावलंबनाबद्दल आग्रह धरता येतो, पण दुसऱ्याच्या स्वावलंबनाचा हट्ट योग्य ठरत नाही. म्हातारपणी जोडप्यापैकी जो जास्त सक्षम असेल त्यानी स्वतःची सगळी कामं करायचीच आणि शिवाय जोडीदाराला शक्य तेवढी मदत करायची. या सगळ्याची मूळ कल्पना एकमेकांना मदत करून दोघांचा स्वावलंबन आणि आत्मसन्मान जपणं हीच आहे. त्यातला एकमेकांचा हा शब्द महत्त्वाचा आहे. मला स्वतःला घरकाम आवडत नाही. त्यातली मला पुरेशी माहिती नाही, सवय नाही, ते करण्यात काही रस नाही. पण ते काम शोभानी एकटीनी करणं योग्य नाही, त्यामुळे मी ते करतो.

खरं म्हणजे दुसऱ्यावर अवलंबून राहण्याची मर्यादा प्रत्येकाला समजली पाहिजे. त्या मर्यादेनंतर त्या दुसऱ्याचा नाद सोडून देऊन ते काम स्वतःलाच करावं लागतं.

या विषयाच्या चर्चेला बसलं की पुढे तो विषय गंभीर आजारपण, कठीण म्हातारपण, मृत्यू इथपर्यंत पोहोचतोच. असा मुद्दा निघतो की, तब्येत बिघडली, हात-पाय वाकडे झाले तरी माणसाला जगण्याची हाव असते. त्याचं काय? एखादा विकलांग माणूस नोकरचाकर, नातेवाईक, कुटुंबीय, मुलं, जोडीदार यांच्या साहाय्यानी परावलंबी जीवन जगतो. त्याचं काय? या प्रकारच्या प्रश्नांचं खरं उत्तर समजायला, पचायला कठीण, पण एकच आहे. स्वावलंबी असेपर्यंतच माणसानी जगावं! हा निर्णय त्या माणसानीच घ्यायचा असल्यामुळे ते ठरवण्यासाठीचे काही निकष सांगतो.

1) स्वतःच्या रोजच्या सामानाची पिशवी स्वतः उचलता आली पाहिजे.
2) स्वतःचे शारीरिक विधी स्वतःला कोणाच्याही मदतीशिवाय करता आले पाहिजेत.
3) स्वतः घेण्याची औषधं कोणाच्याही मदतीशिवाय स्वतः लक्षात ठेवून घेता आली पाहिजेत.
4) स्वतः जेवता आलं पाहिजे.

एवढं जमत नसेल तर माणसानी जगण्याबद्दल अधिक स्पष्ट विचार करावा.

●

10) काही खास उदाहरणं

काही उदाहरणं घ्यायची तर काही चांगली आणि वाईट, काही सर्वसामान्यांची आणि काही थोर लोकांची देणं योग्य होईल.

आमच्या ओळखीतल्या एका बापानी स्वतःच्या आजारपणावर उपाय करायचा प्रयत्न केला. तो आजार गंभीर आहे कळल्यावर आपल्या बायकोवर अवलंबून राहायला लागला. मग तो मुलांकडून पैसे मागून स्वतःवर इलाज करायला लागला. पुढे पुढे तर त्यानी लोकांकडे, मित्रमंडळींकडून, जवळच्या, दूरच्या नातेवाइकांकडून देखील पैसे घेतले. ते परत करण्याची शक्यताच नव्हती. पण त्यानी हे कोणालाही सांगितलं नाही. मुलांना कळल्यावर मुलं दुरावली. हे असं अखेरपर्यंत अनेक वर्षं चाललं. सगळं आम्हाला कळल्यावर मला आणि शोभाला प्रश्नच पडतो की, त्या माणसाच्या आत्मसन्मानाच्या मूळ प्रेरणेचं काय झालं असेल? जगण्याची प्रबळ इच्छा आपण समजू शकतो, पण त्या इच्छेनी आत्मसन्मानाच्या प्रेरणेवर विजय मिळवलेला स्पष्ट दिसतो.

आत्मसन्मानाच्या बाबतीत आणि आपल्या कामावरच्या विश्वासाच्या बाबतीत दोन मोठ्या लोकांचं मुद्दामून उदाहरण घेऊ. महात्मा गांधी महामानव होते यात शंका नाही. त्यांचा ईश्वरावर विश्वास होता. कसा ते मात्र समजायला मार्ग नाही. माझ्या दृष्टिकोनातून ईश्वरावर विश्वास आणि स्वतःच्या कामावरचा प्रचंड विश्वास या दोन्ही गोष्टी एका माणसाच्या डोक्यात असूच शकत नाहीत. ज्या काळात गांधीजींनी काम केलं त्या काळात कदाचित लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी ईश्वरवादाचा त्यांनी आधार घेतला असेल. इंग्रजी साम्राज्याला बाहेर काढण्यासाठी लोकांच्या मनाला हात घालणं गांधीजींसाठी जरुरीचं होतं म्हणून असेल. त्यांचं स्वावलंबनही टोकाचं आग्रही होतं.

बाबा आमटे हेदेखील प्रचंडच होते. त्यांचं निःस्वार्थी काम महामानव या उपाधीला शोभण्याजोगंच होतं. ते मात्र जाहीर निरीश्वरवादी होते. त्यांचा स्वतःच्या कामावरचा दुर्दम्य विश्वास म्हणजेच आत्मविश्वास आणि त्यांचा स्वावलंबनाचा आग्रह या गोष्टी शिकण्याजोग्याच होत्या.

मगासपासून आपलं जे सारखं मधूनमधून बोलणं चाललंय, त्याचा आपण

आपल्यापुरता काही निष्कर्ष काढू शकतो का, याबद्दल चर्चा करून बघूया. तो विषय म्हणजे 'स्वावलंबन हा सद्‌गुण आहे का दुर्गुण आहे?' एक उदाहरण मी सांगतो, त्याबद्दल आपण सगळे मिळून आपला अनुभव मांडूया. प्रथम माझा अनुभव सांगतो. बांधकाम क्षेत्रातल्या सल्लामसलतीसाठी अनेक छोट्या गावांच्यात अनेक वर्षं मी गेलेलो आहे. जेव्हा प्रथम अशा छोट्या गावी गेलो तेव्हा शहरी माणसं जी नेहमी करतात ती चूक केली. जिथे मी गेलो होतो तिथे त्या रात्री मला राहायचं होतं आणि दुसऱ्या दिवशी संध्याकाळपर्यंत काम करून संध्याकाळच्या गाडीनी पुण्याला परत यायचं होतं. रात्री राहण्याची व्यवस्था कुठच्यातरी छोट्या हॉटेलमधे असेल अशी माझी बहुतेक कल्पना असावी. खूप जुनी गोष्ट आहे ही. सगळे बारीक तपशील मला आठवत नाहीयत. पण एक पक्कं आठवतंय की, त्या छोट्या गावात हॉटेल, लॉज वगैरे असं काही नव्हतं आणि माझ्या 'क्लायंट'कडेच माझी राहण्याची सोय होती.

तिथे प्रत्येक गोष्टीत त्यांच्याकडून काही काही वस्तू मला मागून घ्याव्या लागत होत्या. सकाळी आवरताना मी त्यांच्याकडे टॉवेल, साबण, तेल, कंगवा अशा सगळ्या वस्तू मागून घेतल्या आणि मुळात स्वावलंबी माणूस असल्यामुळे मला त्याची फारच शरम आणि संकोच वाटला. काही दिवसांनी त्याच ठिकाणी मी पुन्हा गेलो. सगळी व्यवस्था तशीच होती, फरक एवढाच होता की, मला एकही वस्तू त्यांच्याकडे मागायला लागणार नव्हती. अगदी सकाळी उठून व्यायाम करण्यासाठी लागणारं गजराचं घड्याळसुद्धा माझ्याकडे होतं. त्याच क्लायंटकडे त्यानंतर मी अनेक वेळेला गेलो; आणखीनही इतर गावांच्यात अनेक लोकांच्याकडे गेलो पण एकदा सुरुवातीला केलेली चूक मी पुन्हा कधीही केली नाही.

आता मी माझंच वर्णन पण लोकांच्या दृष्टिकोनातून या शब्दांत करतो की, मी पाहुणा म्हणून कोणाकडे गेलो तर मी संपूर्ण स्वावलंबी पाहुणा असतो. आता मी तुम्हाला विचारतो आहे, तुमच्याकडे जे कोणी पाहुणे येत असतील त्यांनी गादी, उशीसारख्या जड, मोठ्या वस्तू सोडून स्वतःला लागणाऱ्या सर्व वस्तू स्वतः बॅगेतून बरोबर आणल्या असल्या तर तो त्या पाहुण्याचा सद्‌गुण आहे की दुर्गुण आहे? शब्दशः सगळेच्या सगळे लोक हा मोठा सद्‌गुण आहे हे मान्य करतात.

मला एक जॉर्ज फर्नांडिसांनी लिहिलेला लेख आठवतो. त्यांच्यावर

सर्वोदयी संस्कार होते. त्यांच्या पिढीतले अनेक लोक स्वातंत्र्यसंग्रामात लढलेले, कुटुंबापासून अनेक वर्षं दूर राहिलेले असे होते. त्यामुळे त्यांच्यावर संपूर्ण स्वावलंबनाचे संस्कार होते. त्या लेखामधे जॉर्ज फर्नांडिस यांनी हेही लिहिलेलं होतं की, एवढ्या महत्त्वाच्या पदावरच्या खूप महत्त्वाच्या मुद्द्यांवरच्या चर्चा उरकून घरी परत आल्यावर त्याच्यापुढचा अर्धा तास कपडे धुण्यात घालवला तर कमीपणा वगैरे वाटण्याचा प्रश्नच नाही. बैठकीतल्या चर्चेबद्द अतिशय उत्तम दर्जाचं चिंतन कपडे धुताना व्हायचं. ते आग्रहानी स्वतःच्या घरचा केर काढायचे, स्वयंपाक करायचे आणि ते अभिमानानी सांगायचे की यातली कुठचीही गोष्ट त्यांना खालच्या दर्जाची वाटत नाही.

तुम्हाला महात्मा गांधींचं सफाईबद्दलचं उदाहरण तर माहीतच असेल. महात्मा गांधींनी स्वतःच्या आश्रमातले सगळे सार्वजनिक संडाससुद्धा साफ करण्याची जबाबदारी अनेक वर्षं सांभाळली. महात्मा गांधींची एकेक कहाणी ऐकली की थक्क व्हायला होतं. गरवारे बालभवन म्हणजे शोभानी चालू केलेली संस्था. त्यांचा प्रकाशन विभागदेखील आहे. त्यांनी प्रकाशित केलेलं, शोभानी अनुवादित केलेलं 'बहुरूप गांधी' नावाचं एक पुस्तक आहे. त्याचं वर्णन करायला 'अप्रतिम' खेरीज दुसरा शब्दच नाही. माझ्या मते, गेल्या 75 वर्षांत खरोखर भारत देश म्हणजे काय हे कळलेला महात्मा गांधी हा एकटा माणूस होता. गांधीजींच्या स्वावलंबनाची ताकद एवढी होती की, त्यांच्यापासून घेतलेल्या स्फूर्तीमुळे सबंध देश हालला. गांधीजी म्हणायचे की, स्वावलंबन हीच खरी प्रत्येकाची मूळ प्रवृत्ती आहे. दुसऱ्यानी आपलं काम करायचं ही कल्पना म्हणजे विकृती आहे. आजारी, परावलंबी, अपंग लोकांची सेवा ते करायचे. त्याबद्दल लोक प्रश्न विचारायचे. गांधीजी म्हणायचे, 'सेवाभाव माणसांच्या मनात अहिंसेचं बीज पेरतो, त्यासाठी मी आग्रहानी सेवा करतो.'

स्वावलंबनाचा आग्रह धरणारे, गांधीवादी विचारांच्या प्रेरणेनी जगायचा प्रयत्न करणारे काही लोक आमच्या ओळखीचे आहेत. वाईट भाग असा की, ते चरितार्थासाठी, मुलांसाठी शहरात राहतात. शहरात राहिलं की, स्वावलंबनाच्या अनेक कल्पनांवर मर्यादा येतात. स्वावलंबन, पर्यावरण, आत्मसन्मान, चरितार्थासाठीच्या गरजा, साधी राहणी या मूल्यांची शहरात इतकी गल्लत आणि गुंतागुंत होते की, त्यातून मार्ग काढणं अशक्य होऊन बसतं.

समजण्यासाठी एक उदाहरण देतो. कापसाचं सूत स्वतः काढायचं आणि

त्याचे बनवलेले खादीचेच कपडे वापरायचे इथपर्यंत कल्पना छान वाटते. पण त्यात बरेच प्रश्न आहेत. सूत बनवलं तरी त्याचं कापड कोण करणार? स्वतः हातमाग घरात ठेवायचा म्हटला तर त्याला एवढी जागा लागते की, ती जागा शहरात घ्यायची म्हणजे पैसे आणि पर्यावरण दोन्हींचं नुकसान. सूत दुसरीकडे पाठवून कापड बनवून घ्यायचं म्हटलं की, स्वावलंबनाच्या कल्पनेत बाधा येते. त्यानंतरचे प्रश्न निराळेच असतात. खादीचे कपडे फार कमी काळ टिकतात. कपडा जेव्हा फाटतो तेव्हा त्याची आधी कल्पना न आल्यामुळे बाहेर परक्या ठिकाणी भलत्या जागी कपडा फाटण्याची भीती. शिवाय ते स्वच्छ ठेवण्यासाठी इतका साबण लागतो की, त्यात पर्यावरणाचा बोऱ्याच वाजणार. खादीचेच पांढरे शुभ्र, कडक इस्त्रीचे कपडे वापरणारे राजकीय पुढारी या गोष्टींचा विचार करत असतील असं वाटतं?

काही उदाहरणं देतो, ती तुम्हाला योग्य-अयोग्य कशी वाटतात ते बघा. आमच्या नात्यात एक बाई आहेत. त्यांच्यातले गुण, दुर्गुण काही प्रमाणात आनुवंशिक असतील हे मान्य आहे, पण त्या बाई लग्न झाल्यापासून चूल-मूल या पलीकडे जायला कधीही तयार नव्हत्या. त्यांनी कुठच्याही पैशाच्या व्यवहारात लक्ष घातलं नाही. आपल्या हिश्श्याचा खर्चही कधी केला नाही आणि दुसऱ्याकडून पैसे मागितलेही नाहीत. त्यांचं आयुष्यभराचं धोरण एकदम स्पष्ट आहे. कायम दुसऱ्यावर अवलंबून राहायचं. स्वावलंबन हा शब्द त्यांच्या कोशात नाही.

पारंपरिकतेत काही उत्तम संस्कार होते त्यात एक कौटुंबिक स्वावलंबन होता. प्रवासाला निघायचं तरी घरून स्वयंपाकातला टिकाऊ पदार्थ स्वतः बनवून डब्यात घेऊन जायची पद्धत होती.

काही लोक स्वावलंबन या कल्पनेचं प्रतीक वापरतानाही मी बघितलंय. एकदा एक वयस्कर जोडपं आमच्याकडे जेवायला आलं होतं. त्यांनी जेवणाअगोदर 1 रुपयाचं नाणं ताटाजवळ ठेवलं. विचारल्यावर म्हणाले, 'आम्हाला परान्न वर्ज्य करण्याचं व्रत पुरं करायचंय.' मला मूळ मुद्दा कळला, पण अशा प्रतीकात मला तथ्य वाटत नाही. मला असाही एक माणूस भेटला होता की, ज्यानी 8 दिवस घराबाहेर राहायचं म्हणून 8 दिवसांचा डबा बरोबर ठेवला होता आणि 2 दिवस जास्त राहायला लागलं तर त्यानी मधे मधे उपास करून ते अन्न पुरवलं. त्या वागण्यात खूपच अर्थ होता.

●

11) स्वावलंबन आणि भेटवस्तू, बक्षिशी, भीक वगैरे

मगाशी सांगितल्याप्रमाणे शोभानी आणि मी प्रत्यक्ष लग्न फिलाडेल्फिया, यू.एस.ए. इथे केलं. लग्नाचा अर्थ मला माझ्या चिंतनामुळे अगदी स्पष्ट माहिती होता. लग्न झालं की शारीरिक संबंधात आणि चरितार्थात नफ्या-तोट्याची संपूर्ण निम्मी भागीदारी चालू झाली होती. आमची दोघांची आर्थिक भागीदारी याचा अर्थ आम्ही दोघं मिळून एकच झालो. जसं इतर कोणाशी वागताना 'मी कोणाकडून काही घेत नाही, माझ्या वस्तू मीच विकत घेतो' होतं तसंच मी बायकोला काही देण्याचा आणि तिच्याकडून घेण्याचाही प्रश्न नव्हता. भेटवस्तू नावाच्या कल्पनेतून मी आणि शोभा दोघंही मुक्त होतो. आम्हा दोघांना लागणाऱ्या खाण्यापिण्याच्या वस्तू, कपडे आम्ही दोघं आमच्या संसारासाठी घ्यायचो, पण मी शोभाला प्रेझेंट आणलं आणि तेही सरप्राइझ गिफ्ट या कल्पनेला मी अर्थशून्य मानत होतो. शोभानी असं करून बघितलं. कधी कधी माझ्यासाठी म्हणून शर्ट आणणं वगैरे एक-दोनदा केलं, पण खरोखर मला काय आवडतं याचा निर्णय घेण्यासाठी सर्वांत सक्षम व्यक्ती मीच असणार हे तिला पटलं. तिनी मला भेटवस्तू आणणं हा विचार सोडून दिला.

आम्ही भारतात परत आल्यानंतर शोभामधे बरेच बदल झाले. शोभा इतरांना भेटवस्तू द्यायला पण लागली आणि इतरांकडून घ्यायला पण लागली. मी स्वतःचा व्यवसाय चालू केला. इतर भागीदारही होते. व्यवसायाची जरूर म्हणून मी काही काळ भेटवस्तू देऊन-घेऊन बघितल्या आणि अधिक स्पष्ट चिंतनानंतर पुन्हा माझ्या मूळ आग्रहावर पोहोचलो. पुढे मुलं झाली. ती मोठी झाली नि स्वतःचा विचार करून स्वतःचे निर्णय घ्यायला लागली. एवढ्या वर्षांनंतरही मुलं आणि शोभा यांचा देण्या-घेण्याच्या बाबतीत निराळा गट आहे आणि माझा एकट्याचा पूर्ण नकाराचा स्वतंत्र गट आहे. त्याबद्दल माझा आक्षेप नाही. ती तिघंही स्वतंत्र, जबाबदार, स्वावलंबी आणि सक्षम आहेत. मी एवढंच म्हणतो की, 'मी त्यात नाही.'

संपूर्ण स्वावलंबनाच्या माझ्या विचारात मी एक एक टप्पा पार करत पुढे चाललो होतो. भेटवस्तू स्वीकारणं बंद केलं होतं, पण तरी अंमलबजावणीत

काही अपवाद होते. ‘यांचं मन दुखवायला नको’ या विचारामुळेच थोडेसे अपवाद केले जायचे. त्याच काळात एक किस्सा घडला. त्यामुळे मी वस्तू न घेण्याच्या अंमलबजावणीत कडक बनलो. तो किस्सा सांगतो.

माझ्या बांधकामाच्या धंद्यात स्टील फॅब्रिकेशनचं काम बरंच असायचं. दरवाजे, खिडक्या, ग्रिल्स, कुंड्या ठेवण्याचे स्टँड्स, कठडे अशी कामं मी एकाच माणसाकडून नियमितपणी करून घ्यायचो. आमची दोघांची खूप चांगली ओळख झाली होती. मी त्यांच्या घरी एक-दोनदा गेलो होतो. तेही माझ्या घरी बरेच वेळा आलेले होते.

माझ्याकडे एक अँटिक लाकडी डायनिंग टेबल होतं. चांगलं मोठ्या लंबगोल आकाराचं ते टेबल मला आवडायचं. अजूनही ते आम्ही वापरतो. तेव्हा त्या टेबलाचा लाकडी स्टँड खराब व्हायला लागला होता. अशा लाकडी वस्तूची दुरुस्ती जवळजवळ अशक्य असते हे नक्की होतं.

ते फॅब्रिकेटर मला म्हणाले, ‘मला तुम्हाला एक गिफ्ट द्यायचीच आहे आणि मेहरबानी करून त्याला नाही म्हणू नका.’ मनातल्या मनात हो, नाहीचा विचार करून मी ते शेवटी मान्य केलं. काय गिफ्ट ते मला माहिती नव्हतं. एक दिवस अकस्मात ते एक लोखंडाचा स्टँड घेऊन आले आणि जबरदस्तीनी तो माझ्याकडच्या टेबलाला बसवला. अजूनही मी तोच स्टँड वापरतो. आता मुख्य भाग सांगतो.

मी स्वतः डिझाईन करून स्टँड बनवून घेतला असता तर असा स्टँड कधीही मान्य केला नसता. कारखान्यातल्या उरलेल्या लोखंडी तुकड्यांचा तो स्टँड आहे. दिसतो वाईट, पायाला अनेक वेळेला खूप इजा करतो. सारांश, म्हणजे ‘टेबलाचा स्टँड कसा नसावा’ याचा तो नमुना आहे.

भेटवस्तू देण्या-घेण्याबद्दल सगळ्यांना, इथे जमलेल्यांना सगळ्यांना माझी भूमिका टोकाची वाटेल हे मला माहिती आहे. मी दुसऱ्याचं स्वातंत्र्य आणि स्वावलंबन मानतो. त्यामुळे माझ्या मते माझी भूमिकाच योग्य आहे याबद्दल मी ठाम आहे. पण मी तुमच्यावर माझी मतं लादणार नाही. मी उलट तुम्हाला मदत करण्यासाठी मधल्या काही पायऱ्या सुचवणार आहे. कुठल्या पायरीवरून कुठच्या वेगानी कुठे पोहोचायचं हे तुम्ही ठरवायचं आहे. माझ्या दृष्टीनी हे सगळे त्या-त्या अवस्थेमधले सोईस्कर समर्थनाचे मुद्दे आहेत. आता बघा हं, आपण यादीच करूया.

1) कामावरच्या सहकाऱ्यांना भेटवस्तू दिली-घेतली तर चालेल? – त्यामधे अजिबात स्वार्थ, मतलब नसेल आणि तशी समोरच्या विषयीही खात्री वाटली तरच चालेल.
2) नोकरी / व्यवसाय / धंदा वाढावा म्हणून भेटवस्तू देणं चालेल? – दोघांनी एकमेकांना दिली तर ती चालायला पाहिजे. माझ्या मते, रोखीत लाच देण्याचंच हे दुसरं स्वरूप आहे. एकमेकांना असं त्याचं वर्णन असलं तरच ते चालेल.
3) एखाद्या व्यक्तीबद्दल खूप प्रेम, आपुलकी वाटते म्हणून भेटवस्तू दिली तर चालेल? – माझ्या मते ती वस्तू दिली नाही तर प्रेम कमी होईल अशी भीती पोटात असते. त्यामुळे ही स्वार्थी वागणूक आहे.
4) आपली आठवण राहावी म्हणून भेटवस्तू दिली तर चालेल? – माझ्या मते, ही पण स्वार्थी वागणूकच आहे. आपली आठवण त्या व्यक्तीला ती वस्तू न बघता होत असेल तरच खरी. शिवाय ती वस्तू काही काळानी शोरूममधून आतल्या कपाटात, मग अडगळीत आणि शेवटी कचऱ्यात जाणार किंवा आणखीनच तिसऱ्या व्यक्तीकडे भेटवस्तू म्हणून जाऊन पोहोचणार. तेव्हा तुम्हाला कसं वाटेल?
5) समोरच्याला जरूर असते म्हणून दिलं तर चालेल? – या बाबतीत जरा तरी विचार करायला वाव आहे. त्या व्यक्तीची जरूर तुम्ही ठरवू शकत नाही. खऱ्या गरजेविषयी स्पष्ट बोलणं झालं असेल आणि गरजू व्यक्तीला खरोखर मदत होत असेल तर यात काहीतरी तथ्य असणं शक्य आहे.
   आधीची सगळी उदाहरणं एका सुखवस्तू व्यक्तीनी दुसऱ्या सुखवस्तू माणसाला दुकानातून भेटवस्तू आणून देण्याची आहेत. म्हणजे सगळा प्रकार दुकानदारांच्या फायद्यासाठी चालू असतो, तसं तरी या बाबतीत होत नाही.
6) नैसर्गिक आपत्तीसाठी 'रिलीफ फंड' अनेक लोक गोळा करत असतात. त्या कारणानी वस्तू दिली तर चालेल? – याबद्दलसुद्धा खूप मोठा प्रश्न आहे. या वस्तू खऱ्या गरजूंपर्यंत न पोहोचल्याची खूप उदाहरणं आहेत. त्यामधे भ्रष्टाचार, गैरव्यवस्था, वस्तूची नासधूस, चोऱ्या सगळेच घटक विचार करण्याजोगे आहेत. माझा वैयक्तिक निर्णय म्हणाल तर तो असा – माझ्यासमोर मी देत असलेल्या वस्तूचा किंवा रोखीचा उपयोग होत असेल आणि तोही अत्यावश्यक गरजेसाठी, तरच मला ते पटतं.

7) लहान मुलांना वस्तू, खाऊ दिला तर चालेल? – याचं खरं उत्तर म्हणजे ते मूल ओळखीतलं, पुन्हा पुन्हा भेटणारं असेल तर चालेल. अनोळखी मुलांना खाऊ वाटताना फोटो छापून येण्यापुरती ती सामाजिक कार्याची योजना असली तर मला त्यातही तथ्य वाटत नाही. ती वस्तू ब्लँकेट्स वाटण्यासारखी असली तरी नाही. पुस्तकंदेखील वाटणं मला पटत नाही. एखाद्या मुलानी एखाद्या पुस्तकात रस दाखवला तर ते त्याला भेट म्हणून देणं यात मला थोडं तथ्य दिसतं. मुलाला वाचनाची गोडी लागण्याची शक्यता आहे म्हणून ते ठीक आहे. खाऊ देण्यात खूप भानगडी असतातच. तो खाऊ त्या मुलाला आवडतो का नाही, हा स्वतंत्र प्रश्न असतोच. पण आवडत असला तरी वैद्यकीयदृष्ट्या योग्य आहे का नाही हा प्रश्न असतोच. पाहुण्यांनी दिलेलं चॉकलेट खाऊन पोट भरल्यामुळे नीट जेवण झालं नाही, झोपेवर परिणाम झाला असं आई-वडील पाहुणे गेल्यावर तक्रार करताना मी खूपदा बघितलं आहे. त्याखेरीज एक मुद्दा असतोच. तो खाऊ खरा म्हणजे मुलाच्या आई-वडलांची मर्जी राखण्याच्या इराद्यानी दिलेला असतो. त्या हेतूचं काय होईल, हे सांगता येतच नाही.

८) जुनी टाकाऊ, न लागणारी वस्तू देणं. उदाहरणार्थ – कपडे, धान्य, जुनं फर्निचर दिलं तर चालेल? – आत्ता खरं तर आपण जवळजवळ 'भीक देणं' या विषयाकडे वळलो आहोत. त्याविषयी आपण जरा वेळानी बोलणारच आहोत. पण या मुद्द्याबद्दल असंच वाटतं की, समोरच्याला त्या वस्तूचा खरा उपयोग असला तर या कल्पनेत तथ्य आहे. मी आणि शोभानी आत्तापर्यंत अशा अनेक वस्तू दिलेल्या आहेत. कोणालाही त्या वस्तूची गरज नाही असं वाटलं, तेव्हा भंगारवाल्याला बोलवून 'त्या आधी इथून घेऊन जा, त्याचे पैसे किती वगैरे नंतर बघू' असंही म्हटलेलं आहे.

जुनी टाकाऊ वस्तू जो माणूस घेतो त्याला कसं वाटत असेल याचा अनुभव एरवी आपल्याला नसल्यामुळे लक्षात येत नाही, पण क्वचित येणारा एखादा अनुभव असू शकतो. शोभाला एका बाईंनी दिलेली साडी घरी आल्यावर बघितलं तर चक्क जुनी, आतून फाटलेली होती. एकदा एका बाईंनी डब्यात घालून दिलेला खाण्याचा पदार्थ घरी उघडल्यावर खराब झालेला आणि बुरशी

आलेला निघाला. माझ्या मते, हा अनुभव घेण्याच्या बाबतीत आणि देण्याच्या बाबतीत पुरेसा शिकवणारा होता. टाकाऊ वस्तू घेताना त्या गरजू व्यक्तीला किती लाचार वाटत असेल?

आपल्या घरी काम करणाऱ्या मोलकरणीला देखील आत्मसन्मान असतोच की! खायचा शिळा पदार्थ मोलकरणीला दिला, तिनी तो काही न बोलता घेतला आणि नंतर तो खालच्या मजल्यावरच्या केराच्या डब्यात टाकला असं मी अनेक वेळा बघितलंय. तुम्ही?

मगाशी मी उल्लेख केला त्या 'भीक देणं' या विषयाकडे आता वळूया. भीक याची व्याख्या प्रथम तपासूया. दुसऱ्याकडून काहीतरी घ्यायचं आणि त्याचा मोबदला द्यायचा नाही यालाच भीक म्हणतात. आपण दुसऱ्याला काही वस्तू, रोख पैसे दिले आणि मोबदल्याची अपेक्षा ठेवली नाही की, त्याला भीकच म्हणतात. आपण निरपेक्ष प्रेमाबद्दल बोललो त्यातल्या जास्त किमतीच्या वस्तूंचा आणि भीकेच्या व्याख्येचा संबंध आता स्पष्ट होऊ शकेल. यापेक्षा निराळी काही व्याख्या कोणाला माहिती असली तर सांगा. मी म्हणतो त्या व्याख्येत पैसे, श्रम, ज्ञान, वस्तू, विकतची वस्तू सगळ्याचा समावेश होतो. स्वतःच्या झाडावरचं फूल तोडून दुसऱ्याला दिलं तर त्याला भीक म्हणता येणार नाही. योग्य भेटवस्तू म्हणून मी ती मान्य करीन. बुटक्या माणसाचा हात पोहोचत नाही म्हणून उंच माणसानी झाडावरचं फळ त्याला काढून दिलं तर त्याला भीक म्हणता येणार नाही. मदत म्हणावं लागेल.

धार्मिक स्थळांवर भीक मागणाऱ्याला वस्तू देणं योग्य का? पैसे देणं योग्य का? शहरात रस्त्यावर भीक मागणाऱ्यांना एक-दोन रुपये देऊन आपली सुटका करून घेणं सोयीचं आहे हे मला समजू शकतं, पण ते योग्य आहे का नाही, हा प्रश्न शिल्लकच राहिला. भगवे कपडे घालून दाराशी साधूच्या वेशात आलेला असला तरी तो भिकारीच आणि हत्ती रस्त्यावरून चालत नेत हत्तीच्या सोंडेतून नाणी घेणारा तोही भिकारीच.

रस्त्यावर काठ्यांचे, दोरीवरचे खेळ आधी करून, कला दाखवून मग पैसे मागणारं डोंबाऱ्याचं पोर भीक मागतं असं नाही म्हणता येणार. रस्त्यावर खडूनी अप्रतिम चित्र काढून तिथे ताटली ठेवून लोकं स्वेच्छेनी टाकतील तेवढे पैसे गोळा करणाऱ्याला भिकारी नाही म्हणता येणार. यावरून भीक याची व्याख्या पुरेशी स्पष्ट होते. व्याख्येतला मुख्य भाग म्हणजे पैसे किंवा वस्तू मोबदला न देता घेणं

म्हणजे भीक.

4-5 वर्षांच्या आसपासच्या भिकाऱ्याच्या पोराला भीक मागायला पाठवलेलं आपण पाहतोच की! कसं वाटतं? एक गोष्ट सरळ आहे, भीक देणारे देतात म्हणून लहान मुलांना पाठवतात. त्यांना भीक द्यायची नाही असं ठरवलं तर? कदाचित सुरुवातीला ती मुलं त्याबद्दल मार खातील, पण नंतर त्यांचं भीक मागणं बंद होईल हे नक्की.

आता दोन महत्त्वाच्या प्रश्नाची उत्तरं शोधूया. आणि मग स्वतःचे विचार पुन्हा तपासून बघूया.

1) फुकट मिळालेल्या वस्तूचं आपल्या घरात काय होतं? त्या वस्तूकडे दुर्लक्ष होतं का? नाहीतरी फुकटच मिळालीय, त्यामुळे ती एवढी आवडलेली नसली तर दुसऱ्याला देऊन टाकून ती वस्तू आणि ती व्यक्ती विस्मरणात जाते का? आपण दुसऱ्याला फुकट वस्तू दिली असली तर त्याचा वापर दुसरा काय पद्धतीनी करतो?
2) संपूर्ण आयुष्यभराचा एक नियम कोणालाच चुकत नाही. जी गोष्ट माझ्या बाबतीत तीच दुसऱ्याच्या बाबतीत असायला पाहिजे. दुसऱ्यासाठी निराळा नियम आणि माझ्यासाठी निराळा नियम असं मलाही चालणार नाही आणि दुसरा मला असं वागूही देणार नाही. या दोन गोष्टी योग्य वाटत असल्या तर त्याचा अर्थ असा होतो. भीक देणं तुम्हाला योग्य वाटत असलं तर भीक घेणंही मान्य पाहिजे. दोन रुपये कोणीतरी तुम्हाला भिकारी समजून दिले तर त्यात अपमान, कमीपणा वाटता कामा नये.

तुम्ही दुसऱ्याकडून भीक घेणार नाही, कारण त्यात कमीपणा येतो. त्याच न्यायानी दुसऱ्याला भीक देणार नाही, कारण दुसऱ्याला त्यात कमीपणा येतो, या तर्कविधानात काही चूक आहे? समजा, हे पटलं तरी लोकांचा प्रतिवाद असा असतो की, मी भीक घेणार नाही, पण भीक देईन. विचारप्रवास अनेक वर्षांचा असतो. त्यातला एक टप्पा म्हणून हे मान्य करता येईल.

लोकांची मुख्य अडचण अशी असते की, त्यांना नकार देता येत नाही. 'ही वस्तू मी घेऊ शकत नाही, कारण मी कोणाकडूनही भेटवस्तू स्वीकारणं तत्त्व म्हणून बंद केलंय, मला माफ करा.' हे वाक्य माणसाला बोलता येत नाही. हे बोलता येत नाही, कारण त्याच्यामागे पुरेसा स्पष्ट विचार, चिंतन नसतं. ज्याला नकार देण्याची इच्छा आहे, पण जमत नाही त्याला विचारांचं बळ देण्यासाठी

तर ही चर्चा, ही कार्यशाळा आहे.

याच विचाराची पुढची पायरी म्हणजे रेस्टॉरंटमधे वेटरला टिप देणं किंवा न देणं. काही ठिकाणी सर्व्हिस चार्ज लावतात, काही ठिकाणी नो टिप्स असं स्पष्ट लिहितात, काही ठिकाणी सेल्फ सर्व्हिसच्या पाटीमुळे तो विषयच संपवलेला असतो. टिप का द्यावी, याची अनेक कारणं मी ऐकलेली आहेत. आणि तरी माझा निर्णय पक्का झाला आणि मी तो अमलात आणतो. मी टिप देत नाही. माझ्या बाजूनीही त्याचं कारण स्पष्ट आहे. दुसऱ्या कोणी तुम्हाला टिप दिली तर तुम्हाला कसं वाटेल? टिप देणाऱ्याच्या तुलनेत टीप घेणारा फार कमी दर्जाचा माणूस असा मला त्याचा अर्थ वाटतो आणि म्हणून मी जसा माझा आत्मसन्मान जपतो तसा वेटरचाही आत्मसन्मान जपतो. जीवनसाथनी शोधलेल्या अनेक खेळात 'कॅटॅगरीज' म्हणून एक प्रसिद्ध वैचारिक खेळ असतो. त्यामधे हा विषय कधी कधी मी घेतो. या पुस्तकातल्या 'खेळ' या प्रकरणात त्याचं सविस्तर वर्णन केलेलं आहे.

●

12) निष्कर्ष

एवढ्या निरनिराळ्या गोष्टींचा, घटनांचा आपण स्वावलंबन आणि आत्मसन्मान या दोन्ही अंगांनी विचार केला. मागे म्हटलेलंच मी पुन्हा सांगतो. स्वावलंबन आणि आत्मसन्मान या संकल्पना इतक्या जवळच्या आहेत की, स्वावलंबन म्हणजेच आत्मसन्मान असंच म्हणावं लागेल.

आपण मगासपासून बोललेल्या प्रत्येक गोष्टीपासून आपल्याला काही शिकता येतं. शिक्षकाचं खरं काम काय? तर त्यानी विद्यार्थ्याला स्वावलंबी बनवायचं आहे. अडलं तरच विचारावं अशीच पद्धत पाडायची. समुपदेशकानी समुपदेशनार्थीला स्वावलंबी बनवायचं आहे.

महानगरपालिकेनी जनतेला स्वावलंबी बनवण्यासाठी योजना आखायच्या. कचरा, पाणी, ड्रेनेज, वीज या सगळ्या बाबतीत हे शक्य आहे, हे निश्चित आहे. त्यातल्या काही गोष्टी कठीण असतात, काही सोप्या. रस्ते, वाहन व्यवस्था या गोष्टी मात्र खूप कठीण आहेत. वाहन व्यवस्था आणि रस्ते यामधे पर्यावरणासारखे प्रश्नही गुंतलेले असतात.

याच पद्धतीनी नीट विचार केला तर राज्य पातळीवर देखील स्वावलंबनाची समज कमी-जास्त असते. तशीच ती देशपातळीवरही असते. दुसऱ्या राज्याकडून किंवा राष्ट्राकडून वीज, पाणी, पैसे अशा बाबतीत जिकडेतिकडे परावलंबनच असतं. जगातले विकसित म्हणजे प्रगत देश हे कायम स्वावलंबनाच्या मागे असतात.

माझ्या दृष्टिकोनातून मनःशांतीसाठी भक्तिमार्ग हा परावलबंनाचा मार्ग आहे. ज्ञानमार्ग, विवेकनिष्ठ विचारसरणी हा स्वावलंबनाचा मार्ग आहे आणि म्हणूनच सरस आहे.

या सगळ्या गोष्टींचा एकत्र अभ्यास करून मी एक महत्त्वाचा निर्णय घेऊ शकलो, त्यामुळे मला मनःशांती मिळाली. तो निर्णय असा – ‘माझं स्वतःचं स्वावलंबन संपलं की, आत्मसन्मान त्यासरशी संपणार. आत्मसन्मान जपता आला नाही तर मृत्यू म्हणजेच इच्छामरण.’

●●●

2

लोकशाहीची समज आणि रोजचं कौटुंबिक आयुष्य

याच पुस्तकसंचात तत्त्वज्ञानाचा आयुष्यात प्रत्यक्ष उपयोग कसा करायचा, याबद्दल सविस्तर लिखाण आहे. त्यामुळे इथे कुटुंबात, आपल्या कामाच्या जागी कशा प्रकारचं वातावरण आहे, यावरच भर दिला आहे. काही मुद्दे दोन्ही ठिकाणी घालावेच लागले कारण त्यांचा उल्लेख अटळ होता. लोकशाहीची समज आणि एकत्र का स्वतंत्र कुटुंब या दोन निराळ्या वाटणाऱ्या विषयांना एका पाठोपाठ घेण्यामागचा माझा उद्देश या दोन विषयामधलं साम्य दाखवणं हा आहे.

तुमच्यापैकी काहींना माहिती असेल, काहींना नसेल म्हणून सांगतो. जगातला भारत हा सर्वांत मोठा लोकशाही देश आहे. भौगोलिक आकारानी भारतापेक्षा मोठे देश बरेच आहेत, पण काही साम्राज्यवादी तर काही साम्यवादी तर काहींची लोकसंख्या भारतापेक्षा कमी असं आहे. जगातल्या सर्वांत मोठ्या लोकशाही असलेल्या आपल्या देशाला लोकशाही कळली असं मात्र म्हणता येत नाही. प्रत्येक सज्ञान माणसाला एक मत, पण मत देणाऱ्यांच्या औपचारिक शिक्षणात, जीवनशिक्षणात, आर्थिक परिस्थितीत प्रचंड तफावत आहे. यामुळे नेतृत्वाच्या खेळात थापा मारून, रोज 24 तास खोटं बोलून, खोटं वागून मतं मागण्याचा मार्ग रूढ झाला.

माझा राजकारणाचा अभ्यास नाही. पण माणसांचा, त्यांच्या परिस्थितीचा अभ्यास आहे. संपूर्ण आयुष्य अस्वस्थ अवस्थेत कसंबसं काढणारी शेकडो असहाय माणसं मी बघतो. त्याखेरीज एक सुशिक्षित माणूस म्हणून 'लेमन्स व्ह्यू पॉइंट' मांडण्याचा मला अधिकार असल्यामुळे मी अगदी स्पष्टपणी म्हणतो आहे की, प्रत्यक्ष राजकारणातल्या लोकांना स्वतःला लोकशाही कळली असेलही, पण

प्रत्यक्ष अंमलबजावणीत लोकशाहीचा निव्वळ अभिनय आहे.

एखाद्या कारखान्यात, एखाद्या मोठ्या व्यवसायात जसा सर्वोच्च पदावरच्या व्यक्तीच्या वागणुकीची आपोआप नक्कल केली जाते तशी राजकारणी हे या इंडस्ट्रीतले निर्णयकर्ते, बॉस असल्यामुळे त्यांची नक्कल बहुतांश जनता करते. आसपास दिसणारे जवळजवळ सगळे मध्यमवर्गीय लोक लोकशाहीचा अभिनय करतात. अशा मध्यमवर्गीय अभिनेते, अभिनेत्रींचं अनुकरण कष्टकरी गरीब वर्ग करतो. गोळाबेरीज काय? तर लोकशाहीच्या खऱ्या अर्थाच्या नावानी भोपळा! आपल्या समाजाच्या अवस्थेचं माझ्यासारख्या विवेकनिष्ठ विचाराच्या माणसाला वाईटच वाटतं.

पुण्यात दरवर्षी 'लोकशाही उत्सव' साजरा करतात. त्याचं आयोजन करणारे पाच-पन्नास लोकं हे वर वर्णन केलेल्या अभिनेते-अभिनेत्रींच्या यादीतले नसतात हे मान्य आहे, पण साध्य काही होत नाही असं मला वाटतं. कशाबद्दलचाही जो विचार, जी भावना असेल ती वर्षातले 365 दिवस तशीच असते आणि असायलाच पाहिजे. तो राष्ट्राचा किंवा व्यक्तीचा, संस्थेचा कशाचाही वाढदिवस असो, तेवढा दिवस समारंभ केला की जनता 364 दिवस तो विचार, भावना विसरून जायला मोकळी होते, ही मात्र मोठी गफलत आहे.

माझं वैयक्तिक मत असं बनलं आहे की, कुठल्याही दिशेनी, कुठल्याही विचारधारेबद्दलचं काम वर्षभर सातत्यानी चालणारं असलं तरच त्याचा उपयोग होण्याची शक्यता असते. व्यवसायानी मी समुपदेशकच असल्यामुळे मनोव्यवहाराशीच माझी रोज गाठ असते. विशिष्ट दिवस उगवल्यामुळे ती विशिष्ट भावना तीव्रपणे उचंबळून आली असं कोणाचंही कधीही खरं म्हणजे होत नाही. महाराष्ट्र दिन, स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन याला निरर्थक कर्मकांडाचं स्वरूप आलेलं आहे हे मला अतिशय दुःखकारक वाटतं.

भारतात प्रजासत्ताक दिनी नेमकं काय साजरं होतं? कशाबद्दल सक्तीची सुटी असते? ध्वजवंदनाचा काय परिणाम होतो? प्रजासत्ता हा शब्द तरी आपल्याला शोभतो का? राजकारणी जो मतांचा खेळ खेळतात ते लक्षात घेतलं तर फार तर त्याला प्रजा-सट्टा म्हणता येईल. प्रजाथट्टा हा शब्द त्याहूनही योग्य वाटतो.

फार पूर्वीपासून, अगदी मानवांच्या टोळ्या एकत्र रहायच्या तेव्हापासून माणसामाणसातल्या क्षमतेमधला फरक सगळ्यांना माहिती होता. नेतृत्वगुण हा

शब्द माहिती नसला तरी कोणीतरी एक सक्षम नेता हवा आणि टोळीच्या वतीनी कोणीतरी निर्णय घ्यायला लागतात हे माहीत होतं. एका टोळीला दोन नेते असू शकत नाहीत हे पण सगळ्यांना समजत होतं. तसं झालं की दोन नेत्यांच्यात मारामारी, एकाचा मृत्यू किंवा दुसरी टोळी स्थापन करणं एवढे दोनच पर्याय तेव्हा होते. नंतरच्या काळात याच कल्पनेला राजा हे नाव मिळालं. टोळीचं नेतृत्व स्त्रीकडेसुद्धा असायचं हे अनेक उल्लेखांतून कळतं. तिला राणी म्हणायचे. राजा आणि राणी स्त्री-पुरुष भिन्न लिंगी असल्यामुळे आणि त्यांच्यात निराळं आकर्षण असल्यामुळे युती शक्य होती आणि या पद्धतीमुळे दोन भिन्नलिंगी नेते हे शक्य झालं. निश्चित एक पुरुष आणि एक स्त्री यांच्या संततीला राजपुत्र आणि राजकन्या समजण्याची कल्पना रूढ झाली.

राजा या रूढ कल्पनेबरोबरच व्यवस्थापकीय जबाबदाऱ्यांसाठी प्रधान नावाची एक व्यक्ती किंवा अनेक लोकांची प्रधानमंडळं आवश्यक वाटू लागली. कारण क्षमता हाच प्रश्न होता. आणि उरलेली सगळी जनता म्हणजे झाली प्रजा. या पदांच्या काही जबाबदाऱ्या, कर्तव्यं, वागणुकीच्या पद्धतीच्या रूढी बनल्या आणि त्या पिढ्यान्‌पिढ्या चालू राहिल्या. त्या तीन मनोवृत्ती झाल्या. राजाची मनोवृत्ती आणि प्रजेची मनोवृत्ती स्पष्ट होती. पण प्रधानाचं स्थान, अधिकार, क्षमता याबद्दल गुंतागुंती निर्माण व्हायला लागल्या. अगदी जवळचा मित्र किंवा सल्लागार होता तो क्षमता, सत्ता यामधल्या सुप्त संघर्षामुळे किंवा ईर्ष्येमुळे जवळचा शत्रू असं व्हायला लागलं. कित्येक ठिकाणी राजाचा प्रमुख शत्रू स्वतःचा धाकटा भाऊ, मुलगा असंही व्हायला लागलं.

राजा, प्रधान आणि प्रजा ह्या तीन मनोवृत्ती अजूनही आपल्याला आढळतात. भारतातली संस्थानं खालसा झाली. पण वृत्तीनी संस्थानिक असलेले लोक अजूनही जागोजागी आढळतात. त्यांची वागणुकीमधली गुर्मी प्रत्येक घटनेत दिसते. आपल्या आधुनिक समाजातली प्रजासुद्धा आपल्याला सर्व जागी दिसते. प्रजा सगळ्यांना मुजरा करत आयुष्य जगते आणि राजा बनण्याची इच्छा करत, स्वप्नं बघत राजे लोकांच्या मागे हिंडतानाचे प्रधानही आपल्याला दिसतात. सध्याच्या राजांना प्रजेची जराही भीती वाटत नाही, त्यामुळे पर्वाही वाटत नाही. प्रधान मंडळी मात्र केव्हा राजाच्या पाठीत खंजीर खुपसतील, हे सांगता येत नाही.

दोन निराळ्या पक्षाचे नेते ऊर्फ राजे 'मतभेद विसरून हास्यविनोदात रमलेले' असा वर्तमानपत्रातला फोटो पाहिला की त्यातला अभिनयाचा मगाशी

मी सांगितलेला भागही पूर्ण कळतो आणि आपल्या देशाच्या लोकशाहीच्या नसलेल्या समजेबद्दल पुन्हा एकदा कपाळावर हात जातो. शिवाय लोकशाहीच्या मुखवट्यात वावरणारे हुकूमशहा सतत दिसतात. काही राजकीय पक्षदेखील लोकशाहीची भाषा बोलतात, पण प्रत्यक्षात थेट, जातिवंत, खानदानी, एकाधिकारी हुकूमशहा असतात.

हुकूमशाहीचा अनुभव मी आखाती देशात काम करताना घेतला. तिथला राजा कायदा ठरवतो. जमिनींची मालकी त्याच्याकडेच असते. पोलीस डिपार्टमेंट तोच चालवतो. न्यायालय त्याचंच, शिक्षा तोच ठरवतो. धंद्यासाठी आलेल्या परकीयांच्याबरोबर भागीदाऱ्या करतो. इतर कोणालाही सत्ता मिळत नाही. त्याचा सर्वांत कट्टर शत्रू त्याचा सर्वांत मोठा मुलगा असतो. मोठ्या भावाला सर्वांत जास्त धोका धाकट्या भावापासून असतो.

हे सगळं असून तिथे एक महत्त्वाची गोष्ट नसते. लोकशाहीचा अभिनय नसतो. पण हुकूमशहा कोण होणार हा प्रश्न असतो. दोन-तीन तुल्यबळ प्रतिस्पर्ध्यांमधे डावपेच, शीतयुद्ध, उघडयुद्ध, कट-कारस्थानं, फितूरबाजी, बंड, मारामाऱ्या, खून सगळं होतं. थोडक्यात, हुकूमशाही आणि हिंसा यांचं एकमेकांबरोबर लग्नच लागलेलं असतं. हुकूमशहा बनण्याची ईर्ष्या कमी लोकांमधे असते. बाकीच्यांच्यात ती धमक नसते. ते एका हुकूमशहाच्या आधिपत्याखालून दुसऱ्याच्या राजवटीखाली आयुष्य मान्य करतात. असा नवीन राजा जरा बरा किंवा जास्त जुलमीही निघू शकतो. आणि तेही लोक सहन करतात. कारण त्यांच्यात तेवढं मानसिक बळ नसतं म्हणून तर ते आम आदमी राहतात.

तरी त्या आम आदमीच्या हातात मर्यादित का होईना सत्ता आली तर त्याची वागणूक म्हणजे देशाच्या राजकीय पद्धतीचीच छबी असते. आपल्या सर्वसामान्य माणसासमोरचे साधे रोजचे प्रश्न सोडवण्यासाठी कुठचीतरी पद्धत वापरावीच लागते. आपला संबंध शहरात काही निवडणुकांशी येतो. राष्ट्रीय निवडणुका, नगरपालिका, स्वतः राहतो त्या सहकारी सोसायटीशी येतो. त्यातही आक्रमक प्रवृत्तीचे, लोकशाहीनी वागायचा प्रयत्न करणारे, अलिप्त, बेपर्वा सगळ्या प्रकारचे लोक असतातच. ज्या देशाच्या लोकशाहीची इतकी वाट लागलेली असते त्यातल्या राज्य, जिल्हा, शहर किंवा को.ऑप.सो. पातळीवर खरी अर्थपूर्ण लोकशाही असणं अशक्य आहे. लोकशाहीच्या मोठ्या पाटीखाली बसून जमेल तिथे हुकूमशाही केली जाते. दुर्बलांना काही मत नसतं हे माहीत असतं. लहान

मुलं, कनिष्ठ आर्थिक वर्ग, नोकरचाकर, अशक्त, ज्येष्ठ हे सत्ताहीन वर्गातले लोक संख्येनी खूप असतात. त्यांच्यावर बळजबरी शक्य असते. पण ही बळजबरी करणारे लोक एरवी लोकशाहीच्या गप्पा मारतात.

आपण जिथे काम करतो, ऑफिस, फॅक्टरी, स्वतःचा व्यवसाय, एजन्सी, दुकान काहीही असो, तिथली पद्धत लोकशाहीच्या तत्त्वांच्यात बसते का नाही हे जरूर तपासून बघावं.

मला अशी काही माणसं माहिती आहेत की जी मोठ्या संस्थेची अध्यक्ष झाल्यामुळे त्यांची स्टाफकडून विशिष्ट वागणुकीची अपेक्षा असते. उदाहरणार्थ – वॉचमननी सॅल्यूट केला पाहिजे. क्लार्कनी ते आले की उठून उभं राहिलं पाहिजे. त्यांनी बोलावणं पाठवलं की सहकाऱ्यांनी मुकाटपणी हजर झालं पाहिजे. असं वातावरण लोकशाहीच्या तत्त्वांच्यात अजिबात बसत नाही.

हे आणखी नीट जोखण्यासाठी काही मुद्दे तपासूया.

1) प्रत्येक प्रश्न सोडवण्यात प्रत्येकाचं मत, प्रत्येकाची गरज विचारात घेतली जाते का?
2) देशाच्या राजकारणात मतदार बनण्यासाठी सज्ञान होण्याची वयाची अट असते. सज्ञान मतदारांनी लहान मुलांचा विचार करून मत द्यावं अशी कल्पना असते. ते लहान मुलांचा खरोखर विचार करतात का?
3) सबलांनी दुर्बलांना मदत करावी म्हणून सरकार योजना राबवतं. सरकार स्थापण्याचा हेतूच तो असतो. प्रत्यक्षात तसं होतं का?
4) कुठलाही विषय चर्चेजोगा नक्की असतो. चर्चा करून निर्णय बदलता येतो. मतपरिवर्तनासाठी सत्याग्रह, निषेध, मूकमोर्चा, लिखाण, काहीही करायची परवानगी असते. तसं प्रत्यक्षात होतं का?
5) हिंसेला फक्त पोलिसांशिवाय कोणाला अधिकार नसतात. त्याचं काय होतं?
6) व्यक्तिस्वातंत्र्य हे लोकशाहीतलं सर्वोच्च मूल्य आहे. व्यक्तीला खरोखरच स्वातंत्र्य असतं का?
7) कुठच्याही माणसाचा अपमान करण्याचा आपल्याला अधिकार नसतो. तसं वातावरण कुटुंबात असतं का?

इतका वेळ आपण लोकशाहीबद्दल चांगल्या-वाईट गोष्टी बोलत होतो,

पण ते जवळजवळ सगळं भारत देशाच्या लोकशाहीबद्दल होतं. प्रत्यक्षात आपण या कार्यशाळेला जमलेले सगळे सर्वसामान्य लोक आहोत. भारताच्या लोकशाहीची अवस्था कितीही वाईट असली तरी निवडणुकीत आपल्या राहण्याच्या भागात जी व्यक्ती उभी असेल त्या कुठच्यातरी व्यक्तीला मत देणं किंवा मतदान न करणं या पलीकडे आपण काही करू शकत नाही.

पण त्या राजकारणातल्या लोकशाहीबद्दलच्या चर्चेमुळे लोकशाही या विषयाचा अभ्यास तर आपला झाला! लोकशाहीचं मूलतत्त्व आपल्याला कळलं का नाही ते मात्र आपल्या कुटुंबात, परिवारात आपण वागतो कसे, त्यावरूनच कळणार. लोकशाहीचं मूलतत्त्व आपण अगदी थोड्या शब्दात सांगायचं ठरवलं तर त्याचं वर्णन 'व्यक्तिस्वातंत्र्य आणि प्रत्येक व्यक्तीच्या हिताचा विचार' असंच करावं लागेल.

हे मूलतत्त्व अगदी संक्षेपात दिलेलं आहे, पण आपल्याला स्वतःची तपासणी करण्यासाठी एवढं पुरेसं आहे. आपल्यासारख्या मध्यमवर्गीय सुशिक्षित कुटुंबात 5 निरनिराळ्या संदर्भात आपल्याला हे तपासायचं आहे. 1) नवरा-बायको, 2) नवरा-बायको आणि मुलं, 3) नवरा-बायकोची माहेरं, भावंडं, म्हणजेच जवळची नाती, 4) दूरची नाती, मित्रमंडळी आणि कामानिमित्तानी नियमित भेटणारी लोकं, 5) आपला परिसर, बेताच्या ओळखीचे लोक, आपलं गाव, शहर, राज्य, देश वगैरे. आता पाचही संदर्भात आपली रोजची दिनचर्या तपासून बघू.

दिनचर्या तर जमलेल्या प्रत्येकाची निराळी असणार. त्यातल्या प्रत्येक घटनेचा विचार केला तर आपल्याला वेळ पुरणं शक्य नाही. त्यामुळे आपण पूर्वी उल्लेख केलेल्या संसाराच्या आधुनिक त्रिसूत्रीचा उपयोग करू. पारंपरिक व्याख्येप्रमाणे माणसाच्या अत्यावश्यक गरजा अन्न, वस्त्र, निवारा अशा मानलेल्या होत्या. आधुनिक व्याख्येत या तीनही मिळून चरितार्थ असं मानलेलं आहे. दुसरं सूत्र म्हणजे मानसिक आणि लैंगिक स्वास्थ्य. आपले या कार्यशाळेतले 5 संदर्भ लक्षात घेतले तर नवरा-बायकोतच फक्त लैंगिक स्वास्थ्याचा प्रश्न येत असल्यामुळे आपण त्याच्या व्यापक स्वरूपाचा विचार म्हणजेच स्त्री-पुरुषांचं एकमेकांशी असलेलं वागणं याचा विचार करू. आणि तिसरं सूत्र म्हणजे समानतेची जाणीव. याबद्दल आपण 'स्त्री-पुरुष असमानतेचे सबंध आयुष्यातले टप्पे' या लेखातून मुद्दे उचलू. शिवाय समाजातल्या 2 प्रमुख गटांबद्दलच्या 'आधुनिकता आणि पारंपरिकता

म्हणजे काय' या लेखाचाही आधार घेऊ.

थोडक्यात, आजच्या या कार्यशाळेत 5 निराळे संदर्भ आणि प्रत्येक संदर्भात ताडून बघण्यासाठी 3 सूत्रं अशी रचना ठेवू. अर्थातच, त्याबद्दल प्रत्येकानी बोलावं अशी अपेक्षा आहे. 3 सूत्रांची पुन्हा उजळणी करूया. 1) चरितार्थ, 2) लग्नाच्या जोडीदाराशी किंवा परस्त्री, परपुरुषांशी वागण्याची समज, 3) समानता या आधुनिक मूल्याची समज.

या कार्यशाळेच्या रचनेत एकूण 15 प्रश्न विचारलेले असतील. जमलेल्या प्रत्येकानी स्वतःची त्या बाबतीतली परिस्थिती सांगावी. मी स्वतः त्यातल्या प्रत्येक प्रश्नाचं उत्तर आधी सांगीन म्हणजे नेमकी कशा पद्धतीनी गटचर्चा पुढे सरकायला हवी ते समजेल.

1) नवरा-बायकोच्या म्हणजे मी आणि शोभा यांच्या संदर्भात मी चरितार्थाचा केलेला विचार, परस्त्री, परपुरुषांशी वागण्याची समज आणि समानता या आधुनिक मूल्याची माझी समज याबद्दल सांगतो.

सारांशात 1-1, 1-2, 1-3 या प्रश्नांबद्दल सांगायचं आहे. आणि केवळ स्वतःबद्दलच बोलायचं आहे हे लक्षात ठेवायचं. बायकोबद्दल किंवा नवऱ्याबद्दल बोलायचं नाही. जमलेल्यांपैकी अविवाहितांनी भावी जोडीदाराशी आपण कसे वागू, याविषयी बोलण्याखेरीज काही पर्याय नाही.

1-1) चरितार्थाबद्दल आयुष्यभर माझ्या मनात दोघांनी पैसे मिळवायचे, दोघांना पैसे मिळवण्याचा जो आवडीचा योग्य मार्ग वाटेल तो दोघांनी अमलात आणायचा आणि पैसे खर्च करण्याचं स्वातंत्र्यही दोघांना असेल अशीच कल्पना लग्नाआधीपासून होती. चरितार्थ चालवण्यासाठी आवश्यक ती बुद्धिमत्ता दोघांकडे असणार आणि सगळे निर्णय दोघं मिळून चर्चा करून पूर्ण लोकशाही पद्धतीनी घेणार अशीच होती. मी आणि शोभानी एकमेकांची निवड करताना या गोष्टीचा विचार केला होता. आम्ही आमच्या एवढ्या वर्षांच्या संसारात त्याप्रमाणेच वागू शकलो याचा आम्हाला अभिमान वाटतो.

1-2) परस्त्री आणि परपुरुष यांच्याशी वागण्याची समज याबाबतीत माझी परस्त्रियांशी वागण्याची समज यात किशोर वयात, तरुण वयात घोटाळे होते. आकर्षण फार होतं, घोळ होऊ शकेल याची भीतीही होती. काही

मुलींना मी आवडत होतो आणि त्यांच्याशी कसं वागायचं याबद्दल निर्णय होत नव्हता. दुसऱ्या बाजूनी ज्या मुली मला आवडत होत्या त्यांच्याकडून होकार येत नव्हता. 3-4 प्रेमभंग झाले. पण एक गोष्ट चांगली झाली ती म्हणजे माझ्या मनात विकृती असूनही परस्त्रियांशी कसं वागायचं नाही, हे मी बऱ्यापैकी शिकलो.मोठेपणी मी न शोभण्याजोगं क्वचित एक-दोन वेळा बोललो, पण चुकीचं कुठच्याही स्त्रीशी वागलो नाही. काही स्त्रियांविषयी मनात आकर्षण असूनही शिताफीनी ते त्यांना कधी कळू दिलं नाही. थोडक्यात, सभ्य माणूस ही प्रतिमा सांभाळली.

1-3) समानता या मूल्याची माझी समज अगदी किशोरवयापासून चांगलीच होती. स्त्री-पुरुष समानता, समानतेची समाजात वागणूक, धर्मभेद, वर्णभेद, जातिभेद याबद्दल अत्यंत उदार भूमिका असं माझं तरुणपण गेलं. शोभाशी लग्न ठरवणं, आणि करणं, संसार करणं या सगळ्या अवस्थांच्यात समानतेचं मूल्य मला अमलात आणता आलं.

2) मी आणि शोभा, शोनील आणि आभा या आमच्या मुलांशी चरितार्थ या विषयात आम्ही कसे वागलो, ते सांगतो.

2-1) मुलांच्या लहानपणी शोभा पैसे मिळवणार नाही हे आम्ही दोघांनी पूर्वीच योजनापूर्वक ठरवलेलं असल्यामुळे आमच्या लग्नानंतरची पहिली 5-7 वर्षं चरितार्थाची सगळी जबाबदारी माझ्यावरच होती. त्या काळात जेवढ्या नियमितपणी आणि कुटुंबाला काळजीत न टाकता चरितार्थ चालवण्याइतके पैसे मी मिळवायला हवे होते ते मी मिळवू शकलो नाही. खूप चढ-उतार झाले. त्यानंतर शोभा नोकरी करायला लागली. त्यामुळे मुलांवर फार ताण न येता आमचं भागलं, पण मुलांवर थोड्या प्रमाणात ताण आलेच. गेली 10 वर्षं नक्की ताणविरहित गेली आणि सुबत्ता आली. शेवटी सारांशात सांगायचं तर मी, शोभा आणि शोनील आभा यांचा आर्थिक प्रपंच माझ्या एकट्याकडून अस्थिरच झाला. लोकशाही मूलतत्त्वांप्रमाणे मी वागलो, पण अस्थिरतेनी असंच म्हणावं लागेल.

2-2) परस्त्री-परपुरुष नाती याविषयी ज्या वयात खरं म्हणजे आम्ही दोघांनी मुलांशी बोलायला हवं होतं त्या वयात आम्ही बोललो नाही. जरा उशिरा मात्र थेट विवाह अभ्यास मंडळच चालू केलं, त्या काळात आणि त्यामुळे

मुलांशी वागतानाची लोकशाही मूल्यं आम्ही सांभाळू शकलो.

2-3) समानतेची समज – स्त्री-पुरुष समानता खुद्द माझ्या वागणुकीत होतीच. इतर धर्मभेद, जातिभेद, वर्णभेद वगैरे गोष्टींपासून मी दूर असल्यामुळे मुलांवर तसेच लोकशाही संस्कार झाले.

3) शोभाची आणि माझी माहेरं आणि भावंडं यांच्या बाबतीत मी कसा वागलो, ते सांगतो.

3-1) शोभाचे वडील लवकर वारले. तिच्या आईशी मी लोकशाही मूल्यांप्रमाणे वागलो नाही असं मला वाटतं. शोभाच्या मोठ्या भावाकडे त्या राहात असत. त्यांना कदाचित बऱ्याच वेळा पैशाच्या अडचणी असायच्या. पण माझीच स्वतःची परिस्थिती जेमतेम असल्यामुळे मी त्यांची या बाबतीत काही चौकशीच केली नाही. माझ्या आई-वडलांचेदेखील चरितार्थ चालवण्यासंबंधीचे प्रश्न होते. ते माझ्याशी याबद्दल बोलले नाहीत, कारण माझ्या अडचणी त्यांना माहिती होत्या. मीही चौकशी केली नाही. सारांशात सांगायचं तर मी शोभाच्या आणि माझ्या आई-वडलांशी, भावंडांशी लोकशाही मूल्यांना धरून वागलो नाही.

3-2) परस्त्री, परपुरुष संबंध या बाबतीत मी सर्वसाधारणपणी ठीक वागलो. काही मध्यम जवळच्या नात्यांमधल्या स्त्रियांबद्दल मला अयोग्य म्हणण्याजोगं आकर्षण वाटायचं, पण वाढतं वय, समाजातली प्रतिमा, जीवनसाथमधला माझा अभ्यास, गटचर्चा, डॉक्टरेटच्या निमित्तानी झालेलं वाचन या सगळ्यामुळे मी त्यातून बाहेर आलो.

3-3) जवळच्या नातेवाइकांशी मी समानतेनी वागलो हे नक्की म्हणता येईल. धर्मभेद, वर्णभेद, जातिभेद यांच्या पलीकडे मी फार पूर्वीच पोहोचलो होतो. आमचा मुलगा इंग्लंडला असताना त्याचं एका ग्रीक ख्रिश्चन मुलीबरोबर लग्न ठरलं. माझा त्या गोष्टीला एक क्षणही तसूभरदेखील आक्षेप नव्हता. ती मराठी बोलत नाही या एका गोष्टीपलीकडे तिच्या वेगळेपणाविषयी आमच्या डोक्यात विचारही येत नाही.

4) माझी, शोभाची मित्रमंडळी, शोनील ॲनास्तेसिया यांची मित्रमंडळी, आभाची, श्रेयसची मित्रमंडळी, आमच्या कामावरचे लोक यांच्याशी माझी

वागण्याची पद्धत याविषयी सांगतो.

4-1) चरितार्थाबद्दल अशा लोकांशी माझा बराच संबंध आला, कारण मी बांधकामाच्या व्यवसायात होतो. अनेक लोक मित्र आणि क्लायंट असायचे. काही मित्र आणि पार्टनरही असायचे. पण मोकळेपणानी पैसे देणं, घेणं मला जमत असल्यामुळे कसलीच अडचण आली नाही.

4-2) सगळ्या मित्रमंडळींपैकी परस्त्री, याविषयी मला मनातून ज्यांच्याविषयी आकर्षण वाटतं अशा काही होत्या, अजूनही आहेत, पण मी चुकीचं वागणं मात्र शक्य नाही.

4-3) माझी वागणूक सगळ्यांशी कायम समानतेची होती. अगदी माझ्या बांधकामावर कामाला ठेवलेल्या रोजंदारीवरच्या बिगाऱ्याशी देखील मी सन्मानानी वागतो. स्त्री-पुरुष समानता तर माझ्यात भिनली आहे. मी कोणाताही धर्म, जात विचारत देखील नाही.

5) आपला परिसर, बेताच्या ओळखीचे लोक, पुणे शहर, महाराष्ट्र, इतर राज्यं, भारत देश, जागतिक प्रश्न यांच्याविषयी माझी परिस्थिती आता सांगतो.

5-1) मी कष्टाळू, प्रामाणिक, बुद्धिमान, प्रतिभावंत असूनही चरितार्थ चालवताना आयुष्यभर मला खूप अडचणी आल्या. बरेच वाईट अनुभव आले. त्या सगळ्या अडचणींच्यातून मार्ग काढून मी उच्च मध्यमवर्गीय आयुष्य जगण्यापर्यंत पोहोचलो हे चांगलं झालं. पण एकूण समाजाबद्दल मी असमाधानी आहे.

5-2) वाढत्या वयाबरोबर माझं पर-स्त्री आकर्षण कमी होत गेलं. निव्वळ शारीरिक सौंदर्याच्या बरोबरीनी इतर गुण महत्त्वाचे वाटायला लागले.

5-3) स्त्री-पुरुष समानता – संबंधात येणाऱ्या प्रत्येक माणसाचा सन्मान ठेवूनच मी वागतो. पण लोकांच्या एकूण असंस्कृत वागणुकीबद्दल मला असमाधान वाटतं. पण राजकारणात भाग न घेण्याबद्दल मी ठाम असल्यामुळे त्याबद्दल 'जीवनसाथ अभ्यास मंडळा'च्या माध्यमातून प्रबोधन करत राहण्यापलीकडे मी काही करू शकणार नाही.

लोकशाहीची कुटुंबातली समज याविषयीच्या कार्यशाळेत मी माझं उदाहरण समोर मांडल्यावर लोकांना कशा पद्धतीनी या विषयाकडे बघायचं याची कल्पना

आली. याच विषयावर पुन्हा एकदा कार्यशाळा घेऊ तेव्हा लोक आणखी तयारी करून येतील असं सगळे म्हणाले.

हे वाचणाऱ्यांनीही स्वतःची याबाबतीतली खरी परिस्थिती मोकळेपणानी लिहून कळवावी. पुढच्या आवृत्तीत ती जरूर घालता येईल.

●●●

3

एकत्र किंवा स्वतंत्र कुटुंब

जीवनसाथ विवाह अभ्यास मंडळातल्या 'कॅटॅगरीज' या खेळामधला एक वादविवाद आज इथे सांगतो आहे. विषय – 'एकत्र का स्वतंत्र कुटुंब'

अनिलदादा आणि शोभाताई मिळून : बरं का मंडळी, एकत्र कुटुंब ज्यांना पसंत आहे त्यांनी या बाजूला बसावं नि स्वतंत्र कुटुंबवाल्या लोकांनी विरुद्ध बाजूला त्या तिथे. मग खेळूया 'कॅटॅगरीज'? सगळ्यांना विचार मांडायची संधी मिळेल ही जबाबदारी मात्र सगळ्यांनी सांभाळायची.

सुबोध : एकत्र म्हणजे नेमकं कोणाकोणाचं कुटुंब समजायचं?

अनिलदादा : आई-वडील आणि लग्न झालेली मुलं एका घरात राहिली तर त्याला एकत्र कुटुंब समजायचं. तुम्ही जी बाजू निवडलीय त्याची कारणं सांगा आणि समोरच्याला ती पटवा. असाच हा खेळ आहे.

धीरज : मला एकत्र कुटुंब चांगलं वाटतं, कारण त्यात कायम घरात कोणीतरी असतं. त्यामुळे घर भरलेलं राहतं. मजा येते. स्वतः किल्ली वापरून दार उघडून आत यायला नेहमीच नको वाटतं हेही आहेच.

शुभदा : जेव्हा घरात फार माणसं असतात तेव्हा क्वचित मजा येते हे खरं आहे, पण बाकीच्या वेळेला त्रासच होतो.

शैलेश : मला एकत्र कुटुंबात छान वाटतं. घरचा स्वयंपाक, पाहुणे यांची सगळी जबाबदारी आई-बाबा घेतात. त्यामुळे दादा-वहिनी आणि त्यांची मुलं यांना काहीच बघावं लागत नाही. ते मला सुखाचं वाटतं. मी तसंच करीन. त्यांच्याबरोबरच लग्नानंतरही राहीन.

अनघा : पण मग संसाराची जबाबदारी कधीही न कळण्याची शक्यता आहे. स्वतंत्र कुटुंबात माणसाचा खरा कस लागतो. पैसे स्वतः मिळवून संसार

भागवण्यातच खरा पुरुषार्थ आहे.

सुवर्णा : अनेक स्वतंत्र काठ्यांपेक्षा अनेक काठ्यांच्या एकत्र बांधलेल्या जुडीत खूप ताकद असते हे तर मानाल? ती जुडी म्हणजेच एकत्र कुटुंब.

सोनाली : पण एकमेकांना बांधून घातल्यामुळे कुटुंबातल्या कोणालाच मनाप्रमाणे वागता येत नाही ना! कुटुंबप्रमुखाला सुद्धा मनाप्रमाणे वागता येणं अशक्य आहे. कारण त्या एका माणसावर फार जबाबदारी असते. आणि हो. अनघाचा पुरुषार्थ शब्द शब्दशः घ्यायचा नाही, बरं का!

स्वाती : एकत्र कुटुंबात कोणी आजारी असलं की आळीपाळीनी शुश्रूषेची जबाबदारी घेता येते. शिवाय लहान मुलांना सांभाळण्याचा फार मोठा प्रश्न सुटतो.

अल्पना : हे थोडंसं खरं असलं तरी आई-वडलांचा सहवास मुलांना पुरेसा न लाभल्यामुळे इतरांकडून नको ते संस्कार होण्याचीही शक्यता असते. त्यावरून भांडणंही होतात.

शोभाताई : ही दोन पर्यायांमधून एक निवडण्याची कसोटी असते खरी म्हणजे. आजी, आजोबा या विषयावरून नवरा-बायकोमधे बारीकबारीक बरेच वाद होतात हेही खरं आहे आणि आजी-आजोबांची गरज असते हेही खरं आहे. या प्रश्नाची तयारी लग्नाआधीच काय, जोडीदार निवडीपूर्वी असावी यासाठी तर ही आजची कार्यशाळा आहे.

किरण : त्या भांडणांना महत्त्व द्यायचं नाही. कारण इतर जण जे संस्कार करतात ते मुलांच्या भल्यासाठीच ना! आजी, आजोबा, काका, काकू आपल्या मुलांच्या हितासाठीच सांगत असतात.

अस्मिता : जेव्हा आजी-आजोबांचं ते वागणं आई-वडलांना पटत नाही तेव्हा काय करायचं? अनेक सासू-सुनांची भांडणं आपण बघतोच की. स्वयंपाकाच्या पद्धतीवरून, नवऱ्यांच्या मिळकतीत फरक असल्यामुळे वगैरे. मला तर स्वतंत्र रहाणंच चांगलं वाटतं.

केवळ दोन पिढीतल्या फरकामुळे सुद्धा संघर्ष निर्माण होऊ शकतात. त्या व्यक्ती वाईट नसतात. सगळ्यांचा चांगला हेतू असतो पण तरी ती भट्टी नाही जमत. टी.व्ही. सीरियल्समधे 'दादीच्या इच्छेसाठी' म्हणून हीरो-हिरॉइन काय काय करत असतात आणि दाद्या त्यांच्याकडून त्यांच्या मनाविरुद्ध करवून घेत असतात. मला समजत नाही, अशा कशा सगळ्या दाद्या ब्लॅकमेलर?

अनघा : एकत्र कुटुंबात कमी पैसे मिळवणाऱ्याचा फायदा होतो नि जास्त

कमावणाऱ्याला स्वतःवरचा तो अन्याय वाटू लागतो. अशा वेळी ते स्वतंत्र होतात.

हृषिकेश : असं घर फोडण्याचं काम सुना करतात बहुतेक वेळा. त्या दुसऱ्या घरातून आलेल्या असतात ना!

शुभदा : एकत्र कुटुंबात एकूण सुनेवर अन्यायच होतो. कुठच्याही दोन घरांच्या पद्धतीत फरक असणारच. एका विशिष्ट तऱ्हेनी वागणाऱ्या एकत्र मोठ्या कुटुंबात निराळ्या कुटुंबातली मुलगी लग्न करून आली की तिची गळचेपीच होणार.

समजा, नवऱ्याचं एकत्र कुटुंब सहा माणसांचं असलं तर कुटुंबाच्या चालीरीती, संस्कार या सगळ्या बाबतीत त्या मुलीची अवस्था एक विरुद्ध सहा अशीच होणार. अनेक ठिकाणी या अशा परिस्थितीमधे त्या मुलीची नवऱ्याशीसुद्धा नीट ओळख होऊ शकत नाही. अगदी स्वतंत्र खोली असली तरी पलीकडे आवाज पोहोचू नये म्हणून नवरा-बायकोला कुजबुजत किंवा खाणाखुणांनी कित्येक वेळा दिवे बंद करून अंधारात संवाद साधावा लागतो.

अनिलदादा : ही चर्चा व्यवस्थित चालू आहे. पण जरा थोडी थिअरी सांगतो. स्त्री-पुरुष समानता आणि एकत्र कुटुंबपद्धती या दोन गोष्टींची अंमलबजावणी एका वेळेला करताच येणं शक्य नाही. एकत्र कुटुंब या कल्पनेत पुरुष श्रेष्ठ आणि त्याच्या कुटुंबात स्त्री राहायला येणार हे गृहीतच धरलेलं आहे. आणखी एक मानसशास्त्रीय तत्त्व समजून घेण्याजोगं आहे. प्रत्येकच व्यक्तीच्या दृष्टीनी ती स्वतः सर्वांत महत्त्वाची व्यक्ती असते. त्याला नं. 1 म्हणूया. लग्न होईपर्यंत बहुतेक मुलग्यांच्या आयुष्यात नं. 2 ची व्यक्ती आई असते. लग्नानंतर त्या नं. 2 च्या आसनावर बसण्यासाठी बायको येते आणि आई खाली ढकलली जाते. हा खरं तर लग्नाचा एक प्रमुख भाग आहे. पण यामुळे नं. 2 च्या जागेबद्दलचा संघर्ष असं सासू-सुनेच्या नात्याचं विश्लेषण आहे. ज्या सासूबाईंना हे समजतं तिथे ही भांडणं होत नाहीत.

धीरज : लहान मुलांच्या दृष्टीनी एकत्र कुटुंबाइतकी सोयीची गोष्ट नाही असं अजूनही वाटतं. कधीकधी आई-वडलांची मुलांना पाळणाघरांत, शाळेत सोडणं, आणणं ही धावपळ पाहिली की दया येते त्यांची. आजी आजोबा असले की बरं असतं.

सोनाली : त्या तेवढ्या काही वर्षांच्या सोयीसाठी अनेक जोडपी लग्नानंतरची काही वर्षं एकत्र आणि पुढे स्वतंत्र असं करताना दिसतात. हा मात्र फार स्वार्थीपणा वाटतो. त्यांनी कायम एकत्र रहावं की आवडत असलं तर!

शोभाताई : तरुण पिढी सोईस्करपणे आपली वागणूक बदलते हे चूक आहे. लहान मुलं सांभाळायला त्यांना आई आठवते. एरवी ते नकोसे वाटतात. त्यांनी स्वतः मुलं सांभाळावीत किंवा पाळणाघरात ठेवावीत.

गायत्री : मुख्य प्रश्न आणखी निराळाच आहे. मुंबई-पुण्यासारख्या ठिकाणी कुटुंब वाढलं की जागा पुरेनाशीच होते. स्वतंत्र जागा घ्यायची म्हटली तर खूपच लांब जावं लागतं. मुंबईसारख्या ठिकाणी या सगळ्या चर्चेला काही अर्थच नाही, कारण एकत्र राहण्याला जागेच्या अडचणीमुळे पर्यायच नसतो. छोट्या जागेत आळीपाळीनी बेडरूम वापरणारी जोडपी माझ्या ओळखीत आहेत.

अल्पना : पण त्या जागेच्या ताणापेक्षा घर खूप लांब असलं तरी नवरा-बायकोचं स्वतंत्र कुटुंब जास्त सुखाचं होईल. कारण स्वातंत्र्य असेल.

सुवर्णा : एकत्र कुटुंबात आसपास निरनिराळ्या वयाची दिवसभर खूप माणसं असल्यामुळे भांडणं कमी होतात. भांडणासाठी लागणारी प्रायव्हसी मिळत नाही.

अनघा : पण मग रात्री बेडरूममधे धुसफूस चालते. अबोला, रुसवे असतात. त्यापेक्षा उघड बोलता आलेलं चांगलं. त्यानी ताण तरी निर्माण होत नाहीत.

अनिलदादा : कोणी काहीही म्हणालं तरी हे मान्यच करावं लागतं की नवरा-बायकोचं दोघांचंच असं स्वतंत्र विश्व असतं. शारीरिक जवळिकीबरोबरच मानसिक जवळीकही वाढत जाते. एकमेकांना एकमेकांचे अनेक छुपे कप्पे माहिती असतात. मानसशास्त्रानी कुठच्याही दोन व्यक्तींमधला संवाद याची पातळी अतिशय निराळी मानलेलीच आहे. त्यात तिसरी व्यक्ती आली की त्या संवादाची पद्धत संपूर्ण बदलते. मग त्यात चौथी व्यक्ती आली काय आणि पाचवी आली काय! संवाद करणाऱ्या माणसांचं 'सायकोडायनॅमिक्स' हा निराळाच अभ्यासाचा विषय मानतात. पण मूळ मुद्दा दोन व्यक्ती हाच आहे. इंग्लिशमधे एक वचन आहे, त्यात फार तथ्य आहे. 'टू इज कंपनी अँड थ्री इज क्राउड'. एकत्र कुटुंबात जेवढी माणसं साधारणपणे असतात त्याला 'ओव्हरक्राउड' म्हणावं लागेल. त्याशिवाय एवढ्या लोकांचे येणारे-जाणारे पाहुणे देखील असणारच.

शोभाताई : ज्यांना शेजारचे दोन फ्लॅट्स घेणं जमेल त्यांना मात्र स्वतंत्र आणि एकत्र कुटुंब पद्धतीचे फायदे घेता येतील. जागा लहान असली तरी देखील भाग करता येतात. मधे पार्टिशन्स बसवता येतात.

अनिलदादा : जागा हा मुख्य प्रश्न असू शकतो. बिनदरवाजाच्या माड्यांपासून अॅटॅच्ड टॉयलेटपर्यंत गृहरचनेत बदल झालेलाच आहे. काही काही जागा मात्र अशा असतात की, त्याचे भाग करता येत नाहीत. स्वतंत्र आणि एकत्र कुटुंबाचे फायदे घेता येतील अशा प्रकारे घराचं डिझाइन करता येतं. त्याचा व्यवस्थित आराखडा बनवून घ्यावा लागतो. पण आता एवढंच सांगतो की हे करता येतं.

शोभाताई : कामं आळीपाळीनी उरकता येतात. आम्ही आमच्या स्वतःच्या संसारात असं प्रत्यक्ष केलं होतं. छोटी मुंबईतली जागा, त्यात आमच्या तान्ह्या मुलासकट संसार एका खोलीत मांडला होता. पुढे आम्ही पुण्याला आलो. पुण्यात जागा खूप होती. पण आजोबांचा आणि आमचा संसार स्वतंत्र ठेवला. अनिलचे आई-वडील आणि आम्ही कायम स्वतंत्र राहिल्यामुळे आमचे संबंध आयुष्यभर प्रेमाचे राहिले.

आणखी एक गोष्टही मी क्वचित बघितली आहे. स्वतंत्र कुटुंब म्हणजे प्रत्येकाचं स्वातंत्र्य. प्रत्येकाची 'स्पेस'. याची समज सगळ्यांना असली तर सुखानी राहणारं एकत्र कुटुंबही असतं. आणि ती समज नसली तर स्वतंत्र कुटुंबात राहणाऱ्या नवरा-बायकोत देखील संघर्ष होतो.

अनिलदादा : माझ्या विवाह अभ्यासाचा निष्कर्ष या बाबतीत असा आहे. निरनिराळ्या संवेदनांचं, विचार, भावना यांचं प्रत्येक माणसाला कमीजास्त महत्त्व असतं. ज्याला आत्मसन्मान ही भावना तीव्र आणि खूप महत्त्वाची आहे, ती व्यक्ती स्वतंत्र कुटुंबच पसंत करणार. काहींना माणसं, नाती, एकमेकांची सोय, परंपरा याचं जास्त महत्त्व असतं. ते एकत्र कुटुंब पसंत करणार. यातला कुठचाही गट चूक किंवा बरोबर असं काही नाहीय. हा व्यक्तिमत्त्वाचा प्रकार आहे. त्याबद्दल वेळेवर विचार करता यावा हाच प्रयत्न आहे.

ज्या नवरा-बायकोचं या बाबतीतलं व्यक्तिमत्त्व भिन्न प्रकारचं आहे त्यांच्यात या विषयावर संघर्ष होणार हे नक्की आहे. पारंपरिक संसाराच्या व्याख्येमधे एकत्र कुटुंब गृहीत धरलेलं होतं. आधुनिक विचारात हे दोन पर्याय मान्य आहेत, हा मुख्य फरक आहे. आमची इच्छा एवढीच की तुम्ही स्वतः कसे आहात हे तुम्हाला वेळेवर ठरवता यावं आणि त्याविषयीच्या चर्चेनंतर मग जोडीदाराची निवड करावी.

लोकशाही नजरेसमोर ठेवून यापुढे आपण हेच मुद्दे मोठ्या एकत्र कुटुंबात तपासून बघितले, छोट्या एकत्र कुटुंबात तपासले आणि विभक्त कुटुंबात पण

तपासले तर असं चित्र दिसतं की, विभक्त कुटुंबात लोकशाही शक्य तरी आहे. छोट्या एकत्र कुटुंबात कठीण पण अशक्य नाही. छोटं एकत्र कुटुंब म्हणजे आजी-आजोबा, 2 मुलगे, 2 सुना आणि 2-3 मुलं. थोडक्यात, 9-10 माणसं. मोठ्या एकत्र कुटुंबात सरासरी 20 ते 25 माणसं असतात. मोठ्या कुटुंबात तात्पुरता बेबनाव झाला तर न्यायदानाची व्यवस्था तत्त्वतः अशक्य नाही. अबोला, असहकार या गोष्टी थोड्या काळासाठी होतातही, पण फार प्रमाणात झाल्या तर विभक्त कुटुंब करण्याला पर्याय उरत नाही.

एकत्र किंवा विभक्त कुटुंब या विषयाचा अभ्यासक म्हणून मला सरळ सरळ 2 विचारगट दिसतात. विभक्त कुटुंब आणि व्यक्तिस्वातंत्र्य, स्त्री-पुरुष समानता, आधुनिकता, लोकशाहीची मूल्यं हा एक गट आहे. एकत्र कुटुंब आणि असमानता, पारंपरिकता आणि हुकूमशाही हा दुसरा गट आहे.

व्यवस्थापनशास्त्रामधे महत्त्वाचा प्रश्न आणि किरकोळ प्रश्न निराळे काढण्यासाठी एक पद्धत असते. त्या पद्धतीविषयी ‘विवाह आणि व्यवस्थापनशास्त्र’ या लेखात सविस्तर सांगितलेलं असल्यामुळे इथे सांगत नाही, पण महत्त्वाचा आणि गौण प्रश्न यात गल्लत केली तर चुकीचे निर्णय होऊ शकतात. एकत्र का विभक्त कुटुंब, याचा विचार करताना त्या माणसाची, लग्न करणाऱ्या जोडप्याची मूळ प्रवृत्ती, या विषयातली परिपक्वता हा खरा महत्त्वाचा प्रश्न असतो. स्वतंत्र राहण्याची प्रवृत्ती असली आणि जागा अपुरी हाच प्रश्न असला तर भाड्याची जागा घेता येते. पण स्वतःच्या मालकीची जागा झाल्याशिवाय लग्न पुढे ढकलणारेही मी बघितले आहेत किंवा लगेच लग्न करून एकत्र कुटुंबात अस्वस्थ आयुष्य काढणारी जोडपीही बघितली आहेत.

समोरची व्यक्ती कोणीही असो, वयानी छोटी असो, मोठी असो, सर्व परिस्थितीमधे आपल्याला जे काही म्हणायचंय ते मुद्देसूद, स्पष्ट, थोडक्यात आणि सभ्यपणे मांडता येणं हे महत्त्वाचं आहे. ते लोकशाहीतलं मुख्य पथ्य आणि लक्षण आहे. एकत्र कुटुंबात संपूर्ण कुटुंबाची प्रतिष्ठा हे महत्त्वाचं मूल्य मानलेलं असतं. त्याला धक्का लागलेला अजिबात चालत नाही. त्या प्रतिष्ठेच्या कल्पनांमुळे अनेक मतभेद लपवलेदेखील जातात.

भागीदारीचे काही नियम आहेत. मध्यम आवक असली तर ती टिकते. जास्त किंवा कमी आवक म्हणजे भागीदारीला धोका. एकत्र कुटुंबाला भागीदारीचे सगळे नियम लागू होतात, ही गोष्ट कायम डोक्यात ठेवायला हवी.

आई-वडलांनी मुलांचं लहानपणापासून लालन-पालन केलेलं असतं हे कबूलच आहे. पण आई-वडलांनी मुळात मुलांना जन्माला घातलेलं असतं ते स्वतःच्या आनंदासाठी, हेही मान्य करायला हवं. त्यामुळे 'जन्मदाता' या कल्पनेचं किती अवडंबर करायचं, हा विचार नीट व्हायला हवा. सगळ्यांच्या सगळ्या भावनांविषयी मला आदर आहे, कदर आहे. माझ्या आई-वडलांबद्दलच्या माझ्या भावना, त्यांच्या माझ्याविषयीच्या भावना यांची मला पूर्ण जाणीव आहे. आमच्या मुलांविषयी मला आणि माझ्याविषयीच्या त्यांच्या भावनांची पूर्ण जाणीव ठेवून मी हे म्हणतोय. कृतज्ञतेची अतिशयोक्त कल्पना हा खऱ्या रास्त, वास्तव कृतीमधला अडसर बनतो आणि शेवटी योग्य निर्णय होत नाहीत.

एकत्र कुटुंब आणि गोडीगुलाबीत राहतायत असं दुरून वाटावं अशीही कुटुंबं असतात. पण नीट बघितलं तर त्यातल्या राहणाऱ्या लोकांना एकमेकांविषयी माहितीही नसते आणि कदरही नसते असं दिसतं. स्वयंपाकासाठी, घरकामासाठी माणसं नेमलेली असतात आणि एखाद्या खानावळीसारखी माणसं जेवून आपापल्या विभागात गुडूप होतात. अशा अवस्थेतल्या एकत्र कुटुंबानी एवढंच ठरवायचं असतं की वेळीच गोडीत स्वतंत्र व्हायचं की भांडून उशिरा स्वतंत्र व्हायचं. एक अभ्यासक म्हणून मला वाटतं की, स्वतंत्र राहून संसाराला सुरुवात करावी. सासर नि सुनेचा संसार, सुनेचं माहेर यांचं चांगलं पटतंय असं वाटलं तर एकमेकांकडे जाणं वाढवत न्यावं आणि तरी खरंच जमतंय अशी खात्री झाली तर शेजारी दोन स्वतंत्र घरं करावीत. मुख्य म्हणजे या विषयावर लग्नाआधी चर्चा आणि एकमत व्हायला हवं.

जीवनसाथ विवाह अभ्यास मंडळ स्पष्ट विचार याच उद्देशानी चालू केलेलं असल्यामुळे एका विषयावर विचारांचा खेळ मधून मधून आम्ही खेळतो. साधारण 15 ते 20 लोकं असतात. अविवाहित, विवाहित असा मिश्र गट असतो, यांच्यात हा खेळ असतो. मी तो खेळ समजावून सांगतो. एका एकत्र कुटुंबाचं वर्णन करायचं. आपल्या अनुभवाप्रमाणे, कल्पनेप्रमाणे या एकत्र कुटुंबात कोणकोण माणसं रहात असतील एवढं नुसतं सांगायचं. आधीच्यानी सांगितलेल्या व्यक्तीला पुढच्यानी यादीतून काढायचं नाही, एकच माणूस यादीत वाढवायचा आणि दुसरी सर्वांत महत्त्वाची अट म्हणजे ही यादी बनवताना कुठेही स्त्री-पुरुष असमानता त्यात येऊ द्यायची नाही. आता सुरू करूया?

मिश्र गटातली व्यक्ती क्र. 1 : नव्वदीतले आजोबा आणि ऐंशीमधल्या आजी.

व्यक्ती क्र. 2 : साधारण सत्तरीमधला त्यांचा मुलगा आणि पासष्टीची त्याची बायको.

व्यक्ती क्र. 3 : पंचेचाळीस वर्षांचा त्यांचा मुलगा आणि त्याची बायको.

व्यक्ती क्र. 4 : चाळिशीची त्यांची मुलगी आणि तिचा नवरा.

व्यक्ती क्र. 5 : मला एक प्रश्न आहे. स्त्री-पुरुष समानतेनी वागण्याची अट असल्यामुळे सत्तरीतल्या माणसाची बहीण पण तिथेच रहायला हवी. आणि ती तिच्या नवऱ्याबरोबरच राहणार असल्यामुळे तोही तिथेच राहणार.

व्यक्ती क्र. 6 : हा मुद्दा बरोबर आहे. पंचेचाळीस वर्षांच्या मुलाची बहीण आणि तिचा नवरा तिथेच राहणार हे बरोबर आहे. खरं म्हणजे सत्तरीतल्या माणसाची लग्न झालेली बहीण आणि तिचा नवराही तिथेच रहायला पाहिजे.

व्यक्ती क्र. 7 : आणि त्यांची मुलं पण.

व्यक्ती क्र. 8 : आमचा हे सगळं ऐकतानाच गोंधळ होतोय. एकत्र कुटुंब आणि स्त्री-पुरुष समानता दोन्ही कल्पनांचा वापर करायचा असेल तर नव्वदीतल्या आजोबांची इतर मुलं इथेच पाहिजेत.

व्यक्ती क्र. 9 : ऐंशीमधल्या आजीबाईंचा भाऊ आणि त्याची बायकोही पाहिजे.

व्यक्ती क्र. 10 : हा घोटाळा, गोतावळा वाढतच चाललाय. या सगळ्या प्रकरणात बहिणी आणि त्यांचे नवरे कसे येतील?

व्यक्ती क्र. 11 : एकत्र कुटुंबात बहिणींचे नवरे घ्यायचे तर त्या नवऱ्याच्या आई-वडलांचं काय? त्यांनीही एकत्रच रहायला पाहिजे ना!

व्यक्ती क्र. 12 : एकत्र कुटुंब किंवा स्त्री-पुरुष समानता यापैकी एक काहीतरी जमेल असंच लक्षण दिसतंय मला.

व्यक्ती क्र. 13 : आतापर्यंतच 30-35 माणसांची यादी झालीय. ही एवढी लोकं एकत्र राहणार म्हणजे केवढं घर पाहिजे!

व्यक्ती क्र. 14 : आणि या सगळ्यांची मुलं, त्यांच्या बायका, त्यांचे भाऊ, भावांच्या बायका, बायकांचे भाऊ, त्याही भावांच्या बायका ही सगळी यादी न संपणारीच आहे. घर किती मोठं हा प्रश्नच नाही, सबंध गाव या कुटुंबाला लागेल आणि तरी ते पुरणार नाही.

व्यक्ती क्र. 15 : मी तर पार वेडाच झालो आहे हे ऐकून.

निष्कर्ष : एकत्र कुटुंब पद्धतीमधलं मूळ गृहीतच पुरुषप्रधानतेवर बेतलेलं आहे. नवऱ्याच्या घरी बायको राहायला जाणार. अधिक मुलगे असले तर त्यांच्या बायका धरून संख्या वाढेल, पण मूळ गृहितात काही बदल नाही. नवऱ्याकडे बायको राहणार. त्यामुळे एकत्र कुटुंब पद्धती आणि स्त्री-पुरुष समानता या दोन कल्पनांचं एकत्रीकरण करताच येणार नाही. एकत्र कुटुंब याचा अर्थ स्त्री-पुरुष असमानता मान्य.

आधी एकत्र कुटुंबाची सवय असलेल्या मुलांनी विभक्त कुटुंबात रहावं असं आई-वडलांनाच कित्येक वेळा वाटायला लागतं. कारण ते पटलेलं असतं. स्वतंत्र कुटुंबात स्वतः जगाला तोंड देण्याची ताकद कमावल्याशिवाय व्यक्तिमत्त्व विकास शक्य नाही हे आई-वडलांना पटलं, पण मुलालाच तेवढा आत्मविश्वास नाही अशी ही उदाहरणं मी बघितली आहेत. अशा आई-वडलांनी युक्तीयुक्तीनी अर्धसत्याचा आधार घेऊन गोडीत मुलाला बाहेर काढायला हवं. अकस्मात ही गोष्ट घडली की कटुता निर्माण होण्याची शक्यता असते. आपुलकी असल्यामुळे पैशाची, श्रमाची, सल्ल्याची सगळी मदत करावी, पण शेवटी स्वतंत्र बनवावं. माझ्या आणि शोभाच्या पालक शिक्षणाच्या कार्यशाळा नियमित चालू असतात. त्यात या एका मुद्द्यावर बरीच चर्चा चालते. काही निरीक्षणं मांडतो.

- राजकारणाचं वातावरण पूर्वी हुकूमशाहीचं असल्यामुळे भारतातल्या कुटुंबातही हुकूमशाही रुजली.
- गेल्या 25 वर्षांत, विशेषतः शहरात स्वतंत्र कुटुंबांचं प्रमाण वाढलं.
- मुंबईत जागेच्या प्रश्नामुळे एकत्र कुटुंबं असतात.
- पुण्यात जागा खूप असल्यामुळे एकत्र कुटुंबं असतात.
- छोट्या शहरात सामाजिक वातावरणामुळे एकत्र कुटुंबं असतात.
- ग्रामीण भागात जवळजवळ सगळीच एकत्र कुटुंबं असतात. शेतीची तर ती गरजच आहे.
- सारांशात, अजूनही एकत्र कुटुंबंच भारतातली पारंपरिक पद्धत आहे.

आणि तरी आपली ही सगळी चर्चा ज्यांना लागू नाही अशी कुटुंबं आहेतच. त्यांची परिस्थिती निराळी, प्रश्न निराळे, उत्तरं निराळी.

- ज्यांना मुलगा नाही त्यांची एकत्र कुटुंबाची व्याख्या निराळी होते.
- एकटी म्हातारी आई असली तरी सगळं बदलतं.

● एकटे वडील असले तर निराळी कुटुंबरचना करावीच लागते.

या विषयात जीवनसाथमधल्या लोकांशी बोलताना आणखी एक गोष्ट माझ्या लक्षात आली. एखाद्याचे वडील वारले, भावंडं नसली आणि आई एकटी असली की मुलांच्या दृष्टीनी एकत्र कुटुंबाची व्याख्याच बदलते. आमच्यासमोर अशा एकट्या आयादेखील स्वतंत्र घर करून राहिल्याची उदाहरणं आहेत, पण फारच क्वचित असं आढळतं.

मूल किंवा आई-वडील आर्थिक-शारीरिक बाबतीत कमजोर असले तर बाहेर राहून मदत करणं जास्त अडचणीचं आणि खर्चाचं असतं. सबंध विचार निराळाच करावा लागतो. मतिमंद किंवा गतिमंद, अपंग मूल असलं की सगळं बदलतं.

एकामधून दुसरा मुद्दा सुचत जातो, कळत जातो, बोलला जातो. अधिक स्पष्ट होतो. ते सगळे मुद्दे आता एकत्रितपणे सांगतो. हा असा संवाद उत्तम रंगला आहे. तो अजून काही तासही चालेल. मुला-मुलींनी मांडलेले मुद्दे उजळणीच्या स्वरूपात मांडतो.

● स्वतःचं किंवा जोडीदाराचं खरं व्यक्तिमत्त्व एकत्र कुटुंबात कळतच नाही. स्वतःची चरितार्थ चालवण्याची धमकही कळत नाही. गुण पण लपतात आणि दुर्गुणही लपतात.

● एकत्र कुटुंबच बरं असं म्हणणाऱ्या लोकांना एक महत्त्वाची गोष्ट कळलेली नसते असं मला वाटतं, ती म्हणजे स्वावलंबनाचं महत्त्व. त्यातलं विशेषकरून आर्थिक स्वावलंबन आणि त्याचबरोबर आत्मसन्मान एकत्र कुटुंबात मार खातो.

● स्वतंत्र कुटुंबात स्वावलंबनाचा भार, स्वातंत्र्य, प्रायव्हसी मिळते. त्यामुळे आत्मविश्वास वाढतो, कार्यक्षमता वाढते.

● शहरी सुशिक्षितांची प्रत्येकाची विचारसरणी निराळी असते. त्यामुळे एका कुटुंबप्रमुखाच्या सूत्रानी कुटुंब चालू शकत नाही.

● याबाबतीत मोठी शहरं, छोटी शहरं, छोटी गावं यात फार फरक आहे. 20-25 वर्षांची गॅप बदलांच्या बाबतीत आढळतेच. शेतीची पार्श्वभूमी असेल तर इलाजच नसतो.

● लहान वयाच्या, स्वाभिमानी, प्रखर व्यक्तिमत्त्वाच्या माणसाला एकत्र कुटुंबात मिंधेपणा येऊ शकतो.

● एकत्र कुटुंबातल्या सुनेची कुचंबणा सर्वांत जास्त होते. मुलाचीही पंचाईत होतेच. कारण तो कोणाचीच बाजू घेऊ शकत नाही.

● एकत्र कुटुंबातल्या कामाच्या विभागणीतसुद्धा स्त्री-पुरुष समानता मोडीत निघते.

● पैसे कमावण्याची ताकद भावंडांची कमी-जास्त असली तरी प्रश्न असतात.

अगदी क्वचित आढळणारी गोष्ट आहे हे मला माहीत आहे, पण काही एकत्र कुटुंबं माझ्या प्रत्यक्ष माहितीची, गुण्यागोविंदानी एकत्र संसार करणारी आहेत. त्याचं श्रेय ज्येष्ठांना जातं. त्यांना वागणुकीचे 'डूज अँड डोन्ट्स' माहिती असल्यामुळे सगळ्यांचं आयुष्य सोपं होतं. या विषयावर एक इंग्लिश पुस्तक आहे. त्याचं नाव 'हाऊ टु रेझ युअर पेरंट्स'. या पुस्तकसंचात ज्येष्ठ नागरिकांशी संवाद या विषयावर लेख आहे, त्यात सुसंवादासाठी आवश्यक अशा बऱ्याच उपयोगी गोष्टी सांगितल्या आहेत.

विभक्त कुटुंब असलं तरी नवरा-बायको निरनिराळ्या कामामधे व्यग्र असू शकतात. मुलं जरा मोठी झाली की दिनचर्येमधल्या फरकामुळे एकमेकांसाठी कोणाला वेळच नसतो. एकत्र कुटुंबात तर ही परिस्थिती आणखी गंभीर बनते. या असंवादाचं पुढचं रूप विसंवाद. एवढ्या निरनिराळ्या व्यक्ती म्हणजे निराळी व्यक्तिमत्त्वं असणारच, प्रश्न असणारच. ते सोडवले नाहीत तर गंभीर होणारच. याला एकच मार्ग म्हणजे कुटुंबचर्चा. आधीपासून ठरलेला दिवस, वेळ हवा. प्रश्न मांडण्याची सगळ्यांपाशी हातोटी हवी.

अशा कुटुंबचर्चांमधे पैशाचे प्रश्न आणि वागणुकीचे प्रश्न सुटायलाच हवेत. त्याखेरीज प्रश्न असतो समाईक वस्तू, वापरण्याच्या वेळा, दुरुस्त्या, समाईक मालमत्ता, समाईक मोलकरणी वगैरे. हे असे प्रश्न अगदी थेट व्यवसायातल्या, धंद्यातल्या प्रश्नांसारखेच असतात. कोठीच्या सामानाची व्यवस्था, स्वयंपाकघरातल्या वस्तूंची व्यवस्था हे अगदी थेट व्यवस्थापन क्षेत्रातले प्रश्न असतात आणि ते प्रश्न योग्य पद्धतीनी वेळेवर सुटले नाहीत तर घोटाळे अगदी ठरलेले.

एकत्र कुटुंबात एक फायदा असतो. मोठ्या कुटुंबातल्या एखाद्या व्यक्तीला, जोडप्याला तात्पुरती किंवा जास्त काळ पैशाची अडचण येऊ शकते. तात्पुरती रक्कम उभी करायची झाली तर अशा कुटुंबातल्या सगळ्या कमावणाऱ्या सदस्यांनी थोडा थोडा भार उचलला तर प्रश्न सहज मिटतात. त्यासाठी एकमेकांच्यातले पैशाचे व्यवहार, समज या गेष्टी फार स्वच्छ असायला लागतात. निर्मळ मनानी, रास्त व्याजदरानी एकमेकांना पैसे उसने देणं-घेणं ही गोष्ट सहज घडायला लागते. या बाबतीत मी बघितलेल्या अनेक मराठी कुटुंबात हा निर्मळ आणि चोख व्यवहार नसल्यानी एकत्र कुटुंबपद्धतीचा खरा उपयोग होऊ शकत नाही, याचं वाईट वाटतं.

शहरामधला समाज व्यक्तिवादी असतो आणि जसं छोट्या गावात जाऊ तसा समाज कुटुंबवादी होतो. लोक असा वाद घालतात की, ही मी सांगितलेली सगळी व्यवस्थापनाची तंत्रं कारखाने, संस्था यांच्यासाठी आहेत. कुटुंबासाठी याची काही जरूर नाही. मला स्वतःला हे पटत नाही. माझ्या मते, कुटुंबात महिन्यातून एकदा एकत्र चर्चा अत्यावश्यक आहे. एखाद्या प्रसंगी यापेक्षाही लवकर भेटण्याची गरज असू शकते. ते अडचणीच्या स्वरूपावर अवलंबून ठेवावं.

या पुस्तकसंचात इतर ठिकाणी उल्लेख तुम्ही वाचलेला असेल, तरी सांगतो. आर्किटेक्चर, कॉन्ट्रॅक्टर आणि बिल्डर, मॅनेजमेंट कन्सल्टंट या माझ्या व्यवसायामधे मी महाराष्ट्रात आणि राज्याबाहेरही बरीच कामं केली. शहराबाहेर जवळजवळ सगळी एकत्र कुटुंबं असतात. जमिनी मोठ्या असतात. त्यांच्या गरजा लक्षात घेऊन एकत्र कुटुंबासाठी म्हटलं तर स्वतंत्र, पण पाहिजे तेव्हा एकत्र अशी सोय असणारी मी डिझाइन केलेली बरीच घरं आहेत. शहरात मात्र ते जवळजवळ अशक्य असतं.

माणसाची दुसऱ्यावर प्रेम करण्याची क्षमता कमी-जास्त असू शकते हे मान्य आहे. पण एकत्र कुटुंबातल्या सगळ्या माणसांवर प्रेम करण्याइतकी क्षमता कोणातही नसते. त्यामुळे एकत्र कुटुंबात वागणुकीतल्या भावनिक प्रामाणिकपणाची शक्यता कमी होते.

आता आपण याहून स्पष्ट विचारासाठी एक तक्ता बनवूया. चक्क तुलनेचा तक्ता. एका बाजूला एकत्र कुटुंबाचे फायदे-तोटे. आणि दुसऱ्या बाजूला विभक्त कुटुंबाचे फायदे-तोटे. एक एक करून करुया सुरुवात?

सोयीसाठी तुलना तक्ता

फक्त स्वतंत्र कुटुंबाची व्याख्या = नवरा बायको, न कमावणारी अविवाहित मुलं एका ठिकाणी (एका चुलीत) राहणं.

तुलना

एकत्र कुटुंब		**स्वतंत्र कुटुंब**	
फायदे	तोटे	फायदे	तोटे
एकत्र स्वयंपाक, वेळ वाचतो.			स्वयंपाकात वेळ जास्त जातो.
एकत्र स्वयंपाक, पैसे वाचतात.			स्वयंपाकात जास्त खर्च होतो.
घरकामाची नीट वाटणी होते.			घरकामाचा जास्त बोजा पडतो.
लहान मुलं सांभाळणं–सोय.			लहान मुलांची पंचाईत.
आर्थिक संकट– शक्यता कमी.			आर्थिक संकट शक्य.
	प्रायव्हसी कमी.	प्रायव्हसी खूप.	
	नवरा-बायको एकत्र कामाचा प्रसंग नाही.	नवरा-बायको एकत्र कामाची मजा.	
	आत्मबळ न वाढण्याची शक्यता.	आत्मबळ वाढतं.	
भांडण्याइतकी प्रायव्हसी नसल्यामुळे भांडणं कमी.			भांडण्याइतकी प्रायव्हसी असल्यामुळे भांडण जास्त शक्य.
वाईट संगतीची शक्यता कमी-खूप जणांची नजर असते.	एकमेकांच्यातले दोष फार उशिरा कळतात.	एकमेकांच्यातले दोष लवकर कळतात.	नजर ठेवायला कोणी नसल्यामुळे कुसंगत शक्य.
	नको त्या लोकांच्यात वेळ जातो.	नको ते लोक टाळण्याचं स्वातंत्र्य असतं.	

एकत्र कुटुंब		स्वतंत्र कुटुंब	
फायदे	तोटे	फायदे	तोटे
	मालमत्तेच्या वाटण्या मृत्युपत्रात कठीण.	मृत्युपत्रात मालमत्तेच्या वाटण्या सोप्या.	
	स्त्री-पुरुष समानतेनी एकत्र कुटुंब राहू शकत नाही.	स्त्री-पुरुष समानतेनी वागता येतं.	
	खरं वागता येत नाही.	खरं वागता येतं.	
	स्वावलंबन कळत नाही.	स्वावलंबन कळू शकतं.	
म्हाताऱ्यांना सुरक्षित वाटतं. वेळ जातो.	सुनेची कुचंबणा.	प्रश्नच येत नाही.	म्हाताऱ्यांची पंचाईत होऊ शकते.
	पैशांवरून वाद असतात.	पैशावरून कमी वाद होतात.	
समाजकार्य कळण्याची शक्यता जास्त.			व्यक्तीवादी कुटुंबकेंद्रित प्रवृत्ती बळावण्याची शक्यता.
नात्यांचे अर्थ कळणं, शक्यता जास्त			नात्यांचा अर्थ न कळणं.
	कुटुंब व्यवस्थापन अवघड	कुटुंब व्यवस्थापन सोपं.	
	माणसाची धमक कळत नाही.	माणसाची धमक कळते.	
शेती शक्य.			शेती कठीण.
अनेक जण असल्यानी आधार वाटतो.	पैसे कमावण्यात मुलं कमी-जास्त हा प्रश्न बनतो.	हा प्रश्न येतच नाही.	कमी माणसं असल्यामुळे आधार वाटत नाही.
	दोन पिढ्यांमधलं अंतर संघर्ष निर्माण करतं.	हा प्रश्न येत नाही.	

4

अंतिम निर्णय कोणाचा?

प्रत्येक माणसाची निर्णयप्रक्रिया अशी असते. स्वतःला स्वतःच्या विचारपद्धतीची म्हणजे व्यक्तिमत्त्वाच्या प्रकाराची बऱ्यापैकी माहिती असते. आपली शारीरिक आणि मानसिक ताकद, आवड कशाची आहे? आपल्या उणिवा, मर्यादा काय आहेत हे माहीत असतं. स्वतःच्या आणि जवळच्या लोकांच्या परिस्थितीची जाणीव असते. एखादी गोष्ट नाही झाली तर होणारं नुकसान, त्याचे परिणाम. यापूर्वी आलेले या प्रकारचे अनुभव, समोरच्या व्यक्ती, संस्था किंवा गट यांचा आपल्याला समजेल तेवढा खरा हेतू. एवढं समजलं की मनात अर्ध्या क्षणात निर्णय होतो, निदान स्वतःचा कल कळतो. व्यक्त करण्याचं धाडस किती, याप्रमाणे शब्दात किंवा कृतीनी ते दुसऱ्यापर्यंत पोहोचतं.

नीट विचार केला तर कळतं की आपलं संपूर्ण आयुष्यभर आपण प्रत्येक क्षणी निर्णयच घेत असतो. श्वास घेणं, हृदयक्रिया चालू राहणं, मेंदूची क्रिया सुरू राहणं एवढं सोडलं तर आपण सतत निर्णय घेत असतो. झोपेतून जाग आली की उठून बसण्याचा निर्णय आपण घेतलेला असतो. आवरण्याचा, अंघोळीचा, कपड्यांचा, खाण्यात वाढलेल्यापैकी कुठचा पदार्थ आधी खायचा हा निर्णय असतो. खाणं पुरे हा निर्णय असतो.

बाहेर कामासाठी गेल्यावर कोणाला भेटायचं, काय बोलायचं, उशीर झाला तर घरी कळवायचं का नाही, हा निर्णय असतो. ड्रायव्हिंग ही तर जास्त जबाबदारीच्या निर्णयाची साखळीच असते. ओव्हरटेक, ब्रेक दाबणं, किती अंतरावरून कशी गाडी वळवायची हा योग्य असो किंवा चुकीचा असो, पण निर्णयच. रात्री टी.व्ही.वर काय बघायचं, कुटुंबाशी कशाविषयी बोलायचं, केव्हा झोपायचं, या त्या दिवसातल्या शेवटच्या निर्णयापर्यंत क्षणोक्षणी निर्णयप्रक्रिया

चालू असते.

अशा प्रत्येक निर्णयप्रक्रियेसाठी अगदी कमी वेळ आपल्यापाशी असतो. मोजायचाच झाला तर फार तर अर्धा सेकंद. हा एवढासा वेळ काहींना पुरत नाही. शाळा-कॉलेजच्या अभ्यासांच्या विषयात ठीकठाक, पण निर्णयाच्या बाबतीत मंद असेही लोक असतात. काही अं अं म्हणत वेळ काढतात, काही ऐकू न आल्यासारखा मख्ख चेहरा करून नुसते स्तब्ध होतात. काही लोक एकाग्र चित्त होऊ शकत नाहीत. काहींना खरोखरीच कमी ऐकू येत असतं. हे सगळे बिघाड किंचित असतील तर खपून जातात, नाहीतर लोक नावं ठेवतातच. चेष्टेचेष्टेत 'मंदाबाई' किंवा 'मंदारदादा' म्हणतात.

मुख्य म्हणजे अशा माणसावर निर्णयाची जबाबदारी टाकायला कोणी तयार होत नाही. मी बांधकाम व्यवस्थापन क्षेत्रात होतो हे आपलं पूर्वी बोलणं झालंच आहे. त्यामधे माणसांचे 3 वर्ग केलेले असतात. निर्णय घेऊ शकणारे, निर्णयांप्रमाणे कामं करवून घेणारे आणि त्याप्रमाणे कामं प्रत्यक्ष हातानी करणारे. असेच तीन वर्ग इतर क्षेत्रात आणि आपल्या आयुष्यातही असतात. निर्णयाची क्षमता असलेल्या माणसालाच सन्मान आणि मोबदला जास्त मिळतो.

तत्त्वज्ञानात याबद्दल काय म्हणलंय, ते बघूया. अडीच हजार वर्षांपूर्वी शेकडो लोकांनी अनेक वर्षं चर्चा केल्यावर साधारण पन्नास वर्षांनंतर ते अशा विचारापर्यंत पोहोचले. 'चांगल्या गोष्टीचं कौतुक जरूर करावं. वाईट गोष्टीबद्दल नाराजी जरूर व्यक्त करावी. पण आपली वागणूक सतत समतोल पाहिजे.' असा विचार जेव्हा प्रथम मांडला गेला तेव्हा साहजिकच असा प्रश्न उद्‌भवला की, स्वतःला त्याबद्दल वाटणाऱ्या भावनांचं काय करायचं? त्याच्यातून शब्दात मांडण्याजोगं स्पष्ट तत्त्व निघालं ते असं 'व्यक्तिस्वातंत्र्य हे सर्वोच्च मूल्य आहे.' ह्याचा पुढचा अर्थ म्हणजे 'स्वतःच्या व्यक्तिस्वातंत्र्याबरोबर दुसऱ्याचं व्यक्तिस्वातंत्र्य तेवढंच महत्त्वाचं आहे.' ह्याच्यातून दोन महत्त्वाची तत्त्वं निघाली.

1) प्रत्येकानी स्वतःचा निर्णय स्वतःच घ्यायचा.

जास्त लोकांना पसंत पडेल अशी कुठचीही गोष्ट लोकप्रिय होऊ शकेल. यशस्वी देखील होईल. पण ती योग्यच असेल असं सांगता येत नाही. हे तत्त्व मला कळणं म्हणजे ते माझं तत्त्वज्ञान झालं. अशी गोष्ट सडेतोड, पण अप्रिय असली तरी मला योग्य वाटते म्हणून मी करणार. पण तुमच्यावर त्याचं काही बंधन नाही, असं जेव्हा मी म्हणतो तेव्हा ते त्याच्यातलं दुसरं तत्त्व.

2) व्यक्तिस्वातंत्र्य.

जे लोक निर्णय घेऊ शकत नाहीत त्यांच्या खरोखर अडचणी असतात. ते मुद्दामून तसं वागत नाहीत. त्यांची खरंच पंचाईत झालेली असते. त्याची चार महत्त्वाची कारणं मानसशास्त्राच्या आणि तत्त्वज्ञानाच्या अभ्यासात सांगितलीयत.

1) त्या माणसाला अडचणीवरचा एखादा उपाय माहिती असतो तो उपाय फसला तर तो अडतो, कारण त्याला पर्याय माहिती नसतात.
2) प्रत्येक माणसाला प्रत्येक क्षणी स्वतःलाच निर्णय घ्यायचा असतो. या तत्त्वाबद्दल त्यांची खात्री पटलेली नसते. दुसरा कोणीतरी स्वतःऐवजी निर्णय घेईल या आशेवर ते थांबून राहतात.
3) आनुवंशिकता, परिस्थिती, नियती, प्राक्तन, नशीब, योगायोग, दैव वगैरे सोईस्कर शब्द वापरून ते निर्णय पुढे ढकलत राहतात.
4) दुसऱ्याच्या आयुष्याचा निर्णय स्वतः घेणारे कोणीतरी अशा माणसाला भेटतातच. त्यामुळे निर्णय होतो आणि तात्पुरतं निर्णयाच्या जबाबदारीचं संकट दूर होतं.

दुसऱ्या माणसावर आपलं नियंत्रण असतं असं मानणारी माणसं असतात, त्यांच्यासाठी एक प्रश्न आहे. विशेषतः अनेक पुरुष असं प्रामाणिकपणी समजतात त्यांच्यासाठी. ‘जोडीदार, मुलं यांच्या शरीरांवर माझं नियंत्रण नसतं तर शरीरात असणाऱ्या मनावर नियंत्रण कसं असेल?’

जोडीदाराची निवड करताना काय होतं जरा बघूया. लग्नासाठी मुलगा-मुलगी एकमेकांना पसंत असं ठरलं की, एक प्रश्न सुटतो; पण दहा समस्या समोर उभ्या राहतात. कोणाच्या मनात खर्चाचे आकडे येतात, तर कोणाला होणाऱ्या समारंभाचं आकर्षण असतं. कोणाला सासरच्या माणसांचा दबदबा वाटतो, तर एखाद्या मुलीला सासुरवासाबद्दल चिंता असते. एखाद्या मुलाला बायकोच्या नोकरी/करिअरमुळे घरात येणाऱ्या पैशांविषयी लोभ असतो, तर एखाद्या मुलीला नोकरी सोडून परगावी/परदेशी जावं लागल्यापायी गृहिणी बनावं लागेल अशी चिंता असते. एखाद्या मुलीला लग्नानंतरच्या पहिल्या शरीरसंबंधांबद्दल चिंता असते. कधी रुसव्या-फुगव्यांची काळजी असते. कधी घरातल्या कोणा म्हाताऱ्या माणसाच्या तब्येतीमुळे लग्नाची घाई असते. धंद्यातल्या लोकांना कमी

किंवा जास्त कामाचा धसका असतो, तर नोकरीतल्या कोणाला बदली, रजा असे प्रश्न असतात.

अशा समोर उभ्या राहिलेल्या अनेक प्रश्नांबद्दल निर्णय कोणी घ्यायचा, हा प्रश्न असतो. समारंभ केवढा, तडजोडीची तयारी, करिअरचे प्रश्न, त्यातल्या शक्यता, खर्चाचे प्रश्न यात बहुतेक कुटुंबांत अंतिम निर्णय मुलगा-मुलगी घेत नाहीत. कुटुंबानी त्यांना निर्णय घ्यायला शिकवलेलं नसतं आणि अधिकारही दिलेले नसतात. विचार, अभ्यास आणि अनुभव यांच्या आधारांनी मी तुम्हाला सगळ्यांना खात्रीनी सांगतो की, याबद्दल अंतिम निर्णय लग्न करणाऱ्या व्यक्तींनीच घ्यायचा असतो. आयुष्य एकाचं नि निर्णय दुसऱ्याहाती ही भारतीय कुटुंबव्यवस्थेमधली एक मोठी त्रुटी आहे. माझ्या ओळखीची अनेक मुलं-मुली असा स्वतःहून विचार करताना मी बघितली आहेत की, निर्णय चुकल्यामुळे वैवाहिक आयुष्यात काही गडबड झाली, तर ती जबाबदारी आपल्यावर नको.

मला अशी कुटुंबंही खूप माहीत आहेत की, मुलांना-मुलींना स्वतः निर्णय घ्यायची इच्छा आणि क्षमता आहे, पण घरच्या मोठ्यांची कल्पना पारंपरिक हुकूमशाहीची, एकसूत्री कारभाराची आहे. लोकशाही जशी आपल्या देशाला समजलेली नाही, आणि त्यामुळे पेलवली नाही तसा आपल्या कुटुंबसंस्थेला व्यक्तिविकास समजलेला नाही, त्यामुळे तो जमत नाही.

प्रत्यक्षात इतर सगळ्या कुटुंबीयांच्या कल्याण/अकल्याणाची जबाबदारी घेणाऱ्या एका सत्ताधारी माणसाची बहुतेक वेळा पंचाईत झालेली असते. अशा एकसत्ताक कुटुंबव्यवस्थेत सत्ताधारी व्यक्ती अतिउच्च कर्तृत्ववान असावी लागते. अशा व्यक्तींचं प्रमाण कमी असतं आणि इतर कुटुंबीय आज्ञाधारक असावे लागतात. या दोन्हींची शक्यता कमी. त्यामुळे अशी कुटुंबं वरवर एकसूत्री वाटली, तरी आतून दुभंगलेली असतात. घरातल्या वडीलधाऱ्यांना हे समजायला पाहिजे की, निर्णय हा प्रत्येक व्यक्तीला स्वतःच घ्यायचा असतो.

पण असाही निर्णय त्या मुलांनी-मुलींनी कुटुंबाच्या सरासरी 'स्टेजचा' विचार करून घ्यावा लागतो. 'सारासार विचार' हा सर्व विषयातला 'अंतिम निर्णय' घेण्याचा आधार आहे. तेवढा समन्वय कायम साधायलाच पाहिजे. पालकांच्या मार्गदर्शनाकडे दुर्लक्ष करू नये. ते त्यांचं कर्तव्यच आहे. दुसरा फार तर मदत करेल, मार्ग दाखवेल, धीर देईल; पण प्रत्येकाला पाऊल स्वतःच टाकायचं असतं. श्वास स्वतःलाच घ्यायला असतो. वडीलधाऱ्यांनी हे समजून

सत्तेचा मोह सोडून द्यायला पाहिजे.

ड्रायव्हिंग करायला बसलेल्या माणसाला शेजारचा माणूस फार तर हळू चालवायला सांगू शकेल, समोरून ट्रक येतोय म्हणून ओरडेल; पण अपघात होणारच असला तर टाळू शकणार नाही. 'दुसरी व्यक्ती योग्य वागेल' ही जबाबदारी स्वतः घेणं हेही चूक आणि 'स्वतः योग्य वागू' याची जबाबदारी दुसऱ्या कोणी घ्यावी हेही चूकच. या ठिकाणी सर्व हितचिंतकांना, पालकांना मी विनंती करतोय की, मुला-मुलींच्या कुठल्याच निर्णयात जबरदस्ती करू नका. ब्लॅकमेल करू नका. "या मुलाशी लग्न केलंस तर तू आम्हाला मेलीस" हे ब्लॅकमेलिंगच आहे आणि "या मुलीशी लग्न केलंस तर घरातून निघून जा" हाही दहशतवादच आहे. खरं तर लहानपणापासून मनातले विचार शब्दात मांडण्याची मुलांना आणि पालकांना सवय असली, तसा मोकळेपणा असला, तर असे प्रसंग येत नाहीत. जबरदस्तीची परिस्थिती येते तेव्हा तो पालकांचाच पराभव असतो. आपण पालक म्हणून योग्य असू तर आपला मुलगा किंवा मुलगी जोडीदार ठरवल्यापासून वैवाहिक आयुष्यापर्यंत सगळे निर्णय स्वतःच घेतील आणि सारासार विचाराचं भान ठेवून समस्या सहजपणे सोडवतील.

अनेक निरनिराळ्या पद्धतींनी मुलांना आणि त्यांच्या पालकांना समजावून सांगितल्यावर त्यांना ही गोष्ट कळते की, स्वावलंबन म्हणजेच निर्णयक्षमता अकस्मात येत नाही. लहानपणापासून ती सवय असली तरच असा आग्रह स्वभावात येतो. मग जोडीदार निवडताना, लग्नाबद्दलचे तपशील ठरवताना, पुढे संसार सांभाळताना योग्य निर्णय घेता येतो.

पालक, शिक्षक, मित्र यांचं खरं कर्तव्य मार्गदर्शन, सल्ला देणं इतकंच असतं. अगदी आणीबाणीच्या वेळीच मदतीसाठी ते असतात. एरवी त्यांनी स्वावलंबनाच्या प्रवासातला अडथळा बनू नये.

व्यक्तिस्वातंत्र्याबरोबर माणसाची निर्णयक्षमता वाढायलाच हवी. तसं आपल्या समाजात झालं नाही. व्यक्तिस्वातंत्र्य म्हणजेच स्वतःबद्दलच्या वागणुकीच्या निर्णयाचे अधिकार त्या व्यक्तीचे. 'योग्य का सोयीचं' हा मुख्य प्रश्न प्रत्येक माणसाला सोडवायचा असतो. योग्य तसं वागू म्हणणारा वर्ग कमी कमी व्हायला लागला नि सोयीचं ते करू म्हणणारांचा वाढला. योग्य आणि सोयीचं ही गोष्ट शोधायला जास्त अभ्यास लागतो, त्याची लोकांची तयारी नसते.

त्यासाठी आसपासच्या समाजाचा विचार, पृथक्करण, त्यांच्यासाठी काहीतरी

करण्याचा निर्णय, तसं प्रत्यक्ष आचरण आणि तुम्हाला पटलेल्या गोष्टींचा प्रसार एवढं करण्याची आवश्यकता आहे.

काही मुला-मुलींना लग्नाचा निर्णय स्वतः घ्यायची धास्ती वाटते. कारण एकतर तो फार मोठा निर्णय असतो. आणि काही चूक झाली तर, अशी भीती असते.

आपला मगाचचा विषय राहून जाता कामा नये. पालकांशी चर्चा करावी. त्यांना नापसंत असलेल्या जोडीदाराशी लग्नाची परवानगी त्यांनी नाहीच दिली तर दोनच मार्ग उरतात – माघार घेणं किंवा पळून जाऊन गुपचूप लग्न करणं. यामधे मुख्य अडचण अशी असते की, यातला कुठलाच मार्ग कुटुंसाठी सुखाचा होत नाही. म्हणून पालकांनी सक्ती करण्याची मर्यादा ओळखली पाहिजे. समाजप्रबोधन करणाऱ्या प्रत्येकाचं कर्तव्य आहे की, 'स्वतःऐवजी आपला निर्णय दुसरा कोणीतरी घेईल' ही कल्पना लोकांच्या मनातून उखडून टाकणं.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट समजून घ्यायला हवी. स्वतः निर्णय घेण्याची सवय झाली की माणूस आग्रही बनतो. पण त्यानी आक्रमक बनता कामा नये. या दोन्हीमधला फरक अगदी थोडा आहे, पण समजायला सोपा आहे. आपल्या निर्धाराबद्दल, मग तो निर्धार होकारात्मक असो किंवा नकारात्मक असो, आग्रही असणं हे स्वतःपुरतं झालं. पण तसं वागण्याचा आग्रह दुसऱ्याला कोणी करायला लागलं तर ती आक्रमकता झाली.

आपल्या लग्नासंबंधीचा निर्णय आई-वडलांनी घ्यायचा असं म्हणणाऱ्या मुला-मुलींचं म्हणणं मला पटत नाहीच, शिवाय त्यांच्या आई-वडलांनाही मी दोषी मानतो. असा जबरदस्तीनी घ्यायला लावलेला निर्णय तात्पुरतं समाधान देतो, पण मुलं आयुष्यभर नाराज राहतील याची वडीलधाऱ्यांना तमा वाटत नाही. सासू-सासऱ्यांशी आयुष्यभर संबंध बिघडून राहतील, अशी भीती (विशेषतः एकत्र कुटुंबात सासरी गेलेल्या मुलीबद्दल) वाटते. कुटुंब स्वतंत्र असलं आणि लग्न करणाऱ्या दोघांच्या संमतीनी निर्णय झाले, तर काहीच प्रश्न येत नाहीत. पण तसं होत नाही हाच तर प्रश्न आहे ना!

तरुणांचा कार्यशाळेमधला नेहमीचा संवाद अशा प्रकारचा असतो. 'आम्हांला सगळं पटतंय हो. पण आमच्या आई-वडलांना कोणीतरी सांगायला पाहिजे!' यासाठी निव्वळ पालकांच्या सुद्धा कार्यशाळा आम्ही घेतो. पण तरुण मुला-मुलींनी आणखी एक गोष्ट मात्र लक्षात घ्यायला पाहिजे. 'कुठच्याही सामाजिक

बदलाचा वेग फार कमी असतो.’ पुन्हा सांगतो, पालकांच्या सूचनांकडे दुर्लक्षही करू नका. त्यांच्या मार्गदर्शनाबद्दल गंभीरपणे विचार करा आणि सारासार विचारानी स्वतःच ‘अंतिम निर्णय’ घ्या. आता याबद्दलसुद्धा अनेक पालकांचा नि माझा मतभेद असेल, याची मला कल्पना आहे. पण त्याबद्दलचा अंतिम निर्णय तुमचाच असणार.

स्वतःचे निर्णय घेण्यासाठी एरवी समर्थ असणाऱ्या लोकांच्यात काही कौशल्यं कमी असू शकतात. एखाद्याची बुद्धिमत्ता, निर्णयशक्ती उत्तम असते, पण शारीरिक क्षमता कमी असते. अनेक पुरुषांना स्वयंपाक येत नाही, पण बाकीचे निर्णय ते उत्तमरीत्या घेऊ शकतात. अशावेळी नवरा-बायकोत भागीदारीत निर्णयाच्या अधिकाराच्या वाटण्या केलेल्या असतात. आमच्या घरी कोणी जेवायला, चहाला येणार असलं की कुठचा पदार्थ करावा, हा निर्णय मला स्वयंपाक येत नसल्यामुळे शोभा घेते. पण याचा अर्थ शोभानी माझ्याऐवजी निर्णय घेतला असा होत नाही तर माझ्या वतीनी निर्णय घेतला आणि तिला त्या निर्णयाचे अधिकार देण्याचा मूळ निर्णय मी घेतला. एखाद्या संस्थेचे विभागप्रमुख काही निर्णय घेताना दिसतात, पण त्यांना निर्णय घेऊ देण्याचा निर्णय सर्वोच्च अधिकाऱ्यानी घेतलेला असतो.

इतर व्यवहारात आणि संसारात आणखी एक महत्त्वाचा फरक लक्षात येतो. व्यक्तिस्वातंत्र्याचं मूल्य आणि दोघांची निराळी मतं पण वस्तू, व्यक्ती एकच असा पेच निर्माण होतो. समाईक जागा, समाईक मूल यांच्याबद्दलचे निर्णय कठीण जातात. अशावेळी ज्याचा जास्त अभ्यास त्यानी निर्णय घ्यावा अशी वाटणी करावी लागते आणि मध्यच काढावा लागतो. अशा वाटणीचं कसब हे संसाराचं कसब ठरतं. असा मध्य काढणं हे आपलं महत्त्वाचं काम ठरतं. आपलं अभ्यास मंडळ हे सुद्धा एक प्रकारचं मध्यस्थ – समन्वयस्थ मंडळच आहे. वैवाहिक आयुष्यातली सर्वांत मोठी महत्त्वाची समाईक गोष्ट म्हणजे मूल असतं. त्यामुळे त्याचा खास अभ्यास करावा लागतो. या पुस्तकसंचातला पुरुष पालकाची भूमिका असा लेख त्या दृष्टीनी महत्त्वाचा आहे.

निर्णय घेण्याची पद्धत माणसाच्या मूळ वृत्तीवर अवलंबून असते. फक्त स्वतःचा विचार करणारे, कुटुंबासकट स्वतःचा विचार करणारे आणि सबंध समाजाचा, कुटुंबाचा आणि स्वतःचा एकत्रित विचार करू शकणारेही असतात. त्या वृत्तीप्रमाणे माणूस निर्णय घेतो. एक उदाहरण सांगतो म्हणजे हा मुद्दा

समजायला सोपा होईल.

अशी कल्पना करा की, दुष्काळ, उपासमार अशी परिस्थिती समोर दिसतेय. अशा वेळी फक्त स्वतःचा विचार करणारा माणूस आत्ता समोर दिसतंय तेवढं जास्तीत जास्त अन्न खाऊन घेतो. कुटुंबाचा विचार करणारा खाण्याच्या पदार्थांच्यात बदल करतो. सगळ्यांचा विचार करणारा म्हणतो की, आधीपासून कमी खाण्याची सवय केलेली बरी. पुढे काय परिस्थिती येईल सांगता येत नाही.

'माझ्या जीवनाचा मी शिल्पकार' असं अनेक आध्यात्मिक गुरूंनी म्हटलेलं आहे. तत्त्वज्ञान, मानसशास्त्र आणि व्यवस्थापनशास्त्र हीच गोष्ट निरनिराळ्या शब्दात मांडतंच की. पण स्वतःच्या आयुष्याची जबाबदारी पेलण्यासाठी खांदे रुंद हवेत. ते क्षमता वाढवल्याशिवाय जमणार नाही. त्यासाठी अभ्यास पाहिजे.

निर्णय घेण्यासंबंधीचा एक विनोदी चुटका आहे. एक नवरा मित्राला सांगत होता, 'आमच्या घरी सगळे मोठे निर्णय मी घेतो. आणि छोटे छोटे निर्णय बायको घेते. घरखर्च किती करायचा? मुलांना कुठच्या शाळेत घालायचं? पाहुण्यांना केव्हा बोलवायचं? मोठ्या मुलाशी आणि सुनेशी कसं वागायचं, हे सगळे निर्णय बायको घेते.' मित्रानी विचारलं, 'मग तुम्ही कुठचे निर्णय घेता?' 'देशाच्या निवडणुकीत कुठचा पक्ष जिंकायला पाहिजे, अमेरिकेनी व्हिएतनाम युद्धात काय धोरणं ठेवावीत, यापुढची चंद्रावर जाण्याची मोहीम केव्हा आखायला पाहिजे, हे निर्णय मी घेतो.'

कुठच्या कुठच्या बाबतीतले अंतिम निर्णय माणसानी विचारपूर्वक घेतले पाहिजेत आणि प्रत्यक्षात तो काय करतो, हे बघण्याजोगं असतं. ते निर्णय तो स्वतः घेतो का आणि नीट घेतो का, या दोन्हीला फार महत्त्व असतं.

1) जोडीदार निवडण्यात, 2) लग्नसमारंभ छोटा, मोठा, त्याचं स्वरूप ठरवण्यात, 3) स्वतःच्या नोकरी/धंद्यातल्या आर्थिक व्यवहारात, 4) मालमत्ता खरेदी/विक्री करताना, 5) किती मुलं व्हावीत याबद्दलच्या निर्णयात, 6) ज्येष्ठांच्या किंवा कोणाच्याही आजारपणात, 7) मित्र-नातेवाईक यांच्याशी असलेले संबंध सांभाळण्यात, 8) आपल्या मुलांशी वागणुकीत.

स्वतः समर्थपणे निर्णय घेऊन पार पाडण्याची क्षमता हळूहळूच वाढवावी लागते. बहुतेक वेळा शाळेच्या सहलींमुळे हळूहळू घरच्यांपासून दूर जाण्याची

तयारी सावकाश होत असते. मला असेही पालक माहिती आहेत की त्यांनी मुलाला एकट्याला कुठेतरी पाठवलं आणि न सांगता ते त्याच्या मागे मागे गेले. मुलाला ते कळलं नाही, पण वडलांना कळलं की आपला मुलगा आता पुरेसा मोठा झाला आहे.

कित्येक पालक एरवी मुलांना सक्षम बनवण्याच्या रस्त्यावर नीट जात असतात पण एखादा महत्त्वाचा प्रश्न आला की, पालक अचानक तो त्यांच्या हातात घेतात. त्यांचा निर्णय मान्य करायला लावतात. मुलांचं काही ऐकत नाहीत. अशा प्रसंगी पालक, मित्र, शिक्षक हे सल्लागाराच्या भूमिकेतून सत्ताधिकाऱ्याच्या भूमिकेत जातात. असं अनेकदा घडतं. कारण पालकांना मुलांची काळजी वाटते. तुमचं भलं करायची इच्छा असते. ही सगळी मूळ भावना मान्य केली तरी एक नक्कीच – असं वागणं हा स्वावलंबनाच्या शिक्षणातला अडथळाच असतो.

मुलांच्या मनात मुख्य प्रश्न असा असतो की, आई-वडलांनी किंवा शिक्षकांनी एखादी गोष्ट करायला भाग पाडलं तर स्वतःबद्दलचे निर्णय स्वतः घेण्याच्या त्या सगळ्या कल्पनांचं काय होणार? प्रत्यक्षात कदाचित नकळत्या वयात काही मुलांसाठी अशा सक्तीचा थोडाफार उपयोग होतो. कधी कधी त्याची गरज वाटते. पण खरे समंजस पालक अशी सक्ती टाळायचाच प्रयत्न करतात. कारण त्यांना कळतं की, त्यांच्या निर्णयानुसार मुलांनी चालणं हे त्यांचं परावलंबन वाढवतं. त्यांना आपण दुबळं करत असतो. शिवाय त्याहून वाईट म्हणजे आपण त्याच्या आत्मसन्मानाच्या संवेदनेला दुखावत असतो. विशेषतः तरुण वयाच्या मुला-मुलींच्या बाबतीत हे प्रश्न फार तीव्र होतात.

तुम्हाला योग्य असं आपण एक काल्पनिक उदाहरण घेऊ. पालकांच्या दृष्टिकोनातून चुकीच्या अशा मुलाशी किंवा मुलीशी लग्न करण्याचा निर्णय तुम्ही घेतलाय्. पालकांनी सक्ती केली तर तुम्ही तो बदलाल का? यावर एक मुलगी म्हणाली होती– 'पण मी माझ्या आईला माझा निर्णय बरोबर आहे हे पटवून देईन. म्हणजे पटवून द्यायचा प्रयत्न करीन. त्यांचा विरोध कशासाठी आहे, हे विचारीन. त्यावर मी काय विचार केलाय, हे सांगीन. माझ्या मैत्रिणींची त्यात मदत घेईन.' कदाचित आई पण तिच्या बाजूनी हेच प्रयत्न करेल. दोघींनी एकमेकींना पटवून देण्याचा प्रयत्न काही दिवस, काही महिने करता येईल. पटलं नाहीच तर पुढे काय? या प्रश्नाचं उत्तर सोपं नाही. कारण हा प्रश्न थेट बळजबरी किंवा सक्तीचाच झाला.

अगदी एक वर्षांचं लहान मूल असतं तेव्हापासून सक्ती हा विषय चालू होतो. खाण्याची सक्ती ही गोष्ट घरोघरी बघायला मिळते. लहान मूल अजून मोठ्या माणसाइतकं बिघडलेलं नसल्यामुळे भूक लागली कीच, आवडेल तेच आणि हवं तेवढंच खातं. आया मात्र जास्त खाण्याची जबरदस्ती करायचा प्रयत्न करत असतात. पालक शिक्षणात मी आणि शोभा सांगत असतो की, हे चुकीचं आहे. डाएटिशियन, मुलांचे डॉक्टर्स हेच सांगत असतात. पण आया मूल उलटी काढेपर्यंत त्याला खाऊ घालत असतात. मुलांना द्यायची औषधं ही एकच गोष्ट अशी आहे की गोडीत नाही जमलं तर ती औषधं सक्तीनी पाजावी लागतात.

घरी मुलांना शिक्षा म्हणून आई-वडलांनी काही करायला लावलं असलं तर स्वतःची निर्णयशक्ती वगैरे सगळं विसरावं लागतं. शाळेत शिक्षकांचं तसंच. प्रत्यक्षात रागावणं, मारणं, शिक्षा करणं यापेक्षा खूप चांगल्या पद्धती असतात. पालक शिक्षणातला सर्वांत मुख्य भाग 'मुलाला अभ्यास करायला लावणं' याबद्दलचा शोभाचा आणि माझा आक्षेप हा असतो.

सक्ती या विषयातलं टोक म्हणजे काहीतरी कारणानी तुरुंगात जाणं आणि तिथे मिळणारी वागणूक. तुरुंगात आपण स्वतःच्या निर्णयानी कधीच जात नाही. त्यामुळे आपल्या स्वतःचे निर्णय स्वतः घेणं या विषयाच्या कक्षेत हे येत नाही. वरचे अपवाद सोडले तर कुठच्याही परिस्थितीत अंतिम निर्णय त्या त्या व्यक्तीचाच असतो. सक्ती केल्यामुळे काही महिने, वर्षं एखादी व्यक्ती दुसऱ्याच्या मर्जीप्रमाणे वागल्यासारखी दिसते, वाटते हे खरं आहे. पण ते वरवरचं असतं. टिकाऊ नसतं.

स्वतःशी प्रत्येकानी विचार करून बघावा – स्वतः आजारी असूनसुद्धा डॉक्टरांच्या औषध घेण्याच्या सूचना आपण तंतोतंत पाळतो का? आहाराबद्दलच्या, व्यायामाच्या सल्ल्याचं आपण काय करतो? आपल्याला झटका बसेपर्यंत म्हणजेच स्वतःला पटेपर्यंत आपण कोणाचंही ऐकत नाही. एक विचार मला पूर्ण पटला आहे. मानसशास्त्रात जे अनेक निरनिराळ्या पद्धतींनी सांगितलंय ते असं – 'मुद्दा पूर्ण पटला की मगच त्याची अंमलबजावणी होते. तोपर्यंत नाही.' एकच गोष्ट आपण खरोखर पाळतो. ती म्हणजे 'ऐकावे जनाचे करावे मनाचे'.

व्यवस्थापन शास्त्रातलं एक तत्त्व आहे. मागे मी ह्याचा उल्लेख केलेला आहे. तत्त्वज्ञान म्हणजे ज्ञानाचा आनंद असं असल्यामुळे तत्त्वज्ञान ह्या विषयातलं हे तत्त्व व्यवस्थापनशास्त्रापर्यंत पोहोचलं तर त्यात आश्चर्य काहीच नाही. जेव्हा

जेव्हा आयुष्यात, वैवाहिक आयुष्यात कुटुंबातलं कोणीतरी, काहीतरी विचारतं त्यावेळी विचारणाऱ्या माणसानी ह्याचं मला ताबडतोब उत्तर पाहिजे, कारण त्या उत्तरावर अमुक अमुक अवलंबून आहे आणि ते करण्याची घाई आहे असं समजावून सांगितलं तर गोष्ट वेगळी. नाहीतर ताबडतोब उत्तराची गरज नसताना माणूस ते काल्पनिक बंधन मानतो आणि एका क्षणात चुकीचं उत्तर देऊन मोकळा होतो. त्याची काहीही गरज नसते.

त्या प्रश्नाचा सांगोपांग विचार करायला कधी पाच मिनिटं, कधी काही तास, कधी काही दिवस, एवढा वेळ असतोच. तेवढ्या वेळेमधे योग्य ते उत्तर देणं जास्त महत्त्वाचं आहे. हजरजबाबीपणानी कानाला चमकदार वाटणारं चुकीचं उत्तर देण्याची गरज नसते, लगेच उतर हवं असे प्रसंग सर्वसाधारण आयुष्यात जास्तीत जास्त दहा असतात. हे तत्त्व जर समजावून घेतलं तर वैवाहिक आयुष्यात ताबडतोब चुकीचं उत्तरं दिल्यानी होणारी अनेक घनघोर युद्धं आपोआप टळतील.

एका गैरसमजुतीची शक्यता वाटल्यामुळे आत्ताच उलगडा करून टाकतो. निर्णय प्रक्रियेत कोणी कोणाची मदत मागायची नाही आणि कोणी कोणाला मदत करायची नाही, असा अर्थ अजिबात कोणी काढू नये. निर्णय घ्यायला मदत करावी, पण निर्णय सांगून दुबळं करू नये. प्रेमाच्या, परोपकाराच्या, दुसऱ्यासाठी झटण्याच्या व्याख्येत हे बसत नाही. मला वाटतं, या कल्पना बदलायला हव्यात. कारण यातून दोन गुंते होतात. एकतर पालकांनी मुलांना दुबळं बनवणं किंवा दुसरं निर्णयाची सक्ती करून त्यांचा आत्मसन्मान दुखावणं. दोन्हीत मुलांचं नुकसानच आहे.

काही वेळा निराळीच अडचण असते. काही मुला-मुलींना स्वतःला ते आवडतं. कोणीतरी दुसऱ्यानी निर्णय घ्यावा, आपण आरामात जगावं. आई-वडील काय, चांगलंच करणार की आपलं, असं त्यांचं म्हणणं असतं. अशा वर्णनाची काही मुलं असतात, हे खरं आहे. पण ते योग्य नाही.

काही लोकांचा याखेरीज निराळ्या स्वरूपाचा प्रश्न असतो. दुसऱ्याला मदत करण्यापासून स्वतःला आनंद मिळतो त्याचं काय? दुसऱ्याला मदत करण्यातला आनंद हे बहुतेक वेळा स्वतःच्या अहंकाराचं स्वरूप असतं, असं मानसशास्त्र स्पष्ट म्हणतं. मला ते योग्य वाटतं. त्यामुळे मी स्वतः माझा अहंकार सुखावला जावा म्हणून दुसऱ्याला मदत करायला जात नाही.

आणखी एक गोष्ट सांगतो, माझा निर्णय मला घेऊ द्या असं म्हणण्याचा

आग्रह तुमच्या मनात असला तर दुसऱ्यालाही स्वावलंबनाचा आणि निर्णय त्यानी स्वतः घेण्याचा आग्रह पाहिजे. ऊठसूट मदत मागणं किंवा दुसऱ्याला करणं, हे दोन्ही चूक आहे. पण ही कल्पना न समजणारे लोक तुम्हाला नावं ठेवतील याचीही तयारी पाहिजे. मला पैसे लागले तर मी व्याजानीच पैसे घेतो. हा स्वावलंबनाचा आग्रह हा सद्‌गुण आहे हे मान्य करणारे खूप भेटतात, पण आचरण करणारे कमी असतात.

घरातल्या वडीलधाऱ्या मंडळींमुळे आणखी एक मोठी अडचण होते. कमी खर्चात साधं लग्न करण्याची बऱ्याच मुलांची इच्छा असते. पण घरातली मोठी माणसं ऐकायलाच तयार होत नाहीत. मुली म्हणतात की, मुलग्यांचं जरा तरी ऐकून घ्यायची शक्यता असते. पण मुलींची गोष्ट जास्त अवघड.

हल्ली पालकांची शिक्षण, करिअर, नोकरी याबाबतीत तुलनेनी बरीच उदार दृष्टी असते. पण लग्नाच्या विषयात ते स्वातंत्र्य नाही देत. जोडीदाराच्या निवडीपासून खर्च, समारंभ, सगळ्याच गोष्टींमधे स्वतःची मतं लादतात. थेट सक्ती करतात म्हटलं तरी चालेल. आई-वडलांनी हे निर्णय पूर्णपणे त्या जोडीवर सोपवावेत तरच त्यांच्या स्वतः निर्णय घ्यायच्या प्रक्रियेला सुरुवात होईल. कारण पुढे त्यांना रोज सतत, स्वतंत्रपणी निर्णय घ्यावेच लागणार आहेत. नोकरीचा निर्णय, मुलं केव्हा, किती मुलं हा निर्णय, शेजाऱ्यांबद्दलचे निर्णय, नातेवाइकांबद्दलचे निर्णय असे कितीतरी. हे त्यांना स्वतःच्या बळावरच घ्यायचे आहेत. मुलं पाळणाघरात ठेवायची का नाही, या बाबतीत तर स्वावलंबनाच्या आग्रहाची खरी परीक्षा असते.

मला अशा अनेक जोड्या माहिती आहेत की, दोघांपैकी एकाला असे कुठलेच निर्णय स्वतः घ्यायची सवय नसते. त्यामुळे त्यांच्या संसारात एका हाती निर्णय घ्यायचीच पद्धत असते. एकसत्ताक प्रकारात एक सोपं, सोयीचं व्यवस्थापन असतं. पण समानतेची, एकत्र निर्णय घेऊन तो निभावण्याची गंमत नसते. झटपट निर्णय घेऊन वेळ वाचतो. पण दोघांनी एकमेकांची समजदारी वाढवणं, अशी साथीदारीतली गंमत नसते.

या प्रकारच्या खऱ्या स्वावलंबनासाठी पैशाचं स्वातंत्र्य आवश्यक आहे. म्हणून खरा स्वावलंबी मुलगा किंवा मुलगी तरुणपणापासून पैशानीही स्वतंत्र, स्वयंपूर्ण व्हायला बघतात. आई-वडलांची मदत, प्रोत्साहन हे काही वर्षं ठीक आहे. पुढे स्वतःचा आत्मसन्मान स्वतः सांभाळणं, ही जबाबदारी तुमची आहे.

इतरांना दोष देणं खोटं! मात्र एक महत्त्वाचं आहे. या स्वावलंबनाच्या विचारातून तुम्ही आत्मकेंद्री होऊ नये याची काळजी तुम्हाला घ्यावी लागते. स्वाभिमान, आत्मविश्वास आणि अहंकार यातला सूक्ष्म फरक ओळखायला शिकलं पाहिजे. खरं तर ते इतकं साधं आहे की, ज्याला आत्मसन्मान महत्त्वाचा वाटतो, त्याला दुसऱ्याचा सन्मानही महत्त्वाचा वाटतो. दुसऱ्याचा सन्मान राखून स्वतःचाही मान राखता आला तर त्याला तो फरक कळला असं समजायचं.

आर्थिक स्वावलंबनाचं शिक्षण पालकांकडून मिळेल किंवा नाही मिळणार. त्या त्या कुटुंबाच्या परिस्थितीवर ते अवलंबून आहे. पण मुला-मुलींनी ते स्वतः मिळवलं पाहिजे हे नक्की. त्यासाठी उत्तम पुस्तकं आहेत, अवतीभोवती ज्येष्ठ मित्र असलेली माणसं आहेत, मित्र-मैत्रिणींचे ग्रुप आहेत. इथून हे स्वयंशिक्षण करायला हवं.

एवढ्या सगळ्या चर्चेनंतर मला एक गोष्ट अधोरेखित करून सगळ्यांच्या मनात ठसवायचीय. कुठचाही विषय वैयक्तिक पातळीवरच्या बाचाबाचीपर्यंत जाऊ द्यायचा नाही. त्याला सामाजिक प्रश्नाच्या चर्चेत नियंत्रित ठेवायचं. एकदा अहंकार दुखावला की दुरुस्ती कठीण असते.

जीवनसाथसारख्या संस्थेच्या कार्यकर्त्यांनीही लक्षात ठेवायला हवं की, मुला-मुलींनी स्वतः निर्णय घ्यावेत अशी शिफारस करताना पालक नाराज होऊ शकतील. प्रत्यक्षात पालकांनी सध्याच्या पिढीच्या अडचणी समजून तर घ्यायला पाहिजेतच. पुढे समजा एखाद्या विषयात मतभेद असला तरी पालकांनी असं म्हणायला पाहिजे, ‘आपला या बाबतीत मतभेद असला तरी तू तुझ्या मनाप्रमाणेच वागावंस अशी माझी इच्छा, नव्हे आग्रह आहे. मी म्हणतो म्हणून कुठचीही गोष्ट करणं चुकीचं ठरेल.’

जीवनसाथच्या शिफारशीप्रमाणे आई-वडलांनी लग्न जुळवायचं नाही, चोरून, प्रकरण करून प्रेमविवाहही करायचा नाही तर प्रश्नावली पद्धतीनी परिचयोत्तर विवाह स्वतः जुळवायचा. पण याचा अंतिम निर्णय तुमचाच हवा.

दुसरी कोणीतरी व्यक्ती आपल्याऐवजी निर्णय घेईल हा गैरसमज भारतीय परंपरेत भरून राहिलेला आहे. तो गैरसमज पार उखडून टाकण्याची गरज आहे. परंपरेच्या म्हणण्याप्रमाणे आपण काही ठरवायचं नसतं. नियती आपल्याकडून कृती करवून घेते. मला संपूर्ण भारत देश, महाराष्ट्र राज्य, यामधल्या अनेक

प्रश्नांपैकी 'ही अंतिम निर्णयाबद्दलची परिस्थिती' हा बराच मोठा गंभीर प्रश्न वाटतो.

हा मुद्दा निरनिराळ्या प्रकारानी निरनिराळ्या शब्दात सांगण्याचं प्रमाण या आजच्या कार्यशाळेत जरा जास्त झालंय हे मला कबूल आहे, पण त्याचं कारण माझ्या मनातली गंभीर काळजी हे आहे. याबद्दलचा अंतिम निर्णय तुम्हीच घ्यायचा आहे, एवढं म्हणून इथे थांबतो.

●●●

कुठचाही विषय वैयक्तिक पातळीवरच्या बाचाबाचीपर्यंत जाऊ द्यायचा नाही. त्याला सामाजिक प्रश्नाच्या चर्चेत नियंत्रित ठेवायचं. एकदा अहंकार दुखावला की दुरुस्ती कठीण असते.

5

स्त्री-पुरुष समानतेच्या प्रवासातली असमानतेची रूपं

एक खास गोष्ट समजावून सांगण्यासाठी आज आपण ही कार्यशाळा घेत आहोत. माझ्या वागणुकीवरून, लिखाणावरून तुम्ही असं खात्रीनी समजत असाल की संपूर्ण स्त्री-पुरुष समानता आचरणात आणू शकणारे जे अगदी कमी लोक आहेत त्यापैकी मी आहे. तुमची समजूत सर्वसाधारणपणी बरोबर आहे. पण मी स्वतः 'ॲप्लाइड सायकॉलॉजी'च्या पृथक्करण पद्धतीनी त्याच्या खोलात शिरतो तेव्हा कळतं की तो संपूर्ण समानता आचरणारा पुरुष मी नाही. हा मुद्दा मी नीट सविस्तर सांगतो.

1997 सालापासून 2015 पर्यंतच्या 18 वर्षांत विवाह या विषयाचा शक्य तेवढ्या खोलात जाऊन अभ्यास करत असताना जीवनसाथ अभ्यास मंडळ या संस्थेच्या कामकाजाची जबाबदारी मुख्यतः माझ्यावर आहे. संस्थेचे सदस्य निरनिराळ्या वयोगटातले आणि निरनिराळ्या वैवाहिक अवस्थांमधले आहेत. त्यांची यादी सांगतो.

सर्वांत जास्त अविवाहित मुली, त्या खालोखाल अविवाहित मुलगे
त्या खालोखाल विवाहित स्त्रिया, मग विवाहित पुरुष.
त्या खालोखाल घटस्फोटित किंवा विधवा स्त्रिया,
मग त्यानंतर घटस्फोटित किंवा विधुर पुरुष
आणि यादीच्या शेवटी वृद्ध स्त्रिया आणि पार शेवटी वृद्ध पुरुष
अशांचा मिश्र गट अभ्यास मंडळात येतो.

जीवनसाथच्या मिश्र गटचर्चेसाठी ठरलेलं ठिकाण, ठरलेले वार, वेळा यामुळे योजना करण्यातल्या अडचणी कमीत कमी असतात. त्यामुळे खरोखर अभ्यासाकडे लक्ष देणं शक्य झालं आहे.

ज्या अनेक विषयांचा अभ्यास इथे मंडळात केला जातो त्यापैकी एक महत्त्वाचा विषय म्हणजे स्त्री-पुरुष समानता या विषयाची समज. ज्या जोडप्यांचा विवाह झालेला आहे त्यांची शरीरं निरोगी असतील, चरितार्थ सुरळीतपणी चिंताविरहित भागण्याइतपत पैसे नियमितपणी मिळत असतील तर उरतो तो एकच प्रश्न; तो म्हणजे एकमेकांशी असलेली वागण्याची समज. वागणुकीची समज म्हणजे एकमेकांचं मन, सन्मान सांभाळून स्वतःच्या गरजा सांगता येण्याचं कसब. सर्वसाधारणपणी पुरुषप्रधानतेच्या पगड्यामुळे या बाबतीतली समज पुरुषाला कमी असते. पण हे पुरुषांचं शिक्षण करणार कोण?

आपल्या समाजातले पुरुष अशा प्रकारचा प्रश्न समजून घ्यायला तयारच नाहीत. समृद्ध वैवाहिक आयुष्याची गरज स्त्री आणि पुरुष दोघांनाही आहे, हे अजून पुरुषांना समजलेलं नाही. आपला समाज अनेक पिढ्यांपासूनच पुरुषप्रधान आहे. स्वतःचे आई-वडील, स्वतः आणि बायको, मुलं आणि सून-जावई एवढ्या स्वतःच्या देखत वाढलेल्या जोडप्यांमधे पुरुषप्रधानतेची तुलना केली तरी कळतं की, त्यामधे बदल होतोय, पण फार सावकाश. आणि तोही शहरी पुरुषांमधे.

ग्रामीण सरासरी पुरुषाची विचारपद्धती तर फारच भयानक आहे. बायकोच्या आजारपणाला जास्त खर्च येत असला तर त्या आजारावर इलाज करण्याऐवजी तो बायकोला माहेरी पाठवून देईल आणि दुसरं लग्न करेल.

ग्रामीण असोत नाहीतर शहरी असोत. सगळीकडे एक गोष्ट आढळते. स्त्रियांना सुख देण्यातली समज जास्त असते. आपण लैंगिक संभोगाबद्दल बोलत नाही, तर आयुष्यभर दुसऱ्याची पर्वा करण्याच्या वृत्तीविषयी बोलतो आहोत. स्त्रिया जे सुख देऊ शकतात ते सुख घेणं पुरुषांना समजत नाही आणि त्यामुळे जमत नाही.

सर्वसाधारण भारतीय पुरुषाचं म्हणणं असतं की, बाईनी आपली पायरी ओळखून वागावं. श्रीमंत, मध्यमवर्गीय, गरीब, शहरी, ग्रामीण सगळे याबाबतीत सारखेच. पुरुष मंडळींना दुसऱ्याची कदर करण्यातल्या ममतेपेक्षा आणि त्यातल्या आनंदापेक्षा स्पर्धेत विजय मिळवण्यात जास्त महत्त्व वाटतं. अलंकारिक पद्धतीनी पुरुषांनी 'आई' व्हायला शिकलं पाहिजे हे मी लहानपणापासून ऐकलेलं आहे. साने गुरुजींच्या गोष्टी ऐकल्यायत. ज्ञानेश्वरांना 'माउली' म्हटलेलं आपण जाणतो.

याचा खरा अर्थ, ती थोर माणसं 'संवेदनशील' होती असा आहे. अशी संतवत माणसं सोडली तर एकूण सर्वसाधारण पुरुष या एका बाबतीत फार कमी पडतो. 'फेमिनिस्ट मॅनेजमेंट' नावाची व्यवस्थापनाची स्वतंत्र कल्पना कशामुळे आली? 'दुसऱ्याबद्दल कदर' हाच तर त्यातला मुख्य विषय आहे.

एका अभ्यासकानी फार पूर्वी असं म्हटलं होतं की, नारी गुण आणि नर गुण हे निराळे मानायलाच लागतात. पण ज्या व्यक्तीत दोन्ही गुण असतात ती व्यक्ती आयुष्यात जास्त समाधानी असते. स्त्री मुक्ती चळवळीबद्दल एक फार सुरेख स्पष्टीकरण आहे. 'स्त्री मुक्तीची चळवळ असं नाव असलं तरी ती स्त्रियांच्या उद्धारासाठी नाही, तर पुरुषांच्या उद्धारासाठी आहे.' मला हा विचार फार महत्त्वाचा वाटतो.

प्रत्यक्षात आपला सर्वसाधारण समाज नवऱ्याला बायकोनी ए म्हणणं आणि नावानी हाक मारणं म्हणजे स्त्री-पुरुष समानता या समजेच्या फार पलीकडे जात नाहीय. पुरुष तर जात नाहीयतच, पण स्त्रियाही जात नाहीयत.

मुलाला जन्म देण्याची जबाबदारी निसर्गानी स्त्रीवर टाकलेली असल्यामुळे तिचं शरीर चिवट बनवलेलं असतं. मुली मुलांपेक्षा लवकर प्रगल्भ होतात. सहन करण्याची क्षमता ही देखील एक प्रकारची ताकदच असते. शारीरिक वेदना सहन करण्यातदेखील स्त्रिया जास्त सक्षम असतात. बाळाला जन्म देताना स्त्रियांना खूप वेदना सहन कराव्या लागतात. गर्भारपणाचे नऊ महिने आणि प्रत्यक्ष बाळाचा जन्म या काळात होणारी गैरसोय पुरुष सहन करू शकला नसता असं समजतात. ही गोष्ट प्रत्यक्ष सिद्ध करणं शक्य नसलं तरी याची प्रचीती आयुष्यभरातल्या घटनांनी येते.

मुलाला जन्म देणं आणि दूध पाजणं या दोन गोष्टींशिवाय पुरुषाला करता येणार नाही आणि स्त्रीनीच करायला हवी असं काहीच नसतं हा स्पष्ट तर्कविचार आधी सगळ्यांनी समजून घ्यायला हवा. पुरुषांनी आणि स्त्रियांनीही. त्याखेरीज पुरुष आणि स्त्री यांच्यात एकच मुख्य फरक आहे. पुरुषाची शारीरिक शक्ती सरासरीतच जास्त आहे. उंची, रुंदी, बाह्य शरीररचना, स्नायूंची ताकद या सगळ्यातच फरक आहे. कमी वेळात जास्त शारीरिक कष्टाचं काम असलं तर पुरुष त्यात भारी पडतो. पण जास्त काळ सलग चिकाटीनी मध्यम कष्टाचं काम असलं तर स्त्री सरस ठरते. चिवटपणा, टिकून राहण्याची क्षमता स्त्रीमधे निसर्गतः जास्त असते.

बाळाला जन्म देण्यामुळे आणि दूध पाजण्यामुळे मुलांच्या बाबतीत स्त्रिया जास्त भावनाशील असतात. त्या तुलनेत पुरुषांच्या भावनांची समज कमी पडते. मुळातल्या मनातल्या भावनांच्यात स्त्री-पुरुष फरक असल्यामुळे सगळ्या भावना व्यक्त करण्यात पुरुष कमी पडतात.

आत्तापर्यंतचा इतिहास सांगतो की, गणित विषयात पुरुषाची बुद्धी जास्त चांगली चालते. चित्रं, मांडणी, अवकाशाचा विचार यात त्याला जास्त गती असते. भाषांच्या, संवादाच्या बाबतीत स्त्री सरस ठरते. हातांच्या, बोटांच्या हालचाली आणि कौशल्यं यात स्त्री जास्त सक्षम असते. या प्रत्येक बाबतीत अपवाद असणारच, पण सर्वसाधारण स्थिती मात्र अशी आहे.

सीगमंड फ्रॉइडनी स्त्रिया आणि पुरुष यांच्याबद्दलच्या अभ्यासात असं स्पष्ट निरीक्षण मांडलं की, स्वतः आहोत तसं स्वतःला समजणं हे स्त्रीला जास्त चांगलं जमतं. पुरुष त्यात कच्चा पडतो. आपण कसं असायला हवं आहे त्याविषयी पुरुष जास्त विचार करतो. स्त्रीची आयुष्याची ध्येयं पुरुषांच्या संदर्भात जास्त प्रमाणात असतात. पुरुषाच्या स्वप्नांच्यात मात्र इतर सामाजिक, तांत्रिक समस्यांची उकल करण्याचा ध्यास अधिक प्रमाणात असतो. मी स्वतः फ्रॉइडच्या या निरीक्षणाशी सहमत आहे.

माझा स्वतःचा पुनर्जन्म या कल्पनेवर विश्वास नाही, पण विचारांना चालना मिळण्यासाठी मुद्दामून विचारलेल्या काल्पनिक प्रश्नांपैकी एक प्रश्न असा असतो, 'आणखी एक जन्म मिळाला आणि निवड करायची असली तर पुरुष व्हाल का स्त्री व्हाल?' गंमत अशी की फारच क्वचित लिंग बदलण्याची तयारी कोणीतरी दाखवतं. काहीही उत्तर असलं तरी चालतं, पण पुढे त्याची कारणं सांगायची असतात. अशा चर्चेतून प्रत्येक स्त्रीची आणि पुरुषाची स्त्री-पुरुष समानतेची समज स्पष्ट होते.

टी.व्ही.वरच्या जाहिराती हा एक काळजीचा विषयच होऊन बसला आहे. साडीची जाहिरात करताना ब्लाउजऐवजी ब्राच्या आकाराचं काहीतरी वस्त्र त्या स्त्रीनी घातलेलं दाखवणं, सिनेमामधल्या ओल्या कपड्यामधलं बाईचं अंगप्रदर्शन या सगळ्या गोष्टी स्त्री-पुरुष समानतेच्या मूल्यांना थेट पायी तुडवणाऱ्या आहेत. सुरुवातीला काही वर्षांपूर्वी अशा गोष्टी पडद्यावर दाखवण्यामागे पुरुष असायचे. पण आता तसंही म्हणता येत नाही. अनेक स्त्रियाच अशी दृश्यं दाखवण्याचे निर्णय घेताना दिसतात.

आपल्या समाजातल्या मुलग्यांना योग्य शिक्षण देणं जास्त जरुरीचं आहे. त्या शिक्षणात स्त्रियांशी नीट वागण्याला महत्त्व हवं. दुर्दैव असं की, स्त्री-पुरुष समानतेच्या शिक्षणात स्त्रिया चार इयत्ता शिकतायत तर सरासरी पुरुष त्या विषयाच्या बालवाडीत प्रवेश घ्यायलाही तयार नाही. स्त्री-पुरुष समानतेविषयी बोलताना पुरुष असा प्रतिवाद करतात की, स्त्रियाच स्त्रियांच्या शत्रू असतात. हे बऱ्याच प्रमाणात खरं आहे. त्याचबरोबर दुसऱ्या बाजूला पुरुष पुरुषांशी काय कमी शत्रुत्व करतात? सारखे तर एकमेकांचे पाय ओढतात, एकमेकांचे जीव घेतात. त्यामुळे या वादात काही तथ्य नाही हेच खरं.

विशिष्ट पद्धतीनी याचं शिक्षण कसं द्यायचं याची पद्धत पक्की केल्याशिवाय ते होणार नाही. अभ्यास मंडळात हा विषय शिकवण्याच्या अनेक पद्धती मी शोधून काढल्या. त्यापैकी एक पद्धत सर्वांत उपयुक्त आणि परिणामकारक आढळली ती म्हणजे गटचर्चा पद्धतीनी गोलात बसून या विषयाच्या प्रत्येक मुद्द्याबाबत आळीपाळीनी बोलणं.

जमलेल्या प्रत्येकाच्या आयुष्यात आढळणाऱ्या विविध घटनांकडे एका विशिष्ट चष्म्यानी बघता येणं ही या अभ्यासाची पहिली पायरी. त्यामुळे संपूर्ण गटाच्या अनुभवात पूर्ण आयुष्यात आढळणारी स्त्री-पुरुष असमानता दिसणारी रूपं शोधणं अशी ही पद्धत आहे. अमुक एक वागणूक हे स्त्री-पुरुष असमानतेचं रूप आहे हेच उपस्थितांपैकी एखाद्याला न पटल्यामुळे चर्चा रंगते. नवीन ज्ञान झाल्यावर शिस्तशीरपणी लिहून घेण्याइतके निष्ठावंत काही असतात तर काही सगळ्याच गोष्टी सोडून देण्याच्या वृत्तीमुळे लिहिण्याचे कष्ट घेत नाहीत. संपूर्ण गटाला अगदी सुरुवातीला एक गोष्ट जाहीर करून टाकली आहे. स्त्री आणि पुरुष यात जो नैसर्गिक शारीरिक फरक आहे त्याबद्दल पुन्हा बोलणं हा या गटचर्चेचा हेतू नाही. त्याबद्दल कोणाचा वादही असणं शक्य नाही आणि तो बैठकीचा विषय नाही. त्या व्यतिरिक्त मनाच्या जडणघडणीतले सगळे फरक टिपणं हे मात्र जमलेल्या सगळ्यांनी मिळून करायचं ठरवलं आहे.

एक निराळा विचार मी काही लोकांकडून ऐकला आहे आणि मला तो योग्य वाटतो. समजा, घरात दोन माणसं आहेत आणि त्या दोघांवर अडचणीला तोंड देण्याचा प्रसंग आला. एक जण वयानी, अंगानी मोठाड आहे नि दुसरा छोटा आहे. त्या दोघांपैकी अडचणीला मार्ग काढण्याची जास्त नैतिक जबाबदारी कोणावर असेल? अर्थात मोठ्यावर. समजा, एखाद्याला अधिकाराची गादी

चालवण्याचा अनेक पिढ्यांपासून आनुवंशिक वारसा आहे आणि दुसऱ्याला नाही, तर योग्य वागण्याची जास्त जबाबदारी कोणावर आहे? अर्थात आनुवंशिक वारसा असणाऱ्या माणसाची. यातून प्रश्न असा निघतो की, आपल्या देशानी समाजात वागण्यासाठी लोकशाही हा मार्ग निवडलेला आहे. शारीरिक बळ पुरुषामधे जास्त, अधिकार वापरण्याचा अनुभव पुरुषाला हजारो वर्षांचा, जवळजवळ प्रत्येक विवाहसंबंधामधे पुरुषाचं वय जास्त. असं असताना योग्य वागण्याची जास्त जबाबदारी सरळसरळ पुरुषाची नाही का?

स्त्री शिकली-सवरली, पैसे मिळवायला लागली. स्त्री बदलली, पण पुरुष बदलायला तयार नाही. मिळालेली सत्ता कोण सोडणार? हा सगळा सामाजिक सत्तासंघर्षच आहे. समाजात तत्त्वतः दोन गट आहेत हे मान्य आहे. पण ते दोन गट स्त्री आणि पुरुष असे नाहीयत. समानता हे मूल्य मानणारे आणि समानता न मानणारे असे दोन गट आहेत.

मानवजातीचा इतिहास तपासला तरी त्यात काही गोष्टी स्पष्ट दिसतात. आदिमानवाला निसर्गाबद्दल खूप कुतूहल होतं. त्या त्या काळात मानवानी निसर्ग समजून घेण्यासाठी, त्याच्यावर नियंत्रण मिळवण्यासाठी खूप प्रयोग केले, खूप शोध त्याला लागले. निसर्ग समजून घेण्याचा, त्याच्यावर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न करणं म्हणजेच विज्ञान.

त्याला दुसरं एक प्रचंड कुतूहल होतं ते अपत्यजन्माबद्दल. स्त्री-पुरुष दोनच जाती आहेत आणि त्यांच्या बाह्यशरीरात फरक आहेत एवढं त्याला कळलं होतं, पण अपत्यजन्मासारखी जादूगिरी करणाऱ्या स्त्रीवर नियंत्रण ही पुरुषाच्या दृष्टीनी मोठी महत्त्वाकांक्षा होती. सगळ्यांनी वागण्याची पद्धत असं म्हणत प्रत्यक्षात स्त्रीवर बंधनं घालण्यासाठी, म्हणजेच नियंत्रण ठेवण्याच्या अंतस्थ हेतूनी धर्म या कल्पनेचा जन्म झाला. जगात आजही सगळ्या धर्मांचा अभ्यास केला तर त्यात जास्तीत जास्त बंधनं स्त्रीवर आहेत.

इव्हान इलिच या लेखकानी 'जेंडर' नावाच्या पुस्तकात एक निराळ्या प्रकारचा मुद्दा मांडलेला आहे. जगभरात पूर्वी संपूर्ण समाजानी स्त्री आणि पुरुष फरक सगळ्या बाबतीत मान्य केला होता. त्या काळात स्त्रीला सन्मान होता. तोंडदेखला नाही, खरोखरच समाजात मान होता. समाजातल्या कर्तृत्ववान स्त्रियांच्या बाबतीत समतादेखील होती.

त्यानंतर जगभरात पैशाला फार महत्त्व आलं. आर्थिक संस्कृतीचं साम्राज्य

चालू झालं. आधी होती ती समता आणि सन्मान नाहीसा झाला. संघर्षाला सुरुवात झाली. त्यात स्त्री-पुरुष दोघांचंही नुकसान झालं. पुरुषांनी स्त्री-स्वातंत्र्याच्या बाबतीत फोडा आणि झोडा धोरणाचा वापर केला. सौभाग्यवती, विधवा, परित्यक्ता, घटस्फोटिता, अविवाहिता, पुत्रवती, निपुत्रिका असे भेद करून त्यांचं स्तोम संस्कृतीच्या नावाखाली वाढवत नेलं. पुरुषांच्या हातात सत्ता असल्यामुळे ते शक्य झालं.

मागे आपण कौटुंबिक आयुष्यामधल्या व्यक्तिस्वातंत्र्याविषयी उल्लेख केला होता. व्यक्तिस्वातंत्र्याचा पुढचा भाग म्हणजे स्त्री-पुरुष समानतेचं तत्त्व. इथपर्यंत समाजाला पोहोचायला दोन हजार वर्षं मधे गेली ह्याची कल्पनाही आपल्याला करणं कठीण जातं. स्त्री-पुरुष समानतेच्या तत्त्वाआधी स्त्री-दाक्षिण्य ही कल्पना मात्र होती. अजूनही ज्या ठिकाणी स्त्री-दाक्षिण्य ह्या कल्पनेमुळे स्त्रीला पुरुषांनी काहीतरी दान केलेलं असतं, तिथे ती गोष्ट समानतेच्या तत्त्वात बसत नाही. हे कळणं सुद्धा कित्येकांना कठीण जातं. खरं म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्य हे मूल्य म्हणून मान्य केलं की ते स्वातंत्र्य देण्याचा प्रश्नच येत नाही. ते असतंच. सध्याच्या वैवाहिक जीवनात हे तत्त्व समजणारे पुरुष फार कमी आढळतात. नवऱ्यानी बायकोला स्वातंत्र्य द्यायचं, हा शब्दप्रयोग सुद्धा बरोबर नाही.

प्रथम थोडे या विषयाच्या इतिहासात शिरुया. 1947 साली भारत ब्रिटिशांपासून स्वतंत्र झाला तेव्हापासून सुरुवात करू. मी स्वतः 1944 साली जन्मल्यामुळे मी स्वतः स्वानुभवानी त्या काळाबद्दल लिहिणं शक्य नाही हे उघड आहे. स्वातंत्र्य लढ्याच्या काळात देशाचं स्वातंत्र्यच केंद्रस्थानी होतं. समतेचा मधून मधून उल्लेख व्हायचा. समतेचा विचार त्या काळात घोषणांच्या पलीकडे फारसा गेलेला नव्हता. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही बऱ्याच काळपर्यंत समतेचा विचार कागदोपत्री आणि घोषणांच्यातच राहिला. स्वातंत्र्याच्या मागोमाग समता येईलच असा काहीसा भ्रामक समज झाला होता. अनुभवानंतर या बाबत काही प्रमाणात भ्रमनिरास होऊन विषमतेचं निर्मूलन करून समता प्रस्थापित करण्यासाठी भक्कम पावलं उचलली पाहिजेत याची समाजाला हळूहळू जाणीव होऊ लागली. राजकारणी आणि समाजकारणी यांच्या ही गोष्ट उशिरा का होईना लक्षात आली की, स्त्रिया या मतदार आहेत. त्यामुळे, खरं तर फक्त त्यामुळे स्त्री या घटकाचा विचार झाला. त्या मतदार नसत्या तर तेवढाही झाला नसता.

मगासचा मुद्दा पुन्हा मांडतो. कुठल्याही दोन मानवांची शरीरं निराळी

आहेत, याचा अर्थ मनं निराळ्या प्रकारे विचार करतील; म्हणजे दोन व्यक्ती या स्वतंत्रच आहेत. कोणी कोणाला स्वातंत्र्य द्यायचं नसतं. ते त्या व्यक्तीकडे असतंच. याच तर्कविधानाप्रमाणे पुरुषानी स्त्रीला स्वातंत्र्य द्यायचं नसतं, ते स्त्रीकडे असतंच. ते समजण्याची, वापरण्याची पद्धत समजण्याचीच खोटी आहे. हा मुद्दा समजून घेण्यासाठी तान्ह्या बाळाचं उदाहरण घेऊ. बालमानसशास्त्र म्हणतं की, जन्मल्यावर काही काळ बाळाला आपण आणि आई ही दोन निराळी अस्तित्वं आहेत हेच कळत नाही. जेव्हा ते कळतं तेव्हापासून ते शरीर, मन, विचार, भावना यांनी स्वतंत्रच असतं. त्याला ते एका आधीच्या अवस्थेत समजलेलं नव्हतं एवढंच.

समतेचा उद्घोष युरोपातल्या प्रबोधनयुगाच्या काळापासून आणि विशेषकरून फ्रेंच क्रांतीनंतर झाला. लोकशाहीवादी, समाजवादी, साम्यवादी, गांधीवादी अशा सर्वांनीच समतेच्या सिद्धांताचा निरनिराळ्या रीतीनी पाठपुरावा केला. कामगारांचे वर्ग-वर्चस्वाविरुद्धचे लढे, दलितांचे वर्ण-वर्चस्वाविरुद्धचे संघर्ष यामागेही समतेची प्रेरणा या ना त्या स्वरूपात होती.

जागतिक शांतता, स्थिरता, अशा हेतूनी स्थापन केलेल्या यूनोनी 1975 हे महिला वर्ष म्हणून जाहीर केलं. जवळजवळ निम्म्या अधिक देशांनी स्त्री-पुरुष समानतेच्या दृष्टीनी जमेल तशी पावलं उचलली. त्या प्रक्रियेमधे काही गटांनी 'वीमेन ओन्ली' असा आग्रह धरला. पुरुष नकोत अशा प्रकारची विधानं तर खूप वादग्रस्त ठरली. स्त्रियांनी पुरुषांच्या अनेक हजार वर्षांच्या अधिकारालाच आव्हान केल्यासारखं झालं. जणू काही स्त्रिया विरुद्ध पुरुष असा सामना चालू झाला. चुकीच्या क्रियेवर अर्थातच जोरदार प्रतिक्रिया आली. मुळात चांगल्या हेतूनी सुरू केलेल्या प्रवासामधे अडचणी निर्माण होऊन विधायक काम अनेक वर्षांनी मागे गेलं. प्रतिक्रियांपैकी एक महत्त्वाची गैरसमजूत म्हणजे स्त्री-मुक्तीचा अर्थ स्वैराचार असा घेतला गेला. 'फेमिनिझम', 'विमेन लिबरेशन' या शब्दाचा पुरुषांनी चुकीचा अर्थ घेतलाच, पण काही स्त्रियांनीही घेतला. या विषयाची रास्त समज असलेल्या जगभराच्या कार्यकर्त्यांना हे घोटाळे निस्तरताना खूप त्रास झाला. अजूनही हा विषय नीट समजावून सांगताना भरपूर अडचणी समोर आहेत.

स्त्री-मुक्तीची चळवळ नोकरी-धंद्यानिमित्त घराबाहेर जाणाऱ्या स्त्रियांच्या समस्या आणि मागण्यांभोवती केंद्रित झालेली होती. ही चळवळ समतेच्या व्यापक चळवळीचं एक अविभाज्य अंग आहे, याची काहीशी जाणीव अलीकडच्या स्त्री-मुक्ती चळवळीत दिसते. आजच्या पुरुषप्रधान समाजामधे स्त्रीमुक्तीचा मुख्य

रोख स्त्री-पुरुष समतेवर असणं स्वाभाविक आहे. पण स्त्री-मुक्ती आंदोलन समतेच्या व्यापक चळवळीचा एक अविभाज्य घटक आहे हे ध्यानात घेतल्याखेरीज स्त्री-पुरुष-समतेच्या स्त्री-मुक्ती आंदोलनाला आवश्यक ती गती येणं कठीण दिसतं. त्या प्रश्नात गुंतलेले भारतातले धर्मभेद, जातिभेद, भाषाभेद, वर्णभेद हे प्रश्न आहेत हे माहीत होतं, पण ते किती राक्षसी आहेत ते जरा उशिरा कळलं.

या दृष्टीनी विचार केला तर असं म्हणता येईल की, स्त्री-मुक्तीचा किंवा व्यापक समतेचा एक भाग म्हणून स्त्री-पुरुष समतेचा संबंध मालमत्तेची खाजगी मालकी व कुटुंबसंस्था यांच्याशी तर आहेच, शिवाय लोकशाहीच्या संकल्पनेशीही याचा घनिष्ठ संबंध आहे. त्यामुळे या सर्वांचाच एकत्रितपणी विचार व्हायला हवा. मानव समाजाची भटकी अवस्था संपून तो हळूहळू स्थिर जीवन जगू लागेपर्यंत त्याच्याजवळ ज्याला खाजगी मालमत्ता असं म्हणता येईल असं काही नव्हतं. पण त्यानंतर दुसऱ्याच्या श्रमातून अधिक उत्पादन मिळवून त्याची मालकी स्वतःकडे अबाधित ठेवून तो स्थिर जीवन जगायला लागला. आणि त्याचबरोबर शोषण आणि विषमता यांची सुरुवात झाली.

याचा पहिला बळी स्त्री ठरली आणि तिथूनच स्त्रीच्या गुलामगिरीची सुरुवात झाली. सारांशात असं म्हणता येईल की, ह्या काळात शोषणाच्या जोरावर खाजगी मालमत्ता बळकवायला सुरुवात झाली आणि विषमतेची बीजं रोवली गेली. याचा परिणाम असा झाला की, पुरुषानी स्त्रीचं स्वातंत्र्य हिरावून घेऊन तिला गुलाम बनवलं. भौतिक जीवनाच्या या कृतीला नैतिक आधार उभा केल्याशिवाय चालण्यासारखं नव्हतं. भारतामधे सामाजिक पातळीवर चार वर्ण निर्माण करण्यात आले व स्त्रीला शूद्रांच्या पंक्तीला बसवलं गेलं. परिणाम असा झाला की सर्वसाधारणपणी सगळे असं म्हणायला लागले, 'मुलगी सासरी जाताना उभी जाते नि आडवीच बाहेर येते.'

याच काळात बहुपतित्व अथवा बहुपत्नीत्वाची प्रथा हळूहळू नाहीशी केली. स्त्रीवर एकपतित्वाचं आणि पातिव्रत्याचं बंधन घातलं. तिला अनेक विशेषणांनी नटवलेल्या कुटुंबसंस्थेच्या महिरपीत बंदिस्त करून टाकलं. याचा अर्थ असा की, मालमत्तेच्या खाजगी मालकीची स्थापना झाल्याबरोबर त्यातून एका बाजूनी सबंध मानवी समाजात शोषण आणि विषमता सुरू झाली. दुसऱ्या बाजूनी स्त्रीला गुलाम बनवून कुटुंब असं गोंडस नाव असलेल्या संस्थेत बंदिस्त केलं. सर्वसाधारण भारतीय स्त्री कुटुंबासाठी संपूर्ण आयुष्य अर्पण करायला तयार होती. त्यात

नवऱ्याबद्दलच्या ओढीपेक्षा अपत्यप्रेम ही गोष्ट जास्त ताकदीची ठरली.

जगाच्या या बाबतीतल्या अभ्यासात एक गोष्ट स्पष्टपणे दिसते. संपूर्ण मानव समाजात किंवा स्त्री-पुरुषांमधल्या समतेचा विचार करणाऱ्या सगळ्यांनाच समता-मालमत्ता-खाजगी मालकी– कुटुंब संस्था यांच्या परस्पर संबंधाचा विचार करणं भाग आहे.

आधुनिक काळात समतेचा उद्‌घोष प्रथम प्रबोधन युगात झाला आणि फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळी त्याचे पडसाद जगभर उमटले. तोपर्यंतची साधारण परिस्थिती अशी होती. स्त्रीकडे, अगदी स्वतःच्या लग्नाच्या बायकोकडे एक देण्या-घेण्याची भोग्य वस्तू म्हणून बघितलं जायचं. याबद्दल यू.एस.ए.चा दक्षिण प्रांत विशेष माहिती होता. घरी आलेल्या विशेष पाहुण्याला आपली बायको लैंगिक सुखासाठी वापरायला देण्याची पद्धत होती. यात खूप आश्चर्य वाटण्याजोगं काहीच नव्हतं. अगदी प्रसिद्ध ग्रीक तत्त्वज्ञानी सॉक्रेटिस यानीदेखील आपली बायको झांटिपी ही पाहुण्याला वापरायला दिली होती.

त्यानंतर समाजवाद्यांनी, साम्यवाद्यांनी समतेचं सूत्र धरलं. त्यासाठी उत्पादनसाधनं खाजगी मालकीची न राहता ती समाजाच्या मालकीची व्हावीत अशी भूमिका त्यांनी घेतली. म्हणजेच त्यांनी मुख्यतः उत्पादन साधनांच्या मालकीचा विचार केला. उत्पादन साधनांच्या मालकीच्या स्वरूपामधे बदल घडवून आणले तर खाजगी मालमत्तेच्या भौतिक पैलूचा विचार होईल. पण त्याचवेळी खाजगी मालकीला सांस्कृतिक बाजू आहे हे विसरून चालणार नाही.

भाषेच्या अडचणीमुळे भारताचा आणि बाकीच्या जगाचा फार संबंधही यायचा नाही. इंग्रजी जाणणारे जे मूठभर लोक असायचे, त्यांना स्त्री-पुरुष समानता हा विषय एवढा महत्त्वाचा वाटला नाही. त्यांनी त्याच्याकडे चक्क दुर्लक्ष केलं.

खाजगी मालकीच्या संकल्पनेचे संस्कार आपल्या आयुष्यात फार खोलवर गेलेले आहेत. त्यामुळे व्यक्ती, कुटुंब आणि समाज या सगळ्यांवर त्याचा परिणाम होतो. इतकंच नाही, तर खाजगी मालकीच्या संकल्पनेमुळे आपल्या संपूर्ण जीवनाला एक निराळंच वळण लागलं आहे. याचा परिणाम पहिल्यांदा कुटुंबात दिसतो. त्यामुळे स्त्री-मुक्तीचा लढा घरोघरी द्यावा लागणार आहे.

अगदी सुरुवातीला मी जो माझ्या आचरणाचा उल्लेख केला त्याचा हा अर्थ आहे. मी पुरुष असलो तरी स्त्री-पुरुष समानतेबद्दल आग्रही आहे. त्यामुळे हा

लढा मलाही चुकवता येत नाही. खुद्द मी आणि शोभा यांच्यात ही लढाई होणार नाही, पण विस्तारित कुटुंबात मला आणि शोभाला मिळून लढाई करावीच लागेल.

याचाच अर्थ असा की, व्यापक सामाजिक समतेची चळवळ असो की स्त्री-पुरुष समतेचं आंदोलन असो, ते करणाऱ्यांना केवळ उत्पादनसाधनाच्या खाजगी मालकी संबंधीचा नाही तर खाजगी मालकीच्या एकंदर संकल्पनेबाबतची आपली भूमिका देखील स्पष्ट मांडावी लागेल. स्त्रीच्या गुलामगिरीला म्हणजेच स्त्री-पुरुष विषमतेला खाजगी मालकीची संकल्पना मुळात जबाबदार आहे. जोपर्यंत मालमत्तेच्या खाजगी मालकीची संकल्पना आपण सोडत नाही, तोपर्यंत स्त्री-मुक्ती किंवा स्त्री-पुरुष समता साकार होणार नाही हे समजून घ्यावंच लागेल.

संपत्ती आणि खाजगी मालकी यासंबंधी जी चर्चा होते तिचा रोख मुख्यतः उत्पादनसाधनांवर असतो. उत्पादन साधनं खाजगी मालकीची झाल्यामुळे ती शोषण, अन्याय, विषमता यांची साधनं बनली आहेत. पण ज्याच्या साहाय्यानी शोषण शक्य होतं आणि विषमता निर्माण होते, अशी मालमत्ता समाजातल्या फारच थोड्या लोकांजवळ असते.

असं असूनसुद्धा खाजगी मालकीच्या संकल्पनेचे संस्कार समाजातल्या सगळ्या समूहांमधे व्यापकपणे पसरलेले दिसतात. म्हणून खाजगी मालमत्तेचा विचार करताना आपल्यासमोर खाजगी मालमत्ता आणि त्यातून निर्माण झालेले संस्कार मुख्यतः असायला हवेत.

हा सगळा साम्यवादाचा विचार झाला. पण भारतानी तर लोकशाही राज्यपद्धती पक्की केलेली होती. त्यामुळे हा प्रश्न सोडवणं तेव्हाही बिकटच होतं. खाजगी मालकीच्या सांस्कृतिक बाजूचा विचार करताना कुटुंब आणि कुटुंबसंस्था यांचा विचार करणं जरूर आहे. स्त्री-मुक्तीच्या संदर्भात संस्कृतिवाद्यांकडून नेहमीच अशी भीती व्यक्त करण्यात येते की, स्त्री-मुक्तीच्या आंदोलनानी कुटुंबसंस्थाच धोक्यात येणार आहे. इतकंच नाही, तर कुटुंबामधे जे उदात्त (!) मानवी संबंध जोपासले जातात त्यांचा विध्वंस होणार आहे. स्त्री-पुरुष समतेच्या संदर्भात आपल्याला विचार करायला हवा तो असा की, कुटुंब आणि कुटुंबसंस्था भविष्यात सध्याच्या स्वरूपात राहील का? राहू द्यायची का?

आजच्या पुरुषप्रधान समाजातल्या कुटुंबसंस्थेचा विचार करताना त्याच्यामागचा इतिहास पण बघायला हवा. आपल्याकडची कुटुंबरचना रक्तसंबंधांच्या पायावर तयार झालेली आहे. म्हणजेच आजच्या आपल्या कुटुंबातल्या व्यक्ती रक्ताच्या

नात्यांनीच संबंधित असतात, सबंध कुटुंब रक्तसंबंधियांपुरतंच मर्यादित असतं. असं करण्यामागच्या प्रेरणेचा विचार केला तर असं दिसून येईल की, वारसागत चालणारी खाजगी मालमत्ता ही त्यामागची मुख्य प्रेरणा होती. शिवाय पुरुषप्रधान समाजातली कुटुंबरचना कर्त्या पुरुषाला केंद्रस्थानी ठेवूनच करण्यात आलेली आहे. त्यामुळे कुटुंबातली सत्तारचना सुद्धा पुरुषकेंद्रितच आहे.

याचाच अर्थ असा की, कुटुंबामधे सत्ता कर्त्या पुरुषांच्या हातात एकवटलेली आहे आणि पर्यायानी स्त्रीला कसल्याच प्रकारची सत्ता नाही. सत्ता असलीच तर ती हाताला हात लावून सत्तेत सहभागी झाल्याचं पोकळ, फसवं समाधान मानण्याची. त्यामुळे रक्तसंबंधावर आधारित कुटुंबरचना आणि कुटुंबातलं सत्तेचं कर्त्या पुरुषाच्या हाती झालेलं केंद्रीकरण ही स्थिती बदलल्याशिवाय स्त्रीच्या कुटुंबातली सत्ता आणि स्वातंत्र्याच्या अभावाला व पुरुषकेंद्री कुटुंबाच्या संस्कारांना दूर करता येणार नाही.

अडचण अशी आहे की याबद्दलही राजकारणात, समाजकारणात, उद्योगधंद्यात निर्णय घेणारे सगळे पुरुषच असतात. सध्याची कुटुंबरचना बदलली पाहिजे असं म्हटल्याबरोबर आर्यसंस्कृतिप्रेमी लोक स्त्री-मुक्तीवाले कुटुंबसंस्था नामशेष करायला निघाले आहेत असा अतिशयोक्त अपप्रचार जाणूनबुजून करतात.

प्रत्यक्षात लोकशाही ही केवळ राज्यपद्धती नसून जीवनपद्धती आहे हे सगळ्यांना कळायला हवं. लोकशाहीत स्त्री आणि पुरुष समान असतात म्हणल्यासरशी रोजच्या आयुष्यातही ते समान असायलाच हवेत. काही महाभाग असे निघतील की जे म्हणतील, आम्हाला लोकशाहीच नको. प्रत्यक्षात भारत स्वतंत्र झाला तेव्हाही लोकशाहीव्यतिरिक्त दुसरी पद्धत निवडता आली नसती आणि यापुढेही येणार नाही. जे सध्याचं चित्र आहे ते वाईट आहे, पण त्यातल्या त्यात चांगलं हेच आहे.

मालमत्तेच्या खाजगी मालकीच्या संकल्पनेचं तसंच आपल्या कुटुंबाच्या आणि त्यातल्या सत्तेच्या झालेल्या रचनेचे संस्कार बालपणापासून झाल्यामुळे ते फार खोलवरचे आहेत. हे बदलतील का नाही हे सांगणंही कठीण आहे. हे संस्कार कुटुंबामधे अगदी लहान लहान गोष्टींतून होत असतात. नमुन्यादाखल याची एक-दोन उदाहरणं घेऊया. मोलकरीण आली नसली तर बायकोनी नवऱ्याचे कपडे धुतले पाहिजेत. ते तिचं कर्तव्यच आहे असं समजतात.

हे सगळे संस्कार खाजगी मालकी या मूळ संकल्पनेवर बेतलेले आहेत.

खाजगी याचा अर्थ फक्त रक्ताची नाती. त्यापलीकडचं समविचारी लोकांचं कुटुंब अशी व्याख्या मान्य केली तर ते कुटुंब खूप मोठंही असू शकेल. कुटुंबाच्या विस्तृतीकरणामधला खरा अडसर मालमत्ता–खाजगी मालकी हा आहे. तो एकदा नाहीसा झाला म्हणजे कुटुंबातल्या व्यक्तींचे संबंध एका नव्याच जाणिवेतून वाढीला लागतील. आजच्या कुटुंबाच्या परिवर्तनातले टप्पे साधारण असे असतील. आजचं कुटुंब रक्तसंबंधियांपुरतं मर्यादित आहे तसं राहणार नाही. खाजगी मालमत्ता-मालकी नाहीशी होत गेल्यामुळे वारसाचा प्रश्न उद्भवणार नाही.

याचा अर्थ, पती-पत्नी-मुलं हे संबंध राहणार नाहीत असं नाही; पण त्यामागली प्रेरणा समतेची-स्वातंत्र्याची असेल आणि म्हणूनच ते संबंध अधिक जिव्हाळ्याचे असतील. कारण खरं निर्व्याज प्रेम हे स्वतंत्र-समान व्यक्तीमधेच संभवतं. अशा तऱ्हेचं स्वतंत्र-समान व्यक्तिमत्त्व खाजगी मालमत्ता-मालकीच्या लोपानंतरच वाढीला लागू शकेल. या पद्धतीत आजच्या मर्यादित कुटुंबाचा लोप होत जाईल आणि एक व्यापक/विस्तृत कुटुंब अस्तित्वात येईल. अशा कुटुंबातल्या व्यक्तींचे परस्पर संबंध स्वातंत्र्य आणि समता यावर आधारलेले असतील. कालांतरानी ह्या व्यापक/विस्तृत कुटुंबाचं परिवर्तन सबंध गाव, किबुट्झ अथवा कम्यून असू शकेल. मागे आपण 'विमुक्त जीवन' या विषयाचा अभ्यास केला होता. ती कल्पना किबुट्झच्या बरीच जवळची आहे.

आपल्या कुटुंबरचनेत बदल होतील असं जे मगाशी म्हटलं होतं, त्यामागे हा अर्थ आहे हे आता स्पष्ट व्हायला हरकत नाही. कुटुंबाच्या परिवर्तनाबरोबरच समाजही बदलेल आणि स्त्री-स्वातंत्र्य आणि स्त्री-पुरुष समतेवर आधारित असा एक नवा समाज निर्माण होईल. असं झालं म्हणजेच स्त्री खऱ्या अर्थानी मुक्त होईल आणि समाजामधे स्त्री-पुरुष समता नांदेल, इतकंच नाही तर एक सुदृढ असा नवा समाज आपल्याला पाहायला मिळेल.

या आत्ता सांगितलेल्या गोष्टी अनेक स्वरूपात अनेक ठिकाणी जगभर करून बघितलेल्या आहेत. 'विमुक्त समाज' या विषयाच्या स्वतंत्र कार्यशाळेसाठी त्या राखून ठेवू आणि आता पुन्हा सध्याच्या परिस्थितीकडे वळू.

आपण जो पूर्वीचा इतिहास बघितला तो फार आधीच्या काळाचा होता. अगदी अलीकडच्या नजीकच्या काळातला इतिहास म्हणजे आपले आई-वडील. एकूण समानतेचा संस्कार आई-वडलांवर त्यांच्या लहानपणी जसा झाला असणार त्याप्रमाणे ते वागणार. त्यांनी जो सुधारित संस्कार आपल्यावर लहानपणी केला

असेल त्याचा आपल्यावर परिणाम होणार.

विवाह या विषयाचा अभ्यास करताना निरनिराळ्या पार्श्वभूमीच्या विवाहित लोकांच्या मुलाखतीची मला संधी मिळाली. आनंदानी सांगण्याजोगा भाग वैवाहिक जीवनात असतोच, त्याचा अभिमान वाटणंही स्वाभाविक आहे, परंतु फार कमी जोडपी वैवाहिक जीवनात आलेल्या अडचणी मोकळेपणानी मांडतात. मुलाखतीच्या प्रक्रियेत त्यांच्या मनात शिरून, एकमेकांना अधिक खरं आणि स्पष्ट बोलायला प्रवृत्त करून, खरं बाहेर निघालं की काही गोष्टी ते बोलतात. त्यांच्यामधल्या भांडणाचे विषय हा तर खूप महत्त्वाचा मुद्दा असतो.

एकूण समानतेची समज कशा कशात तपासायची असते ते बघूया. 1) पैशांबद्दलचे व्यवहार 2) घरकामामधे सहकार्य, रास्त वाटणी आणि मदत 3) मुलांचं संगोपन 4) एकमेकांचे नातेवाईक 5) समाज 6) परस्त्री आकर्षण-परपुरुष आकर्षण या विषयाची हाताळणी.

दुसऱ्या एका पद्धतीनीही विचार आणि भावनांची वर्गवारी करण्याची पद्धत आहे. 1) स्त्री-पुरुष आकर्षण, अर्थात मानवी नाती, 2) पैसे अर्थात चरितार्थाची काळजी 3) आत्मसन्मान अर्थात मानापमानाची संकल्पना.

यापैकी स्त्री-पुरुष असमानता हा विषय आत्मसन्मान या गटात मोडतो. आत्मसन्मान जागृत असेल तर असमानतेचं प्रत्येक रूप संवेदनशील स्त्रीला बोचणारच. त्यावरून नवरा-बायकोच्यात वादविवाद होणारच. आत्मसन्मानाबद्दल तेवढी संवेदना तीव्र नसेल तर अनेक असमानतेची रूपं दिसणार सुद्धा नाहीत. स्त्रियांप्रमाणेच असमानतेच्या स्वरूपाबद्दल पुरुषाच्याही मनात संवेदना कमी-अधिक असते. काही विवाहित पुरुष आपल्या बायकोला असमानतेची वागणूक मिळू नये म्हणून स्वतः खूप जागरूक असतात, तर उरलेले नसतात. काही स्त्रिया खूप सजगपणे संसार करतात तर काही स्त्रियांना ही असमानतेची रूपं नजरेला पडत नाहीत. थोडक्यात, पुरुषप्रधान सांस्कृतिक वातावरणामुळे पुरुषप्रधान पुरुषांबरोबर पुरुषप्रधान स्त्रियाही असतात.

हे ऐकताना गंमत वाटेल, पण बघा हं. मुलींना मुलग्यासारखं वागवा असं म्हटलं जातं. मग मुलग्यांनाही मुलींसारखं वागवायला नको का? आता ही संवेदना बारकाव्यानी बघता आली तर तसा प्रयत्न करावा म्हणून हा शोध घेतलेला आहे. अगदी सुरुवातीचा मुद्दा पुन्हा मांडतो. शारीरिक दृष्ट्या स्त्री आणि पुरुष यांच्यात जे फरक आहेत ते कोणालाच अमान्य नाहीत. शरीररचना, उंची,

ताकद, वजन, अपत्यजन्म, केस, आवाज या सगळ्या गोष्टी मान्य केल्या तरी आजचा मुख्य प्रश्न हा नाही. विचारशक्ती, बुद्धिमत्ता, प्रतिभा, जिद्द, धाडस, चिवटपणा, पृथक्करण शक्ती, दुसऱ्याला समजून घेण्याची इच्छा, भावनिक समज, कलागुण अशा व्यक्तिमत्त्वाच्या अनेक पैलूंची खरोखर तुलना करायला बसलं आणि सँपल म्हणून आपल्या स्वतःच्या ओळखीचे पाचपन्नास स्त्री-पुरुष घेतले तर त्याचं मला पटलेलं उत्तर असं आहे. स्त्री आणि पुरुष यांच्यात काही गुण कमी-जास्त दिसतात. पण सारांशानी बघितलं तर मला कोणीही एक श्रेष्ठ किंवा कनिष्ठ सहज ठरवता येत नाही.

नवरा-बायकोचं सहजीवन या शब्दामधला 'सह' शब्द महत्त्वाचा आहे. सह म्हणजे एकत्र, एकमेकांसाठी, एकमेकांना, एकमेकांनी असंच आहे. एका व्यक्तीनी दुसऱ्या व्यक्तीची सेवा करायची म्हटली तर ते सहजीवन कसं म्हणता येईल?

हा सगळा 'एक्सरसाइझ' प्रत्येक स्त्री आणि पुरुषानी अवश्य करून बघावा. समाजातल्या चारही वर्गांना त्याचा उपयोग होईल. ते चार वर्ग म्हणजे आपले नेहमीचे ब्राह्मण, वैश्य, क्षत्रिय, शूद्र नाहीत. मी म्हणतोय ते चार वर्ग असे –

1) स्त्री प्रधान स्त्रिया (म्हणजे सध्याच्या स्त्री-मुक्तीच्या प्रवाहातल्या मुक्त स्त्रिया)
2) पुरुष प्रधान स्त्रिया (म्हणजे ज्या स्त्रियांची स्वतःची खात्री आहे की पुरुष हा श्रेष्ठ मानव आहे. अशा स्त्रिया प्रचंड संख्येनी आहेत.)
3) पुरुष प्रधान पुरुष (अगदी थोडे अपवाद वगळून जवळजवळ संपूर्ण पुरुष जमात अशीच आहे.)
4) स्त्री प्रधान पुरुष (असे अगदी कमी पुरुष आहेत.)
   मी, आमचा मुलगा शोनील या वर्गातले आहोत. आम्ही कायम मानतो की जर चुकून या दोन तुल्यबलांमधे ठरवायचं झालंच तर स्त्रीलाच श्रेष्ठ ठरवावं लागेल, कारण दुसऱ्याला समजून घेण्याची इच्छा, समज, सारासार विचार, अष्टावधान हा गुण तिच्यात कायमच जास्त असतो.
   आमच्या तोंडात 'या बायकांचं असंच असतं' वगैरे वाक्य कधीच नसतं.
5) लिंगप्रधानतेतून मुक्त अशी माणसं अगदी क्वचितच सापडतात. (आपण तृतीय पंथियांबद्दल बोलत नाही आहोत.) वर उल्लेख चार वर्णांचा होता, पण हा देखील गट करायला हवा. अशी व्यक्ती मात्र फारच क्वचित दिसते.

खरं म्हणजे मी आत्ता एकही उदाहरण सांगू शकत नाही.

आता हे मान्य करून सगळ्या पाचही जातीच्या लोकांना स्वतःच्या तपासणीसाठी काही प्रश्न खाली मांडतो आहे. त्याच्या उत्तरांवरून तुम्ही त्यातले कोण आणि तुमच्या स्वतःच्या माणुसकीच्या परीक्षेत पास की नापास ते तुम्हीच ठरवायचं.

विषयाच्या नीट मांडणीसाठी आणि सगळ्यांच्या विचाराच्या शिस्तीसाठी आयुष्याचे काही टप्पे पक्के केले. ते 12 टप्पे असे आहेत. या टप्प्यांची निराळी रचनाही करता येईल याची मला कल्पना आहे, पण सध्या ही रचना मान्य करून पुढे जाऊ.

1) आईला दिवस गेल्यापासून ते अपत्याच्या 5 व्या वर्षापर्यंत.
2) अपत्याच्या 5 ते 10 वर्ष वयापर्यंत
3) अपत्याचं वय 10 ते ग्रॅज्युएशन शिक्षणापर्यंत
4) नोकरी-धंदा–व्यवसाय वगैरे ठिकाणी
5) घरच्या आणि सामाजिक वातावरणात
6) लग्न ठरवताना
7) प्रत्यक्ष लग्नबंधनाच्या वेळी
8) लग्नानंतरचं 1 वर्ष किंवा मूल झाल्यावरचा सुरुवातीचा काळ
9) पालकत्वाचा काळ
10)आपल्या मुलांची लग्नं ठरवताना आणि करताना
11)म्हातारपण
12)जोडप्यापैकी एकाचा मृत्यू झाल्यावर.

या प्रत्येक टप्प्याबद्दल या अभ्यासामधे भाग घेतलेल्या प्रत्येकाचं काहीतरी म्हणणं होतं. त्यावरून काही निष्कर्ष निघाले. त्याचा अभ्यास या कार्यशाळेत आपण सगळे मिळून करू आणि स्वतःची भूमिका स्पष्ट करू. त्यात स्वतःची भूमिका याला फार महत्त्व आहे. समजा, तुमच्यापैकी कोणाचंतरी काहीतरी

म्हणणं आहे आणि दुसऱ्या कोणाला तरी ते पटत नाहीय. त्यानी तो मतभेद कारणासकट व्यक्त करणं महत्त्वाचं आहे. आता आपण ठरवलेल्या एकेका टप्प्याची चर्चा करूया. सगळ्यांना विनंती अशी की मुद्देसूद, स्पष्ट आणि शांतपणी आपलं मत मांडायचं. नवरा-बायकोचं म्हणणं निरनिराळं असू शकेल, खरं म्हणजे असेलच. ते एकमेकांना सोयीचं, जुळण्याजोगं, पटण्याजोगं मांडण्याचा प्रयत्न शक्यतोवर करू नका. निराळं असलं तरी स्पष्ट मांडा.

एक गोष्ट आकडेवारीसंबंधातली आहे, पण त्याचा अर्थ गंभीर आहे. अप्रगत देशांच्यात, आशिया खंडात, भारत देशात जनगणनेत पुरुषांची संख्या जास्त आहे. प्रगत देशात म्हणजे इंग्लंड, उत्तर अमेरिका, कॅनडा, रशिया, स्कँडिनेव्हिया मधे स्त्रियांचं प्रमाण किंचित जास्त आहे. याचा अर्थ स्पष्ट आहे. जन्म होण्यापूर्वीच स्त्रियांना स्त्री-पुरुष असमानतेचा दणका बसला.

●

प्रत्यक्षात लोकशाही ही केवळ राज्यपद्धती नसून जीवनपद्धती आहे हे सगळ्यांना कळायला हवं. लोकशाहीत स्त्री आणि पुरुष समान असतात म्हणल्यासरशी रोजच्या आयुष्यातही ते समान असायलाच हवेत.

1) गर्भधारणेपासून 5 व्या वर्षापर्यंतची असमानता

जन्माआधीचं घरातलं वातावरण जसं असेल, वर सांगितलेल्या 4 गटांपैकी आई कुठच्या विचार-गटाची, वडील कुठल्या विचार-गटातले, घरावर ज्यांच्या विचारांचा पगडा आहे त्या लोकांप्रमाणे जन्माचं ठिकाण ठरतं. आईच्या माहेरी का सासरी, आणि तिथल्या प्रथेसरशी येणारं सगळं वातावरण ठरतं. त्या वेळेलाच आपला गट ठरायला सुरुवात होते.

विलायतेत केलेला एक प्रयोग आपण समजून घेण्याजोगा आहे. एका पुरुषाला गर्भारपणाचा अनुभव घेण्याची इच्छा होती. त्या प्रयोगासाठी तो 24 तास त्या त्या महिन्यात स्त्रीला जे सोसावं लागतं त्या सगळ्या गोष्टी करून बघत होता. सुरुवाती सुरुवातीच्या महिन्यांच्यात त्यानी मुद्दामून औषधं घेऊन उलट्या, सूक्ष्म चक्कर, सगळे अनुभव घेतले. त्यानंतर पोटाला 24 तास छोटी उशी बांधून ठेवून कसं वाटतं ते बघितलं. उशीचा आकार वाढवत नेला. उशीचं वजन वाढवत नेलं. औषधांनी पायावर सूज येण्याचा अनुभव घेतला. चालतानाचा त्रास, कंबरदुखी, सगळ्या गोष्टी मुद्दामून अनुभवल्या. या गर्भारपणाच्या कृत्रिम अनुभवावर त्यानी बरंच प्रबोधनाचं काम केलं. त्याच्या स्वतःच्या दृष्टिकोनात आणि वागणुकीत तर बदल झालाच, पण त्याच्या प्रयत्नांमुळे समाजाच्या विचारातही बदल झाले.

आयुष्यात साधारणपणी ज्या क्रमानी घटना घडतात त्या क्रमानी आजच्या कार्यशाळेत मुद्दे मांडलेले आहेत. संभोग आणि लैंगिक संभोग याचा अर्थ निराळा होऊ शकतो. निव्वळ दोन माणसांच्यातला आनंदाचा अनुभव म्हणजे समभोग, संगभोग ऊर्फ संभोग. लिंगाचा वापर करून दिला-घेतलेला आनंद म्हणजे लैंगिक संभोग. यामुळे लैंगिक संभोग असा शब्द मुद्दामून वापरलेला आहे.

1) मुलगा व्हावा म्हणून नवस बोलण्याची घटना– सुशिक्षित, सुसंस्कृत समाजात, शहरी, निमशहरी वातावरणात देखील मुलगा होणं या गोष्टीचं महत्त्व अजून शिल्लक आहे. पुरुषप्रधान समाजरचना आणि अजूनही पुरुषधार्जिणे कायदे यामुळे ही परिस्थिती आढळते.

प्रत्यक्षात मुलगा होणं की मुलगी हे स्त्रीवर अवलंबून नसतं. स्त्रीच्या शरीरात मुलाच्या किंवा मुलीच्या गर्भाची कायम तयारी असते. लैंगिक संभोगाच्या

वेळी पुरुषाच्या वीर्यातून मुलाचं किंवा मुलीचं कोणतं बीज स्त्रीच्या योनीत शिरतं त्यावर गर्भ मुलाचा का मुलीचा हे ठरतं. थोडक्यात, मुलगा होणार की मुलगी हे संपूर्णपणे पुरुषावर अवलंबून असतं. नवसाचा उपयोग नसतो. यामधे स्त्रीचाच दोष असतो असं भारतीय समाजानी मानलेलं होतं, कारण वैद्यकीय संशोधन तेवढं पूर्वी झालेलं नव्हतं आणि खरं काय ते सगळ्यांना माहीत नव्हतं.

ही माहिती वैद्यकीय स्वरूपाची असली तरी प्रत्येकाला आवश्यक आहे म्हणून सांगतो. स्त्री-पुरुष दोघंही आर.एच.निगेटिव्ह किंवा दोघंही आर.एच.पॉझिटिव्ह असले तर काळजीचं कारणच नाही. पुरुष आर.एच.निगेटिव्ह आणि स्त्री आर.एच.पॉझिटिव्ह असली तरी काही अडचण निर्माण होत नाही. स्त्रीचा रक्तगट आर.एच.निगेटिव्ह आणि पुरुषाचा आर.एच.पॉझिटिव्ह असला तरच प्रश्न येतो. स्त्री प्रसूत होताना थोडं आईचं आणि बाळाचं रक्त यांचं मिश्रण होतं. बाळानी वडिलांकडून आर.एच. पॉझिटिव्ह रक्तगट आनुवंशिकतेमुळे घेतला असला तर तो आईच्या रक्तात मिसळून आईच्या रक्तात 'अँटिबॉडीज' तयार होतात. त्यामुळे पहिल्या मुलाचा जन्म सुखरूपपणी होतो. दुसऱ्या मुलाच्या बाबतीत अडचणी येऊ शकतात. त्यावरदेखील वैद्यकीय क्षेत्रानी इलाज शोधलेले आहेत. पण अशा जोडप्यांनी एक मूल हा निर्णय पक्का केला तर काही अडचण होत नाही.

2) मुलगाच व्हावा किंवा मुलगीच व्हावी म्हणून काही विशिष्ट रासायनिक प्रयोगही अस्तित्वात आहेत. मुलगा व्हावा म्हणून तो प्रयोग केलेला असो किंवा मुलगी व्हावी म्हणून केलेला असो, ते असमानतेचंच रूप आहे. मी आणि शोभानी असा प्रयोग केला आणि आम्हाला त्यात यशही आलं. आम्हाला एकच मूल पाहिजे असतं तर मात्र आम्ही जे होईल ते, असं ठरवलं असतं.

3) 'अष्टपुत्रा सौभाग्यवती भव' असा कुणा वयस्करानी तरुण स्त्रीला दिलेला आशीर्वाद ही असमानता आहे. कारण मुली व्हाव्यात असा हा आशीर्वाद नाही आणि हा आशीर्वादही स्त्रीलाच दिलेला असतो. मी आणि शोभा मुळात असं मानत नाही की आम्ही वयानी मोठे असल्यामुळे आम्ही आशीर्वाद द्यायचा आणि लहान वयाच्या माणसानी आशीर्वाद घ्यायचा. डोक्यावर हात धरून 'अष्टपुत्रा सौभाग्यवती भव' च काय इतर कुठच्याच प्रकारचा असा फोटो काढण्याच्या 'पोझ'मधला आशिर्वाद आम्ही देत नाही. त्या पारंपरिक 'पोझ'चं चित्र आमच्या नजरेसमोरून पुसलं गेलं आहे.

4) जोडप्याला पहिली मुलगी झाली की मुलगा व्हावा म्हणून दुसऱ्यांदा

मुलाचा प्रयत्न करणं किंवा पहिला मुलगा झाला असला तर दुसरी मुलगी व्हावी म्हणून प्रयत्न करणं. खुद्द मी आणि शोभानी रासायनिक प्रयोग केला, पण आसपास जे मध्यमवर्गीय विवाहित दिसतात त्यांच्यात असं दिसत नाही. बऱ्याच जणांनी विचारच केलेला नसतो.

5) सोनोग्राफी टेस्टमधे डॉक्टरांना गर्भ मुलगा आहे का मुलगी हे कळतं. पण ते आईवडलांना न सांगण्याचं डॉक्टरांवर कायद्यानी बंधन टाकलेलं आहे. कारण स्पष्ट आहे. मुलगी आहे असं आधी कळलं तर गर्भवती स्त्रीच्या तब्येतीकडे दुर्लक्ष करण्यापासून मुलगी झाल्या झाल्या तिची हत्या करण्यापर्यंत कुठल्याही थराला आपल्या समाजातले लोक जाऊ शकतील याची सरकारला कल्पना आहे. गेल्या 10-12 वर्षांत हा कायदा मोडल्यामुळे तुरुंगवास भोगावा लागल्याचीही उदाहरणं शहरात सापडतात. ही समाधानाची गोष्ट आहे. शहराबाहेर मात्र काही सांगता येत नाही. संशोधनात असं आढळलं आहे की, मुलीचा गर्भ निसर्गतःच मुलाच्या गर्भापेक्षा जास्त चिवट असतो.

एकदा एक सुशिक्षित बाई व्यासपीठावर येऊन स्त्री-पुरुष समानता या विषयावरच्या मोठ्या सभेत जाहीरपणी असं बोलल्या, 'मुलीला जन्म दिल्यानंतर तिला पोसायचं, शिकवायचं, लग्न करून द्यायचं, पुढे तिची बाळंतपणं, माहेरपणं करायची. हे सगळं केवढ्यात पडतं! त्यापेक्षा जन्माआधी तिचा गर्भच काढून टाकला तर त्यात चूक काय? या बाईंचं बोलणं चुकीचं होतं यात शंकाच नाही. पुढचा सगळा त्रास, खर्च वाचवण्यासाठी गर्भ काढणं ही कल्पना लढवायची म्हटली तर मुलाचाही गर्भ काढावा. पुढचा त्रास आणि खर्च टळेल. लोकसंख्या कमी होईल. काहीशे वर्षांनी मानवजात नाहीशी होऊन सगळ्यांचा सगळा त्रास कायमचाच नाहीसा होईल.

6) बाईला दिवस राहिल्यावर तपासणीसाठी हॉस्पिटल, दवाखान्यात नवऱ्याला प्रवेश नसणं – प्रत्यक्षात स्त्रीची संपूर्ण शारीरिक तपासणी, शक्यता, चर्चा, दिवस राहिल्यावर घेण्याच्या काळज्या या प्रत्येक गोष्टीशी नवऱ्याचा जवळून संबंध आहे. केवळ पुरुष म्हणून त्याला प्रवेश नाकारल्याची उदाहरणं मात्र सापडतातच. आमच्या बाबतीत असं नाही झालं, कारण डॉक्टर दोन्ही वेळांना खूप जवळचे, घरच्या ओळखीचे होते. प्रवेश नाकारण्याची उदाहरणं अगदी पुण्यातही सापडतात. महाराष्ट्रातल्या इतर छोट्या शहरांत अशी उदाहरणं खूप जास्त सापडतात.

7) मुलगी झाली म्हणजे घरात लक्ष्मी आली, असा वाक्प्रचार वापरतात. बहुसंख्य समाजात मुलगी म्हणजे हुंडा, लग्न समारंभात खर्च अशा पद्धतींनी लक्ष्मी ऊर्फ पैसा जाणार याचीच मनाची तयारी असते. विरस झालेल्या कुटुंबीयांना दिलासा या हेतूनी हा वाक्प्रचार वापरला जातो. काही जातीत मात्र मुलीलाच मुलाकडून धन मिळण्याची रीत अस्तित्वात आहे.

8) मुलगा म्हणजे वंशाचा दिवा असा वाक्प्रचार आहे. प्रत्यक्षात खानदानाचं नाव उज्ज्वल करायचंच असेल तर ते मुलगा आणि मुलगी दोघंही करू शकतात आणि दिव्याचा उजेड पाडू शकतात. प्रत्यक्ष आमच्या ओळखीत, नात्यात अशी अनेक उदाहरणं आहेत की मुलींनी खूप चांगलं काम केलं, नाव कमावलं आणि मुलांनी आयुष्यभर मनस्ताप दिला. पैशाचे घोळ केले. अगदी वैताग आणला.

9)मुलगी झाली तर हॉस्पिटलमधून घरी नेताना उदासीनता असते. हॉस्पिटलमधून घरी बाळंतिणीला नेताना मुलगा झाला असला तर कौतुकानी समारंभपूर्वक घरापर्यंत नेतात. याउलट मुलगी झाली तर हिरमुसल्या चेहऱ्यानी आई बिचारी मुलीला घेऊन एकटीच चोरासारखी घरात येऊन पडल्याची उदाहरणं सापडतात. त्या आईवर किती मानसिक आघात होत असेल, आपण कल्पना करू शकतो. तो आघात पुढे मुलीच्या वाट्यालाही रागाच्या स्वरूपात येऊ शकतो. आमच्या मुलीचा जन्म झाला त्यावेळेला माझ्या व्यवसायात खूप आर्थिक अडचणी आल्या होत्या. त्यामुळे घरातलं वातावरण जरा काळजीचं होतं, पण ते मुलीच्या जन्मामुळे अजिबात नाही. उलट, आम्हाला आनंद झाला होता.

10) मुलगी झाल्यामुळे घरात रुसवा, नाराजी, दुस्वास करतात. अगदी शहरी, सुशिक्षित, सुसंस्कृत समजल्या जाणाऱ्या घरातदेखील मुलगी झाल्यामुळे दुःखद प्रसंग घडल्यासारखं वातावरण घरात लोक ठेवू शकतात. पायगुणांची चर्चा होते, मुलीला आणि तिच्या आईला सूक्ष्मपणे वाईट वागवण्याचीही उदाहरणं दिसतात. जसं शहरापासून दूर जावं तसं निमशहरी आणि ग्रामीण भागात तर अशा वागणुकीची आणखीच तीव्र रूपं सापडतात.

11) मुलांची आणि मुलींची नावं निराळी असणं– ओळखण्यासाठी प्रत्येकाला काहीतरी नाव ठेवायलाच हवं असल्यामुळे नाव ठरवतानाही मुलाच्या नावांची यादी आणि मुलीच्या नावांची यादी निराळी असते. त्या बंधनाबाहेर जाणाऱ्यांना लोक नावं ठेवतात. मुलगा असो किंवा मुलगी असो चालतील अशी

नावंही असतात. आमच्यासमोर हा फारसा प्रश्नच नव्हता. मुलांच्या जन्माच्या आधीपासून अ नील आणि शो भा यापासून बनणारी 2 नावं म्हणजे शोनील आणि अभा अशी तयारच होती. आम्ही जुळं झालं असतं तरी हीच नावं ठेवली असती. दोन्ही मुलगे, दोनही मुली असत्या तरीही. महाराष्ट्रात मुलग्यांच्या, मुलींच्या नावात फरक असण्याची जेवढी आग्रही रूढी आहे, तेवढी भारताच्या इतर राज्यांत नाही. तिकडे कमल, गोपी, सविता, चंदा वगैरे नावाचे पुरुष सहज सापडतात तर शरद, वसंत नावाच्या मुलीही सापडतात. आम्हाला दुसरा मुलगा झाला असता तरी हेच नाव ठेवलं असतं. तिळं झालं असतं तर जरा विचार करावा लागला असता, पण आम्ही दोन्ही लिंगांना चालणारं नाव ठेवलं असतं. शिरीष, सुहास, किरण वगैरे.

12) मुलगा जन्मला तर पेढे आणि मुलगी जन्मली तर बर्फी वाटणं– प्रत्यक्षात काही खाद्यपदार्थ वाटावा किंवा नाही आणि गोड की तिखट हा सगळा चालीरीतीचाच भाग आहे. पण पेढे आणि बर्फी अशा मिठाईचा संकेत हा स्त्री-पुरुष असमानतेचाच एक आविष्कार आहे. आमच्या घरात कुठचाही पदार्थ वाटणं हा प्रकारच नाही आणि पेढे-बर्फी वगैरेचा तर प्रश्नच नाही.

13) जन्मल्याबरोबर मुलीचा जीव घेणं – इतकं अमानुषपणे कोणीही कसं वागू शकतं, असा प्रश्न पडतो. पण तरीही असे प्रसंग घडतात. दाईला/सुईणीला आधीच सांगून ठेवलेलं असतं की, मुलगा असला तर दाखवायचा नाहीतर मेलेलंच मूल जन्मलं सांगायचं आणि नवजात अर्भक मडक्यात पुरून टाकायचं. काही ठिकाणी कचऱ्यात टाकतात, दुधात तोंड बुडवून मारतात. विश्वास ठेवणं कठीण अशी ही क्रूर कृत्यं आहेत. आपण ज्यांचा अभ्यासगट चालवतो त्या सुसंस्कृत, सुशिक्षित आणि शहरी समाजात या गोष्टी चालतात का नाही असा प्रश्न मनात आला की पुढे लक्षात येतं सुसंस्कृत, सुशिक्षित इथपर्यंत ठीक आहे, पण शहरात सुद्धा मोठ्या प्रमाणावर लोक झोपडपट्ट्यांच्यातून राहतात. त्यांच्याबद्दल आपल्याला कुठे माहिती आहे?

14) अगदी जन्मल्यापासून पुरुष बाळाचा आत्मसन्मान सांभाळला जातो. स्त्री बाळाची ओळख मात्र अमुक वडलांची मुलगी अशी असते. नंतर अमुक पुरुषाची पत्नी अशी तिची ओळख असते. आणि नंतर कुठच्यातरी पुरुषाची आई, त्यानंतर कोणाची तरी आजी, पणजी अशी असते.

15) तान्हेपणी स्त्रीनीच मुलाला अंगाखांद्यावर घेणं, दूध पाजणाऱ्या

आईनी मुलाला घेणं समजण्याजोगंच आहे, पण घरातल्या इतर व्यक्तींपैकी फक्त स्त्रियाच जणू काही लहान मुलाला घेऊ शकतात, पुरुषांना बाळाला घेता येत नाही अशासारखी अनेक घरांत समजूत पाहायला मिळते. आमच्या घरी हा प्रश्न अजिबात आला नाही. मी माझ्या मुलांना, नातवंडांना अगदी तान्हे असल्यापासून, खांद्यावर घेणं, हिंडवणं, खांद्यावर किंवा मांडीवर झोपवणं वगैरे केलं. मान सावरणं हा प्रश्न असतो आणि एवढीच गोष्ट एक मिनिट देऊन समजून घेतली की बाकी काही अडचण नसतेच. माझ्या पिढीत नाही, पण तरुण पिढीत मला असे बरेच पुरुष दिसतात. ही चांगली गोष्ट आहे.

16) लहानपणी स्त्रीनीच बाळाची शी-शू काढणं– जवळजवळ सगळ्या घरांच्यात हे काम कमी प्रतीचं मानल्यामुळे आपोआपच स्त्रीकडे त्याची जबाबदारी येते. पुरुष ते आपल्याला जमत नाही असं अभिमानानी म्हणतात. आमच्या घरी असं नाही झालं. मला जमत नाही असं पण नव्हतं आणि मला त्यात कमीपणाही वाटत नव्हता. फक्त आमच्या मुलांच्या अशा वयात मी कामानिमित्त बाहेर किंवा बाहेरगावी असायचो. त्यामुळे असे प्रसंग फार कमी आले.

17) बाळंतपणाचा खर्च माहेरच्यांनी करणं – मुलीची बाजू कमी दर्जाची या मूळ कल्पनेतलाच हा भाग असल्यामुळे मूल दोघांचं किंवा सासरच्या मालकीचं, पण बाळंतपण माहेरी असा प्रघात आहे. मुलीला सासूपेक्षा आईबरोबर बाळंतपणाची प्रक्रिया जास्त सुखकारक हे समजण्याजोगं आहे, पण खर्चही माहेरच्यांचाच हे मात्र स्त्री-पुरुष असमानतेचं स्पष्ट रूप आहे. आमच्या संसारात अशी गोष्ट घडणं शक्यच नव्हतं. कारण माझी आणि शोभाची लग्नाच्याही आधीपासून या आणि अशा अनेक प्रश्नांविषयी सविस्तर चर्चा झालेली होती. शोनीलच्यावेळी आम्ही आग्रहानी कोडोलीकर कुटुंबाला बाळंतपणाचा खर्च दिला. पण प्रत्यक्ष बाळंतपण शोभाच्या माहेरी कोडोलीकरांच्याकडे झालं. आभाच्यावेळी पुण्यात आमच्याच गावी शोभा होती.

18) तान्ह्या बाळाच्या काळजीमधे मुलगा-मुलगी असा फरक करणं – तान्हं बाळ कुठच्याही लिंगाचं असलं तरी त्याची खूप काळजी घ्यावीच लागते. त्यामधे मुलगा-मुलगी फरक करणारे अजूनही आढळतात ही खेदाची गोष्ट आहे. अगदी आपल्या घरी काम करणाऱ्या कष्टकरी वर्गात असा प्रकार सर्रास चालू असतो. सुशिक्षित वर्गात मात्र असं आढळत नाही.

19) मुलगाच दत्तक घेणं – एकच मूल दत्तक घ्यायचं असेल तर

मुलगाच किंवा मुलगीच असे दोन्ही विचार लोक करताना दिसतात. स्त्रियांवर एरवी अन्याय होतो अशा जाणिवेनी मुलगी दत्तक घेण्याचा निर्णय असो किंवा मुलगा हवा अशा भावनेनी दत्तक घेतलेला असो, ती असमानताच म्हणायला हवी.

ज्यात असमानता नाही असं कृत्य म्हणजे एक मुलगा आणि एक मुलगी एकाच वेळेला दत्तक घेणं. किंवा ज्यांना एक स्वतःचं मूल आहे त्यांनी दुसरं दत्तक मूल विरुद्ध लिंगी निवडणं, हे बुद्धीला पटण्याजोगं आहे. आधीच्या पिढीत तर संपत्तीला, राज्याला, संस्थानाला वारस म्हणून मुलगाच दत्तक घ्यायचे. सुशिक्षित वर्गात मला अशी खूप उदाहरणं दिसतात की, ज्यांनी दत्तक घेताना स्त्री-पुरुष समानतेचा विचार नीट केला.

20) फक्त मुलग्यांचा जावळ समारंभ – हा महत्त्वाचा प्रसंग मानून त्याचं कर्मकांड बनवून समारंभात रूपांतर करणं हे योग्य किंवा अयोग्य, हा त्या त्या कुटुंबाचा निर्णय आहे. पण मुलगा आहे म्हणून जावळ समारंभ करणं आणि मुलीचा असा समारंभ नसणं ही असमानता आहे. आमचं थेट आधुनिक प्रकारचं कुटुंब असल्यामुळे हा विषय चर्चेलाही निघाला नाही.

21) जावळ हा कार्यक्रम मामाच्याच मांडीवर ही प्रथा – मुलाच्या दृष्टीनी आई, वडील सर्वांत जवळचे आणि मायेचे असतात. असं असून मामा या पुरुषालाच ह्या समारंभात मुलाला मांडीवर घ्यायला लावणं ही यातली असमानता आहे.

22) फक्त मुलीला दागिने बनवणं – मुळात दागिने बनवणं ही गोष्ट योग्य आहे की नाही, त्याचा खर्च त्या कुटुंबाला परवडतो किंवा नाही हा त्या कुटुंबाचा प्रश्न आहे. पण मुलगी म्हणून दागिने करणं, मुलाला न करणं ही मात्र असमानतेची वागणूक आहे. आमच्या घरी दागिनेच वापरत नसल्यामुळे हा प्रश्न आला नाही.

23) लहान मुलाला कडेवर, हातावर घ्यायचं तर ते आईनी, हा संकेत काहींच्या डोक्यात पक्का असतो. शोनील, आमचा मुलगा नऊ महिन्यांचा असताना एकदा मी, शोभा आणि शोनील रस्त्यानी चालत होतो. आम्ही बेबी सॅकमधे शोनीलला घातलेलं होतं आणि मी त्याला पाठीवर घेतलं होतं. रस्त्यात एका वयस्कर गृहस्थांनी आम्हाला थांबवून सांगितलं, ‘हे काम बायकांनी करायचं असतं, आपण नाही. बायकांची कामं बायकांनाच करू द्यावीत.’ अजूनही असा

विचार करणारे बरेच लोक आढळतात.

24) रडणाऱ्या लहान मुलाला रडायला तू काय मुलगी आहेस का असं म्हणणं – लहान वयाच्या मुलीला काय आणि मुलाला काय रडू आलं की थोपवणं कठीणच असतं. वाईट वाटण्याची भावना व्यक्त करण्याचा समतोल मोठेपणी समजतो तोही स्त्री-पुरुष दोघांनाही सारखाच. स्त्रीनी रडलं तर चालेल, पुरुषानी रडता कामा नये असा यातला मथितार्थ आहे, तो स्त्री-पुरुष समानतेच्या मूलतत्त्वांविरुद्ध आहे.

'पुरुषासारखा पुरुष तू, रडतोस काय मुलीसारखा!' या वाक्याचा अर्थ लहान मुलाला भावना व्यक्त करायच्या नाहीत असं शिकवण्यासारखाच आहे. मग त्याचे परिणाम मोठेपणी पुरुष जात भोगते. स्वकेंद्री बनण्याच्या टप्प्यापैकी हा पहिला धडा लहानपणी मिळतो. मी माझ्या आईवडलांकडून हे वाक्य अनेक वेळा ऐकलेलं आहे. मी आणि शोभा शोनीलशी मात्र असं कधी बोललो नाही. असे शब्द आमच्या दोन्ही नातवांच्या वाट्यालाही कधी येत नाहीत. आम्ही कोणीच तसं बोलत नाही.

25) लहान मुला-मुलींचे पोषाख निराळे असणं – अगदी लहानपणी लहान मुलाच्या दृष्टिकोनातून हवामानाप्रमाणे योग्य पोषाख असला की ठीक असतं. मुलाचा पोषाख विशिष्ट पद्धतीचा आणि मुलीचा निराळ्या पद्धतीचा ही इतर मोठ्यांची हौस असते. स्वतःच्या शरीराच्या अवयवांमुळे आपण मुलगा का मुलगी, हे मुलांना पुढच्या एका वयात कळतंच. पण पालकांनाच हा असमानतेचा पोषाखाचा भेद लवकरच करण्याची हौस असते.

आमच्या घरी शोनील आणि आभा शाळेत जायला लागल्यावर शाळेच्या संकेत/नियमांमुळे निराळा पोषाख दोघांनी वापरला. तोपर्यंत नाही. पाश्चात्त्यांच्यात बरीच वर्षं शाळेतल्या पोषाखाचे मुला-मुलींचे संकेत निराळे असतात. मुलग्यांचा निळा रंग आणि मुलींसाठी गुलाबी रंग हा संकेत सगळे जण अगदी कडकपणे पाळतात.

26) महाराष्ट्रात, खरं म्हणजे भारतात जवळजवळ सगळीकडे बऱ्याच घरांच्यात मुलग्याला इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालतात आणि मुलींना मराठी माध्यमाच्या शाळेत. कनिष्ठ मध्यमवर्गीय घरात मुलग्यांना नीट पौष्टिक अन्न देतात, मुलींना नाही. कमाल आहे.

27) मुलगा कपडे न घालता हिंडला तर पालकांना चालतं – मुलींबद्दल

जास्त जागरूक. एका विशिष्ट वयापर्यंत कपडे घालणं/न घालणं हे फक्त हवामानावर अवलंबून असायला हवं. त्यात मुलगा किंवा मुलगी हा विचार असमानतेचा आहे.

28) आई-वडलांच्या डोक्यात असमानता असली की मुलगा-मुलगी भेद ते करतात. घरातली सगळीच माणसं भेद करतात. हेही मान्य करायला हवं की काही फरक नैसर्गिकपणे मुलांच्या आणि मुलींच्या मनोवृत्तीमधे असतात. त्याचं नेमकं प्रमाण ठरवण्याचे काही प्रयत्न झाले, काही चालू आहेत. दिसतं ते मात्र असं की मुलगे मारामारीचे खेळ निवडतात. पिस्तूल, बाँब, मिसाइल, चोर, दरोडेखोर, शिपाई, पोलीस, सैनिक, रणगाडे, ट्रॅक्टर, गाड्या, रेसर कार असे त्यांचे आवडते खेळ असतात. मुली बाहुल्या, भातुकल्या, पत्ते यामधे जास्त रमतात. याला अर्थातच अपवाद असतात. मगाशी म्हटलं तसं काही फरक नैसर्गिक तर काही त्यांच्यावरच्या संस्कारांमुळे झालेले असतात.

29) मुलग्याला मार देणं, मुलीला मार टाळणं – बिचाऱ्या मुलाकडून अपेक्षा जास्त करणं हे पालक सर्रास करतात. लहानपणी, मोठेपणी तो चांगला व्हावा म्हणून शिस्तीच्या नावाखाली मुलग्यांना मार खावा लागतो. मुलींकडून अपेक्षा कमी त्यामुळे आणि मुली नाजूक या कल्पनेमुळे मुलींवर मार खाण्याचे प्रसंग कमी येतात. हा स्त्री-पुरुष असमानतेचाच प्रकार आहे.

या विषयामधे माझा अनुभवच खूप जबरदस्त आहे. म्हणजे मार खाण्याचा अनुभव. मला दोन बहिणी. त्यामुळे त्यांचा कोटा पण मीच वापरला बहुतेक. माझ्या बिचाऱ्या पालकांना फक्त तेवढी एकच गोष्ट माहिती होती. शोनीलनी माझ्या हातचे सगळे मिळून दोन फटके खाल्ले आणि आभानी एकही नाही. शोभानी त्यांना कधीच मारलं नाही.

30) सगळी मोठी लोकं मुलांना ज्या गोष्टी सांगतात त्या गोष्टीही थेट पुरुषप्रधान डोक्यातून निघालेल्या असतात. पुरुषप्रधान पुरुष असला काय नि पुरुषप्रधान स्त्री असली काय, परिणाम एकच. गोष्टीतले उल्लेख असे असतात. 'त्याचा तो अवतार बघून राजा रागावला आणि राणी घाबरली.' 'तो कामासाठी बाहेर गेला आणि मग ती आपलं घरातलं राहिलेलं काम एकेक करून उरकायला लागली.'

31) मुळात बाजारात खेळणी बनतात त्यात बाहुल्याच अनेक प्रकारच्या असतात. दोघांचं लग्न लावण्याचा खेळ खेळता यावा म्हणून फक्त थोडे बाहुले

बनवलेले असतात. शिवाय घरात मुलगे बाहुलीशी खेळायला नकार देतात.

एका घरामधे दोन मुलगेच असले की पाहुण्यांनी काही खेळणी आणली की एखादा पुरुष किंवा स्त्रीसुद्धा म्हणते, 'हे काय, ही मुलींची खेळणी कशाला आणली?'

32) गरवारे बालभवनमधे लहान मुलांना काही सोपी सोपी कामं सांगितली होती. केरसुणीनी साफ करण्याचं काम चालू असताना एक साडे तीन वर्षाचा, धड बोलताही न येणारा बोबडा मुलगा हात बांधून बसला होता. तो म्हणत होता, 'मी पुलूष आहे. मी नाही केल कालनाल.'

●

2) अपत्याच्या 5 ते 10 वयामधली असमानता

मी आणि शोभानी कटाक्षानी आमचा मुलगा शोनील आणि मुलगी आभा यांच्यात कधी फरक केला नाही. आमची इच्छा मुलं-मुली एकत्र असलेल्या शाळेत दोघांना घालण्याची होती. पण शाळा घराजवळ असणंही महत्त्वाचं होतं. त्यामुळे शोनीलला नू.म.वि.त आणि आभाला हुजूरपागेत घातलं. त्याचे काही दुष्परिणाम त्यांच्यावर झाले असं अजून आम्हाला वाटतं. आता या टप्प्यामधली असमानतेची रूपं बारकाव्यानी बघूया.

1) मुलींचा भातुकलीचा खेळ – या वयापर्यंत मुलांची आणि मुलींची शारीरिक ताकद, उंची, वजन सारखी असते. मुलींना बैठा खेळ खेळणं आणि मुलग्यांनी धांगडधिंगा अशी काही जरूर नसते. पालकांच्या सुप्त इच्छा, सूचना, मित्रमंडळींची संगत यामुळे खेळाच्या निवडीत अशी असमानता येते. मगाशी टप्पा क्र. 1 मधे आपण हा उल्लेख केला होता.

2) मुलग्यांचे दंगामस्तीचे खेळ – अशा खेळात मुलींना मुलगे बाजूला ठेवतात. आई-वडीलही त्याला पाठिंबा देतात. शेवटी परिणाम? अनावश्यक असलेली असमानता. मुलांबरोबर त्यांच्या बरोबरीनी दंगा करणाऱ्या काही मुली असतात, पण बहुतेक वेळा त्या घरी बोलणी खातात.

3) मुलग्याला कार, विमान, बंदूक असे खेळ खरीदणं आणि मुलीला बाहुली – असा फरक पालक करताना दिसतात. दुकानात मुलगा खेळाची निवड करतोय आणि मुलगी निवड करतेय अशी संधी दिली आणि काहीच सूचना दिल्या नाहीत तर निराळं चित्र समोर येईल. निदान या वयात तरी. पण पालकांनी खरेदी केली तर ते या संकेताप्रमाणेच खरेदी करतात. ही गोष्ट आपण टप्पा क्र.1 मधे मगाशी बघितली आहे.

4) मुलीला बजावणं की मुलीसारखी वाग – जोरानी बोलू नको, हसू नको, पाय पसरून बसू नको. अशा तऱ्हेची समज नैसर्गिकपणी मुलीला स्वतःला यायला अवधी असतो. पण पालकांनाच अशा संस्कारांची घाई

असल्यानी अशी वागणूक हे स्त्री-पुरुष असमानतेचंच रूप आहे. आमच्या घरी हा प्रकार कधीच घडला नाही.

5) लहानपणी सगळीच मुलं अंधाराला घाबरतात. मोठेपणी अंधाराची भीती कमी झालेली असते. चुकीचा अपायकारक प्रसंग उजेडात देखील घडू शकतो हे कळलेलं असतं. चोर-दरोडेखोर, दुष्ट, विकृत माणसं यांच्याबद्दलची ती भीती असते. कारण अंधारात ती लोकं आपल्याला दिसत नाहीत. याशिवाय खाचखळग्यांची, साप-विंचू, कीटक यांच्याबद्दलची ती भीती असते. त्यामधे स्त्री-पुरुष भेद खरा असताच कामा नाही. पण जणू काही पुरुषजातीला भीती वाटायला परवानगी नसल्यासारखे सगळे बोलतात. प्रत्यक्षात लहान मुलग्यालाही अंधाराची खरोखरच भीती वाटू शकते.

6) मुलीला बजावणं – मारामारी करू नकोस. लहान मुलांच्यामधे माराला मारानी उत्तर, हीच योग्य गोष्ट असताना मुलीला पडतं घ्यायला, माराला मारानी उत्तर न देण्यासाठी पालकच शिकवण देतात. शोनील आणि आभा यांच्यामधे मारामारी कमी व्हायची. चिडवाचिडवी मात्र खूप असायची. आणि आसपासच्या किंवा शाळेतल्या मुलांमधेही मारामारीचे प्रसंग आलेच नाहीत. स्त्री-पुरुष असमानतेचा आमच्या घरात असा प्रसंग कधीच घडला नाही.

7) मधलं नाव वडलांचं लावणं, आईचा उल्लेखही नसणं – ही रीत थेट पुरुषप्रधानतेवर म्हणजेच असमानतेवर आधारलेली आहे.

8) वडलांचं आडनाव वापरणं – ही रीत थेट असमानतेचं प्रतीक आहे. अगदी सुरुवातीला आपण मालकी हक्काच्या तत्त्वांविषयी जे बोललो त्यातून वडलांचं आडनाव ही कल्पना निघाली. शोभा भागवत हेच आडनाव वापरते. लग्नानंतर याविषयी माझा काही आग्रह नव्हता, पण शोभानी स्वतः तो निर्णय घेतला. नंतरच्या आयुष्यात तो निर्णय बदलून कोडोलीकर आडनाव वापरणं गैरसोयीचं वाटलं, त्यामुळे तसं तिनी केलं नाही.

9) आईला ए अशी हाक मारली जाते, वडलांना मात्र अहो अशी हाक मारण्याचीच पद्धत आहे. फारच क्वचित याला अपवाद आढळतो. मी आणि शोभा दोघंही या परंपरेमधेच वाढलो. शोनील आणि आभा, शोनीलची बायको आणि आभाचा नवरा, एवढंच काय नातवंडंदेखील आम्हाला ए कारानीच हाक मारतात. आम्हाला यातली कुठचीच हाक कधी गैर वाटली नाही. ही सगळी जण आम्हाला ए अनिल, ए शोभा अशी सगळ्यांच्या देखत हाक मारतात. त्यांची

मित्रमंडळीही तसंच करतात.

10) मुलग्याला इंग्लिश माध्यमाच्या आणि मुलीला मराठी माध्यमाच्या शाळेत घालणं – मुळात शिक्षणासाठी मातृभाषा, कुटुंबभाषा की जनभाषा योग्य हा स्वतंत्रपणी त्या त्या कुटुंबानी घ्यायचा निर्णय असला तरी मुलगा-मुलगी फरक हा मात्र स्त्री-पुरुष समानतेच्या मूलतत्त्वात बसत नाही. मातृभाषेत शिक्षण याबद्दल शोभाचं आणि माझं एकमत आणि तेही ठाम असल्यामुळे आमच्याकडे हा प्रश्नच आला नाही. हा पण मुद्दा आपण आधीच्या टप्प्यामधे बोललो होतो.

11) मुलीला घरकाम सांगणं/मुलाला न सांगणं – मुलांना लहानपणापासून घरकामाची सवय असणं ही गोष्ट चांगलीच. त्यात मुलगा-मुलगी हा भेद पालक करतात, याबद्दलचं हे निरीक्षण आहे. माझ्या तरुणपणी परदेशात जाण्यापूर्वी मी काहीही घरकाम केलेलं नव्हतं. मी थेट एकटा मुलगा म्हणून पुरुषप्रधान संस्कारातच वाढलो. त्यानंतरच्या घरसंसारातही मी आणीबाणी-व्यतिरिक्त शोभाला काही मदत केली नाही. स्वतःच्या व्यवसायात खूप वेळ जायचा हे कारण असलं तरी मी थोडी मदत शोभाला करू शकलो असतो. गेली 10-12 वर्षं मी घरकामात त्यामानानी खूप मदत करतो. शोनील त्याच्या तरुणपणी आमच्या घरी असताना काही काम करायचा नाही. तो 16 वर्षांपूर्वीपासून इंग्लंडमधेच असतो. तिथे मात्र त्याला सगळं बायकोच्या बरोबरीनी करावं लागतं. तिथे कामाला माणसं मिळतच नाहीत.

12) मुलांची आणि मुलींची शाळा निराळी – याबद्दल दोन्ही बाजूनी वाद घालण्याजोगे मुद्दे असतातच, पण मुळात मुला-मुलींची शाळा स्वतंत्र ठेवण्याची कल्पना स्त्री-पुरुष असमानतेची आहे.

13) मुलींना प्राथमिक, माध्यमिक शिक्षणापर्यंत चक्क फी नसते. ही गोष्ट का केली असेल ते आपण समजू शकतो, पण हे असमानतेचंच एक रूप आहे. आभा शिकायची तेव्हा तिला फी नव्हती. शोनीलला होती.

14) अनेक निरनिराळ्या कारणांमुळे मुलं-मुली शाळा मधेच सोडून देतात. पण त्यामधे मुलींचं शाळा सोडण्याचं प्रमाण जास्त असतं.

15) एका शाळेत मुलांची आणि मुलींची बाकं निराळी – शाळेतल्या मूळ धोरणातल्या असमानतेमुळे शाळेत बसण्याची अशी व्यवस्था असमानतेची असते. फार क्वचित याला अपवाद सापडतो.

16) शाळांच्यात पुरुष शिक्षक फार कमी असतात. बालवाड्यांच्यात तर

मी अजून एकही पुरुष शिक्षक बघितलेला नाही.

17) घरातल्या पुरुषांनी आणि मुलग्यांनी स्त्रिया आणि मुली यांच्या अगोदर जेवणं–आमच्या घरी रोजच्या जेवणात असं कधीच घडलं नाही. कधी कधी पदार्थ असा असायचा की तो ताजा तव्यावर करूनच खावा लागतो, तेव्हा मी आधी जेवायला बसलेलो आहे. मला दोन पदार्थ आत्ता आठवतायत. दोसे आणि पुऱ्या. उलटं करणं शक्य नव्हतं कारण मला स्वयंपाक येत नाही. शोनील आणि त्याची बायको दोघं मिळून स्वयंपाक करतात आणि दोघं एकत्र जेवतात. श्रेयस आणि आभाही दोघं मिळून स्वयंपाक करत नसले तरी एकत्र जेवतात. श्रेयस अत्यावश्यक तेवढा स्वयंपाक करू शकतो.

18) मुलग्यांची मुंज – फक्त पारशी समाजात मुलींचीही मुंज (नवज्योत समारंभ) असते. एरवी मुलाची मुंज म्हणजे असमानतेची प्रकर्षानी केलेली आठवण. ती असमानता स्त्री-पुरुषातलीही असते आणि जातीतलीसुद्धा असते. फक्त ब्राह्मणांच्यामधे मुंज करतात. माझ्या आई-वडलांनी मी अकरा वर्षाचा असताना माझी मुंज केली.

मी आणि शोभानी शोनीलच्या मुंजीचा विषयही कधी काढला नाही. मुंज नाही. त्यामुळे सोडमुंजीचा प्रश्नच आला नाही. माझ्या आई-वडलांखेरीज इतर नातेवाईकांमधे परंपरावादी लोक होते. पण माझं लग्नच यू.एस.ए. मधे झाल्यामुळे सोडमुंजीबद्दल मला काही विचारण्याचा प्रश्न आला नाही. शिवाय तोपर्यंत मी विक्षिप्त ही उपाधी पूर्णपणे मान्य केली होती. एका शाळेत मुलांबरोबर मुलींचीही सामूहिक मुंज करतात, ही गोष्ट अपवाद आहे. खूप विशेष वाटली.

19) शाळेमधल्या मुलग्यांच्या शिक्षा आणि मुलींच्या शिक्षा निराळ्या असणं – कोणीच कधी मुलांना वेडंवाकडं बोलणं, बाकावर उभं करणं, छड्या मारणं असं करू नये. पण इथे विषय स्त्री-पुरुष असमानता एवढाच असल्यामुळे मुद्दा एवढाच आहे की मुलांना जास्त कठोर शिक्षा आणि मुलींच्या चुकांकडे काणाडोळा अशी असमानता ठेवू नये. मी स्वतः लहानपणी मुला-मुलींच्या एकत्र शाळेत होतो. या फरकाचा रोज मनस्ताप व्हायचा. आम्ही मुलगे खूप मार खायचो.

20) घरात मुलग्याला मार, मुलींना माफ – गेल्या 3-4 पिढ्यांच्यात हीच पद्धत सर्वसाधारणपणी आढळते. मुलांना फोडून काढतात, कोंडतात तसं मुलींना वागवत नाहीत. ही सरळ सरळ असमानता आहे. खरं म्हणजे कोणालाच

मारू नये. मला दोन बहिणीच असल्यामुळे हे खूप जाणवायचं.

21) लहानपणापासून मुलग्यांवर अभ्यासाची सक्ती, मार्कांची अपेक्षा मुलींपेक्षा जास्त – तरुणपणी करिअरबद्दल मुलांकडून जास्त अपेक्षा असल्यामुळे अशी वागणूक दिसते. आम्हा तीन भावंडांमधे असा फरक नव्हता. शोनील आणि आभा यांच्याबद्दल आमचा विचार अशा प्रकारचा कधीच नव्हता.

22) मुलांनी भावनाविवश होऊन रडणं वर्ज्य, मुली मात्र रडत बसल्या तरी चालेल – अशी असमानतेची वागणूक घराघरात दिसते. पाच वर्षापर्यंत काय नि 10 वर्षापर्यंत काय, मला हे कधीच पटणार नाही. मला याचे खूप दुष्परिणाम माहिती आहेत. त्या परिणामांपैकी एक म्हणजे भावना समजण्यात आणि व्यक्त करण्यात आयुष्यभर कच्चं राहणं.

23) मुलींना पारंपरिक नाचाचा प्रकार, शास्त्रीय संगीताच्या वर्गाला सर्रास घालतात. मुलग्यांनी नाच शिकण्याचं प्रमाण फारच कमी असतं. संगीत शिकणारे मुलगे त्यामानानी जास्त, पण मुलींपेक्षा संख्येनी कमी असतात. आम्हा तीनही भावंडांना संगीताची उपजत समज आहे. पण मोठ्या बहिणीला गाण्याच्या क्लासला घातलं आणि मला तबल्याला. पुढे मी ते सोडून दिलं. दोन्ही बहिणी गातात. मी सुगम संगीताच्या पुढे गेलो नाही.

24) मुलग्यांना तबला शिकवतात पण फार कमी मुली तबला वाजवतात. ही असमानता मला फारच खटकते.

25) आई आणि मुलगी यांची जेवढी जवळीक, मेतकूट असतं त्या तुलनेत बाप-मुलगा यांचं नातं जरा कमी घट्ट असतं. खुद्द मी आणि माझे वडील यांचं जवळचं नातं होतं. शोनीलचं आणि माझंही आहे, पण हे अपवादात्मक आहे. शोनील गेल्या 16 वर्षापासून इथे नसतो. त्यामुळे मला त्याची फार आठवण येते. मधल्या भौगोलिक अंतराचं प्रत्यक्षात वाईटच वाटतं.

26) मुली लहानपणापासून कुंकू लावतात. मुलगे काहीच लावत नाहीत. याबद्दल माझा आक्षेप नाही. पण हे असमानतेचं एक रूप आहे, एवढाच मुद्दा आहे. स्त्रियांचं कुंकू ही पद्धत भारतीय हिंदूंची आहे. ख्रिश्चन, मुस्लीम, ज्यू, शिख, पारशी, कुठच्याच बायका कुंकू वापरत नाहीत.

27) शहरामधल्या प्राथमिक शाळांच्यात क्वचितच पुरुष शिक्षक असतात. स्त्री शिक्षिका मात्र संख्येनी खूप असतात. स्त्रिया लहान मुलांशी प्रेमानी वागतात अशी कल्पना यामागे असू शकेल. त्याबद्दल मात्र शंका वाटते. मुलांशी कोणीच

प्रेमानी वागत नाही.

28) मुलांच्या आणि मुलींच्या आहारात फरक करणं हे घराघरात दिसतं. मुलांना आग्रहानी जेवू घालणं, पैजा लावून जास्त खाणं, असं मुली करीत नाहीत. लहानपणी मी स्वतः अशा पैजा लावून जेवलेलो आहे. अनेक वेळा शोनीलला पण मी असं करताना अनेक वेळा बघितलं आहे. माझ्या बहिणींनी, शोभानी, आभानी असं कधीच केलं नाही.

29) मुलींकडून आज्ञाधारकपणाची अपेक्षा असते. उलट बोलू नये, वाद घालू नये अशी अपेक्षा असते. मुलांचा थोडा उद्धटपणा खपवून घेतला जातो.

30) मुलींनी संध्याकाळी अंधारापूर्वी घरात यावं असं वळण लावलं जातं. मुलांवर ते बंधन नसतं. मी आणि शोभा यांनी शोनील आणि आभा यांच्यात असा फरक केला होता हे खरं आहे. समाजातली पुरुषांची विकृती बघून अजूनही आम्हाला वाटतं की, हे असमानतेचं रूप असलं तरी त्याला काही इलाज दिसत नाही.

31) मुळात फटाके ही गोष्टच वाईट आहे. पण तरी पुरुष फटाक्याला घाबरण्याचं प्रमाण स्त्रियांपेक्षा कमी आहे. मुलांना असं म्हणताना मी अनेक वेळा ऐकलंय, 'फटाक्यांना घाबरायला तू काय मुलगी आहेस?' हे वाक्य मात्र चूक आहे.

●

3) अपत्याचं वय 10 वर्षाच्या पुढे ते शिक्षण पूर्ण करून कमवायला लागेपर्यंतची असमानता

शाळा आणि कॉलेजचं शिक्षण – फक्त मुलग्यांच्या आणि फक्त मुलींच्या शाळा असतात. पण कॉलेजेस अगदी कमी असतात. ती देखील फक्त मुलींसाठी असतात. फक्त मुलग्यांसाठी नसतात. त्यामुळे शोनील आणि आभा फक्त मुलांच्या आणि फक्त मुलींच्या घराजवळच्या शाळांच्यात गेली पण कॉलेजमधे एकत्र शिकू शकली. पुरुष म्हणजे काय, हे समजण्यासाठी आणि स्त्री म्हणजे काय, हे समजण्यासाठी ते फार महत्त्वाचं आहे. कॉलेजमधे छोटे छोटे घोटाळे होऊ शकतात. हे फार उपयोगाचं आहे. ते घोटाळे छोटे असल्यामुळे त्यातून बाहेर पडण्याचं शिक्षण तरुण तरुणींना नि त्यांच्या पालकांना मिळतं.

आम्ही आभाला वेळेवर यायला सांगयचो. ती विचारायची, 'पण नेमकी अडचण काय?' आम्ही म्हणायचो, 'इतर मुलांपासून धोका असू शकतो.' मग ती म्हणाली, मग शोनीलपासून नाही का इतर मुलींना धोका? त्यालाही लवकर यायला सांगा.' अगदी खरं होतं ते. मी आणि शोभा फारच सुरक्षित, बाळबोध वातावरणात लहानपणी शाळेत वाढलो होतो. मुळात आम्हाला काही गोष्टी मुलांकडून शिकायच्यात हे पूर्णपणी मान्यच होतं. माझी स्वतःची कॉलेजची वर्षं मात्र विकृत वातावरणात गेली होती. केव्हातरी स्वतंत्रपणी सांगीन त्याच्या गोष्टी.

आमचा शोनील शाळा-कॉलेजच्या वयात अतिशय जबाबदार, संयत, सज्जनपणी वागला. शोनील आणि आभा दोघांचेही मित्रमैत्रिणी घरी वगैरे यायचे आणि तरी प्रामाणिकपणी वाटतं की, आभाच्या मित्रांकडे बघण्याचा आमचा दृष्टिकोन शोनीलच्या मैत्रिणींकडे बघण्याइतका निकोप नव्हता. स्वयंपाक मात्र दोघांनाही येत नव्हता ही समानताच म्हणावी लागेल. पुढे लग्नानंतरच्या संसारात जोडीदारांसकट चौघंही पद्धतशीर घरकाम, स्वयंपाक वगैरे करतात हेही महत्त्वाचं आहे.

आता या टप्प्यातले असमानतेचे बारकावे बघूया. स्त्री आणि पुरुषांच्या आवाजात नैसर्गिकपणीच फरक असतो. मुलग्यांचा आवाज साधारण 10 व्या 12 व्या वर्षी फुटायला लागतो. तोपर्यंत म्हणजे आवाज पुरुषी होईपर्यंत फोनवर बोलत असताना मुलगा का मुलगी, हे केवळ आवाजावरून ओळखणं कठीण

जातं. स्त्री-पुरुषांच्या गाण्याच्या पट्टीमधे देखील फरक असतो. अगदी क्वचित काही लोकांचा या निसर्गनियमात न बसणारा आवाज असला की लोक चपापतात. पुरुषाचा आवाज बायकी असला किंवा बाईचा पुरुषी असला तर त्याला अॅबनॉर्मल समजतात.

शारीरिक श्रमाचे मैदानी खेळ खेळणाऱ्यांची शारीरिक वाढ चांगली होते. त्यातही स्त्रिया कमी पडतात. मानवी शरीराला आवश्यक अशा तीन गोष्टी म्हणजे आहार, व्यायाम आणि तिसरी म्हणजे झोप. चांगली झोप, मध्यम किंवा वाईट अस्वस्थ झोप हे तीनच प्रकार आहेत असं मानलं तर त्याबाबतीतही स्त्री-पुरुष फरक दिसतो. सांसारिक जबाबदारीच्या जाणिवेमुळे स्त्रियांची झोप जास्त सावध असते. पहिलं मूल झाल्यावर ते तान्हं असताना वेळी-अवेळी उठावं लागतं तेव्हापासूनच स्त्रीची डाराडूर झोपण्याची सवय गेलेली असते. एकूण रात्रीचे सलग झोपेचे तास मोजले तरी ते स्त्रीचे कमी भरतात. झोपण्यापूर्वीची आवराआवर ही स्त्रीचीच जबाबदारी असते. सकाळी उठून पहिला चहा करण्याची जबाबदारी बहुतेक घरात स्त्रीचीच असते. इतर कारणांबरोबर या एका गोष्टीमुळेही स्त्रियांचं आरोग्य पुरुषांच्या तुलनेत एवढं चांगलं नसतं.

स्त्री शरीराची आणि पुरुषाच्या शरीराची चालण्याची ढब निसर्गतःच निराळी असते. एखादी बाई पुरुषासारखी चालते असं म्हणतात किंवा एखादा पुरुष बाईसारखा चालतो म्हणतात तेव्हा नैसर्गिक चालीच्या विरुद्ध प्रकारानी ती व्यक्ती चालते असा त्याचा अर्थ असतो. हा फरक इतका सूक्ष्म असतो की त्याचं शब्दात वर्णन करणं देखील कठीण असतं. आता या टप्प्यातली असमानतेची रूपं बारकाव्यानी बघूया.

1) शारीरिक कष्टाची कामं मुलग्यांवर टाकणं – या वयात शारीरिक क्षमतेचाही फरक असतोच, पण मनात असमानताही असते. खरोखर स्नायूंच्या शक्तीचा प्रश्न असला तर मुलग्याला बोलावतात, पण नुसते श्रम असले तर असं दिसतं की पुरुष ती कामं टाळतात आणि बायका करून टाकतात. आमच्या घरात अजूनही उंचावरची, ताकदीची कामं मी करतो, पण बाकी कामांच्यात मला पुरेशी माहिती नसल्यामुळे उगीच कशाला घोटाळा असा विचार करून ती कामं शोभाच करते.

2) बहुतेक घरांच्यात गॅस सिलिंडर उचलण्याचं काम मुलांना, पुरुषांना सांगितलं जातं. स्त्रियांना नाही. सिलिंडर उचलावा लागतो. त्यामुळे अशक्त

स्त्रियांनाच काय पुरुषांनाही तो उचलता येत नाही. आमच्या घरी शोभाच ते करायची. अजूनही करते. पुढच्या पिढीत पाईप गॅसमुळे हा प्रश्नच येणार नाही.

3) गॅस सिलिंडरचा रेग्युलेटरही जास्त प्रमाणात मुलगेच बदलतात. आमच्या घरी अशी सगळी कामं शोभा करते. मी स्वयंपाक करत नसल्यामुळे माझ्या वाट्याला हा प्रसंग क्वचितच येतो. पुढच्या पिढीचा प्रश्नच नाही. तत्त्वतः माझी रेग्युलेटर बदलायला, कुठचंही काम करायला काही हरकत नाही.

4) घरकामापैकी मुली स्वतःचं धुणं लवकर धुवायला लागतात. मुलगे नाही. यामधे फारसा बदल अजूनही झालेला दिसत नाही. मध्यमवर्गीयांच्यात अगदी थोडे पुरुष स्वतःचे कपडे स्वतः धुतात. मीपण धुतो. पण बायकोचे कपडे धुणारा पुरुष क्वचित सापडतो. मीही अगदीच क्वचित शोभाचे कपडे धुतलेले आहेत.

5) घरचं दळण मुली, स्त्रिया आणतात. फारच क्वचित मुलगे, पुरुष त्या भानगडीत पडतात. माझ्या वडलांनी दळण आणण्याचं काम एकदाही केलं नाही. मी माझ्या संसारात दोन-तीनदा आणि शोभानी 15-20 वेळा केलं असेल. कामाची मुलगीच सगळं करायची. शोनील आणि श्रेयस यांच्यासमोर असा एकही प्रसंग येत नाही. शोनील राहतो तिथे इंग्लंडमधे पिठाची गिरणीच नसते. सगळ्या वस्तू पाकिटात पॅक केलेल्या दुकानातूनच आणाव्या लागतात.

6) घराघरात व्रात्यपणामुळे मुलांना मार बसतोच. तो मार खाण्यात मुलगे मुलींपेक्षा फार पुढे असतात. पालकसुद्धा मुलगा असला तर खुशाल पिटून काढतात. मुलीना शक्यतोवर मारतच नाहीत. आधीच्या टप्प्यातही ही परिस्थिती असते.

7) मुलग्याच्या शिक्षणावर पालकांचा जास्त खर्च – शहरात ही असमानता कमी प्रमाणात आढळते, पण निम-शहरी, ग्रामीण भागात भरपूर प्रमाणात आढळते. आम्हा तीनही भावंडांच्या बाबतीत असं झालं नाही. पण माझ्या तरुणपणापासून मी अशी बरीच उदाहरणं बघितली आहेत. आमच्या मुलांच्या शिक्षणाच्या काळात आमच्याकडे पैसे पुरेसे नव्हते, पण मुलगा-मुलगी यांच्यात असमानता मात्र कधी नव्हती.

मुलं-मुली आणि त्यांची मित्रमंडळी याबाबतीतली सर्वसाधारण घरातली परिस्थिती वर्णन करायची तर अशी असते. मुलाला मैत्रिणी असल्या तरी चालतील, पण मुलीला मित्र नकोत. आमच्या घरात शोनील हा मुलगाही होता

आणि आभा ही मुलगीपण होती. त्यांचा मित्रमंडळींच्या बाबतीत माझ्या आणि शोभाच्या दृष्टिकोनात थोडा फरक होता हे मान्यच करायला हवं. शोनीलच्या मैत्रिणींच्या तुलनेत आभाच्या मित्रांकडे आमचं जास्त बारकाईनी लक्ष असायचं. हा विषय मगाशी निघाला होता.

8) घरातला पसारा (उदा. गाद्या, चादरी, जेवणाचं टेबल, ओटा) मुली किंवा स्त्रिया आवरतात. पुरुष आवरत नाहीत. माझ्या वडलांनी एकाही गोष्टीला कधीही हात लावला नाही. मी या गोष्टी मध्यमपेक्षा जरा कमी इतक्या प्रमाणात केल्या. माझा तत्त्वतः विरोध कधीच नव्हता, पण व्यवसायातल्या वेळेचं गणित मला कधी सुधरलं नाही. शोनील मात्र इंग्लंडमधे त्याच्या संसारात साधारण निम्म्या गोष्टींची जबाबदारी घेतो. श्रेयसपण घेतो.

9) मुलींना भरतकाम, शिवणकाम, या कला लहानपणापासून शिकवल्या जातात. मुलांना नाही. ही असमानताच आहे यात शंका नाही. त्यातल्या भरतकामाबद्दल माझं काही म्हणणं नाही. कारण भरतकामाचा, विणकामाचा संबंध फक्त सुशोभित करण्याशी आहे, पण शिवणकाम पुरुषांना न शिकवल्यामुळे त्यांचा खूप तोटा होतो. याचा उल्लेख झाल्यासरशी मला हिंदी सिनेमामधे अनेक वेळेला बघितलेलं दृश्य आठवतं. नवरा कामावर जायला निघतो आणि सगळे कपडे घातल्यावर गुंडी तुटल्याचं लक्षात येऊन बायको ती अंगात घातलेल्या शर्टवर शिवून देते.

माझ्या वडलांनी काहीच शिवणकाम केलं नाही. मी अगदी थोडं, माझ्या कपड्यांच्या दुरुस्त्या स्वतः करण्याइतपत केलं. जरा कठीण काम शोभा करते. त्याहून कठीण किंवा वेळखाऊ असलं तर मी ते शिंप्याकडे टाकतो. शोनील इंग्लंडमधे असल्यामुळे कपड्यांची दुरुस्ती हा शब्दच त्यांना माहिती नाही. काय ते विकत घ्यायचं. या विषयातली गंमत अशी की, घरगुती शिवण बायका करतात पण कपडे शिवून मिळणाऱ्या दुकानात मात्र पुरुष कामाला असतात. अगदी लेडीज टेलर्स देखील पुरुष असतात.

पुरुषांसाठी जसे पँट-शर्ट तयार कपड्यांच्या दुकानात मिळतात तसे स्त्रियांसाठी देखील पँट-शर्ट मिळतात. फरक असा की स्त्रियांच्या पँटवर आणि शर्टवरदेखील डिझाइन, नक्षीकाम वगैरे असतं. झालरी, लेसवर्क, चिकनक्लॉथ अशा गोष्टी असतात.

'होम सायन्स' नावाचा शिक्षणातला एक व्यवस्थित ग्रॅज्युएट कोर्स असतो.

माझ्या माहितीप्रमाणे हा फक्त महिला विद्यापीठांच्यात असतो आणि तो कोर्स करायला फक्त मुलीच जातात. प्रत्यक्षात सध्याची बदलती सामाजिक परिस्थिती लक्षात घेतली तर मुलग्यांनाही 'होम सायन्स'चा कोर्स करण्याची गरज आहे. सुरुवात करताना फार तर एखादा 'शॉर्ट कोर्स' ठेवावा.

10) मुलं आणि मुली यांनी घराबाहेर खाल्लं तर त्याचे पैसे मुलांनी द्यावे, असाच संकेत रूढ झालेला आहे. प्रत्येकानी आपापले पैसे द्यावेत हेच योग्य असतं, पण ही कल्पना नीट समजून त्याची अंमलबजावणी करणारे मुलगे कमी असतात. त्यामुळे मुलीही फार कमी असतात.

11) चांगल्या आरोग्यासाठी योग्य आहार फार जरुरीचा असतो. सध्याची भारताची, महाराष्ट्राची, कुठच्याही शहराची परिस्थिती बघितली तर असं ठिकाणच खात्रीशीरपणे दाखवता येत नाही की जिथे आरोग्यासाठी योग्य आहार मिळेल. हेल्थ फूड अशी जाहिरात प्रत्येक ठिकाणी दिसेल, पण खरोखर हेल्थ फूडची खात्री नाही. भाजी काय, फळं काय, धान्य काय, नफा मिळवण्यासाठी कुठच्या पदार्थामधे काय मिसळलं असेल, काहीच सांगता येत नाही.

नीट बारकाव्यानी विचार केला तर असा प्रश्न पडतो की, मग खात्रीनी ज्या पदार्थाच्या शुद्धतेविषयी ग्वाही देता येईल असं काय आहे? स्वतः पिकवलेल्या धान्याविषयी किंवा भाजीविषयीच फक्त आपण असं म्हणू शकतो. हे सगळं एवढं सविस्तर सांगण्याचा हेतू असा की, 'सेंद्रिय शेती, या त्यातल्या त्यात आरोग्यकारक आहाराविषयी धडपड करणाऱ्या लोकांच्यात पुरुष पुढे आहेत आणि तुलनेनी स्त्रिया मागे आहेत.

12) आरोग्य चांगलं राखण्यासाठी योग्य आहाराबरोबरची दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे व्यायाम. शरीराची ताकद, लवचिकपणा, चिवटपणा या निरनिराळ्या गोष्टी आहेत. शहरी आयुष्यात गर्दीमुळे, वेळेच्या घाईमुळे, वाहनांच्या सोयीमुळे धावणं काय चालणंही कठीण झालं. व्यायामशाळा बऱ्याच आहेत, पण बहुतेक व्यायामाच्या जागा धंदा म्हणून चालवलेल्या आहेत. त्यात व्यायाम होत नाही असं नाही, पण एकूण शहराची लोकसंख्या आणि कुठचाही व्यायामप्रकार करणारे लोक यांचं निरीक्षण केलं तर त्यात पुरुषांच्या तुलनेत स्त्रिया मागे आहेत. घरकामामुळे होते ती दगदग असते. व्यायाम नाही. शहरात इकडून तिकडे दोन चाकी किंवा चार-चाकी चालवत प्रवासात होते ती थकवणूक. व्यायाम नाही. मैदानी खेळांच्या बाबतीत तर पुरुषांच्या तुलनेत स्त्रिया फारच मागे आहेत.

13) डेट्ससाठी मुलगे मुलींच्या मागे लागतात, मुली मुलांच्या मागे लागत नाहीत. या परिस्थितीत शहरात तरी बऱ्यापैकी बदल झाला आहे. मुली धिटाईनी मुलांना आपणहून विचारतात. खुद्द मी आणि शोभाचं उदाहरण असंच आहे. 45 वर्षांपूर्वीचं असलं तरी शोभानी पुढाकार घेऊन माझ्यासमोर लग्नाचा प्रस्ताव मांडला होता. शोनील आमच्या सुनेच्या प्रेमात पडला तर आभा आणि तिचा नवरा यांच्या बाबतीत असं काहीच म्हणता येणार नाही. विवाह अभ्यास मंडळामुळे त्यांची ओळख झाली.

याबाबतीतला पाश्चात्त्य समाजातला संकेत अगदी निराळा आणि गमतीशीर असतो. मुलगा मुलगी अनेक वर्षं एकमेकांबरोबर हिंडतात, राहतात, त्यांच्यात लैंगिक संबंध असतात, पण मुलानी अधिकृतपणी मुलीला लग्नाची मागणी घालेपर्यंत गाडी पुढे सरकत नाही. कितीही काळ मधे गेला तरी मुलगी मुलाला लग्नासाठी मागणी घालत नाही.

एखाद्या रूपवान, गुणवान मुलीला दुसऱ्या सधन कुटुंबातल्या मुलासाठी मागणी घालणं याला पूर्वी खूप प्रतिष्ठा असायची. त्याचा दुसरा अर्थ हुंडा नाही असा असायचा. अगदी पूर्वीपासून चालत आलेल्या पद्धतीत उलट कधी घडायचं नाही. म्हणजे एखाद्या मुलाला मागणी घालण्याचा प्रघात मात्र कधी नव्हता.

14) मुलींच्या लग्नाचा विचार, योजना, तयारी घरात फार लवकर सुरू होते. तुलनेनी मुलग्याच्या लग्नाचा विचार खूप उशिरा सुरू होतो. आमच्या घरात असं घडलं, पण कारण निराळं होतं. शोनील लग्न करणार नाही असं बरीच वर्षं म्हणत होता. त्यामुळे आभाचं लग्न आधी आणि शोनीलचं तीन वर्षांनी झालं.

15) मुलग्यांना माफक व्यसनं असली तरी समाजाला चालतात, पण मुलींना असलेली अजिबात चालत नाहीत. उदा. पान, तंबाखू, सिगरेट, माफक प्रमाणात दारू. आमच्या कुटुंबात माझ्या वडलांनी या सगळ्या गोष्टींचा अनुभव घेतला. आईनी ही असमानता पाळली नि कशालाही हातसुद्धा लावला नाही. मी आणि शोभानी जरा पुढची पायरी गाठली. दोघांनी सगळ्या गोष्टी करून बघितल्या. मी जरा जास्त, शोभानी अगदी कमी. दोघांना कशाचंही व्यसन लागणं शक्य नव्हतं. पुढे तब्येतीच्या कारणामुळे दोघांनी सगळ्या यादीचा उपयोग पूर्ण थांबवला.

आम्ही शोनील आणि आभावर बंधनं तर टाकली नाहीतच, उलट चव

बघायला सांगितली. अशा वागणुकीचा परिणाम चांगला होतो हे आम्हाला माहीत होतं. अपेक्षेप्रमाणे दोघांनाही कशाचंच व्यसन लागलं नाही. दोघंही विलायतेत अनेक वर्षं राहिले. त्यामुळेही काही फरक पडला नाही. नंतरच्या आयुष्यात गेली दहा वर्षं आभा भारतात आल्यामुळे तिनी या सगळ्या गोष्टी पूर्णच सोडल्या. शोनील इंग्लंडमधे असल्यामुळे आणि त्याची बायको ग्रीक असल्यामुळे मधूनमधून ते फक्त वाईन पितात. हार्ड डिंक्स, बिअर पीत नाहीत सिगरेट अजिबात ओढत नाहीत.

16) स्वयंपाक – सर्वांत महत्त्वाचा विषय

मी याला सर्वांत महत्त्वाचा विषय म्हणतोय. कारण मुलगा-मुलगी सध्याच्या काळात जे प्रश्न एकमेकांना विचारतात त्यातला हा महत्त्वाचा प्रश्न असतो. सर्वप्रथमच उलगडा करतो, मला स्वयंपाक येत नाही. शोभा आणि मी जेव्हा एकमेकांशी लग्न करायचं ठरवलं तेव्हा मी तिला स्वयंपाक येतो का हे विचारलं नव्हतं. तिनी पण मला विचारलं नव्हतं. प्रत्यक्षात तिला उत्तम स्वयंपाक येतो.

माझी स्वयंपाक न येण्याची जी कारणं आहेत त्यात स्त्री-पुरुष असमानतेचाच संबंध आहे. मी ती क्रमाक्रमानी सविस्तर सांगतो. माझ्या वडलांना अजिबात स्वयंपाक यायचा नाही. अक्षरशः घरातल्या घरात वावरत असताना त्यांनी स्वयंपाकाच्या ओट्याकडे कधी बघितलं देखील नाही. माझ्या आईलाही कधी वाटलं नाही की पुढे माझं त्यावाचून अडेल. त्यात मी दोन बहिणींच्या मधला एकटा मुलगा. मीपण कधीही स्वयंपाक शिकलो नाही.

पुढे मी इंग्लंडमधे राहायला गेलो. बाहेर खाणं परवडायचं नाही, त्यामुळे घरीच करावं लागायचं. मला सगळे पदार्थ आवडायचे. त्यामुळे मी अंडीपाव खायचो. त्याचाही काही दिवसांनी कंटाळा यायचा. त्यानंतर मी दोन मित्रांबरोबर एका फ्लॅटमधे राहायला लागलो. त्यातला एकजण 'रोज वरण-भात'वाला होता. त्याच्या आग्रहामुळे मी खरं म्हणजे वरण-भात बनवायला शिकलो होतो, पण ते तात्पुरतं होतं. पुढे त्याची सवय न राहिल्यानी ते सगळं विसरलं.

शोभाचं आणि माझं लग्न फिलाडेल्फिया यू.एस.ए. इथे झालं. तिला छान स्वयंपाक येतो म्हटल्यावर पुन्हा मी त्यातून मोकळा झालो. एकदा मी एक खास पदार्थ करून आम्ही जेवलो होतो. खास म्हणजे मांसाहारी. तोपर्यंत तिनी मांसाहार अजिबात केलेला नव्हता म्हणून. बास. एकदा स्वयंपाक केल्यावर अनेक वर्षं स्वयंपाकाला हात न लावल्यामुळे सगळं ज्ञान खलास झालं.

भारतात परतल्यावर रोज 12 तास काम चालू झाल्यामुळे पुन्हा परिणाम तोच. एकदा केव्हातरी मी भाजी केल्याचं मला आठवतंय. एकदा एक पोळी केली. ती पार बिघडली.

पुढे मी आखाती देशात काम-धंद्यासाठी गेलो. तिथे काही काळ एका मित्राबरोबर राहिलो. त्याला छान स्वयंपाक येत होता. मला फावलं. तो स्वयंपाक करायचा आणि मी भांडी घासायचो. जेव्हा मी बांधकामाच्या प्रॉजेक्टवर मुख्य मॅनेजर म्हणून होतो तेव्हा हाताशी थेट आचारीच असायचे. त्यामुळे मी काही करण्याचा प्रश्नच नव्हता.

भारतात परतल्यावर बांधकाम सल्लामसलतीच्या व्यवसायात बाहेरगावी जाणं खूप असायचं. त्यामुळे स्वयंपाक शिकणं राहिलं. आता निवृत्त झाल्यावर माझी स्वयंपाक शिकण्याची इच्छा आहे, पण शोभाला शिकवण्यासाठी जेवढा लागतो तेवढा वेळ नसतो. आता आम्ही दोघंही म्हातारे झालो. नवीन काही शिकण्याची शक्यता हळूहळू कमी होत चाललीय. तत्त्वतः स्वयंपाकाची तयारी आहे, पण प्रत्यक्षात आणण्याची शक्यता फार कमी. म्हणजे या विषयात थेट नापासच की! अगदी नुकतीच मी मूग-तांदुळाची खिचडी शिकलो आहे. तेवढी गोष्ट विसरू नये ही काळजी मी नक्की घेईन.

17) बहीण, भाऊ एका खोलीत झोपणार, पण पलंग एकच असला तर तो मुलाला दिला जातो. माझ्या तरुण वयात ही अशीच परिस्थिती होती. दोन्ही बहिणी पलंगाच्या बाजूला, फरशीवर गादी घालून झोपायच्या.

18) मुलगेच मोटरसायकल चालवतात. मुलींचं प्रमाण फार कमी.

19) मुलींसाठी खास बनवलेली वाहनं बाजारात मिळतात. उदा. ॲक्टीव्हा, सनी, स्कूटी. मुलगे अशी वाहनं शक्यतोवर टाळतात. त्यांना ते बायकांची वाहनं समजतात.

20) कॉलेजमधे मुलं-मुली सहलीला गेली तरी सगळं नियोजन मुलगेच सांभाळतात.

21) सार्वजनिक उत्सवांचं नियोजन मुलगेच पुढाकार घेऊन करताना दिसतात. उदाहरणार्थ – गणपती उत्सव. नवरात्र.

22) काही विशिष्ट विषयांच्या कॉलेजमधे मुलीच जास्त प्रमाणात प्रवेश घेतात. काही विषयांच्या कॉलेजमधे थेट उलटी परिस्थिती असते. मुली क्वचित

प्रवेश घेतात. उदाहरणार्थ – इंजिनियरिंग. आर्किटेक्चर कॉलेजमधे मात्र अनेक वर्षांपासून खूप मुली असायच्या. पुढे अमेरिकेतल्या कन्स्ट्रक्शन मॅनेजमेंटमधे एकही मुलगी नव्हती.

23) शारीरिक बदलांमुळे मुली सर्वसाधारणपणे धास्तावलेल्या असतात. मुलं त्या तुलनेत बिनधास्त आणि बेदरकार असतात. एकूणच पुरुषांवर आत्मविश्वासानी वागण्यासाठी समाजाचा दबाव असतो.

संपूर्ण भारतभर, महाराष्ट्रभर सगळीकडे पुरुष आणि स्त्रिया यांच्यात एक फार मोठा महत्त्वाचा फरक आहे. तो म्हणजे अत्याचाराची, बलात्काराची भीती. ही अतिशयोक्ती नाही. गेल्या 15-20 वर्षांतल्या बलात्काराच्या निरनिराळ्या कहाण्या ऐकल्या की एक गोष्ट स्पष्ट होते. 'आपल्यासारख्या सुशिक्षित, सुसंस्कृत शहरी जगात या अशा बलात्कार वगैरे घटना घडणं शक्य नाही' असा लोकांना विश्वास वाटत होता. तो विश्वास जवळजवळ संपलेला आहे.

शिक्षणाचा आणि बलात्काराचा संबंध नाही. श्रीमंत का मध्यमवर्गीय का गरीब, याचा संबंध नाही. अविवाहित का विवाहित, याचा संबंध नाही. उच्च वर्णीय स्त्री का दलित का आदिवासी, याचा संबंध नाही. कुठच्या राज्यात हे घडेल, हे सांगता येत नाही. भारतीय का परदेशी, हे देखील सांगता येत नाही. त्याचा दिवसा का रात्री, याचाही संबंध नाही. शब्दशः कुठच्याही वयाच्या स्त्रीवर, तान्ह्या मुलीपासून म्हाताऱ्या बाईपर्यंत कुणाहीवर, केव्हाही बलात्कार होऊ शकतो. प्रत्येक दिवशी प्रत्येक भारतीय स्त्री मनाच्या कोपऱ्यातून या एका भीतीच्या छायेखाली वावरत असते. त्या तुलनेत मुळातच पुरुषावर बलात्कार ही गोष्ट सोपी नाही आणि भारतीय स्त्रियांकडून असा बलात्कार होणं फारच कठीण आहे. ही खूप मोठी असमानता आहे.

24) स्त्रीनी स्वतःचं संरक्षण करण्यासाठी कराटे शिकावं, ज्यूदोचे धडे घ्यावेत वगैरे चर्चा प्रत्येक बलात्काराच्या बातमीबरोबर सगळीकडे होतात. पण प्रत्यक्षात मार्शल आर्ट्स म्हणजे ज्यूदो, कराटे, तायक्वांदो अशासारख्या शस्त्राविना स्वसंरक्षणाच्या कला आत्मसात करण्याच्या बाबतीत चित्र निराळं दिसतं. मार्शल आर्ट शिकणारे पुरुष आणि स्त्रिया यात फार तफावत असते. संख्येतही पुरुष जास्त असतात.

25) कुस्ती हा एक खेळाचा प्रकार असा आहे की तो भारतीय पुरुष खेळतात. पण भारतीय स्त्रिया अजिबात खेळत नाहीत. पाश्चात्त्य स्त्रिया मात्र

कुस्त्या खेळताना आपण टी.व्ही.वर बघतो.

26) बहुतेक घरांच्यात, वसतिगृहात मुलींवर लवकर परतण्याचं बंधन असतं. आमच्या घरात शोनील आणि आभामधे हा फरक आम्हाला करावा लागला. इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र सुरक्षित, महाराष्ट्रात पुणं खूप सुरक्षित, हे कदाचित अजूनही खरं असेल. पण आम्हाला सगळ्यांना कळत होतं की ही परिस्थिती झपाट्यानी बिघडतेय.

27) मुलांच्या उच्च शिक्षणाकडे, करिअरकडे पालक जास्त लक्ष देतात. त्यावर वेळ, पैसे घालवतात. त्या मानानी मुलींकडे दुर्लक्ष करतात. हे असमानतेचं रूप कनिष्ट मध्यमवर्गीयांच्यात आणि कष्टकऱ्यांच्यात जास्त आढळतं. अपत्यांची संख्या जास्त असली की ही गोष्ट नक्की होते. आमच्या घरी असं घडण्याची काही शक्यता नव्हती.

28) पारंपरिक घरांच्या धर्माचरणात फक्त मुलग्यांनीच संध्या करायची असते. मुलींनी नाही.

29) कॉलेजमधे मुलग्यांकडून जास्त मार्कांची अपेक्षा पालकांच्या मनात असते. प्रत्यक्षात मुलींची अभ्यासाविषयीची निष्ठा, मेहनत, बैठक जास्त पक्की असते. त्यामुळे बरोबर उलट होतं. आमच्या घरी शाळेच्या अभ्यासात शोनील जास्त यशस्वी होता. कॉलेजचा अभ्यास चालू झाल्यावर दोघंही चमकले. आमच्या कल्पनेत मात्र कधी भेदभाव नव्हता.

30) कॉलेजमधलं रॅगिंगचं प्रमाण मुलग्यांच्यात फार असतं. तसं बीभत्स, क्रूर रॅगिंग मुलींच्यात क्वचित आढळतं. अशा घटनांमुळे मुलगे आत्महत्यादेखील करतात. हा पौरुषत्वाचा अभिमान म्हणायचा का काय म्हणायचं?

●

4) नोकरी, धंदा, व्यवसायात, 'मिळवती बायको' या विषयातली असमानता

संपूर्ण विवाहाच्या इतिहासात आपण आत्ता शिरणार नाही, पण त्यातल्या एका महत्त्वाच्या भागाचा इथे उल्लेख करतो. गेली हजारो वर्षं सामाजिक अधिकाराची जी उतरंड चालत आलेली आहे ती स्पष्ट आहे. त्यात ब्राह्मण, वैश्य, क्षत्रिय आणि शूद्र हा क्रम पक्का होताच, पण त्यातल्या प्रत्येक जातीत पुरुष श्रेष्ठ आणि स्त्री कनिष्ठ ही श्रेणी पण पक्की होती. जातीतल्या क्रमाबद्दल कोणी काही म्हटलेलं समाजानी खपवून घेतलं नाही, त्याचप्रमाणे पुरुषाच्या श्रेष्ठत्वाबद्दल प्रश्न उपस्थित केलेलाही खपवून घेतला नाही. यातल्या कुठच्याही मतभेद, विरोध याबद्दलची ब्राह्मण पुरुषांची म्हणजे सामाजिक अग्रक्रमात सर्वोच्च स्थानी असलेल्या गटाची प्रतिक्रिया खूप तीव्र होती.

शाब्दिक चकमकी, अवहेलना, अशा प्रकारच्या हिंसा तर ब्राह्मण पुरुषांनी केल्याच, पण शारीरिक इजा करायलाही मागे-पुढे बघितलं नाही. विरोधी कृती करायचा प्रयत्न करणाऱ्याला वाळीत टाकण्याच्या शिक्षाही ब्राह्मण पुरुषांनी दिल्या. बुद्धिमत्तेच्या जोरावर त्यांनी हिंसेसाठी इतरांचाही खुबीनी उपयोग करून घेतला. या मूळ विचाराची स्वरूपं बदलली, पण अजूनही त्याच्या मूळ कल्पनेत फार बदल झालेला नाही.

आता 'मिळवती बायको' या विषयातली समाजातली परिस्थिती बघू आणि मग त्याच्या खोलात शिरू. परिस्थितीचं एका वाक्यातलं वर्णन असं की बायको मिळवती असण्याचे फायदे पुरुषाला आकर्षक वाटतात, पण त्याचे परिणाम मान्य नसतात. त्यामुळे स्वतःच्या धोरणाबद्दल पुरुषांनाही धड निर्णय घेता येत नाही आणि स्त्रियांनाही नाही.

माझं स्वतःचं मत वयाच्या 15 व्या वर्षापासून पक्कं आहे. स्वतः पैसे मिळवणं, ते खर्चण्याचा अधिकार असणं, आर्थिक निर्णय घेणं हा आनंद मला माहिती होता. माझी होणारी बायको मिळवती, जबाबदार स्त्री असली पाहिजे असा माझा ठाम आग्रह होता. कारण तो आनंद माझ्या बायकोला मिळालाच पाहिजे असं मला वाटत होतं. कुटुंबाला पैशाची गरज असणार का नसणार हे मला

माहितीच नव्हतं. हा धोरणाचा प्रश्न होता. शोभाला तो पसंत होता. इतर अनेक मुद्यांबरोबर या उलगड्यानंतर आम्ही लग्न केलं.

बहुतेक लोकं म्हणतात, 'मुलींनी शिकून पुढे काय करायचंय, शेवटी चूल नि मूलच ना? मग तेवढ्यासाठी शाळा-कॉलेजमधली एक जागा अडवायची कशाला? थेट घरचं नीट बघावं.' असं बोलणारी व्यक्ती मुलींनी शिकायला हरकत नाही इतपत विचारांनी पोहोचली, तरी पुढे त्याचं म्हणणं असतं की जे शिक्षण असेल त्या विषयातच मुलीनी पैसे मिळवायला हवेत. नाहीतर ते शिक्षण वाया गेल्यासारखं आहे. आमच्या घरी कोणालाच हे दोन्ही विचार मान्य नाहीत. मी, शोभा, शोनील, आभा, कोणीच असा विचार कधीच केला नाही.

तरीही आत्ता आपण चर्चा करत असताना मला दोन्ही बाजू ऐकण्यात रस आहे. गृहिणीच हवी असं म्हणणारे पुरुष आणि गृहिणीच व्हायचं म्हणणाऱ्या स्त्रियांचेही काही मुद्दे आहेत. त्यात तथ्य पण आहे अशी मला खात्री आहे.

जोडीदाराच्या शोधात असलेल्या मुलग्यांच्या मनात नेमकी मुलीबद्दल काय अपेक्षा आहे, हे आम्ही जीवनसाथमधे शोधायचा अनेकदा प्रयत्न केला. नेमकं उत्तर खूप कष्टानी काढूनच घ्यावं लागतं. खरं म्हणजे दोन पर्यायांपैकी त्यांनी निवड करायची असते. 1) हुशार आणि स्वतंत्र विचाराची किंवा 2) बुद्दू आणि आज्ञाधारक. इथेच तर सगळा घोटाळा असतो. त्यांना पाहिजे तशी हुशार आणि आज्ञाधारक मुलगी अस्तित्वातच नसते.

या प्रकारे अनेक वेळा बोलून सत्य कळल्यावर मुलं निदान इतपत म्हणायला तयार होतात. होणारी बायको शिकलेली हवी, म्हणजे पैशाची अडचण कधी आली तर नोकरी करू शकणारी हवी, पण सध्या तिनी नोकरी करू नये. सर्वेक्षण केलं तर अशी भूमिका असलेले मुलगे सर्वांत जास्त असतात. एका दृष्टीनी संसारात कोणीतरी घर सांभाळावं लागतंच, नाहीतर घराची व्यवस्था नीट रहात नाही, हे खरं आहे.

परंपरेनी स्त्रियांवर घरची पडलेली कामं बाहेर काही काम करणाऱ्या स्त्रिया करू शकत नाहीत. नवऱ्याला तर 'ती कामं बायकोची' अशीच शिकवण असते. नवे विचार समजून घेणाऱ्या बायकोला हे दुटप्पी जगणं कठीण होतं. नवऱ्यांना अनेकदा 'थिअरी' पटते, पण 'प्रॅक्टिस' जमत नाही.

एखाद्या पुरुषाला जेव्हा असं वाटतं की आपल्याला 'कळतंय पण वळत नाही', तेव्हा खरा मार्ग एकच. ताबडतोब थोडी का होईना सुरुवात करणं. घरची

कामं हाच विसंवादाचा विषय असला तर त्या विसंवादामुळे मनस्वास्थ्य नसतं, त्यामुळे घरातली कामं शिकून घेणंही शक्य नसतं. सारांशात, प्रश्न तसाच राहतो आणि त्यामुळे अस्वस्थता आणखीन वाढते. अशा वेळेला परिस्थितीत बदल होण्यासाठी थोडा अवधी बायकोनी नवऱ्याला द्यायला पाहिजे. 3 महिने, 6 महिने, 9 महिने आणि 1 वर्षात इथपर्यंत प्रगती व्हायला हवी असा चक्क तक्ता बनवावा.

पण त्यासाठी दोघांपैकी एकानी 24 तास घरच्या व्यवस्थेला बांधून घेण्याची गरज नसते. अक्कलहुशारीनी रोजचं घरकाम 3-4 तासात उरकता येतं हे पण बरोबर आहे. दुसऱ्या बाजूनी विचार केला तर एकानी घराची संपूर्ण जबाबदारी घेतली की दुसरा बाहेर जाऊन निश्चिंतपणी पैसे कमवायला पूर्ण मोकळा होतो. पण त्याच्या दुसऱ्या बाजूनी विचार केला तर तेच तेच घरकाम त्याचप्रकारे करणं अतिशय कंटाळवाणं असतं. हेही खरंय.

आमची दोघंही मुलं, शोनील आणि आभा लहान होती तेव्हा आम्ही वरच्या मजल्यावर राहायचो. खालच्या मजल्यावर माझं ऑफिस असल्यामुळे मी जाऊन येऊन असायचो, आणि शोभा दिवसभर नोकरी करायची. आम्ही 'मिळवती बायको' या विषयाचे अभ्यासक असल्यामुळे दोन्ही मुलांना एकदा-दोनदा विचारलं होतं की, शोभा दिवसभर बाहेर असते. आणि घरी तुम्हाला कामाच्या बाईबरोबर दिवस काढावा लागतो याबद्दल त्यांची काही हरकत नाही ना? शोभानी नोकरी सोडून इतरांसारखं घरी बसावं असं त्यांना नाही ना वाटत? दोघंही नाही म्हणायचे. शोभा तिच्या कामावरच्या गमती सांगायची ते त्यांना आवडायचं. घरात मुलं सांभाळायला बाई ठेवली की बाकी सगळ्या गोष्टी – स्वयंपाक, नाश्ता, चहा वगैरे सगळं व्यवस्थित सांभाळता यायचं.

पैसे कमावण्यासाठी आठवडाभर बाहेर जाणाऱ्या माणसाच्या दृष्टीनी विचार केला तर नोकरी किंवा धंद्यासाठी वणवण भटकणं याचाही त्याला फार कंटाळा येतो. म्हणून तर सुट्टीच्या दिवशी पूर्ण आराम हवा असतो.

माझं स्वतःचं बाहेरगावी जाण्याचं प्रमाण फार होतं. पुण्यात असलो तरीही मला बांधकामांच्या साइट्सवर सारखंच हिंडावं लागायचं. एखाद्या 'सेल्समन'चं आयुष्य जसं असतं तशी माझी परिस्थिती होती. मला बाहेरगावच्या हॉटेलमधे राहूनराहून अगदी कंटाळा यायचा. मी काही काळानी ते पूर्ण थांबवलं. एवढं हिंडत असताना मी असं मात्र कधी म्हणालो नाही की आता घरी मला इतरांनी

पूर्ण आराम द्यावा. इतरांकडून व्यक्तिगत सेवा करवून घेणं मला नाहीच आवडत. शोभा नोकरीवर आणि मी बाहेरगावी अशा परिस्थितीत क्वचित मुलांची आजारपणं असायची. तेव्हा माझी आई मुंबईहून किंवा शोभाची आई ठाण्याहून येऊन राहायची.

नवरा करिअरिस्ट असला, खूप कामात असला, यशस्वी असला की घर, मुलं, पाहुणे यांच्यात बायकोची ओढाताण होते. समजा, बायको करिअरिस्ट असली, खूप कामात असली, यशस्वी असली तरी बायकोचीच ओढाताण होते. नवऱ्याची नाही.

'बिझिनेस पार्टीज' नावाचा प्रकार माझ्या मते अगदी कमीतकमी ठेवावा. तरी काही लोकांचा असा विश्वास असतो की त्यामुळे जनसंपर्क वाढतो नि व्यवसायाला, धंद्यात खूप फायदा होतो. बाहेर रेस्टॉरंटमधे पार्टी झाली तर खर्च फार आणि आरोग्याची हानी होते म्हणून शेवटी लोकांना घरीच बोलवायचं ठरतं. अर्थातच, स्वयंपाक, आवराआवर सगळा ताण बायकोवरच येतो.

घरी काम करणाऱ्यालाही असाच आराम हवा असतो, हेही म्हणणं तेवढंच बरोबर आहे. त्यासाठी सुट्टीच्या दिवशी बाहेर जेवायला जाता येतं. पण बाहेरचं अन्न घरच्यापेक्षा खूप महाग असतं. शिवाय घरच्या इतकं स्वच्छ आणि आरोग्यकारकही नसतं. हे म्हणणं बरोबर आहे.

हे म्हणणं खरं मानलं तर सुटीच्या दिवशी घरी सगळ्यांची स्वयंपाक करण्याची तयारी हवी. नवरा-बायकोनी एकमेकांना मदत केली, सांभाळून घेतलं तर यात काहीच कठीण नाही. या सगळ्या चर्चेत घरी ती बाई आणि बाहेर तो पुरुष असं गृहीत आहे, ही अडचण आहे. या भूमिकांची उलटापालट केली तर चालेल का नवऱ्याला? खरं सांगायचं म्हणजे अगदी क्वचित असेल पण तरी 'हाऊस हजबंडही' असतात आणि तेही घरकाम उत्तमपणे सांभाळू शकतात.

खरा प्रश्न येतो, तो मूल जन्मतं तेव्हा. दुसऱ्या बाजूनी विचार केला तर तोच मुख्य मुद्दा आहे. मुलांना आईच लागते ना! आईच लागते ती जन्म देण्यासाठी आणि अंगावरचं दूध पाजण्यासाठी. सगळं मिळून कामामधून 1 वर्ष सुट्टी घ्यावी लागते. जरूर असली तर तीन महिन्यांच्या रजेतही भागवता येतं आणि एवढी रजा कुठच्याही कामामधून मिळते. पण मूल 3 वर्षांचं होईपर्यंत त्याची जास्त काळजी घ्यावी लागते. त्यामधे आई घरीच असली तर बरं. दोन मुलं असली तर हा काळ 5 वर्षांचाही असतो. 5 वर्षांच्या गैरहजेरीचा नोकरी-

व्यवसायावर खूप वाईट परिणाम होऊ शकतो. नोकरी जाऊही शकते. व्यवसायातल्या परिस्थितीतल्या बदलामुळे अंगच्या गुणांना वाव नाही असं होतं. मुळातच नोकरी नसली तर हे सगळे प्रश्न टळतात, असं लोक म्हणतात ते यासाठी.

मुलांमुळे करिअरमधे 5-7 वर्षांची 'गॅप' पडते ही गोष्ट तरी खरी आहे. पहिली गोष्ट नवरा, बायको, इतर जवळचे नातेवाईक यांनी ही गोष्ट खुशीनी मान्य केलेली हवी. त्या काळातली पैशाची सोय आधी करून ठेवायला हवी. 5-7 वर्षांत आपापल्या क्षेत्रात कमी-जास्त बदल होतात हेही खरंच आहे. पण बुद्धिमत्ता, जिद्द, चिकाटी, मेहनत या गुणांच्या जोरावर ती 5-7 वर्षं भरून काढायची आहेत याची स्पष्ट कल्पना मुलीला हवी. बहुतेक मुलींना हे जमतं. मुख्य म्हणजे मुलं हे आयुष्यातलं महत्त्वाचं प्रॉजेक्ट असतं आणि त्यासाठी ही तात्पुरती अडचण आपल्याला सोडवायचीच आहे असा नवरा-बायकोचा निर्धार हवा. यात नवऱ्याची भूमिका खूप महत्त्वाची ठरते.

पण जास्त स्पष्ट, सापेक्ष विचार केला तर त्या 5 वर्षांसाठी सबंध आयुष्यावर वाईट परिणाम करून घेण्याची जरूर नाही. कारण नोकरी-व्यवसाय नाही म्हणजे बाहेरच्या व्यावहारिक जगाला तोंड देण्याचे प्रसंग नाहीत म्हणजेच आयुष्याचं खरं शिक्षण नाही.

पुन्हा नोकरी चालू झाली की मुलांच्या लहानपणी बायकांना ट्रिपल ड्यूटी करण्याची वेळ येते. मुलांकडे लक्ष, घरकाम, खरेदी, स्वयंपाक आणि नोकरी हे सगळं सांभाळण्यासाठी शॉर्टकट्स चा वापर करावाच लागतो. स्वतःचं सगळं कसब पणाला लावायला लागतं. या काळात स्त्रीच्या कार्यक्षमतेची खरी कसोटी असते.

संपूर्ण आयुष्याचा विचार केला तर हा मुद्दा अगदी खरा आहे. घरचे सगळे एकमेकांना सांभाळून घेतील. परक्यांशी संबंध, तोही व्यावहारिक, यातच खरं 'एक्स्पोजर मिळतं' आणि व्यक्तिमत्त्व विकास होतो. व्यक्तिमत्त्व विकासाचा अगदी सोपा अर्थ अप्लाइड सायकॉलॉजीमधे असा सांगितलेला आहे तो म्हणजे प्रश्न सोडवण्याचं सामर्थ्य! प्रश्न सोडवण्याचं सामर्थ्य येण्यासाठी प्रश्न निर्माण झाले पाहिजेत आणि ते स्वतःच्या हिमतीवर सोडविले पाहिजेत. आपण जी ही चर्चा करतो आहोत, त्यातली कुठचीच एक बाजू बरोबर किंवा चूक नाहीय. आपण कुठच्या गटातले आहोत हे जेवढं वेळेवर प्रत्येक लग्न करणाऱ्याला माहीत होईल तेवढं चांगलं.

बायकांनी कुठचंतरी काम करून पैसे मिळवणं आवश्यक आहे असं मला

व्यक्तिशः नक्की वाटतं. याचं आणखी एक कारण आहे. आयुष्यात नकारात्मक गोष्टी घडू शकतात आणि त्याची तयारी करणं जरूर आहे. त्यातला भावनिक हा एक भाग आणि आर्थिक अडचण ही दुसरी महत्त्वाची पंचाईत होऊ शकते. स्त्री थोडे-बहुत पैसे मिळवत असली की निदान पैशाची अडचण तरी येत नाही. नवऱ्याच्या अपघाती मृत्यूमुळे खूप अडचणीत सापडलेली काही कुटुंबं मी बघितली आहेत.

धाकट्या भावंडांचं सगळं नीट व्हावं म्हणून मोठ्या बहिणीनी नोकरी केली आणि संसार धकवून नेला अशी बरीच उदाहरणं मी बघितली आहेत. करिअर चांगली, मनाजोगी असल्यामुळे लग्न न करण्याचा निर्णय घेणाऱ्या मुली मी बघितल्या आहेत. त्यातल्या काही मुली खरोखरच अतिशय महत्त्वाचं काम करणाऱ्या, नाव मिळवलेल्या अशा आहेत.

प्रत्यक्षातली परिस्थिती अगदी आजची, 2015 मधली बघितली तर पैसे मिळवणं, राखणं, वाढवणं या तीन गोष्टींपैकी अनेक स्त्रिया पैसे मिळवतात. पण त्या राखणं, वाढवणं यात कमी पडतात. सबंध कुटुंबाच्या भल्यासाठी गुंतवणूक करण्यासाठी बैठक आयोजित केली तर स्त्रिया त्याला हजरच रहात नाहीत. हजर राहिल्या तरी त्यांना ती चर्चा समजत नाही. मग त्या भाग घेईनाश्या होतात.

पैशाची बचत करणं हे एक स्वतंत्र कौशल्य आहे. त्यामधे खूप कुशल असणाऱ्याही स्त्रिया बघायला मिळतात, त्याचबरोबर सारख्या खरेदी करत फिरणाऱ्या, पैसे वाचवण्याची अजिबात समज नसलेल्याही बायका असतात. खुद्द शोभाच्या आणि माझ्या संसारात मी शोभापेक्षा जास्त काटकसरी आहे. बचतीचं खास कौशल्य आमच्या दोघांपैकी कोणाकडेच नाही असं मला वाटतं. मुख्य म्हणजे आम्ही दोघंही अजिबात घासाघीस करत नाही.

नवरा आणि बायको दोघंही मिळवते असले की पैसे मिळवण्याच्या बाबतीत त्यांच्या संसारात समाधान असण्याची जास्त शक्यता आहे. माझं मत याबाबतीत असं आहे की घरात येणाऱ्या पैशाबद्दलची संपूर्ण परिस्थिती नवरा बायको, सज्ञान मुलं यांना पूर्ण माहीत हवी. चमत्कारिक वेळ आधी सांगून येत नाही.

व्यवसाय किंवा धंद्यामधे मासिक उत्पन्न अनियमित असतं आणि नोकरीत नियमित असतं हे तर सगळ्यांनाच माहिती आहे. साधारणपणी जास्त प्रमाणात पुरुष व्यवसाय किंवा धंदा करतात आणि त्या तुलनेत नोकरी करणाऱ्या बायका जास्त असतात. त्यामुळे नियमित उत्पन्न असलेल्या स्त्रियांचं प्रमाण जास्त असतं.

माझ्या आणि शोभाच्या संसारात अगदी असंच आहे. मी कायम स्वतःचा व्यवसाय केला आणि शोभानी नोकरी केली. शोनील आणि ॲनॅस्तेसिया दोघंही नोकऱ्या करतात. आभा 'फ्री लान्स आर्टिस्ट' आहे आणि श्रेयस नोकरी करतो.

स्त्री-पुरुष समानता या विषयाचा अभ्यास करताना पैसे मिळवणं हा एक भाग झाला. पण जे पैसे मिळतात ते खर्चण्याचं स्वातंत्र्य स्त्रियांना प्रत्येक घरी असतंच असं नाही. रोजच्या सांसारिक आयुष्यातले छोटे खर्च स्त्रियांच्या हातून होतात, पण त्याचे निर्णय नवऱ्यांनी घेतलेले असतात अशी खूप उदाहरणं आढळतात. माझ्या आणि शोभाच्या संसारात सगळे निर्णय आम्ही दोघं मिळून चर्चा करून घेतो आणि प्रत्यक्ष खर्च माझ्या हातून होतात. कारण घरच्या खरेद्यांचं काम माझ्याकडेच सोपवलेलं असतं.

दोघांचा सन्मान राखण्याची जबाबदारी कायम दोघांवर असते. खूप महत्त्वाचा निर्णय म्हणजे लग्नानंतर मुलीनी माहेरच्यांसाठी खर्च करणं. यामधे खूप प्रकार आढळतात. कारण संबंधित घटक खूप असतात. आई-वडलांची एकुलती एक मुलगी असण्याचं प्रमाण बऱ्यापैकी आहे. दोन बहिणी आणि भाऊ नाही अशीही कुटुंबं बरीच दिसतात. अशा मुलींच्या आई-वडलांकडे बघणं हे खरं म्हणजे मुलीचं कर्तव्य असतं, पण ते सर्वस्वी नवऱ्याच्या स्त्री-पुरुष समानतेच्या समजेवर अवलंबून असतं. समजदार मुलं-मुली लग्नापूर्वी याबद्दल अगदी व्यवस्थित चर्चा करतात. काही मुलींना नियमितपणी माहेरी पैसे पाठवावेच लागतात. काही वर्षांपूर्वी पेन्शनमधे, साठवलेल्या पैशाच्या व्याजावर भागायचं. पण प्रचंड प्रमाणात महागाई वाढल्यामुळे आता भागत नाही अशी अनेक ज्येष्ठांची परिस्थिती होते.

मुलांना सांभाळण्याचे प्रश्न नक्की येणार. तेही दोघांनी समजुतीनी सोडवायचे आहेत. पाहुणे, नातेवाईक, आजारपणं या सगळ्या प्रश्नांपासून कोणाचीच सुटका नाही. नवरा-बायको दोघं मिळवते असले की सगळे प्रश्न दोघांनी एकमेकांच्या सल्ल्यानी सोडवणं याची जरूर जास्त आहे. अनेक संसारात तीच तर नेमकी अडचण असते. कारण जगाचा साधा नियम आहे, 'ज्याची बॅट त्याची बॅटिंग'.

जीवनसाथ अभ्यास मंडळात दोनही टोकाच्या 'कॅटगरीज'मधून समन्वय साधण्याचं शिक्षण देणं हा आम्ही आमचा मुख्य हेतू समजतो.

तुम्ही कामं करणारी बाई असलात तर कामाच्या ठिकाणी तुम्हाला

मिळणारी वागणूक, कामाची जबाबदारी, पगार, बाहेरगावच्या मोहिमांबद्दलची धोरणं, कामाचे कमी-जास्त तास, वरिष्ठांची स्त्री-पुरुष म्हणून वागणूक ही जशी असते तसे तुमच्यावर परिणाम होत जातात.

माझ्या काही शिफारशी सांगतो. करिअर वूमननी करिअरचा प्लॅन मांडावा. मुद्दामून लिहून काढावा. प्रत्येक जन्मलेल्या व्यक्तीनी स्वतःच्या पोटापाण्याची काहीतरी व्यवस्था करायलाच लागते. बायको, मुलं आणि काही ठिकाणी आई-वडील, आणखीही नातेवाईक यांच्या चरितार्थासाठी स्वतः पैसे मिळवायला लागतात. पण कमीतकमी स्वतःपुरती सोय प्रत्येक व्यक्तीनी करायला पाहिजे असा निसर्गनियम आहे. हे ढळढळीत सत्य माहिती असताना अनेक बायका असा निर्णय घेतात की त्या हाऊसवाइफ होणार. याचा अर्थ, त्यांचा पोटापाण्याचा उद्योग त्यांनी लग्न हा ठरवलेला असतो. चरितार्थ चालवण्याची कटकट त्यांना नकोच वाटते. गृहिणींनी म्हणजेच 'होम मेकरनी' थोडे पैसे मिळवून बघावेत. त्या आनंदाची चव घ्यावी.

इथे जमलेल्यांपैकी काही गृहिणी असतील. त्यांना मी आत्ता सांगणार आहे तो अनुभव नक्की आलेला असेल. सगळ्या हाऊसवाइफ गटाची मी आधीच माफी मागतो. चरितार्थ चालवणाऱ्या सगळ्या नवऱ्यांचं ठेवणीतलं अंतिम अस्त्र म्हणजे 'ठीक आहे. मी घर सांभाळतो, तू माझ्याएवढे पैसे मिळवून दाखव!' हे वाक्य उच्चारलं की सगळेच कौटुंबिक वाद निकालात निघतात अशी त्यांना खात्री असते. प्रत्यक्षात जी गोष्ट शक्य नाही ते बोलणं आणि ती अट म्हणून सांगणं हा ब्लॅकमेलिंगचा प्रकार आहे. ज्या नवऱ्यांच्या बायका गृहिणी आहेत त्यांनी कधीही न उच्चारण्याचं हे वाक्य आहे. त्या नवऱ्यांना हे समजत नाही की बायको तात्पुरती निरुत्तर होईल, पण खरा प्रश्न सुटणार नाही. त्याऐवजी असं टोकाचं विधान करून तिला निरुत्तर केल्यामुळे ती दुखावेल आणि पुढचा संवाद कठीण होईल. कौटुंबिक विसंवाद कमी होण्याऐवजी खात्रीनी मनं दुखावण्याचा हा मार्ग आहे.

स्त्री-पुरुष या विषयामधल्या 'मिळवती बायको' या संदर्भात सध्या टी.व्ही.वर एक जाहिरात दाखवतात तिचा उल्लेख जरूर करायला हवा. जाहिरात मॅट्रिमनी संबंधात आहे. त्यामधे प्रिया बापट ही नटी लग्नानंतरही काम करत रहायची इच्छा लग्न ठरवताना होणाऱ्या नवऱ्याजवळ व्यक्त करते असं दाखवलं आहे. अशा संदेशांचा समाजप्रबोधनासाठी उपयोग नक्की होईल. कुठच्याही पुरुषानी,

स्त्रीनी स्वतःच्या कष्टानी मिळवलेले पैसे थोडे असले तरी ते अनमोलच असतात.

कुठच्याही निर्णयाला फार उशीर झाला असं समजू नये. आर्थिक व्यवहार कळल्याशिवाय आयुष्य कळत नाही हे नक्की. जे करू ते चांगलंच करू हा प्रयत्न करावा. या सगळ्यासाठी प्रथम नवरा-बायको आणि त्यानंतर दोन कुटुंबांची चर्चा फार आवश्यक असते, कारण मध्यच काढावा लागतो. मध्य म्हणजे काय, हे समजण्यासाठी दोन्ही बाजू माहिती असाव्या लागतात.

समजा, बायको मिळवती असली तरी किती पैसे, हा प्रश्न पुढे केव्हातरी येतोच. कुटुंबाचा दर महिना सरासरी खर्च जितका असेल त्याच्या 10% स्त्रीनी मिळवले तरी त्याचा लक्षात येण्याइतका उपयोग संसाराला होतो. ते प्रमाण 25% पर्यंत वाढलं तर फारच छान. ज्या घरात सम प्रमाणात म्हणजे 50-50% दरमहिना मिळकत नवरा-बायको दोघांची असते त्या घरी स्त्री-पुरुष समानतेचं प्रमाण जास्त असण्याची शक्यता खूप असते. मी आणि शोभानी साधारणपणे सारखे पैसे आयुष्यभर मिळवले. माझी प्राप्ती अनियमित होती. शोभाची नियमित. पण सरासरी समान भरली. आम्हाला कायमच त्याचा खूप फायदा झाला. शोनील आणि ॲनस्तेसियादेखील साधारण सारखेच पैसे दर महिना मिळवतात.

आपापल्या कामात पैसे कमावणाऱ्या जोडप्यात कधीकधी पैसे मिळवण्यासंबंधी, कामावरच्या वातावरणाविषयी, कामाच्या तासांविषयी असूया, मत्सर, स्पर्धाही असू शकते. शोभाच्या आणि माझ्या बाबतीत असं कधीच घडलं नाही. नवऱ्यापेक्षा बरेच जास्त पैसे मिळवणाऱ्याही बायका असू शकतात. प्रमाण कमी असतं. पण अनेक क्षेत्रांत असं झाल्याचं मी बघितलं आहे. समजूतदारपणा नवऱ्यामधे कमी पडला तर हे कौटुंबिक विसंवादाचं कारण असू शकतं.

काही ठिकाणी नवरा-बायको दोघंही व्यवसाय, धंदा, नोकरी काहीतरी करतात, पण दोघांपैकी एकाला प्रसिद्धी, सामाजिक सन्मान जास्त मिळतो. एखाद्या जोडप्यात या कारणावरून देखील मत्सर निर्माण झाल्यामुळे ताण येतात. माझ्या आणि शोभाच्या बाबतीत असंच काहीसं आहे. पुण्यात, महाराष्ट्रात शोभाचं बरंच नाव आहे. त्या तुलनेत मी अगदीच कमी लोकांना माहीत असतो. माझ्या तुलनेत शोभाचं लिखाणही खूप आहे. मला या गोष्टीचं अजिबात वाईट वाटत नाही. उलट शोभाच्या कामाचा अभिमानच वाटतो. अप्रत्यक्षपणी मला शोभा प्रसिद्ध असल्याचा फायदाही होतो.

बायको आणि नवरा यांच्या बुद्धिमत्तेच्या प्रकारात फरक असणार, ही गोष्ट

एकदा समजली की वाईट वाटण्याजोगं त्यात काहीच नाही. नट-नट्यांचे चेहरे प्रसिद्ध असतात. कधीकधी निराळ्या व्यवसायातले त्यांचे नवरे जास्त पैसे कमावतात, गुणवान असतात, पण लोकांना अजिबात माहिती नसतात. माझ्या दृष्टीनी करिअर करणाऱ्या नवरा-बायकोनी जोडीदार जे काम करत असेल त्याला पाठिंबा देणं महत्त्वाचं आहे. तसं नाही झालं तर जोडीदाराची पावलं थबकतात.

स्त्री-पुरुष समानता आणि स्त्रियांनी काहीतरी कामधंदा करणं याबाबतीत बाकीचा सगळा भारत आत्तापर्यंत आपण बोलतोयत तसा आहे. अपवाद – ईशान्य भारताचा आणि दक्षिण भारतात केरळ राज्याचा. जशी मुलीकडच्यांनी मुलाकडच्यांना लग्नात हुंडा देण्याची पद्धत असते तशी ईशान्य भारतात मुलाकडचे लोक मुलीकडच्यांना हुंडा देतात.

आता आपण मगाशी म्हणाल्याप्रमाणे या टप्प्याच्या बारकाव्यात शिरू.

1) मुलींना प्रमोशन मिळण्यात अडचणी असतात. ही गोष्ट चुकीची असली तरी अगदी खरी आहे. त्या त्या विशिष्ट क्षेत्रावरही ते अवलंबून आहे. मी स्वतः बांधकाम व्यवस्थापन क्षेत्रात असल्यामुळे त्यात फार कमी स्त्रिया असायच्या. सबंध क्षेत्र पुरुष कामगारांकडून काम करवून घेण्याचं असल्यामुळे स्त्री त्यासाठी चालायचीच नाही. एवढ्या माझ्या 55 वर्षांच्या अनुभवात 3-4 स्त्रियांनी बांधकाम व्यवस्थापन शिकण्याचा प्रयत्न केला. प्रमोशन वगैरे तर प्रश्नच नव्हता. हा मुद्दा इतर क्षेत्रात मात्र अगदी तंतोतंत खरा आहे. आणि तरी आजकाल उद्योगविश्वात, बँकांच्यात, राजकारणात अपवाद दिसतात.

2) नोकरीत स्त्रियांना पगार कमी असतात. ही गोष्टही त्या त्या क्षेत्रावर अवलंबून आहे. शोभा जिथे काम करते तिथे म्हणजे गरवारे बालभवनमधे वॉचमनखेरीज सगळ्या स्त्रियाच काम करतात. कॉम्प्युटर क्षेत्रात मुला-मुलींना सारखे पगार असतात. मार्केटिंग क्षेत्रामधे फरक निश्चित असतो. बँकेत मात्र नसतो.

3) मुलींना कामासाठी ऑफिसकडूनही शक्यतोवर बाहेरगावी पाठवत नाहीत. हेही खरं आहे कारण स्त्रीचं शील ही जोखीम मानण्याजोगीच परिस्थिती आहे. त्याची काळजी आणि जबाबदारी त्या व्यक्तीला, कुटुंबाला आणि कामावर ठेवणाऱ्यालाही असते. शोभाला तिच्या कामानिमित्त बाहेरगावी बऱ्याच खेपा मारायला लागायच्या. एकदा तर तिला तिच्या संस्थेनी परदेशातही पाठवलं होतं.

माझ्या व्यवसायात मी माझ्याकडे काम करणाऱ्या मुलींना कधी बाहेरगावी नाही पाठवलं.

काम म्हणजे काय, या अर्थाकडे नीट लक्ष दिलं तर लक्षात येतं की, ज्याला चित्त एकाग्र करून शारीरिक किंवा मानसिक मेहनत करावी लागते ते म्हणजे काम. या अर्थानी घरी बायको स्वयंपाक, घरकाम करते, मुलांना काय लागेल ते देते म्हणजे कामच करत असते. या पद्धतीनी बघितलं तर सरासरी पुरुषापेक्षा सरासरी स्त्रीचे कामाचे तास जास्त भरतात. विशेषतः दिवसभर पूर्ण वेळ नोकरी करणाऱ्या स्त्रीचे कामाचे तास रोज 16 ते 18 भरतात.

4) काही विशिष्ट क्षेत्र मुलींना, स्त्रियांना वर्ज्य मानतात. अशी आता कमी क्षेत्रं उरली आहेत, पण आहेत. उदा. ट्रक ड्रायव्हिंग. कारण ते खूप मेहनतीचं आणि गावोगावी हिंडण्याचं असतं. ड्रायव्हिंगच्या बाबतीत बोलायचं तर एक चुकीची गोष्ट बऱ्याच प्रमाणात जवळजवळ सगळीकडे दिसते. पुरुष स्त्रियांच्या ड्रायव्हिंगबद्दल चेष्टेच्या सुरात बोलतातच, त्याशिवाय एखादी स्त्री चालवत असलेली गाडी स्वतःच्या गाडीच्या पुढे गेली तर पुरुषांना राग येतो. अनेक पुरुष अशा प्रसंगी वेडंवाकडं बोलतात, रागीट नजरेनी बघतात वगैरे. स्त्री ड्रायव्हरनी ओव्हरटेक केलेलं त्यांना खपतच नाही.

मुलींनी नर्सिंगचा कोर्स निवडल्याची खूप उदाहरणं आहेत. पुरुष नर्स असतात, पण त्यांचं प्रमाण अगदी कमी असतं.

5) विनोदी लेखक पुरुषच असतात. अगदी नाही म्हणायला एक-दोन लेखिका आहेत, पण तेवढ्याच. बाकी सगळा खडखडाटच आहे. ज्या आहेत त्या सुद्धा अजून तयार व्हायच्यायत.

6) सिनेमे, नाटकं यात पुरुषप्रधान कथानकं असतात. केवळ जाणूनबुजून निराळं करायचं म्हणून अगदी थोडे स्त्रीप्रधान नाटक, सिनेमे आहेत.

7) लोक आपापल्या उद्योग-धंद्यांसाठी मुलग्यांची नावं वापरतात. पुढे कागदोपत्री नोंद करताना मालक म्हणून मुलग्यांचीच नावं लावतात. मुलींची नावं क्वचित सापडतात.

8) मुलग्यांच्या नावानी आई-वडील जास्त गुंतवणूक करतात. मी आणि शोभानी प्रत्येक गोष्टीत दोन्ही मुलांना सारखा हिस्सा मिळेल याची काळजी घेतली. इतर अनेक कुटुंबांच्यात असं दिसत नाही. मुलीच्या लग्नात हुंडा द्यावा लागेल अशी भीती आई-वडलांना असते. असा हुंडा प्रत्यक्षात द्यावा लागला

नाही तर ते निराळा विचार करायला तयार होतात. कधीकधी हुंड्याएवढे पैसे मुलीला देतात, कधीकधी नाही देत. प्रत्यक्षात मुलगा असो मुलगी असो संपत्तीची सारखी वाटणी करण्याची जनरीत बनायला हवी. या बाबतीत कुटुंबांनी योग्य निर्णय घ्यायला हवा.

घरात एखादा मोठा निर्णय घ्यायचा असला तर तत्त्वतः त्याच्या 4 पद्धती संभवतात. 1) दुसऱ्याच्या मनाप्रमाणे आपण वागणं. 2) आपल्या मर्जीप्रमाणे दुसऱ्यानी वागणं. 3) दोघांनी एकमेकांच्या म्हणण्याचा नीट विचार करून मध्य काढणं. 4) काही केल्या एकमत होत नसलं तर ठरवून दोघांनी आपापल्या मार्गाचा अवलंब करणं. जागा विकत किंवा भाड्यानी घेणं, त्याची निवड करणं अशा प्रसंगी निर्णय घेणं नेहमीच कठीण असतं.

9) पूर्वीच्या काळी न्हावी पुरुषच असायचे. हल्ली पार्लरमधे करतात त्या मुली स्त्री न्हावीच म्हणायला हव्यात. स्त्रियांसाठी ब्यूटी पार्लर्स खूप असतात. पुरुषांसाठी कमी असतात. स्त्रीनी नटायचं या स्त्री-पुरुष असमानतेच्या मूळच्या रूढीमुळेच ब्यूटी पार्लर्स निघाली. मागणीप्रमाणे पुरवठा वाढतोच. त्यात हा व्यवसाय घरीही करता येतो. त्यामुळे कोपऱ्याकोपऱ्यावर ब्यूटी पार्लर्स निघतात. स्त्री-पुरुषाच्या चेहऱ्यांच्या, केसांच्या नैसर्गिक फरकामुळे पुरुषाला प्रसाधनांच्या आणि तंत्राच्या साहाय्यानी अधिक आकर्षक करणं कठीण असतं.

या सगळ्यामुळे स्त्रियांची पार्लर्स आणि पुरुषांची पार्लर्स यांचं प्रमाण 100 ला 1 एवढं असतं. आमचं सबंध कुटुंब साध्या राहणीचं महत्त्व मानत असल्यामुळे आमच्याकडचे आम्ही पुरुष कधीच पार्लरमधे गेलो नाही. शोभा, आभा, आणि शोनीलची बायको ॲनस्तेसिया या पण फारशा कधी स्त्रियांच्या ब्यूटी पार्लरमधे गेल्या नाहीत. शोभा, आभा आणि ॲनस्तेसियाच्या तोंडून अगदी क्वचित फेशियलचा आणि नियमितपणे केस कापायला गेल्याचा उल्लेख ऐकू येतो.

10) मोठ्या शेतीमधे निर्णय घेणारे फक्त पुरुषच असतात. शेतमजूर मात्र स्त्रिया आणि पुरुष दोन्ही असतात. आमच्या ओळखीत याबाबतीतले एक-दोन अपवाद आहेत. बाकी मात्र शेती हे सगळं पुरुषांचंच विश्व आहे. मुळात शेतीतली माहिती मला कमी असल्यामुळे समजा यामधे इतर काही उदाहरणं असली तरी मला माहिती नाहीत.

11) कुठचाही मोठा झालेला व्यवसाय पुरुष सांभाळतात. याचं अगदी

खरं कारण म्हणजे व्यवसायात जी व्यवहारकुशलता लागते ती पुरुषाकडेच असते असा सबंध समाजाचा समज आहे. शोभा जे काम करते तो तिचा स्वतःचा व्यवसाय नाही हे खरं, पण तीच गरवारे बालभवनची पहिली संचालक आहे. बालभवन कसं असावं आणि नसावं, हे तिनीच ठरवलं. तिनीच त्याचा कल्पनाविस्तार केला. प्रशिक्षण द्यायला सुरुवात केली. त्याचे सगळे आर्थिक व्यवहार बघितले. त्या कामात स्वतःला पूर्णपणे झोकून दिलं. एखाद्या व्यवसायाची उभारणी करायला जेवढी मेहनत करावी लागते तेवढी केली आणि हे काम खूप मोठं झालं. अशा कामाच्या सर्व जबाबदाऱ्या पार पाडणाऱ्या स्त्रिया संख्येनी फार कमी असतात, त्यात शोभा एक आहे.

पण एरवीचं समाजाचं चित्र उलट आहे, हे खरं आहे. त्याशिवाय एक घोटाळा आहे. अनेक पुरुषांना कामामधे आपली वरिष्ठ अधिकारी स्त्री असणं आवडत नाही.

आपला समाज मोठा पैशाचा व्यवहार असला की जसा पुरुष पाहिजे असा विचार करतो त्याच प्रकारे बिनपावतीच्या रोखीचा म्हणजे लाच देण्या-घेण्याचा प्रश्न असला तर शक्यतोवर पुरुष असलेला बरा असा विचार करतो. काही वर्षांपूर्वी शोभा युनिसेफतर्फे कन्सल्टंट म्हणून पुणे महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळासाठी काम करायची. तिला सल्ल्याच्या फीचा चेक पुणे महानगरपालिकेकडून मिळायचा. एकदा शोभाला एका बऱ्यापैकी मोठ्या रकमेचा चेक मिळणार होता. शोभा तो चेक आणण्यासाठी म.न.पा.मधे गेली तेव्हा क्लार्कनी तिला चेक दाखवला, पण देत नव्हता. म्हणाला, 'चेक घेण्यासाठी साहेबांना पाठवून द्या.' शोभाच्या लक्षात आलं की, त्या क्लार्कला लाच हवी होती. शोभा म्हणाली, 'ठीक आहे, मी युनिसेफकडून तो मागून घेईन.' पुढच्या पाच मिनिटात शोभाला चेक मिळाला.

12) बस कंडक्टर्स सारखी कामं पुरुषच जास्त प्रमाणात करतात. जास्त म्हणजे जवळजवळ पूर्णच. मी इतर काही राज्यांत स्त्री कंडक्टर पाहिलेल्या आहेत, पण महाराष्ट्रात नाही.

13) बांधकाम क्षेत्रात मुकादम पुरुषच असतात. स्त्रियांना दुय्यम वागणूक असते. बांधकाम क्षेत्राचा व्यापक विचार करताना त्यात आर्किटेक्चर, इंटीरियर डिझाइन, फर्निचर मेकिंग, स्ट्रक्चरल डिझायनर, कन्स्ट्रक्शन कॉन्ट्रॅक्टर, कन्स्ट्रक्शन मॅनेजमेंट कन्सल्टंट, बिल्डर आणि लॅन्डस्केप डिझायनर, गार्डन

काँट्रॅक्टर एवढ्या शाखा येतात. मी त्या जवळजवळ सगळ्याच शाखांमधे काम केलेलं आहे. आर्किटेक्चर, इंटीरियर डिझाइन यात स्त्रियांचं प्रमाण बऱ्यापैकी आहे. स्ट्रक्चरल डिझायनर आणि लँडस्केप डिझायनर या शाखांच्यात पण थोड्या स्त्रिया आहेत.

माझ्या बांधकामाच्या धंद्यात बहुतेक मुली ऑफिसमधलं काम सांभाळायच्या. पण एक मुलगी निराळी होती. तिला साइट सुपरव्हिजनचं काम करण्याची फार इच्छा होती. माझी अजिबात हरकत नसल्यामुळे मी तिला एका साइटच्या सुपरव्हिजनचं काम दिलं. तिचं काम व्यवस्थित होतं. तिला चांगली माहिती होती आणि ती मेहनतीही होती. आणि तरी साइटवर तिला निराळीच अडचण यायला लागली. बांधकामावरचे पुरुष मजूर, गवंडी, प्लास्टर करणारे, टायलर्स तिनी काही सूचना केल्या की हो म्हणायचे, पण ती गोष्ट तशी करायचे नाहीत. पुन्हा त्यांना त्याबद्दल विचारलं तरी काही बोलायचे नाहीत.

माझी प्रत्येक साईटवर रोज एक चक्कर कमीतकमी असायचीच. त्या चकरेत ती लोकं तीच गोष्ट मला विचारून मग ती करायचे. हा प्रकार कामाच्या दृष्टीनी फार अडचणीचा होता. तिच्यासकट सगळ्यांच्या एकत्र बैठका घेतल्या, तिचं शिक्षण, काम सगळ्यांना समजावून सांगितलं, पण फार फरक झाला नाही.

मी स्वतः आर्किटेक्ट म्हणून काही वर्षं व्यवसाय करायचो हे आपलं बोलणं झालेलंच आहे. त्यावेळेला पुण्यात साधारण 1000 आर्किटेक्टस व्यवसाय करायचे. त्यात फार तर 10 स्त्रिया असतील. त्याच वेळेला आर्किटेक्चर कॉलेजमधे बघावं तर 50 विद्यार्थ्यांच्यामधे 30 मुली आणि 20 मुलगे असं प्रमाण असायचं. हे कोडं सोडवायचा आम्ही लोकं प्रयत्न करत होतो की आर्किटेक्चर कॉलेजमधून पास होऊन बाहेर पडणाऱ्या एवढ्या संख्येनी मुली असतात. मग पुढे त्या अदृश्य कशा होतात? काही वर्षांनी याचं उत्तर मिळालं. बहुतेक मुली आर्किटेक्चरचा कोर्स निवडायच्या ते एकाच उद्देशानी. आर्किटेक्ट नवरा पटकवायचा. काहींना शिकत असताना कॉलेजमधेच नवरा सापडायचा, काहींना कोर्स पुरा झाल्यावर नोकरी करत असताना. नवऱ्याच्या ऑफिसमधे जमेल तेवढं काम घर आणि मुलं सांभाळून त्या करायच्या. नवरा बाहेरची कामं सांभाळणार आणि बायको ऑफिस, मधली अशी विभागणी सर्वांत सोयीची ठरायची. ज्यांना असा नवरा सापडणार नाही त्यांच्यापैकी अनेकजणी सरळ गृहिणी बनायच्या.

प्रत्यक्ष साईटवर लेबरकडून काम करवून घेण्याचा प्रश्न आला की त्यात सगळे पुरुषच असतात. त्याचप्रमाणे बरेच पैसे गुंतवून बिल्डर बिझिनेस करायचा असला की त्यात स्त्रिया अजिबात दिसत नाहीत. अनेक ठिकाणी बायका कागदोपत्री भागीदार असतात, पण आपण त्याविषयी बोलत नाही. बायका हुशार असून केवळ या चुकीच्या परंपरेमुळे हे क्षेत्र निव्वळ पुरुषांचं बनलं आहे.

14) उशिरापर्यंतच्या कामासाठी ऑफिसमधे मुलींना थांबू देत नाहीत. त्यामुळे त्यांना जास्तीच्या ओव्हरटाईमचे पैसे साहजिकच कमी मिळतात. ही गोष्ट जवळजवळ सगळ्या क्षेत्रांत घडते. माझ्या बांधकामाच्या धंद्याचेही 2 भाग होते. एक ऑफिसमधला आणि दुसरा साईटवरचा. दोन्ही ठिकाणी असं करावं लागलं. क्वचित ऑफिसमधल्या कामासाठी कोणी मुलगी जास्त थांबली तर तिला घरी सोडायला जाण्याची पद्धत आम्ही पाळायचो.

कॉम्प्युटर सॉफ्टवेअर कंपन्यांच्यात कामं करणारी अनेक मुलं-मुली माझ्या ओळखीची आहेत. तुमच्याही असतील. माझ्याकडे वैयक्तिक समुपदेशनासाठी येणाऱ्यांपैकी जवळजवळ निम्मे सॉफ्टवेअरशी संबंधित आहेत. अशा कंपन्यांच्यात एखाद्या प्रोजेक्टसाठी टीम ठरवतात तेव्हा शक्यतोवर विवाहित मुलगी नको असा प्रयत्न असतो. विवाहित मुलींचा नवरा आक्षेप घेतो. घरून तक्रारी असू शकतात. सासू, सासरे, मुलं, इतर नातेवाईक यांच्यासंबंधीचे घरचे प्रश्न तिला सोडवायला लागतात. त्यामुळे ती एकाग्रचित्त नसण्याची शक्यता असते. प्रत्यक्षात जेवढी गरज असते तेवढ्या प्रमाणात अविवाहित सॉफ्टवेअर इंजिनियर मुली उपलब्ध नसतात. त्यामुळे कोणी काही प्रत्यक्ष बोलत नाही, पण नाइलाजानी विवाहित सॉफ्टवेअर इंजिनियर्स टीममधे मान्य करतात. स्त्री टीम लीडर्सची संख्याही पुरुषांच्या तुलनेत कमी असते.

15) हमाल/सुतार/प्लंबर/इलेक्ट्रिशियन हे पुरुषच असतात. हमाली, सुतारकाम या कामांच्यात अंगमेहनत असते, त्यामुळे हा फरक आपण समजू शकतो. प्लंबिंगमधे डोक्याचं आणि शारीरिक मेहनतीचं काम असू शकतं, त्यामुळे आपण तेही मान्य असं म्हणू, पण इलेक्ट्रिशियनच्या कामासाठी एकही स्त्री कुठेही दिसू नये याचं स्पष्टीकरण असमानतेचा समाजमनावरचा घट्ट संस्कार याखेरीज दुसरं काही असू शकत नाही.

16) कामाबद्दल स्त्रीनी पुरुषाची खरडपट्टी काढलेली पुरुषांना चालत नाही. पुरुष वरिष्ठानी स्त्रीला किंवा पुरुषालाही रागावलेलं समाजमान्य असतं.

खुद्द माझ्या धंद्यात सुपरवायझर मुलगी असणं याला माझी हरकत नव्हती. एक-दोन मुलीही हे काम शिकायला तयार झाल्या, साइटवर जायला लागल्या, पण या प्रश्नामुळे तो नाद सोडावा लागला. शेवटी काम तर झालं पाहिजे.

17) मेंदी काढणं शिकण्याच्या वर्गाला पुरुष जवळजवळ नसतात. मेंदी काढून घेणाऱ्या फक्त स्त्रियाच असतात. मुलींचा हात हातात घेऊन मेंदी काढायला पुरुष आनंदानी तयार होतील, पण त्यांच्या हातात हात द्यायला स्त्रिया तयार होणार नाहीत.

18) ऑफिस-व्यावसायिक, धंदे यांच्यामधे रिसेप्शनिस्ट मुलीच असतात. बऱ्याच प्रमाणात हे खरं आहे, पण पूर्णपणी नाही. इतक्या ठिकाणी आत्तापर्यंत मी हिंडलो आहे आणि मी साधारण 10% ठिकाणी पुरुष रिसेप्शनिस्ट बघितले आहेत. खुद्द माझ्या धंद्यात मात्र रिसेप्शनिस्ट कायम मुलीच होत्या.

19) 'हवाई सुंदरी' हा एक पेशा असा आहे की त्यात शक्यतोवर अविवाहित मुलींना प्राधान्य असतं. मागणी वाढत गेली तशी या संकेतात बदलाला सुरुवात झाली. विवाहित स्त्रियांना त्या नोकऱ्या मिळायला लागल्या. आणखी मागणी वाढल्यावर सुंदर नसलेल्या मुली देखील त्या नोकऱ्यांच्यात शिरल्या. पुरुष शिरले, पण त्यांची संख्या कमीच राहिली. त्यातल्या पुरुषांना 'पर्सर' म्हणतात.

20) वैमानिक स्त्रिया फार कमी आढळतात. ही गोष्ट म्हणजे सरळसरळ असमानतेचं रूप आहे. तिथे शारीरिक ताकदीचा काहीच संबंध नसतो. केवळ बुद्धिचातुर्य, एकाग्रता, धाडस, जिद्द, चिकाटी अशा गुणांचा संबंध असतो आणि त्याबाबतीत स्त्री आणि पुरुष यात काहीच फरक नसतो. माझ्या एवढ्या वर्षांच्या अनुभवात मी 2 वैमानिक स्त्रियांना प्रत्यक्ष ओळखतो आणि 8-10 कुठेकुठे बघितल्यायत.

एकूण समाजामधे पैसे न मिळवणारांचं प्रमाण वाढलंय. भरपूर पैसे मिळवणारी करिअरिस्ट मुलगी आणि घर सांभाळणारा, स्वयंपाक करणारा, मुलांचं करणारा 'हाऊस हसबंड' अगदी क्वचित दिसतो, पण असू शकतो. पूर्वी आधीच्या पिढीत ही गोष्ट अशक्यच असायची. असेही काही संसार दिसतात की नवरे घरचं किंवा दारचं काहीच करत नाहीत. बायका वैतागतात, पण मुलांच्या ओढीनी संसार धकवून नेतात.

अजूनही परदेशात शिकायला जाणाऱ्यांच्यात मुलगे जास्त प्रमाणात असतात.

मी स्वतः नोकरीसाठी इंग्लंडला गेलो आणि नोकरी करून जमेल तेवढं शिकलो. पण माझ्या दोन्ही बहिणींबाबत असा परदेशात जाण्याचा विचार घरात झाला नाही. त्यांनी आधी लग्न करावं आणि मग काय ते ठरवावं, अशीच तेव्हा धारणा होती.

21) विवाहित स्त्रीनी कामानिमित्त परदेशी जाण्याला कुटुंबाचा विरोध असतो. मला स्वतःला वाटतं की, अजूनही नवऱ्यांचा आपल्या बायकोवर असावा तेवढा विश्वास नसतो. व्यवसायासाठी ठिकठिकाणी हिंडणाऱ्या मुलींना पुरुषांच्या विकृतपणाचे खूप अनुभव येतात, ही गोष्ट खरी आहे.

काही लोक सूचित करतात, तर काही सरळ विचारतात. अशा प्रसंगी काही मुली तक्रार करतात, काही पळ काढतात. आमच्या ओळखीची एक मुलगी सारख्या सारख्या सूचित करणाऱ्या पुरुषाला एकदा वैतागून म्हणाली, ‘आता आत जाऊन झोपायचं का? त्यानी होईल का तुमचं समाधान?’ त्या वेळेला तो पुरुष वरमला आणि त्यानी वागणुकीत बदल केला. प्रश्न असा आहे की तेव्हा तो हो म्हणाला असता तर हिनी काय केलं असतं?

एखाद्या घरात बायको कामावरून उशिरा परतणारी असली तर मनात किंचित संशय असणाऱ्या नवऱ्यांची संख्या पूर्वी खूप होती. हळूहळू ते प्रमाण कमी व्हायला लागलं. तोंडानी बोलताना पुरुष बायकोला इतर पुरुषांपासून धोका असल्यामुळे काळजी वाटते असं म्हणाले तरी त्यांच्या पोटातली भीती हीच असते की, आपल्या बायकोचं इतर कोणा पुरुषाबरोबर जुळलं तर काय घ्या?

परदेशात तिला कोणीतरी दुसरा पुरुष भेटण्याची शक्यता, हे एक कारण असतं. बायको परदेशात असताना नवऱ्याला लैंगिक उपासमार मान्य करावी लागते, हेही एक कारण असतं. शिवाय मुलांचा प्रश्न असतो, घरी स्वयंपाकाची थोडी पंचाईत होऊ शकते. ही सगळी कारणं खरीही असतात, आणि तरी सारांशात कुटुंबाचा विरोध असतो. माझा विरोध नव्हता आणि तरी मी त्याबद्दल नाखूषही असायचो. आमची मुलगी आभा लग्नानंतर शिक्षणासाठी निराळ्या ठिकाणी आणि तिचा नवरा श्रेयस निराळ्या देशात आणि आम्ही दोघं भारतात असा प्रकार दोन वर्षं होता. आम्हाला त्या काळात आभाची खूप काळजी वाटायची.

22) ट्रॅव्हल एजन्सीज पुरुषच जास्त प्रमाणात चालवतात. या एका बाबतीत मला गेल्या 10-15 वर्षांत बराच बदल झालेला दिसतोय. चांगलं आहे.

23) पेट्रोल पंपावर मुली क्वचितच काम करतात. अगदी क्वचित हेच

खरं आहे.

24) शेअर्सचा व्यवहार पुरुषच जास्त करतात. शेअर्स ट्रेडिंग, ब्रोकिंग हे काम तर पूर्णपणे बैठं आणि बुद्धीचं असल्यामुळे ही गोष्ट पटण्याजोगीच नाही. याचं एकच कारण दिसतं. पूर्वी शेअरबाजारात स्वतः जावं लागायचं तेव्हा त्या काळात पुरुषच तो व्यवहार बघायचे. त्यामुळे कॉम्प्युटर्स आल्यावरही तेच लोक धंदा पुढे चालवू लागले.

25) एकूण जगभराच्या वाङ्मयीन साहित्यात लेखकांची संख्या लेखिकांपेक्षा जास्त आहे. याचं कारण समजण्याजोगं आहे. पूर्वी सबंध जगात पुरुष घराबाहेर पडायचे नि स्त्री घरीच राहायची. घराबाहेर जाऊन लोकांशी वागण्याचा अनुभव पुरुषच घ्यायचा. त्यामुळे लेखनही पुरुषच करायचा. तीच पद्धत पुढे बऱ्याच अंशी चालू राहिली. हळूहळू त्यात बदल झाले, पण एकूण बेरीज केली तर पुरुष लेखकांचं प्रमाण जास्त आहे.

26) आणखी एक क्षेत्र असं आहे की त्यात पुरुष एकूण फार कमी आहेत. ते म्हणजे नृत्य. त्यात प्रावीण्य मिळवून नाव कमावणारे तर अगदी हाताच्या बोटावर मोजण्याजोगे आहेत.

27) पर्यावरण अभ्यासात पुरुष जास्त असतात. या क्षेत्रात 'फील्डवर्क' खूप असतं. साहजिकच स्त्रिया कमी असतात त्यामुळे ही असमानता दिसते. आमचा मुलगा शोनील याच क्षेत्रातला असल्यामुळे त्याचे पर्यावरण क्षेत्रातले बरेच मित्र आणि थोड्या मैत्रिणी आमच्याही ओळखीच्या आहेत. भारतात आणि इंग्लंडमधे सुद्धा.

28) मोबाईल सर्व्हिस कंपनीनी स्त्रियांनाच खास सवलतीच्या योजना जाहीर करणं, ही गोष्ट म्हणजे अगदी सरळसरळ असमानतेचं धोरण आहे.

29) गोरं होणं, सुंदर दिसणं यासाठी बाजारात स्त्रियांसाठी जास्त वस्तू असतात. टेलिव्हिजनवरच्या निम्म्याच्यावर जाहिरातींमधे अशीच उत्पादनं असतात. अगदी एखाद-दुसरी वस्तू पुरुषांसाठी असते. त्याशिवाय वाईट भाग असा आहे की, जाहिरातीत सांगितेलल्या गोष्टी खऱ्याही नसतात. आणि तरी स्त्रिया या प्रचंड किमतीच्या वस्तू खरेदी करत सुटतात.

30) व्यावसायिक खेळांडूमधे पुरुषांचं प्रमाण जास्त, पुरुषांचा मोबदला जास्त असतो. प्रत्यक्ष आकडे ऐकेपर्यंत मला कल्पना नव्हती की मोबदल्यात एवढी तफावत असते. असे मोबदल्याचे आकडे 1:100 एवढ्या प्रमाणात कमी-

जास्त असतात.

31) कासार, सोनार स्त्रियांसाठीची अलंकार–भूषणं बनवण्याचा, विकण्याचा धंदा करतात. पण त्यात संख्येनी जास्त पुरुषच असतात. मी क्वचितच शोभाबरोबर साड्या खरेदीला गेलेलो आहे. बघावं तर साड्या विकणारे सगळे विक्रेते एकजात पुरुष. अगदी स्वतःच्या खांद्यावरून पदर वगैरे घेऊन साड्या दाखवणारे सगळे पुरुषच. खूपच विनोदी दृश्य असतं ते. ही गोष्ट कुठच्याही पद्धतीनी बुद्धीला पटणारी नाही आणि स्त्री-पुरुष असमानतेचं ते विद्रूप चित्र आहे.

32) लेडीज टेलर्स पुरुषच संख्येनी जास्त असतात. मी जगातल्या अनेक ठिकाणच्या स्त्री-पुरुषांचे अनेक प्रकारचे कपडे बघितले आहेत. त्या सगळ्या कपड्यांच्यात भारतातल्या साडीवर स्त्रिया वापरतात तो ब्लाऊज हा संपूर्ण अंगाबरोबर बसणारा असल्यामुळे शिवायला सर्वांत कठीण असतो. पाश्चात्त्य पोषाखात 'स्किन फिट' पोषाख असतो, पण तो ताणल्या जाणाऱ्या कापडाचा असतो. भारतातलं बायकांचा ब्लाऊज ताणल्या न जाणाऱ्या कापडाचा शिवायचा असल्यामुळे त्याला खरोखर उच्च दर्जाचं कसबच लागतं.

शोभाबरोबर मी अनेक शिंप्यांकडे गेलो आहे. त्यांचं सगळं बोलणं ऐकल्यानंतर माझं हे सगळं मत बनलेलं आहे. ज्या कसबाबद्दल आपण बोलतो आहोत ते नव्याण्णव टक्के शिंप्यांकडे नसतं. त्यांचा धंदा चालतो, कारण बाकीचे सगळे असेच असतात. खरं कसब नसताना आलेल्या गिऱ्हाइकाला मामा बनवण्याचं मुख्य काम असतं. या मामा बनवण्याच्या बाबतीत पुरुष जातीला अनेक पिढ्यांचा अनुभव असल्यामुळे बायकांच्या कपड्यांच्या दुकानाचे जास्तीतजास्त मालक पुरुष असावेत.

काही शिंप्यांनी बायकांची छातीची वगैरे मापं घेण्यासाठी कामाला बायका ठेवल्या आहेत असं दिसतं, पण मुख्य कसबाचं म्हणजे 'कटिंग'चं काम पुरुषच करतात. बायकाही ब्लाऊजची कामं करतात, पण घरगुती स्वरूपात.

अजूनही सबंध जग समजतं की खर्चण्यासाठीचे पैसे पुरुषाच्याच हातात असतात. खरेदीला प्रत्यक्ष दुकानात स्त्री आली तरी निर्णयांच्या मागे पुरुषच असतो असं मानल्यामुळे गिऱ्हाईक याचा अर्थ पुरुष गिऱ्हाईक. 'कस्टमर इज अ किंग' (क्वीन नाही) अशी म्हण आहे ती योग्य नाही, पण खरी आहे.

एकदा पुरुषाला गिऱ्हाईक मानलं की जाहिरातीच्या विश्वात साहजिकच स्त्रियांचा वापर जास्त होतो. यामधे थोडाथोडा बदल होतोय हे खरं आहे.

‘रँपवॉक’ वर देखील थोडेसे मुलगे दिसतात.

33) चटया, झाडू विकणाऱ्या स्त्रियाच असतात. तो धंदा मला नेमका समजलेला नाही. आमच्या दाराशी येणाऱ्या स्त्रिया स्वतः त्या वस्तू बनवायच्या का घेऊन नुसतं विकण्याचं काम करायच्या, हे मला माहीत नाही. पण त्या प्रकारचं काम करणारा पुरुष मी कधीच बघितला नाही.

34) जुने कपडे घेऊन भांडी देणाऱ्या बोहारणी पण फक्त स्त्रियाच असतात.

35) सरकारी कचेऱ्यांमधे सगळीकडे भ्रष्टाचार असतोच. पण त्यात स्त्री-पुरुषांच्या लाच खाण्यात फरक असतो. स्त्रिया कमी आकड्यांची अपेक्षा/मागणी करतात आणि पुरुषांचे आकडे मोठे असतात.

36) सगळीकडचे रखवालदार नेहमी पुरुषच असतात. स्त्री राखणदार मी अजून कधी बघितलेली नाही. प्रत्यक्षात स्त्री काय आणि पुरुष काय, काही फरकच पडत नाही. रखवालदार रखवाली करतच नाहीत.

37) बागेचं, माळीकाम करणारेही कायम पुरुषच असतात.

38) विद्यापीठांचे कुलगुरू या पदावर मी अजून स्त्री बघितलेली नाही. खरं म्हणजे त्या पदावर काम करायला लायक असलेल्या स्त्रिया अनेक असतात. हे असमानतेचं रूप केवळ पुरुषप्रधान संस्कारांमुळे दिसतं.

39) डॉक्टर होणाऱ्या मुलींचं प्रमाण बऱ्यापैकी असतं. विशेषतः शहरात. त्यातल्या अनेकजणी डॉक्टर नवरा करतात, हॉस्पिटल चालवतात. अशाही बऱ्याच डॉक्टर मुली असतात की ज्यांना सासूकडून असं ऐकावं लागतं, ‘तू डॉक्टर असलीस तरी ती बाहेर. घरात तू सूनच आहेस.’

40) वकील झालेल्या बऱ्याच मुली, बायका आमच्या ओळखीच्या आहेत. कोर्टात प्रॅक्टिस करणारे पुरुष वकील कमीच असतात. बायका त्याहूनही कमी. ‘क्रिमिनल प्रॅक्टिस’ करणाऱ्या जवळजवळ नाहीच. फॅमिली कोर्ट, लेबर कोर्ट, सिव्हिल कोर्ट यामधे स्त्रियांची बऱ्यापैकी संख्या असते. कन्व्हेअन्सिंग, काउन्सेलिंग करणाऱ्या बऱ्यापैकी संख्येनी असतात. कोर्टात खटला लढवण्याची वेळ आली की अजूनही पुरुष मंडळी स्त्री वकिलाची नेमणूक करायचं शक्यतोवर टाळतात.

41) टॅक्स कन्सल्टंट म्हणून स्वतःचा व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया कमी असतात. मुली बी.कॉम., एम.कॉम., सी.ए. करतात, पण दुसऱ्याकडे नोकरी

करणं पत्करतात. ज्ञानाची अडचण नसते. लोकांनी म्हणजे पुरुषांच्या जगानी त्यांना स्वीकारण्याचा प्रश्न असतो.

42) अनेक घरांच्यात पुरुषांच्या कामाचं निराळं टेबल, कपाट, बसण्याची व्यवस्था सगळी सोय असते, पण घरच्या बाईची काही सोय नसते. आमच्याकडे अनेक वर्षं माझं ऑफिस खालच्या मजल्यावर असल्यामुळे माझी सगळीच सोय होती. शोभाची लिहिण्या-वाचण्याची सोय वरच्या मजल्यावर घरात होती. पण माझ्याइतकी व्यवस्थित नव्हती. आम्ही शनिवार पेठेतला वाडा विकून साधारण 7 वर्षांपूर्वी कर्वेनगरच्या फ्लॅटमधे राहायला आलो. वाड्याच्या तुलनेत जागा कमी असल्यामुळे डायनिंग टेबलाचाच वापर लिखाणाच्या टेबलासारखा होतो. शोभाला म्हणावी तेवढी नीट जागा नाहीय खरी म्हणजे. शोभा स्टूल पॅड वगैरे घेऊन लिहिण्यासाठी कसातरी मार्ग काढते. मुळात शोभा स्वभावानी भिडस्त आहे. मला कंबरदुखीचा त्रास आहे तसा तिला नाही, हेही एक कारण आहे. शोनील आणि ॲनस्तेसियाकडे दोघांसाठी अगदी व्यवस्थित स्वतंत्र सोय आहे. आभा आणि श्रेयसच्या घरीपण दोघांसाठी निरनिराळी व्यवस्था आहे.

43) गुप्तहेर हा एक असा व्यवसाय, नोकरी आहे की ज्यात स्त्रियांचं प्रमाण कमी आहे. ही माझी अर्थातच ऐकीव माहिती आहे, कारण 'मी गुप्तहेर आहे' असं ती व्यक्ती स्त्री असो किंवा पुरुष, सांगूच शकत नाही.

44) गुन्हेगारीच्या जगात स्त्रिया कमी असतात. ही सुद्धा ऐकीव माहितीच. कारण प्रत्यक्षात आपली कोणाही गुन्हेगाराशी ओळखच नसते. माझी तरी नाही.

●

5) घरच्या आणि समाजातल्या वातावरणातली असमानता

जगभर शब्दाशब्दात स्त्री-पुरुष असमानता भरलेली आहे, पण इथे तिचा फक्त उल्लेख करून आठवण करून देतो. इतर भाषांबद्दल मला माहीत नाही, पण इंग्लिश आणि मराठीबद्दल तरी आपण तसं म्हणू शकतो. इंग्लिशमधे 'ह्यूमन', 'मॅनकाइंड' शब्दामधे तो मॅन आहे, वूमन नाही. मराठीमधेदेखील मानव हा तो आहे, ती नाही. याचं कारण स्पष्ट आहे. स्त्रीला हजारो वर्षांपासून दुय्यमच स्थान होतं. महाराष्ट्रात बघा ना, शिवाजीचं कर्तृत्व सगळ्यांच्या तोंडावर असतं, इतिहासातल्या उल्लेखाप्रमाणे जिजाबाई, शिवाजीची पट्टराणी यांच्याबरोबर शिवाजीच्या बऱ्याच मसलती असायच्या. पण त्यांचा उल्लेखही फारसा होत नाही.

जर धर्म, परंपरा मानणारं कुटुंब असलं तर सगळीच्या सगळी कर्मकांडं, व्रतवैकल्यं स्त्री-पुरुष असमानतेनी तुडुंब आहेत. घरकाम, स्वयंपाक यात पुरुषाचा सम सहभाग अशी घरं असतात, पण त्याचं प्रमाण दहा हजारात एक एवढंच असतं. एकूण चित्र असं दिसतं की पुरुष स्त्रीचा फायदाच घेतो. याविषयी आणखी काही प्रास्ताविक करण्यापेक्षा आपण थेट असमानतेच्या रूपांकडेच वळू.

1) मासिक पाळी मुलींना नैसर्गिकपणे येते. त्यामुळे घरात लैंगिकता हा विषय थोड्या प्रमाणात का होईना, मुलींना शिकवला जातो. मुलग्यांकडे दुर्लक्ष होतं. आमच्या घरात असं झालं नाही. आम्ही ग्रुपच्या मदतीनी शोनील आणि आभा दोघांनाही हे शिक्षण दिलं. एवढ्या वर्षांनंतर मला वाटतं की ते पुरेसं दिलं नाही, पण आम्ही भेदभाव मात्र कधीच केला नाही.

2) मुलींना घरकाम जाणीवपूर्वक शिकवलं जातं. सासरी गेल्यावर अडचण येऊ नये हा हेतू असतो. मुलग्यांना मात्र घरकामाचा गंध नसतो. मी माझ्या लहानपणी किंचितसुद्धा घरकाम कधी केलं नव्हतं. माझे वडील एरवी समानता मानणारे होते, पण घरकामाकडे त्यांनी ढुंकूनही कधी बघितलं नाही. माझ्या आणि शोभाच्या संसाराचे दोन टप्पे झाले. परदेशात असताना मी सगळ्या गोष्टी करायचो. भारतात असताना अगदी थोड्या. माझ्या मनात अर्थातच त्याला विरोध नाही. मला त्यात कमीपणा वाटत नाही. पण व्यवसाय ही गोष्टच अशी

आहे की ती रोजचा दिवस पार भरून टाकते. त्यामुळे माझ्या भारतातल्या आयुष्याच्या टप्प्यात मी याबाबतीत पार नापासच ठरलो.

3) घरात मुला-मुलींच्या लग्नाचा विचार करताना शक्यतोवर मुलीचं लग्न आधी व्हावं असा प्रयत्न करतात. भाऊ मोठा आणि बहीण लहान असली तरीदेखील असंच करतात. लहान बहिणीच्या लग्नाची मोठ्या भावावर जबाबदारी समजतात. आमच्याकडे आभाचं लग्न शोनीलच्या आधी झालं हे खरं आहे, पण त्याचं कारण निराळं होता. शोनील लग्नच करेल का नाही, असा प्रश्न होता. कारण तो तसं म्हणायचा.

4) घरातल्या चर्चांच्यात लग्नासाठी जोडीदार शोधताना मुलगा वयानी मोठा आणि मुलगी लहान असा रिवाज पाळतात. आमच्या शोनीलपेक्षा त्याची बायको ॲनस्तेसिया 4 वर्षांनी मोठी आहे. आमच्या कुटुंबात एकूणच रिवाज पाळण्याचं प्रमाण कमी आहे.

5) मुलीच्या लग्नासाठी पैसा, दागिने याची तयारी कुटुंबात करतात. प्रत्यक्ष हुंडा आणि अप्रत्यक्ष हुंडा या गोष्टीविषयी आपण पुढे बोलणार आहोत. आत्ता एवढंच म्हणूया की, मुलीच्या कुटुंबाला समाजातल्या स्त्री-पुरुष असमानतेची कल्पना असते. त्यामुळे मुलाच्या लग्नाची त्यांना काही तयारी करायची नसते. मुलीच्या लग्नासाठी ही सगळी तयारी इच्छा असो-नसो, करावी लागते. याबाबतीत आभाच्या लग्नासाठी म्हणून शोभानी थोडी तयारी केली होती.

मी तयारी करत होतो, पण त्याचा प्रकार खूप निराळा होता. माझ्या दृष्टीनी वैवाहिक आयुष्याविषयीची स्पष्ट पूर्वकल्पना महत्त्वाची होती. म्हणून तर आखाती देशात असतानाच्या माझ्या चिंतनातून 'विवाह अभ्यास' या कल्पनेचा जन्म झाला. भारतात परतल्यावर 1997 साली चालू केलेलं जीवनसाथ विवाह अभ्यास मंडळ ही त्याचीच तयारी होती.

6) मराठी भाषेतल्या असमानतेनी भरलेल्या एका शब्दाची मला फार गंमत वाटते तो शब्द म्हणजे 'धर्मपत्नी'. या शब्दातला गर्भितार्थ स्पष्ट आहे. अमूक बाई धर्मपत्नी म्हणजे त्याखेरीज जिला पत्नी म्हणता येईल असं कोणीतरी असू शकतं. एक किंवा अनेक 'धर्मपती' असा मात्र शब्द नसतो, कारण स्त्रीला अनेक पती करायला परवानगीच नसते.

7) बाजारात स्त्रियांसाठी आणि पुरुषांसाठी निराळ्या सायकली मिळतात. बायकांच्या सायकलींना 'लेडीज सायकल' असंच म्हणतात. त्याला मधे आडवा

दांडा नसतो. मी स्वतः दोन्हीही सायकली चालवल्या आहेत. लेडीज सायकल जरा बुटकी असते, त्याची चाकं छोटी असल्यामुळे वेग कमी असतो, पण मला ती जास्त सोयीची वाटायची. शोनीलपण इंग्लंडमधे सायकल चालवतो. आमच्या जावयाला मात्र सायकल चालवताच येत नाही. लेडीज सायकल स्त्रियांच्या साडीच्या सोयीसाठी असली तरी ते असमानतेचं एक रूप आहे.

8) स्त्री-पुरुष दोघं मिळून प्रवास करताना स्कूटर, मोटरसायकल, कार ड्रायव्हिंग पुरुषच करतात. स्त्रिया मागे किंवा शेजारी बसतात. हे आपल्या सर्वसाधारण समाजाचं चित्र आहे. आमच्या घरात याबाबतीत अगदी किंचितच फरक आहे. माझे वडील गाडी चालवायचे, पण आई चालवत नव्हती. मी गाडी चालवतो, शोभा पूर्वी चालवायची. पण नंतर गेली 12-15 वर्षं तिनी वाहन चालवणं सोडलं. शोनील इंग्लंडमधे गाडी चालवतो, पण ॲनस्तेसिया चालवत नाही. आभाचा नवरा गाडी चालवतो पण आभा पूर्वी चालवत असूनही सध्या चालवत नाही. ती स्कूटर वापरते. भारतातले नव्वद टक्के पुरुष स्त्रियांच्या ड्रायव्हिंगची चेष्टा करतात. मी नाही करत. शोनील, श्रेयसपण नाही करत. अनेक पुरुषांना आपल्या वाहनाच्या पुढे स्त्री चालवत असलेलं वाहन गेलं की राग येतो. काही असभ्य ड्रायव्हर्स मुलींना, बायकांना मुद्दामून त्रास देणारेही आढळतात.

9) निरनिराळ्या ठिकाणची वाहन व्यवस्था बघितली की लक्षात येतं, सगळी वाहन व्यवस्था पुरुषांची सोय बघूनच होते. आमच्या घरी चारचाकी गाडी आणि महिना पगारी ड्रायव्हर नेमलेला होता. त्याचा खर्च शोभाच्याच पगारातून दिला जात होता आणि कुठचाही कार्यक्रम ठरवताना शोभाच्या सोयीचाच विचार आम्ही आधी करतो. माझ्या तुलनेत शोभाला रिक्षा पकडून जाण्या-येण्याचा त्रासही जास्त होतो. शिवाय माझी जवळजवळ सगळी कामं एखाद्या दिवसानी पुढे ढकलण्याजोगी असतात.

10) रात्री बाहेर राहण्याची सहल असली की मुलींना पालक परवानगी देत नाहीत. समाजातल्या पुरुषांच्या विकृतीमुळे असं होतं खरं. आमच्या घरी असं झालं नाही. व्यवस्थित चौकशी करून आम्ही आभाला अशा सहलींना पाठवायचो आणि ती पण कायम अतिशय जबाबदारीनीच वागायची.

11) बाहेरगावी जाण्याचं सामान स्त्रीनी पुरुषाला बॅगमधे भरून द्यायची घरात पद्धत असते. मला हे कधी पटलं नाही आणि मी कधी केलं नाही. शोनील, श्रेयसही कधी असं करत नाहीत.

12) पुरुषाच्या कपड्यांच्या दुरुस्त्या स्त्रीनी करून देण्याची पद्धत असते. मी मगाशी एकदा याचा उल्लेख केला होता, तरी पुन्हा सांगतो. घरातल्या माझ्या कपड्यांच्या दुरुस्त्या मीच करतो. जरा कठीण दुरुस्त्या शोभा करते. जास्त वेळखाऊ दुरुस्तीची गरज असली तर आल्टररकडे मी कपडे टाकतो. शोभाकडे तेवढं कौशल्य आहे, पण वेळ नसतो.

13) पाहुणे आले की पुरुष दिवाणखान्यात बसतात आणि पाहुण्या स्त्रियादेखील स्वयंपाकघरात बसतात किंवा स्वयंपाकघरात खाण्या-पिण्याची तयारी करतात. पारंपरिक संस्कार असलेल्या घरातलं हे नेहमीचं दृश्य आहे. आमच्या घरी दिवाणखाना, जेवणघर आणि स्वयंपाकघर एकत्र एकाच मोठ्या खोलीत आहे. त्यामुळे आत आणि बाहेर असा प्रश्नच येत नाही. मी शोभाला माझ्या परीनी होईल तेवढी मदत करतो, पण स्वयंपाक न आल्यामुळे आमच्या घरी काही प्रमाणात असमानता आहेच.

14) समजा, एखाद्या घरी सोफे, खुर्च्या कमी असल्या आणि त्यामानानी आलेली माणसं संख्येनी जास्त असली तर खाली सतरंज्या घालून मुलांना बसवतात. तरीही बसण्याच्या जागा कमी पडल्या तर पुढचा खाली सतरंजीवर बसण्याचा नंबर स्त्रियांचा लागतो. जीवनसाथच्या पहिल्या रविवारच्या गटचर्चेला कधीकधी 35-40 लोकंसुद्धा येऊ शकतात. आमच्या घरी खरं म्हणजे 20 माणसांचीच खुर्चीवर बसण्याची सोय आहे. बाकीच्या लोकांसाठी सतरंज्या असतात. अगदी क्वचित दोघं-तिघं तरुण मुलगे सतरंजीवर बसतात. बाकीचे सगळे पुरुष उच्चासनावर बसतात. खाली मुली, स्त्रिया बसतात आणि हे सगळं काही न बोलता आपोआप सगळं होतं.

15) चहा-बिस्किटं, इतर खाण्या-पिण्याचे पदार्थ असले तर ते स्वयंपाकघराच्या ओट्यापासून दिवाणखान्यापर्यंत पोहोचवण्याची 'वेटर'ची कामगिरी बहुतेक वेळा मुली, स्त्रिया पार पाडतात. पुरुष अगदी क्वचित त्यात भाग घेतात. जीवनसाथमधल्या मिश्र गट चर्चेच्या कार्यक्रमातही असंच दिसतं. मला ते नेहमी खटकतं.

16) मुलांच्या नावानी लोक जमिनी, मालमत्ता, फ्लॅट्स विकत घेतात. मुलींच्या नावानी कमी व्यवहार होतात. हे समाजाचं वर्णन अचूक आहे, पण चूक आहे. जागा विकत घेतानाच मुलगा आणि मुलगी अशी दोन्ही नावं त्यावर टाकावीत हे बरोबर ठरेल.

17) पैशाच्या गुंतवणुकींच्या बाबतीत देखील स्पष्ट फरक दिसतो. बँका, म्युच्युअल फंड्स, शेअर्स, डिबेंचर्स यामधे पुरुषांची उलाढाल स्त्रियांच्या-मानानी खूप असते.

18) एका बाबतीतली आर्थिक उलाढाल मात्र थेट स्त्रियांसाठीच चालते ते म्हणजे प्रसाधनं. पुरुषांसाठी प्रसाधनं नसतात असं नाही, पण प्रमाणात प्रचंड फरक आहे. मुळात नटण्याच्या बाबतीत स्त्रिया फार आधीपासून फार पुढे आहेत.

19) एके काळी स्त्रियांचे कान कायम दागिन्यांनी सजलेले असायचे. त्याचा आर्थिक वर्गाशी संबंध नसायचा. पुरुष मात्र वरच्या आर्थिक वर्गातले असले तरच भिकबाळी घालायचे. ती असमानताच होती.

20) गेली 50-60 वर्षं जवळजवळ सगळ्या स्त्रिया दोनही कानात दागिना घालतात. कुड्या, इअररिंग, काहीतरी असतं. गेली 50-60 वर्षं आधुनिक मानले गेलेले पुरुष मात्र कानात काही घालत नव्हते. गेल्या 10-15 वर्षांत तरुण मुलगे एका कानात दागिना घालायला लागले आहेत. हे समानतेचा आभास निर्माण करणारं असमानतेचं रूप आहे.

21) नाकात चमकी हा दागिना मात्र फक्त स्त्रियाच वापरतात. मी असा एकही पुरुष अजून बघितलेला नाही.

22) स्त्रिया, त्यांचं नटणं, दागिने हे एक कोडंच आहे. मुळात जी स्त्री दिसायला चांगली असते ती दागिने, मेकअप वगैरेनी जास्त चांगली दिसते हे मान्य आहे. पण मुळात दिसायला चांगली नसलेली स्त्री कितीही दागिने घातले तरी चांगली दिसण्याच्या ऐवजी जास्त वाईटच दिसते. भडक मेकअपदेखील वाईटच दिसतो. स्त्रिया कशानी जास्त चांगल्या किंवा जास्त वाईट दिसतात ते शेवटी ठरवायला हवं पुरुषांनीच ना! अमुक केल्यामुळे पुरुषांच्या नजरांना आपण जास्त चांगले दिसतो असं स्त्रियांना परस्पर स्वतःच ठरवावं लागतं, हाच तर घोळ असतो!

23) स्त्रिया एवढे अलंकार, पोषाखाच्या, परंपरेतल्या गोष्टी पूर्वीपासून सांभाळायच्या तर त्यांना रुमाल सांभाळणं कठीण होतं का? पण नाटक, सिनेमा, कादंबऱ्यांच्यात पुरुषानी अश्रू पुसण्यासाठी स्त्रीला रुमाल काढून देण्याचे उल्लेख असतात. ही गोष्ट थेट असमानतेची आहे आणि बुद्धीला पटण्याजोगीच नाही. खरं म्हणजे विनोदी आहे.

24) आमच्या घरात आमच्या संसाराला सुरुवात झाल्यापासूनच स्त्री-पुरुष

समानता नांदतेय. त्यामुळे मी माझ्या वस्तू, पैसे सांभाळतो नि शोभा शोभाच्या वस्तू सांभाळते. बायको नवऱ्याला बाहेर पडताना त्याचे कपडे काढून देते, बाहेरगावी जाताना बॅग भरून ठेवते, अंघोळीचं पाणी काढते, टॉवेल नेऊन देते हे सगळे उल्लेख मला आणि शोभाला अतिशयोक्त आणि विनोदी वाटतात. आमच्या घरात यातली एकही गोष्ट कधीही घडणं शक्य नाही. आमची मुलं लहानपणापासून हेच बघत असल्यामुळे तसंच वागतात. अगदी ती 3-4 वर्षांची असल्यापासून शोनील आणि आभा स्वतःची बॅग स्वतः भरायची.

25) एरवीचे दागिने आणि मंगळसूत्र या पूर्ण निराळ्या गोष्टी आपल्या हिंदू समाजानी पूर्वीपासून ठरवलेल्या आहेत. मंगळसूत्राचं भावनिक महत्त्व थेट संस्काराशी, पातिव्रत्याशी जोडून ठेवलेलं आहे. टी.व्ही. सीरियल्स आणि सिनेमांनी मंगळसूत्राचं अतिशयोक्त महत्त्व वाढवून ठेवल्यामुळे जबरदस्त घोळ घालून ठेवलेला आहे. त्यातली वाटी, काळे मणी याला तर देवत्व दिलं गेलं आहे. बाईच्या दागिन्यांना 'स्त्रीधन' असं स्वरूप दिलं त्याची कारणं होती, कारण त्या काळी स्त्रीधनाखेरीज बायकोच्या मालकीचं खरोखरच काही नसायचं. शोभाच्या आणि माझ्या संसारात दागिने, मंगळसूत्र, स्त्रीधन यापैकी काहीच नसतं. माझा पहिल्यापासून या गोष्टींना कडक विरोधच आहे. शोभालाही माझ्या कल्पना पूर्ण पटतात.

26) बाहेरचं कोणी येणार असलं की आदरातिथ्य, पाहुणचार याची जबाबदारी घरातल्या स्त्रीची, असं कुटुंब धरून चालतं आणि पाहुणेही धरून चालतात. आमच्या घरी मी शोभाला काय मदत हवीय ते बघतो, पण सगळे निर्णय शोभावर सोपवतो. तिला त्याचं ज्ञान आणि कौशल्य जास्त आहे. आभाच्या घरी अशीच परिस्थिती आहे. इंग्लंडला शोनील-ॲनस्तेसियाकडे मात्र दोघं मिळून पाहुण्यांकडे लक्ष देतात.

27) सकाळी घरात आलेलं वर्तमानपत्र पुरुष आधी वाचतो. आमच्या घरी अशीच परिस्थिती जवळजवळ असते, पण कारण निराळं असतं. शोभाला वर्तमानपत्रात रसही नसतो आणि वेळही नसतो. ती त्यातलं निवडक तेवढं वाचते.

28) अंघोळीसाठी बहुतेक घरांच्यात पुरुषाला अग्रक्रम असतो. आमच्या घरी कामाच्या वेळेप्रमाणे अंघोळी असतात. मुळात आम्ही दोघंच घरात आणि दोन टॉयलेट्स आहेत. त्यामुळे अग्रक्रमाचा प्रश्न येत नाही.

29) स्त्रियांचा सर्वसाधारणपणे बूट वापरायला नकार असतो. याचं

कारण बहुधा असं असावं की चपलांच्या तुलनेत बुटात रंग, प्रकार, फॅशन्स कमी असतात. आमच्या घरी शोभाला गेली 15 वर्षं मधुमेह असल्यामुळे ती नेहमीच बूट वापरते.

30) स्त्रिया उन्हापासून संरक्षणासाठी टोपी वापरण्याची टाळाटाळ करतात. त्या तुलनेत पुरुष टोपी बऱ्याच प्रमाणात वापरतात. बहुधा ही गोष्टपण फॅशनच्या कल्पनांमुळे असेल. शोभाही टोपी टाळते, पण डोक्यावर ओढणी किंवा पदर घेते.

31) स्त्रिया कागदपत्रं सांभाळण्यासाठी ब्रीफकेस वापरण्याचं टाळतात. याबाबतीत मला तर वाटतं, स्त्रियाच काय पुरुषदेखील ब्रीफकेस, बॅग टाळतात. प्रत्यक्षात कागदपत्रं जबाबदारीनी, न चुरगळता इकडून तिकडे घेऊन जायची असली तर हार्ड केस सर्वांत चांगली. ती तर स्त्रीच्या हातात क्वचितच दिसते. त्या सॉफ्ट बॅग वापरतात. त्यात कागदपत्रं नीट बाळगायची असली तर आत एक पुठ्ठा ठेवावा लागतो. समानता, असमानतेच्या बाबतीत ब्रीफकेस वापरण्यामधे पुरुष आणि स्त्रिया दोघंही बेजबाबदारीनी वागतात, पण स्त्रियांपेक्षा पुरुष किंचित बरे असं म्हणायला पाहिजे. मी आणि शोभा याबाबतीत जागरूकपणे वागतो. मी तर गेली 55 वर्षं अत्यंत जबाबदारीनी कागदपत्रं सांभाळण्यासाठी बॅग वापरत आलो आहे.

32) रोखीचा मोठा व्यवहार असला की त्यासाठी पुरुष हवा असं मानतात. खरोखरच अनेकांच्या डोक्यात स्त्रीला व्यवहाराच्या गोष्टी समजणं, जमणं याबद्दल शंका असतात. मागे मी अनेक वर्षं बिल्डर म्हणून धंदा केला. जागा बघणं, करार करणं, फ्लॅटचा ताबा घेणं वगैरेच्या वेळी कायम घरातले पुरुष यायचे. मी हे नुसतं निरीक्षण सांगतोय. आक्षेप नाही.

33) पुरुषांच्या कपड्याच्या रंगावर कायद्याची बंधनं असल्यासारखे पुरुष वागतात. तुलनेनी बायकांच्या पोषाखासाठी रंगाची मर्यादा अजिबात नसते. कितीही आधुनिक पुरुष असला तरी स्त्रियांच्या रंगीबेरंगी, डिझाइनर साडीच्या तुलनेत त्याचे कपडे अगदी साधे ठरतात. मी पूर्वी डिझाइनचे रंगीत मॅनिला वापरलेले आहेत, पण नंतर मी अगदी साधे, एकरंगी कपडे वापरायला लागलो. शोनील आणि श्रेयससुद्धा अगदी साधे, कमी रंगांचे कपडे वापरतात.

आफ्रिकेतले पुरुष किटेंगे नावाचा पायघोळ झगा वापरतात. रंगीबेरंगी, मळखाऊ, सैल आणि सुती कापडाचा. मी तो वापरून बघितला आहे. उष्ण

प्रदेशासाठी मला ती कल्पना छान वाटली. तो पोषाख चांगला दिसत नाही एवढीच मला अडचण वाटते, म्हणून मी किटेंगे वापरत नाही.

34) घरामधे उरलेलं शिळं अन्न स्त्रिया खातात. माझ्या लहानपणी माझी आई असं करायची, हे मला पक्कं आठवतंय. शिवाय ती घरातलं छोट्यात छोटं आणि जुनं पोचा आलेलं ताट जेवायला वापरायची. इतर मराठी कनिष्ठ मध्यमवर्गीय घरांच्यात असंच असणार. जरा कळायला लागल्यावर आम्ही मुलं वडलांच्याशी याबद्दल बोललो आणि बदल घडवून आणला. शोभाच्या आणि माझ्या संसारात असं कधीच झालं नाही. शोनील आणि आभा यांच्याकडेही नाही. जेवणाची तयारी मी करत असलो तर उलट मी जास्त चांगलं ताट, जास्त चांगला चिनी मातीचा मग शोभासाठी ठेवतो. किंचित फुटका मी वापरतो.

35) भारतीय परंपरेप्रमाणे पुरुष उघड्यानी जेवायला बसतात. पुरुषांची पंगत आधी बसते असाही रिवाज आहे. बायकांना काय उकडत नाही? परंपरेमधे बायकांच्या जेवण्यासाठीच्या पोषाखाची काहीतरी युक्ती शोधायला हवी होती. त्याबद्दल काही विचार केला नव्हता. ही असमानताच आहे.

36) शिक्षणातलं एक मूलतत्त्व आहे. जे आवडतं ते येतं आणि ते जास्त आवडत जातं. हे एरवी खरं असतं, पण घरच्या स्वयंपाकाच्या बाबतीत या मूळ तत्त्वाला पार छेद गेलेला दिसू शकतो. स्वयंपाक आवडतो, चांगला येतो, पण आयुष्यभर तेच तेच करून त्यातली आवड कमी होते. रस संपतो. वेळ नसतो. त्यामुळे स्त्रियांना नको तो स्वयंपाक असं वाटायला लागू शकतं. शोभाची अवस्था जवळजवळ अशीच आहे. पुरुषांच्या वाट्याला असं येत नाही, यात मला असमानता दिसते.

37) इतर अनेक घरकामांचंही असं झालेलं आहे. शोभाचं आता 69 म्हणजे वय पण झालेलं आहे. खरंच तिला कंटाळा येत असेल या कामांचा, असं मला वाटतं. मी काही कामं करतो, पण मला खरी म्हणजे ती नको वाटतात.

या घरकामाच्याबाबतीत अनेक पुरुष चुकीचं वागताना दिसतात. त्यांना खरंच वाटतं की ते कामावर गेले की गृहिणीला काही कामं नसतात. ती दिवसभर मोकळीच असते. गृहिणीच्या हातून झालेल्या बारीक चुकांचाही बाऊ केला जातो. प्रत्यक्षात प्रत्येक माणूस रोजच बारीक चुका करत असतो. बायकोच्या घरकामामधे चुका काढणारा नवरादेखील त्याच्या रोजच्या कामात चुका करतच असतो, पण त्या बायकोच्या देखत करत नसल्यामुळे ती त्यांच्याकडे बोट दाखवू शकत नाही.

मी स्वतः सिंगापूरला आत्तापर्यंत गेलेलो नाही, पण घरकामं, स्त्रियांना घराबाहेर पडून नोकरी करण्याची सामाजिक गरज लक्षात घेऊन चक्क सिंगापूर सरकारनी पुढाकार घेऊन 'हाऊसमेड्स ट्रेनिंग' केलं, घरकामाला बायका मिळण्याची व्यवस्था केली. मला ही गोष्ट फारच विशेष वाटते.

38) स्त्रिया केसात, अंगावर फुलं घालतात. पुरुष फुलांचा वापर करत नाहीत. परंपरेनी असं जे सगळ्यांच्या मनावर ठसवलं आहे की, स्त्रिया म्हणजे नाजुक, सौंदर्य आणि सुवासाच्या भोक्त्या आणि पुरुष म्हणजे राकट, ताकदवान; त्याचा हा कायमचा झालेला परिणाम आहे. मला लहानपणापासून सुवासिक फुलं, विशेषतः मोगरा फार आवडायचा. काही वेळा मी बायका जसा केसात गजरा घालतात तसा गळ्यात मोगऱ्याची माळ घालायचो. मोठेपणी मी चांगला उंचापुरा, मजबूत शरीरयष्टीचा असल्यामुळे मला गळ्यात माळ घातली म्हणून कोणी छक्का म्हणलं नसतं, पण तरी ही जनरीत मोडण्याचा धीर मला झाला नाही.

39) मैदानी खेळाच्यात स्त्रिया आणि पुरुष एकत्र सामने नसतात. जे असतात त्यांना 'मिक्स्ड डबल्स' म्हणतात. स्त्रीच्या आणि पुरुषाच्या शरीरयष्टी, ताकद यात नैसर्गिकच फरक असल्यामुळे ही असमानता कधी दूर होईल असं वाटत नाही.

40) बैठ्या खेळातही स्त्रिया आणि पुरुष सामने निराळे असतात. उदा. कॅरम, ब्रिज, बिलिअर्ड्स, बुद्धिबळ वगैरे. हे मात्र मला अजिबात पटत नाही. मी हे सगळे खेळ कमी-जास्त प्रमाणात खेळलेलो आहे आणि बायकांच्या बुद्धी आणि हस्तकौशल्यामुळे त्या त्यात किती प्रावीण्य मिळवू शकतात, हे पण मला माहिती आहे. असे खेळ लिंगभेद न करता 'जेंडर फ्री' पद्धतीनी आयोजित करायला काहीच अडचण नाही. तसं प्रत्यक्षात होत नाही ते केवळ असमानतेच्या पगड्यामुळे.

41) मुलींना समाजात छेडछाडीला तोंड द्यावं लागतं. मुलांच्या वाट्यालाही या गोष्टी येतात, पण फार कमी. शोभाला आणि आभाला हा त्रास थोड्या प्रमाणात सहन करावा लागला होता.

42) आपला समाज समजतो की पुरुष असल्यावर तो गुन्हे करणारच. असं समाज चक्क म्हणतो याचा अर्थच असा होतो की, एका मर्यादेपर्यंत पुरुषानी गुन्हा केला तर तो माफ करायचा. ही कल्पनाच भयानक आहे.

43) रेल्वेमधे स्त्रियांचे डबे, बसमधे राखीव सीट्स असतात. भारतीय पुरुषांच्या विकृतीला सगळे घाबरतात, दुसरं काय! रात्री इकडून तिकडे प्रवासी घेऊन जाणाऱ्या लक्झरी बसेस खूप असतात. या सगळ्या बसेसमधे एक संकेत कायम पाळतात. स्त्रीशेजारी स्त्रीलाच बसवतात. समजा, दुसरी प्रवास करणारी स्त्री नसली तर ते ती सीट रिकामी ठेवतात. भारतीय पुरुषांच्या विकृतीबद्दल बोलावं तेवढं कमीच. कमी-जास्त प्रमाणात, पण मनाच्या कोपऱ्यात प्रत्येक भारतीय स्त्रीला सतत बलात्काराची भीती असते.

एकतर्फी प्रेम बसू शकतं हे आपल्याला तत्त्वतः मान्य आहे. असं प्रेम पुरुषाचं स्त्रीवर किंवा स्त्रीचं पुरुषावर बसू शकतं. पण स्त्रीनी पुरुषाला त्यापायी त्रास दिल्याचं ऐकिवात नाही. याउलट पुरुष मागे लागतात, अश्लील एस.एम.एस. पाठवतात, ब्लॅकमेल करतात, ॲसिड ओततात, बलात्कार करतात, सुरा खुपसतात, बंदुकीच्या गोळीनी खून देखील करतात. स्त्री-पुरुषांच्या मनोवृत्तींच्यातला हा मोठ्ठा फरक आहे.

स्त्रीची अब्रू गेली असा जिकडेतिकडे उल्लेख करतात. पुरुषांची अब्रू जात नाही का? एखाद्या स्त्रीशी पुरुषानी अनैतिक लैंगिक संबंध ठेवले तर अब्रू दोघांची नाही का जात? 'पुरुषांना अब्रू ही भावना नसते की काय?' असा प्रश्न कोणी विचारला तर त्यात काही चूक नाही. प्रसिद्ध भवरीदेवी बलात्कार खटल्यामधे न्यायाधीश म्हणाले, 'उच्च जातीचे हे पुरुष दलित स्त्रीवर बलात्कार करतीलच कसे?' खरोखर न्यायाधीशांची, त्यांची या विषयाच्या समजेची कमाल आहे.

मागे मी आखाती देशात दुबई आणि अबुधाबी यांच्या साधारण मध्यावर असलेल्या एका बेटावर शेख मखतुमच्या राजवाड्यावर प्रॉजेक्ट मॅनेजर म्हणून नोकरी करायचो. बेटावर त्या बांधकाम प्रकल्पाखेरीज दुसरं काही नव्हतंच. त्या कामावरचे कामगार, सुपरवायझर्स, मॅनेजर्स, ऑफिसर्स सगळे पुरुषच असायचे. ज्या दुबईतल्या माणसानी माझी नेमणूक केली होती त्यानी मला एक दुबई ऑफिसमधे बसून मला मदत करणारी, माणसं, सामान पाठवणारी एक असिस्टंट मुलगीही दिली होती. ती हुशार होती आणि तिला एकूणच चांगली समज होती.

बेटावर स्त्रियांना परवानगीच नव्हती. मला मात्र एका कामासाठी त्या माझ्या असिस्टंट मुलीनी बेटावर येऊन एक गोष्ट प्रत्यक्ष डोळ्यांनी बघावी असं वाटत होतं. त्यामुळे तिला व्यवस्थित ड्रॉइंग बनवता आलं असतं. स्त्रियांना मज्जाव

असण्याचं कारण विचारण्याचा मी प्रयत्न केला. परवानगी मिळाली नाही, पण कारण कळलं. बेटावर स्त्री आहे असं बांधकामावरच्या कामगारांना कळलं तर ती स्त्री सुरक्षित राहण्याची काही गॅरंटी नव्हती. चुकून काही गोंधळ झाला तर ती जबाबदारी कोणीच घ्यायला तयार नव्हतं. शेवटी मी एकदा त्या मुलीला पुरुषाचे कपडे घालायला लावले. हॅट, गॉगल, अशी व्यवस्था करून काही तास माझ्याबरोबर नेलं आणि काही तासात परत दुबईच्या ऑफिसमधे पुन्हा पोहोचवलं.

44) शहरात स्त्रियांसाठी टॉयलेट्सची सोय फार कमी प्रमाणात असते. एकूण भारतभराचंच हे वर्णन आहे. महाराष्ट्र काही निराळा नाही आणि पुणंपण नाही. ही गोष्ट माझ्या लक्षात आल्याला बरीच वर्षं झाली. साधारण 15 वर्षांपूर्वी मी जनमानस वार्तापत्राचं काम करायचो, त्यात मी ही गोष्ट लिहिली. अनेकांनी भेटून सांगितलं की यावर उपाय शोधायलाच हवा. त्यावेळी मी अनेकांना भेटलो, पण काही हालचाल झाली नाही. जणू काही फक्त पुरुषांनाच लघवी लागते. गेल्या वर्षभरात म.न.पा.तर्फे हालचालीला सुरुवात होऊन स्त्रियांसाठीची स्वच्छतागृहं बांधली जायला लागली आहेत. परदेशात भारताच्या तुलनेत स्त्रियांसाठी टॉयलेट्स खूप प्रमाणात असतात. त्यात इतरही अनेक सोयी असतात.

45) स्वतः करण्याचा किंवा करवून घेण्याचा प्रश्न असो, घराच्या स्वच्छतेची जबाबदारी स्त्रीची, असा घराघरात संकेत असतो. हे चूक आहे असं मला वाटतं. आणि तरी देखील लहानपणी आठवतंय की, आमच्या घरातही असंच होतं. सध्यासुद्धा आमच्या घरी काम करणाऱ्या बाईला स्वच्छतेबद्दलच्या योजना, सूचना हे काम शोभाच करते. आभाकडेही ही जबाबदारी आभाच बघते. शोनील-ॲनास्तेसियाला इंग्लंडमधे सगळंच काम स्वतः हातानी करावं लागतं.

46) घराघरात कपडे धुण्याची कामं बायकाच करताना दिसतात. आत्तापर्यंतच्या आयुष्यात शोभाचे कपडे एकदा-दोनदा धुतल्याचं मला आठवतंय. वॉशिंग मशीन आल्यापासून सगळाच बदल झाला. आमच्या घरी मशीनमधल्या कपड्यांचं सगळं शोभाच बघते. मी अगदी क्वचित ते करतो. पण त्यामधेही मला शोभाला विचारावं लागतं, सल्ला घ्यावा लागतो. शोनीलच्या घरी तो आणि त्याची बायको दोघं मिळून धुण्याची जबाबदारी घेतात. आभाच्या घरीही दोघं ते बघतात. हातानी धुण्याजोगे कपडे मात्र माझे मीच धुतो.

47) सकाळचा चहा घरात स्त्रीनीच करण्याची पद्धत असते. हे असमानतेचं रूप आहे यात शंकाच नाही. पण या एका बाबतीत गेली बरीच वर्षं पुरुष

बदललेले वाटतात. मी स्वतः रोज सकाळी आमचा दोघांचा चहा करतो. मी घरूनच वैवाहिक समुपदेशन करतो. त्यामुळे आलेल्यांसाठी किंवा स्वतःसाठी चहा, कॉफी मीच करतो. मी असा काउन्सेलीसाठी चहा, कॉफी करायला लागलो की त्यापैकी स्त्रिया हमखास म्हणतात, 'मी करू का?' पुरुष हा प्रश्न कधी विचारत नाहीत.

48) सकाळच्या नाश्त्याची जबाबदारी स्त्रीवरच असणं हे असमानतेचंच रूप असून मी याबद्दल फार काही करू शकत नाही, कारण माझा कच्चा राहिलेला विषय स्वयंपाक आहे. शोभा नसली किंवा तिला घाई असली तर मी दूध-पोहे, दही-पोहे, नूडल्स असं काहीतरी करतो. अडून बसत नाही एवढं नक्की.

49) घरातली भांडी घासणं किंवा बाईकडून ते काम करवून घेण्याची जबाबदारी स्त्रीचीच असते. आमच्या घरीही तसंच आहे. ज्या दिवशी बाई येणार नाही त्या दिवशी अगदी जरूर तेवढी भांडी आम्ही घासून घेतो. पण त्यात शोभाचं प्रमाण खूप जास्त आहे. वाकण्यामुळे माझी कंबर दुखते हे त्याचं कारण आहे. मला गेली 30 वर्षं कंबरदुखीचा विकार आहे.

50) बिछाने, चादरी, उशा आवरण्याची जबाबदारी स्त्रीचीच मानतात. आमच्या घरीही असंच आहे. आमच्याकडे किती चादरी, किती उशा, किती गाद्या आहेत, हे मला माहितीच नाही. कामाला बाई असते पण तिच्याकडून शोभा करवून घेते.

51) घरात खूप म्हणजे खूप वस्तू असतात. भांडी, डबे, बाटल्या, यंत्रं, उपकरणं – कितीतरी काय, काय असतं. बहुतेक घरांच्यात स्त्रियांना याबद्दल सगळी माहिती असते, पुरुषांना फारसं माहिती नसतं. माझ्या आणि शोभाच्या संसारात जवळजवळ असंच आहे.

52) नातेवाईकांच्याबद्दलदेखील घरोघरी अशीच परिस्थिती असते. नातेवाईक सासरचे असले तरी त्यांच्या जेवणाची, अंघोळीची, झोपण्याची व्यवस्था बघण्याचं काम बहुधा बायकोचं असतं आणि बायकोच्या माहेरचे लोक असले तर अर्थातच बायकोचं असतं. आमच्या घरी बऱ्याच प्रमाणात हेच होतं. मला मुळात पुरेशी माहितीच नसते.

53) सुनेचं सासूबाईंशी नातं चांगलं, मध्यम, वाईट महत्त्वाचा विषय असतोच, पण तो इतका मोठा आहे की त्याविषयीचं या पुस्तकसंचात एक स्वतंत्रच प्रकरण आहे. स्त्री-पुरुष समानतेच्या अभ्यासात नवऱ्याचे सासुरवाडीशी

संबंध कसे, हा एक गमतीचा निराळाच विषय आहे. नवऱ्याचे आणि जावई-सासू-सासरे-मेव्हणे यांच्यात गट्टी असण्याचं प्रमाण कमीच असतं खरं.

54) 'माहेर' हा एक खास अर्थाचा खास शब्द आहे. त्याच्या पारंपरिक अर्थामधे स्त्रियांना माहेर असतं तसं पुरुषांना नसतं. हिंदू संस्कृतीत, परंपरेमधे 'माहेर' या कल्पनेभोवती भोंडले, ओव्या, काय काय प्रकार साहित्यात आहेत. पूर्वी परिस्थितीच तशी होती. पूर्ण असमानतेनी भरलेली.

55) एकत्र कुटुंबपद्धतीमधे लग्न होऊन स्त्री पुरुषाच्या कुटुंबात राहायला जाते ही मध्यवर्ती कल्पना आहे. त्यामुळे स्त्री-पुरुष असमानतेच्या रूपांपैकी एकत्र कुटुंब पद्धती हे सर्वांत मोठं, ठळक असमानतेचं रूप आहे. याच पुस्तकात एकत्र आणि विभक्त कुटुंबाविषयी स्वतंत्र लेख आहे. तो जरूर वाचावा.

56) शोभा आणि मी दिवसभर कामात स्वतंत्रपणी गर्क असायचो. गेली काही वर्षं आमच्याकडे दोघांकडे मोबाईल फोन आहे, पण पूर्वी नव्हता. क्वचित केव्हातरी असं व्हायचं की माझ्या ओळखीच्या कोणाला तरी घरी जेवायला किंवा रात्री राहायला बोलवायचंय. कधीकधी शोभाच्या ओळखीतल्या कोणाला तरी तिला बोलवायचं असायचं. मुळात शोभाच्या तुलनेत मी कमी लोकांना असं बोलावतो. एकूण गेल्या 35 वर्षांचा आढावा घेतला तर शोभाचं असं लोकांना बोलावण्याचं प्रमाण जास्त आहे. त्याखेरीज एक फरक असा होता की, शोभाला सोयीचं आहे की नाही, हे तपासल्याशिवाय मी असा कार्यक्रम पक्का ठरवत नसे. कारण योग्य मेन्यू ठरवणं आणि प्रत्यक्ष स्वयंपाक या दोन्ही गोष्टींत मी तिच्यावर अवलंबून होतो. शोभा माझ्यावर अवलंबून नसल्यामुळे असे कार्यक्रम परस्पर ठरवून मग मला नुसती माहितीसाठी सांगायची. ही असमानता आमच्यात कायमच आहे.

57) दुपारच्या जेवणासाठी डबे भरून देण्याची जबाबदारी स्त्रीचीच समजतात. घरी जेवायचं असलं तर ताट, वाट्या, भांडी स्त्रीच काढते आणि मांडते. आमच्या घरी डबा हा प्रश्न नसतो, पण जेवणासाठीची तयारी शोभा 75% वेळेला करते. भांडी उचलून घासण्याच्या जागी ठेवण्याचं काम मी जास्त वेळा करतो.

58) रात्रीच्या जेवणाची योजना, तयारी स्त्रीनीच करण्याची जनरीत आहे. आमच्याकडे हेही काम 75% वेळा शोभा करते. मी पुढचं आवरतो.

59) आहारशास्त्राचा शोभाचा जास्त अभ्यास आहे. खरं म्हणजे प्रत्येकाला

त्याची जरूर असते. पण माझा नाहीय. त्यामुळे खाद्यपदार्थांच्या खरेदीचे निर्णय ती घेते. मी फक्त खरेदी करण्याचं काम करतो. आम्ही रेस्टॉरंटमधे गेलो तरी काय मागवायचं याचा निर्णय मी शोभावरच सोपवतो. मला सगळेच खाद्यपदार्थ आवडतात. शोभाच्या स्वभावाप्रमाणे शोभा जशी नेहमी घरात जरुरीपेक्षा जास्त प्रमाणात पदार्थ बनवते तशी रेस्टॉरंटमधे नेहमी आमच्या भुकेपेक्षा जास्त पदार्थ जास्त प्रमाणात मागवते. त्यामुळे 'एवढं आपल्याला लागणार नाही, तू एवढं खाऊ शकणार नाहीस, मला एवढं जाणार नाही, आधी थोडं मागवून बघू' अशासारखी संभाषणं नेहमी चालू असतात. आणि तरी निम्म्यापेक्षा जास्त वेळेला 'पार्सल' घरी घेऊन यावं लागतं. काही वेळा पदार्थ थोडाच उरला असला तर संपवण्यासाठी मी खातो, पण मुळात माझा जास्त वजन हा प्रश्न असल्यामुळे तेही बरोबर नाही, हे आम्हा दोघांना माहिती असतं. हे सगळं वर्णन असमानतेचंच आहे. आजकाल बाहेर खाण्याचं आमचं प्रमाण खूप कमी झालंय, हे चांगलं आहे.

60) एकूणच स्त्रिया कमी खातात. हळू, सावकाश जेवतात. नीट जेवतात, जेवताना आवाज कमी करतात. कदाचित या स्त्रियांच्या गुणामुळे हळुवार या अर्थी 'बाइजवार' शब्द ग्रामीण भागात रूढ झाला असावा.

61) कप-बशा, भांडी धुण्याची जबाबदारी स्त्रीचीच मानतात. हे असमानतेचं रूप आहे यात शंकाच नाही. मी, शोनील आणि आमचा जावई असं मानत नाही. मधूनमधून आम्ही कप-बशा, भांडी धुवून टाकतो.

62) टीव्हीवरचे कार्यक्रम पुरुषाच्या आवडीप्रमाणे निवडले जातात. बऱ्याच घरांच्यातून अशी पद्धत असते आणि ती स्त्री-पुरुष असमानतेचीच आहे. माझ्या आणि शोभाच्या संसारात हे प्रमाण सारखं विभागून असतं. शोनील-ॲनस्तेसिया टीव्ही फार कमी बघतात आणि श्रेयस-आभाकडेही साधारण सारखं प्रमाण असतं.

63) सगळ्या प्रकारच्या वर्तमानपत्रं आणि टेलिव्हिजनवरच्या जाहिरातीचं बघितलं तर त्यात स्त्रीचा चेहरा आणि स्त्री-शरीर याचा वापर पुरुषाच्या तुलनेत बराच जास्त दिसतो. सिनेमात, टी.व्ही.वरच्या काही नाचाच्या बाबतीत खरंच गंमत वाटते. 20-25 मुली आणि 20-25 मुलं नाचत असतात. दृश्य स्वित्झर्लंडमधे बर्फातलं असलं तरी मुली जवळजवळ बिकिनीसारख्या पोषाखात आणि मुलगे पुरा सूट घातलेले दिसतात. हिरॉइन्स थंडीनी कुडकुडल्याचंही कधीकधी वाचायला मिळतं. एकूण प्रकार विनोदीच असतो.

64) घराघरात सिनेमा/नाटक यांची निवड पुरुषांच्या पसंतीनी होते. ही पद्धत असमानतेचीच आहे यात शंका नाही. आमच्या घरात आम्ही अगदी थेट शोभाच्या पसंतीनी असे निर्णय घेतो.

65) वर्तमानपत्रातल्या बातम्यांवरून एक गोष्ट लक्षात येते ती अशी. लग्न झालं तरी सिनेमा नट्या ती गोष्ट जाहीर करणं शक्यतोवर टाळतात. कारण पुरुष प्रेक्षकांच्या डोक्यामधली प्रतिमा त्यांना सांभाळायची असते. सिनेमा नट असं करत नाहीत. ते लग्न केल्याचं खुशाल जाहीर करतात.

66) पुस्तकं खरेदीची निवड पुरुषांच्याच मर्जीनी करणं या बाबतीत हळूहळू बदल होतायत्, असं दिसतं. आमच्याकडे मी आणि शोभा आपापल्या आवडीची पुस्तकं खरेदी करतो. दोघांची वाचनाची आवड निरनिराळी आहे. त्यातली काही निवडक पुस्तकं आम्ही दोघं वाचतो.

67) घरातली भाजी खरेदी स्त्रीनीच करण्याची पद्धत आहे. सर्वसाधारण घराचं हे वर्णन आहे आणि ते असमानतेचंच आहे. आम्ही दोघं नेहमी भाजी-खरेदीला जातो, पण निर्णय शोभा घेते. आरोग्याला योग्य भाजी कुठची, याची तिला जास्त माहिती आहे. शोनील ॲनस्तेसिया एकत्र खरेदीला जाऊन एकत्रित निर्णय घेतात. आभाकडे तिचा नवरा श्रेयस भाजी आणतो, पण निर्णय आभा घेते. मुलांना काय आवडतं, हे आभाला नेमकं माहीत असतं.

68) भाज्या विकत घेताना मात्र पुरुषाच्याच आवडीच्या घेतल्या जातात. हे वर्णन सर्वसाधारण घरासाठी खरं आहे. आमच्या घरी मला भाज्याच काय सगळे खाद्यपदार्थ आवडतात. त्यामुळे शोभा जे ठरवेल ते पक्कं.

69) गेली पन्नास वर्षं मी जे उल्लेख ऐकत आलोय त्यात एक गोष्ट दिसते. पैसे मिळवण्यात पुरुषाचं डोकं जास्त चालतं. स्त्रीचं डोकं पैसे वाचवण्यामधे जास्त चांगलं चालतं. मला हे वर्णन योग्य आहे असं वाटतं. तरीही ते असमानतेचंच रूप आहे.

70) स्त्रियांच्या खेळांचे नियम पुरुषांच्या खेळापेक्षा निराळे असतात. ही गोष्ट ढळढळीत असमानतेची आणि बुद्धीला न पटणारीच आहे. बॅडमिंटन घ्या, टेनिस घ्या. किती पॉइंटची गेम, किती सेटची मॅच यात सरळसरळ फरक असतो.

71) विनोदी चुटके हे जगभर जिकडेतिकडे सांगितले जातात. या विषयामधे सरदारजींवर जसा वर्षानुवर्षं अन्याय होत आलेला आहे तसाच स्त्रियांवर विनोद असतात, त्यामुळे अन्याय होतो.

72) स्त्रिया स्वतःचं दुःख जास्त प्रमाणात जास्त काळ उगाळत बसतात. याबाबतीत पूर्वी पुरुष जास्त स्थितप्रज्ञ असायचे, पण हळूहळू पुरुष बिघडत चालले आहेत आणि स्त्रिया सुधारत चालल्या आहेत असं दिसतं. नशिबानी ज्या स्त्रियांच्या पदरी वाईट नवरे पडतात, त्या स्त्रिया पूर्वी दुःख उगाळत बसायच्या. याबाबतीत हिमतीनी उभ्या राहिलेल्या स्त्रिया बऱ्याच दिसतात. याउलट नशिबानी वाईट बायको पदरात पडली तर पूर्वी पुरुष फार पर्वा करत नसत. आता निराशेनी कोसळणारे पुरुष जास्त दिसायला लागले आहेत.

73) गेल्या अनेक वर्षांपासून पुरुषानी स्त्रीला घराबाहेर काढण्याचं प्रमाण जास्त आहे. 'परित्यक्ता' असा शब्ददेखील वापरात आहे. परित्यक्त असा शब्द वापरत नाहीत, कारण स्त्रियांनी पुरुषांना घराबाहेर काढण्याचं प्रमाण फार कमी आहे.

74) झुरळ, पाल, उंदीर यांना स्त्रिया जास्त घाबरतात. स्त्री-पुरुष सगळ्यांनाच अशा प्राण्यांची किळस वाटते. पण टी.व्ही., सिनेमे यांच्यामधली दृश्यं बघून आपण घाबरणं आवश्यक आहे असं स्त्रियांना वाटतं. शिवाय असं म्हटल्यामुळे तेवढं एक काम पुरुषाच्या गळ्यात टाकता येतं. आमच्या घरी आम्हा दोघांनाही किळस वाटते, पण जरुरीप्रमाणे आम्ही दोघं अशा छोट्या प्राण्यांना शक्यतोवर हाकलतो.

75) स्त्रियांचं दारू, पान, सिगारेट पिण्याचं प्रमाण फार कमी असतं. ही असमानता नक्कीच आहे, पण भारतातली निम्मी लोकसंख्या म्हणजे स्त्रिया संस्कारांमुळे व्यसनांपासून दूर आहेत. मी आत्तापर्यंत मध्यमवर्गीय सुशिक्षितांमधे तंबाखू पान खाणारी फक्त एक बाई बघितली आहे. कष्टकरी वर्गात मिश्री लावणाऱ्या खूप बायका आहेत. तरुण मुलींचं सिगारेट ओढण्याचं प्रमाण जरा वाढलं आहे. आमच्या घरी यातलं कुठचंही व्यसन कोणालाच नाही.

76) ब्रँडी या दारूला जगात सगळीकडे बायकांचं पेय किंवा औषध समजतात. अजिबात दारू न पिणारांना हे माहिती नसेल कदाचित, पण मला आणि शोभाला दारुचे अनेक प्रकार माहिती आहेत. पण दारूच्या प्रकारातले हे स्त्री-पुरुष भेदभाव आमच्या डोक्यात कधी आले नाहीत. दारू पिणाऱ्यांच्यात स्त्रियांसाठी खास पेय असतं. उदा. मार्टिनी, शेरी. ही मात्र खास साहेबाची देणगी आहे. अगदी विलायतेतदेखील स्त्रिया व्हिस्की, रम वगैरे क्वचित पितात. मगाशी म्हटल्याप्रमाणे भारतीय स्त्रिया भारतीय पुरुषांच्या मानानी दारूच कमी पितात.

77) माझ्या एवढ्या 60 वर्षांच्या आठवणीप्रमाणे ईश्वरभक्त स्त्रियाचं प्रमाण जास्त असतं. आपण मनापासून ईश्वरावर श्रद्धा असण्याविषयी बोलतो आहोत. पुरुष ईश्वरभक्तीविषयी बोलतात जास्त. त्याच्या मनातली श्रद्धा स्त्रीच्या तुलनेत कमी असते. याचं कारण हे असेल की दुसऱ्यावर अवलंबून असण्याची स्त्रीला हजारो वर्षं सवय आहे. तो दुसरा म्हणजे नवरा जेवढा अवलंबून न राहण्याजोगा तेवढी ईश्वरावर श्रद्धा जास्त.

अंधश्रद्धेवर काम करणाऱ्या अंनिस म्हणजे अंधश्रद्धा निर्मूलन समिती या संस्थेत पुरुष जास्त असतात. ही गोष्ट म्हणजे समाजाचं चित्रणच आहे.

परंपरेनी जे तीन मुख्य देव मानलेले आहेत हे तीनही पुरुष आहेत. ब्रह्मा, विष्णू, महेश. देवता तेवढ्या महत्त्वाच्या मानत नाहीत. ईश्वरवादाची कल्पना मांडण्यात आणि त्याचा प्रसार करण्यामधे पुरुषांचाच पुढाकार असल्यामुळे हे सगळं स्वाभाविकच वाटतं.

78) देवदासी म्हणजे वेश्या असते. तिला देवदासी म्हणायचं, म्हणजे देवाची बायको. थोडक्यात, अखंड सौभाग्यवती. त्यानंतर तिचा उपभोग घ्यायला पुरुष मोकळे. असे काही पुरुषही असतात, पण संख्येनी फार कमी असतात. ते हिजड्यासारखी साडी नेसून वावरतात. 'जोगवा' नावाचा मराठी सिनेमा या विषयावरच आहे.

79) रोजच्या दिनचर्येतल्या अंधश्रद्धा पाळणं या एका बाबतीत स्त्री-पुरुष असमानता ठरवणं फार कठीण आहे. दोन्ही गटांची जबरी स्पर्धा आहे. अंधश्रद्धेच्या बाबतीत शहरी-ग्रामीण असा सुद्धा फरक नाही. गरीब-श्रीमंत असाही फरक नाही. देव मानणं, धर्म मानणं, जाती पाळणं या सगळ्या कल्पनांमागचा मूळ उद्देश माणसाला जगण्यासाठी बळ देणं हा होता. प्रत्यक्षात या कल्पनांनी माणसाला जास्त निर्बल बनवलं आहे.

सगळ्या निरनिराळ्या व्रतांमधे 'वटपौर्णिमा' या सणाचं खास महत्त्व असतं. सात जन्मं, जन्मोजन्मी तोच नवरा मागण्याइतके पुरुष चांगले असते तर बिनसलेल्या संसारांचं एवढं भयानक प्रमाण दिसलंच नसतं ना! भावाचं कल्याण व्हावं यासाठी व्रत घेणाऱ्या बऱ्याच जणी दिसतात. बहीण-भावांचं एकमेकांवर प्रेम हे पण हळूहळू कमीच व्हायला लागलंय.

80) स्त्रीनी नारळ फोडायचा नाही अशी परंपरा आहे. अनेक घरी ती पाळतात. आमच्याकडे शोभा नारळ फोडते. बहुतेक वेळा दुकानातून नारळ

फोडूनच आणण्याची आमची पद्धत आहे.

81) कार्तिकेयासारखे देव स्त्रियांना दूर ठेवतात. पुरुष तिरस्कार करणारे देव नाहीत. दक्षिण भारतात अशी देवळं आहेत की जिथे स्त्रीला परवानगी नाही. आमच्या संसारात देव, देवी कोणीच लुडबुड करत नसल्यामुळे आम्हाला ही केवळ ऐकीव माहिती आहे. अनुभव नाही.

82) बुवा, महाराज, साधू बनलेले पुरुषच जास्त संख्येनी असतात. माताजी असतात, पण फार कमी. ही थेट स्त्री-पुरुष असमानताच आहे.

83) देवाचे प्रेषित म्हणवणारे पुरुषच जास्त असतात. त्या तुलनेत स्त्रिया फार कमी असतात. त्यातले काही पुरुष नागडेबाबा म्हणून जास्त लोकप्रिय असतात. प्रेषित स्त्रिया मात्र खूप अलंकार, आभूषणांनी मढलेल्या असतात.

84) पारंपरिक घरांच्यात रोज देवपूजा करण्याची पद्धत असली तर ती जबाबदारी स्त्रीवर टाकतात. महापूजा मात्र पुरुषच करतात. खुद्द माझी आई रोज पूजा करायची. वडील तिकडे बघायचे नाहीत. कारण मूर्तिपूजेवर त्यांचा विश्वास नव्हता. माझ्या आणि शोभाच्या संसारात देव कधीच आला नाही. पुढच्या पिढीतही हा प्रश्नच नाहीय.

85) देवळाचे पुजारी पुरुषच असतात. खरोखरच मी स्त्री पुजारीण बघितलेली नाही. मी स्वतः देवळात जातच नसल्यामुळे ही माहिती मी अनेकांशी बोलून, खात्री करून घेऊन मग तुम्हाला सांगतोय. शेवटी पुजारी हा व्यावसायिक असतो. त्याला आर्थिक व्यवहाराचं अंग असल्यामुळे तो व्यवसाय पूर्वीपासून पुरुषांनी ताब्यात घेतला असणार.

86) बायकांच्या अंगात येण्याचं प्रमाण खूप जास्त आहे आणि अंगात येते तीही देवीच. देव नाही. या सगळ्यामागच्या कारणाची आपल्याला चांगली कल्पना आहे. स्त्रियांची खूप उपेक्षा झाली की त्यांचं सुप्त मन सन्मान मिळवण्यासाठी हा मार्ग काढतं.

87) धार्मिकतेच्या पद्धतीनी पैसे गोळा करणारे, पारंपरिक वेषधारी सगळे पुरुषच असतात. वासुदेव, भुत्या, पिंगळा वगैरे. वासुदेवी, भुतीण किंवा पिंगळी मी बघितलेली नाही.

88) हिजड्यांच्यात लिंगदोषाचे अनेक प्रकार असतात. पण ते पोषाख स्त्रीसारखाच घालतात अशी प्रथा आहे. मला हे असमानतेचं रूप वाटतं.

89) समाजात वावरताना स्त्रिया पुरुषासारखे कपडे घालून वावरल्या तर

ते गैर मानत नाहीत. पँट, टी-शर्ट, हाफ पँट सुद्धा. पुरुष मात्र स्त्रीसारखा पोषाख करत नाहीत. ही समाजरीत असमानतेची आहे एवढाच मुद्दा आहे.

९०) लठ्ठ, बुटके, बेढब पुरुष असतात, त्याचप्रमाणे स्त्रियाही असतात. पण अशा स्त्रियांची समाजात चेष्टा जास्त होते.

९१) हळदी-कुंकू नावाचा कार्यक्रम फक्त स्त्रियांसाठी असतो. परंपरेच्या संस्कारातली ही असमानता आहे. काही ठिकाणी याचं स्वरूप बदलून त्याला पुरुषांनाही बोलावल्याची उदाहरणं दिसतात. खुद्द मला आणि शोभाला अशा कार्यक्रमात काही रस नसतो. तरी गरवारे बालभवनच्या संपर्कगटामुळे शोभाला कधीकधी अशा कार्यक्रमांना जावं लागतं.

९२) वटपौर्णिमा, करवा चौद वगैरे सगळे प्रकार हिंदू संस्कृतीनी स्त्रियांच्याच माथी मारलेले आहेत. बॉलिवूड आणि हिंदी टीव्ही सीरियल्समधे अशा गोष्टी फारच लोकप्रिय आहेत.

९३) वाहन लागणं, मळमळणं हा प्रकार स्त्रियांना जास्त प्रमाणात होतो. वाहन लागणारे पुरुष असतात, पण फार कमी. ही असमानता असली तरी ती निसर्गाची करणी आहे. त्यात संस्कारांचा काही संबंध नाही, पारंपरिकतेचा नाही. धर्माचाही नाही.

९४) साधारणपणी स्त्रियांना थंडीचा जास्त त्रास होतो. निसर्ग. दुसरं काय? आमच्या घरी असंच आहे. रात्रीच्या ए.सी. लक्झरी बसनी कुठे प्रवास करायचा असला की शोभाला हुडहुडी भरते. त्या तापमानात मला छान वाटतं.

९५) स्त्रियांना कर्कश, मोठ्या आवाजाचा त्रास पुरुषांपेक्षा जास्त होतो. यामधे मला निसर्गाची करणी आणि संस्कार दोन्हीचा संबंध दिसतो. शोभाला मोठा, किरटा, उंच पट्टीतला आवाज सहन होत नाही. मला त्याचं एवढं खास काही वाटत नाही.

९६) रांगोळी काढण्याची कला स्त्रियांना जास्त प्रमाणात अवगत असते. यामधे नैसर्गिक शारीरिक क्षमतेचा काहीच संबंध नसतो. ही निव्वळ संस्कारानी निर्माण केलेली असमानता आहे. याला अपवाद म्हणजे संस्कार भारतीची रांगोळी. ती अनेक पुरुषही काढतात. पण नाजूक रांगोळी आपण डोळ्यासमोर आणली तर हा फरक ठळकपणे दिसतो. आमच्या घरी रांगोळी काढण्याचे प्रसंगच नसतात, कारण धार्मिक समारंभ नसतात. जेव्हा केव्हा थोडे प्रसंग आले त्यात शोभाची तयारी माझ्यापेक्षा खूप जास्त दिसत होती. मला चित्रकलेचं उत्तम

अंग असून मला रांगोळी जमत नव्हती.

97) परदेशात जाण्याचा व्हीसा एकट्या स्त्रीला मिळण्यात बऱ्याच देशांच्या कायद्यात खूप अडचणी असतात. ही असमानता नक्कीच आहे, पण मुळातलं कारण पुरुष जातीची जगभर दिसणारी विकृती हेच आहे. अनेक देश एकट्या स्त्रीला सरळ व्हीसा नाकारतात.

98) पायगुण या कल्पनेत स्त्रीकडे समाज जास्त बारकाईनी बघतो. मुळात पायगुण ही कल्पना निरर्थक असते. पण आपला अभ्यासाचा केंद्रबिंदू स्त्री-पुरुष असमानता असल्यामुळे त्या दृष्टीनी याकडे बघितलं तर जे आढळतं ते बघून थक्क व्हायला होतं. सूनेचा तो पायगुण, जावयाचे सगळे गुणच गुण. मुलगी जन्मली तर तिचा पायगुण, मुलगा जन्मला तर छान छान. आणि अशी विनोदी कल्पना मांडणाऱ्या आणि पसरवणाऱ्या स्त्रियाच जास्त असतात.

99) स्त्रीनी एकटं राहू नये अशी समाज व्यवस्था असते. सामाजिक दबाव असतो. लोकं पाठीमागे काहीबाही बोलत असतात, टिंगल करतात. मदत करण्याऐवजी त्रास देतात. पुरुष एकटा राहिला तर लोकांना चालतं.

एकट्या राहणाऱ्या स्त्रिया, मग ते घटस्फोटामुळे असो, नवरा वारल्यामुळे असो, किंवा अविवाहित राहिल्यामुळे असो, नवऱ्याशी न पटल्यामुळे असो, ओळखीच्या पुरुषांचा काही ना काही पद्धतीनी फायदा घेताना दिसतात. त्या तुलनेत एकटे राहणारे पुरुष निराळे वागतात. त्यांच्यात विकृती असली आणि हातात पैसे असले तर ते एकदम 'प्रकरण'च करतात.

100) 'बायकांना अक्कल कमी' हे विधान सामाजिक पातळीवर बोललं जातं. मुळात ते खरं नाही. घराघरात आपापल्या बायकांना पुरुष असं बोलतात ते निराळंच. मी शोभाला असं कधीही म्हणालो नाही. शोनील, श्रेयस कोणीच त्यांच्या बायकोबद्दल असं बोलत नाहीत. आधीच्या पिढीतले अनेक नवरा-बायको आम्ही एकमेकांशी वागताना बघितले आहेत. बायकोला अक्कल नसल्यासारखेच नवरे वागवायचे. त्यातले काही तसं बोलायचे देखील.

माझी आई फारशी शिकलेली नसली तरी हुशारच होती. आधीच्या पिढीत ब्राह्मणांच्या बायका कमी शिकलेल्या असल्या तरी निरक्षर नसायच्या. इतर जातींच्यात शिकण्याचं प्रमाण कमी, बायकांचं अगदीच कमी. त्यामुळे निरक्षर बायकांची 'अक्कल काढणं' शक्य होतं. पुरुष पूर्वीही बोलायचे आणि आजही बोलतात. दलित स्त्रियांच्यात तर साक्षर असणारी एखादीच असायची. शोभाचं या

विषयावरच्या काही भागाच्या अभ्यासाबद्दलचं एक पुस्तक आहे. त्याचं नाव – ‘दलित पुरुषांच्या आत्मचरित्रातल्या स्त्री प्रतिमा’.

101) आमच्या ओळखीचे म्हातारे नवरा-बायको फिरायला जायचे. ते दृश्य असं असायचं की नवरा पुढे चालायचा आणि मधे 10’-0’’ अंतर ठेवून बायको चालत जायची. माझ्या आई-वडलांना असं वागताना मी कधी बघितलेलं नाही. शोभाचे आई-वडीलही असे नव्हते.

102) नातेवाचक शब्द स्त्रीच्या संदर्भात अधिक आहेत. उदा. जाऊ, नणंद, भावजय, वहिनी वगैरे. पुरुषांची नाती वर्णन करण्याचे शब्द त्या तुलनेत कमी आहेत.

103) काही क्लब्जमधे स्त्रियांना मोफत प्रवेश असतो. पुरुषांना फी असते. ही असमानताच नाही तर विकृतीही आहे.

104) उच्च शिक्षणाच्या प्रवेशांच्यात पुरुषांचं प्रमाण अधिक असतं. ही असमानता असली तरी आता असं प्रमाण झपाट्यानी बदलतंय. ‘मुलींनी काय करायचं शिकून’ असं म्हणण्यापासून आपला समाज इथपर्यंत पोहोचला हेच फार झालं. अजूनही बायकांनी नोकरी, व्यवसाय करण्याविषयी जास्त पुरुषांचं मत असंच असतं की, स्त्रियांनी घरचं सगळं सांभाळून काय ती कामं करावीत.

आम्हाला दोघांनाही वाटतं की जोडीदार निवडताना करिअर करू पाहणाऱ्या मुलींनी मुलाच्या घरातल्या धार्मिक परंपरांची माहिती जरूर विचारावी. जात, धर्म याविषयीची मतंही विचारावीत. कारण नाहीतर करिअरिस्ट मुलगी हवी म्हणता म्हणता ती एकदा घरातली सून झाली की गौरी, गणपती, नवरात्र सगळं करेलच, हे गृहीत धरलेलं असतं. हा मोठा धोका असतो!

105) अनेक घरांच्यात घराच्या किल्ल्या पुरुषाच्या खिशात असतात. ही असमानता आहे हे नक्की, पण त्याची कारणंही स्पष्ट दिसतात. पुरुषाच्या पोषाखाला खिसे असतात. शिवाय महत्त्वाची वस्तू सांभाळून ठेवण्याची सवय आनुवंशिकतेनी पुरुषाला जास्त आहे. आमच्या घरी आम्हा दोघांकडे किल्ली असते. शोनील आणि आभा अविवाहित तरुण वयात आमच्या बरोबर राहायचे तेव्हा त्यांच्याकडेही घराच्या किल्ल्या असायच्या.

106) घरातल्या तिजोरीच्या किल्ल्या मुख्य स्त्रीकडे असतात असा रिवाज आहे. अशा तिजोरीत दागिने असतात. अप्रत्यक्षपणी त्याचा अर्थ त्या स्त्रीनी घरातून बाहेर न पडण्याची व्यवस्था असा व्हायचा.

107) पहाटे उठून कचराकुंड्यांतले कागद गोळा करणाऱ्या स्त्रिया किंवा छोटे मुलगे असतात. तरुण, मध्यमवयीन पुरुष हे काम करत नाहीत.

108) चोरांच्यात पुरुषांचं प्रमाण बायकांपेक्षा फार असतं. या विषयात बायकांची हळूहळू प्रगती होतेय. काही वर्षांनी ही असमानता दूर होऊन सगळे मिळून थैमान घालतील.

109) जगभरच्या, भारतातल्या आकडेवारीत असं आढळतं की, पंच्याण्णव टक्के गुन्ह्यांमागे पुरुषांचाच हात असतो. गुन्हेगारी टोळीचं पुढारीपण स्त्रीकडे फारच क्वचित असतं. फुलनदेवी हा एकच ठळक अपवाद आठवतो.

110) डोंबाऱ्याच्या खेळात तोल सांभाळणं, लवचिकतेचे खेळ हे स्त्रियाच करतात. स्त्रिया निसर्गतः जास्त लवचिक, चिवट, काटक, सहनशील असतात असं म्हणतात. मला स्वतःला असंच आढळलं आहे. स्नायूंची ताकद आणि आकार या एकाच बाबतीत निसर्गाची पुरुषाला देणगी आहे.

111) जवळजवळ पंच्याण्णव टक्के महाराष्ट्रीय जोडप्यांच्यात नवरा बायकोला ए म्हणतो आणि बायको नवऱ्याला अहो म्हणते. नवऱ्याचं नावसुद्धा या बायका शक्यतोवर घेत नाहीत. मुलंदेखील आईला ए म्हणतात, नावानी हाक मारतात. वडलांना अहो बाबा म्हणतात. आजकाल काही ठिकाणी ए बाबाही म्हणतात. आधीच्या टप्यात याचा उल्लेख झाला आहे.

112) सध्याच्या शहरी, सुशिक्षित, सुसंस्कृत, आधुनिक घरात लहान मुलं-मुली वडलांना बिलगतात. त्यांच्या मांडीवर बसतात. रात्री बाबांजवळ झोपतात देखील. 25 वर्षांपूर्वी परिस्थिती अगदी निराळी होती. पुरुष स्वतःच्या मुलांनाही घ्यायचे नाहीत. रात्री शेजारी झोपण्याचा तर प्रश्नच नसायचा.

113) सार्वजनिक उल्लेखात, पत्रव्यवहारात, पुरुषांचा श्रीयुत असा उल्लेख करतात. श्रीयुत शब्दामुळे अविवाहित, विवाहित, विवाहित घटस्फोटित, विधुर काही कळत नाही. स्त्रीचा उल्लेख मात्र कुमारी, सौभाग्यवती असा करतात आणि नवरा हयात नसलेल्या स्त्रीचा उल्लेख श्रीमती करतात. गेली 10-15 वर्षं यामधे हळूहळू बदल झालेला आहे. वयाचा, अविवाहित-विवाहित, नवरा हयात आहे की नाही या गोष्टींचा विचार न करता सरसकट सगळ्या स्त्रियांचा उल्लेख श्रीमती असा करतात. श्रीयुतचा संक्षेप श्री. तसा श्रीमतीचा संक्षेप श्रीम. असा पण करतात. हा बदल मान्य नसलेलेही खूप जण आहेत. माणसाच्या वागण्यावरून, लिहिण्यावरून स्त्री-पुरुष समानतेविषयीची त्याची कल्पना येते. मागे आपण

म्हणालो तसे पुरुषप्रधान पुरुष असतात तशा पुरुषप्रधान स्त्रिया असतातच की!

114) सर्वसाधारण भारतीय स्त्री-पुरुषांना स्त्री-पुरुष समानता या विषयाचं ज्ञानही कमी असतं आणि भानही कमी असतं. निरनिराळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या हुशार, विद्वान आणि यशस्वी स्त्रिया बऱ्याच आहेत. पण कुठच्याही कार्यक्रमात व्यासपीठावर बघावं तर सगळी पुरुषांचीच मक्तेदारी. एकाच कार्यक्रमासाठी बोलावलेल्या व्यक्तींपैकी पुरुष व्यासपीठावर आणि त्याच योग्यतेच्या स्त्रिया खाली सभागृहात असंही दृश्य मी बघितलेलं आहे. मुख्य म्हणजे यामधे कोणाला काही चुकीचं वाटतच नव्हतं.

115) स्त्रीवादाचं टोक गाठणाऱ्या स्त्रियाही माझ्या माहितीत आहेत. एखाद्या विषयाचा अभ्यासक असल्यामुळे सामाजिक संस्थेमधलं प्रमुख पद पुरुषाला दिलेलं खपलं नाही अशाही स्त्रीवादी संस्था मी बघितल्या आहेत. प्रत्यक्षात रास्त भूमिका काय असावी याबद्दल माझं, शोभाचं आणि जीवनसाथचं म्हणणं असं आहे की, पुरुषांना पुरुष असल्याचा अहंगंड नको आणि स्त्रियांना स्त्री असल्याचा न्यूनगंडही नको.

116) विवाहबाह्य मैत्री – माझं आणि शोभाचं दोघांचंही असं मत आहे की, लग्नापूर्वी मुलग्याला मैत्रिणी आणि मुलीला मित्र जरूर असावेत. त्यामुळे पुरुषाला स्त्रीच्या मनाचं ज्ञान होतं आणि मुलीला पुरुषांच्या मनाचं ज्ञान होतं ते महत्त्वाचं आहे. या प्रक्रियेत कोणावर एकतर्फी प्रेम बसलं, एखाद-दुसरा प्रेमभंग झाला की विचार आणखी प्रगल्भ होतात. पुढचा प्रश्न असा असतो की, लग्नानंतर जोडीदाराव्यतिरिक्त इतर भिन्नलिंगी व्यक्तींबरोबर मैत्री असावी का? यालाही आमचं उत्तर होकारार्थीच आहे. अशा मैत्रीमुळे विचार आणखी प्रगल्भ होतात अशी आमची खात्री आहे. शोभाचे आणि माझे, दोघांचे काही मित्र आणि मैत्रिणी आहेत. आमची दोघांची त्यांच्याशी मैत्री असली तरी त्यातल्या काही स्त्रियांची माझ्याशी जास्त मैत्री आहे आणि त्यातल्या काही पुरुषांची शोभाशी जास्त मैत्री आहे.

117) सर्वसाधारण पुरुषांना स्त्री शरीराविषयी, स्त्रीच्या चेहऱ्याच्या सौंदर्याविषयी जेवढं आकर्षण असतं अशी माझी कल्पना आहे त्यापेक्षा मला जास्त आकर्षण वाटतं हे प्रथम सांगतो. माझ्या तुलनेत शोभाला पुरुषाच्या चेहऱ्याचं सौंदर्य आणि शरीरसौंदर्याविषयी एवढं आकर्षण वाटत नाही. शोभाला माझ्याशी लग्न करावंसं वाटलं ते माझ्या विचारांमुळे, समानतेच्या, न्यायपूर्ण

वागणुकीच्या आग्रहामुळे. समाजासाठी काहीतरी विधायक काम करण्याच्या माझ्या ध्येयांमुळे.

माझ्या तरुणपणी मी पिळदार शरीराचा, भक्कम शरीरयष्टीचा होतो त्याचं शोभाला काही महत्त्व नव्हतं. शोभाच्या तुलनेत माझा चेहरा सामान्य होता. त्याचंही तिला महत्त्व नव्हतं. हे सगळं मी अशासाठी सांगतोय की, लग्न करणाऱ्या स्त्री-पुरुषांची 'सेक्स पर्सनॅलिटी' पूर्ण निराळी असू शकते आणि तरी देखील भारतीय संस्कारांच्यामुळे लग्नापूर्वी हा व्यक्तिमत्त्वामधला भाग तपासणं अशक्य असतं.

योगायोगानी जे एक स्त्री – एक पुरुष विवाह बंधनात अडकतात, ते आयुष्यातल्या या महत्त्वाच्या भागाविषयी काही माहिती नसताना जुगार खेळतात. इतरांशी सोडाच, एकमेकांशीसुद्धा याविषयी काही बोलता येत नाही. विवाहबाह्य लैंगिक संबंधाविषयी एकमेकांची भूमिका काय आहे हे विचारणं तर थेट अशक्यच समजायला हवं. कारण लग्न याच्या अर्थामधे तीन महत्त्वाच्या गोष्टी सामावलेल्या असतात. त्या म्हणजे –

1) नफा होवो, तोटा होवो, यापुढे पैशाची समान भागीदारी असेल.

2) एकमेकांव्यतिरिक्त कोणाशी लैंगिक संबंध ठेवणार नाही.

3) दोघांनी मिळून मुलांची जबाबदारी पार पाडायची आहे.

यातल्या परस्त्री-परपुरुषाबरोबर लैंगिक संबंध हा विषय भावनेच्या प्रांतातला क्रमांक 1 चा विषय असतो. बाहेरख्यालीपणा नवऱ्याला किंवा बायकोला चालत नाही. या कारणावरून अनेक घरं दुभंगलेली आहेत. हा मुद्दा सिद्ध झाला तर कोर्टातर्फे घटस्फोटही मिळू शकतो, हे खरं आहे.

पूर्वीच्या काळी फक्त पुरुषाला पत्नीव्यतिरिक्त इतर बायकांशी लैंगिक संबंध ठेवण्याची परवानगी होती. त्यांना अंगवस्त्र असा शब्द होता. जेवढी जास्त अंगवस्त्रं तेवढा समाजात जास्त मान असायचा. पूर्वी राजे, संस्थानिक वगैरे राजकीय धोरण म्हणून एकापेक्षा अधिक बायका करायचे. त्यावरून बहुधा राजाच्या अनुकरणाची ही पद्धत रूढ झाली असावी.

पूर्वी एवढी मुक्तता होती तरीही हळूहळू घोटाळे होत गेले. लग्नाआधी एखाद्या कुमारिकेला गर्भ राहिला तर समाज तिला नावं ठेवायला लागला. या कारणानी लोक तिचा छळ करायला लागले. घरात, घराबाहेर तिला वाईट वागणूक मिळायला लागली. या छळाच्या भीतीनी अनेक कुमारी माता जन्मलेलं

मूल टाकून देतात. ठिकठिकाणच्या अनाथालयात अशी मुलं वाढतात. अनाथालयांची संख्या आणि त्यात असणाऱ्या मुलांची संख्या ही आपल्या समाजातल्या परिस्थितीचा आरसाच आहे.

मी जेव्हा आखाती देशात होतो तेव्हा माझ्यासमोर ते मोठं कोडं होतं. मी शोभाला कळवलंही होतं की, तेवढ्या काळापुरतं लैंगिक स्वातंत्र्य आपण एकमेकांना देत आहोत. शोभाचा स्वभाव निराळा होता. त्यामुळे तिच्या बाबतीत ती शक्यता कमी होती. प्रत्यक्षात असं झालं की तशी गरजच नाही पडली. दर एक-दीड महिन्यानी शोभा माझ्याकडे किंवा मी भारतात चक्कर मारायचो आणि दर काही महिन्यांनी आम्ही भेटायचो. या सगळ्यातला महत्त्वाचा मुद्दा स्त्री-पुरुष समानता हा आहे. बंधन असो किंवा स्वातंत्र्य असो, त्यात स्त्री-पुरुष असमानता असता कामा नये.

त्रयस्थ नजरेनी स्त्री-पुरुषांकडे बघितलं तर असं दिसतं की स्त्रीची देण्याची, त्यागाची जास्त प्रमाणात इच्छा असते आणि पुरुष घ्यायला सोकावलेला आहे, पण घेण्याची कलाही त्याला अवगत नसते.

118) केवळ पुरुषांचे क्लब्ज असतात. पण त्यामानानी स्त्रियांची महिला मंडळं जास्त प्रमाणात जास्त संख्येनी असतात. यातलं कोणीच फारसं अर्थपूर्ण काम करताना दिसत नाहीत. पण पुरुषांच्या क्लब्जच्या तुलनेत बायका सामूहिक पुस्तक-वाचन वगैरे करून थोडा आयुष्याच्या अभ्यासाचा तरी प्रयत्न करतात.

119) रोटरी, जेसीज, लायन्स वगैरे क्लब्ज सगळे प्रथम पुरुषांसाठी स्थापन झाले. खूप उशिरा जाग आल्यावर त्यांनी स्वतःच्या बायकांचा निराळा विभाग चालू केला. मग मुलांसाठीचा स्वतंत्र विभाग सुरू केला. या सगळ्यात मी आणि शोभानी काही काळ भाग घेतला होता. आम्हाला तरी अशा सगळ्या क्लब्जमधे स्त्री-पुरुष असमानता भरपूर प्रमाणात दिसते.

सारांशात सांगायचं तर स्त्री-पुरुष समानता मोजायचा, अंदाज घ्यायचा प्रयत्न करायचा तर 5 गोष्टी अभ्यासाव्या लागतात. शिक्षण, आरोग्य, रोजगार, निवारा आणि संपत्ती. या पाचही गोष्टींच्या बाबतीत भारत आणि महाराष्ट्र परीक्षेला बसला तर सध्या तरी त्यांना नापासांच्याच यादीत टाकावं लागेल.

पुरुष आपल्या ताकदीच्या जोरावर स्त्रियांशी वाईट वागतात त्याबद्दल आमीर खानचा 'सत्यमेव जयते' कार्यक्रम होता. त्यात एका कार्यक्रमात अमिताभ बच्चनला बोलावलं होतं. त्यांनी त्याच्या खास शैलीमधे हिंदीत एक महत्त्वाचा

संदेश दिला. 'ताकदको मोहब्बत मत बताओ । मोहब्बतको ताकद बनाओ ।' ते खूप महत्त्वाचं आहे.

120) हिंदूंच्यात स्त्रियांना स्मशानात प्रवेश नसतो. आभाची सासू वारली तेव्हा आभानी हे बंधन पाळलं नाही. स्मशानात इतर पुरुषांबरोबर ती एकटी स्त्री हजर होती. शोभाही काही वेळा स्मशानात गेली आहे.

●

6) लग्न ठरवतानाची असमानता

असं दिसतं की लग्नाव्यतिरिक्तच्या विषयात एरवी समानतेनी वागणारे स्त्री-पुरुष लग्न ठरण्याचा विषय निघाला की एकदम निराळी माणसं बनतात. 'लोकशहा' असलेले आईवडील एकदम 'हुकूमशहा' बनतात. असमानता उग्र स्वरूप धारण करू शकते. माहिती कोणी कोणाला पाठवायची, आधी का नंतर, फोटो कोणी, केव्हा पाठवायचा, बैठक कुठे, कोण हजर, या सगळ्या बाबतीतल्या परंपरा तर स्त्री-पुरुष असमानतेनी काठोकाठ भरल्यायत. लग्नाची जरूर फक्त स्त्रियांनाच आहे जणू. आपण स्वतः स्वतःच्या लग्नासाठी याबाबतीत कसे वागतो आहोत, हे प्रत्येक कुटुंबाला तपासता येण्यासाठी हा अभ्यास आहे.

विवाहाच्या कायद्याच्या इतिहासाकडे प्रथम जरा लक्ष देऊ. अठरा वर्षापर्यंत स्त्रीच्या शरीराची पूर्ण वाढ झालेली नसते हे आधुनिक वैद्यकशास्त्रानी निर्विवाद सिद्ध केलं. भारतातल्या हजारो वर्षांपासून चालत आलेल्या आयुर्वेदाला ही गोष्ट माहिती नव्हती हे अशक्य आहे. परंपरेमधे असलेले बालविवाह बघितले तर लग्नानंतर पाळी येईपर्यंत बहुतेक मुली काही प्रमाणात सासरी आणि जास्त प्रमाणात माहेरी असायच्या. पाळी साधारण 10-12 वर्षांच्या मुलीला यायची. मुलं देखील 13-14 व्या वर्षापासून व्हायची. संततिनियमन नसल्यामुळे 18 वर्षांपर्यंत कित्येक मुली 2-3 मुलांना जन्मदेखील द्यायच्या. या काळात आई आणि तिचं मूल दोघांचंही मृत्यूचं प्रमाण फार होतं. शेवटी मुलीचं विवाहासाठीचं कमीत कमी वय 18 पूर्ण असा कायदा झाला.

पुरुषाला काही मुलाला जन्म द्यायचा नसतो. पण कामधंदा, चरितार्थ चालवण्याची जबाबदारी असते. त्यामुळे पुरुषाचं विवाहासाठीचं वय कमीत कमी 21 असा कायदा झाला. ही चरितार्थ सांभाळण्यातली असमानता कायद्याच्या तर्काला मान्य होती. भविष्यात सामाजिक परिस्थिती जशीजशी बदलेल तसे एक-दोन दशकात हा कायदा बदलण्याचीही शक्यता आहे. मुलगा, मुलगी दोघांचंही वय एकसारखंच असावं असं माझ्यासकट अनेकांना वाटतं. 20 वयाला सर्वांत जास्त पसंती निरीक्षणात दिसते.

बाकी इतर तपशिलांच्यात आपण शिरूच, पण या बाबतीत सगळ्यांच्या

मानगुटीवरचं सर्वांत मोठं भूत म्हणजे 'हुंडा'. त्याविषयी प्रथम बोलूया. लग्नाचा खर्च मुलीकडच्यांनी करायचा ही रूढीदेखील इतकी पक्की आहे की, ही रूढी असमानतेची आहे हा विचारसुद्धा लोकांना सुचत नाही. 'आमची काही अपेक्षा नाही पण तुम्ही तुमच्या मनानी शोभेल असं लग्न करून द्या म्हणजे झालं.' हे वाक्य तुम्ही शेकडो वेळा ऐकलेलं असेल. मी कमी वेळेला ऐकलंय. कारण अशा बोलण्याच्या वेळेला मी आसपास कुठे नाही ना अशी खात्री करून घेऊन लोक बोलतात. या वाक्याचा अर्थ असा आहे की, आम्ही आमच्या तोंडानी हुंडा मागणार नाही, पण तुम्ही आपणहून हुंडा द्या. कारण हा हुंड्याचाच अप्रत्यक्ष प्रकार आहे.

खरं काय व्हायला हवं त्याबद्दल माझं मत सांगतो. मुलगा आणि मुलगी दोघांनी स्वतःला परवडेल तेवढाच लग्नात खर्च करावा. दोघांनीही आई-वडलांकडून पैसे घेऊ नयेत आणि जो ठरेल तो खर्च निम्मा निम्मा वाटून घ्यावा. शून्य खर्च शक्य नाही. कारण नोंदणी सक्तीची आहे आणि त्याला सध्या शंभर रुपये लागतात. माझ्या मते दोघांनी तो खर्च 50-50 रुपये करून मामला खलास करावा.

हुंडा या संकल्पनेसंबंधी लग्न ठरवण्याच्या प्रक्रियेत आधी किंवा लग्नाच्या वेळेला मुलीच्या घरून मुलाकडे देण्याच्या रकमेला आपण हुंडा म्हणतो. ज्या समाजाबद्दल आपला अभ्यास आहे, तिथे मुलानी मुलीला हुंडा देण्याची पद्धत नसल्यानी त्याविषयी आपण आता बोलत नाही आहोत. असा हुंडा एकरकमी चेकनी किंवा रोखीत दिला तरी तो हुंडाच. तो दागिन्यांच्या, घराच्या, वस्तूंच्या स्वरूपात दिला तरी तो हुंडाच. मुलीच्या घरून मुलाच्या घराकडे कुठच्याही स्वरूपात 'धन' जात असेल तर तो हुंडाच. ही हुंड्याची रक्कम हप्त्यानी दिली जात असेल तरी तो हुंडाच. ही हुंड्याची रक्कम हप्त्यानी दिल्यामुळे त्याचा 'हुंडा' पणा माझ्या दृष्टीनी कमी होत नाही.

साखरपुडा झाला की ताबडतोब मुलगे निर्लज्जपणी सूचित करतात की मला आता नवी मोटरसायकल घेऊन द्या. आधीची जुनी झालीय. 'लग्न झाल्यावर जुन्याच जागेत राहण्यापेक्षा नवीन फ्लॅट घेणार आहोत. जरा पैसे जमले की!' यातल्या 'जरा पैसे जमले की'चा अर्थ मुलीकडच्यांनी ओळखायचा.

जीवनसाथ अभ्यास मंडळात एखादं विधान किंवा एखादा प्रसंग सांगून त्यावर चर्चा करण्याचे खेळ असतात. त्यातला एक गटचर्चेचा विषय सांगतो.

‘एका मुलाचं आणि मुलीचं लग्न ठरलेलं आहे. लग्नाला 1 महिना अवधी आहे. मुलगा मुलीला सांगतो की, जिथे फ्लॅट बुक केला आहे तिथे दोन लाख रुपये भरायला पाहिजे आहेत. तात्पुरते दोन लाख मिळतील का, ते वडलांना विचार. पूर्वीच हुंडा नको यावर एकमत झालेलं असल्यामुळे हुंड्याचा प्रश्नच नाही. जमेल तेव्हा हे पैसे नक्की परत करणार.’

आत्तापर्यंत 8-10 वेळा तरी हा विषय गटचर्चेला टाकला आहे. सगळे मिळून अर्धा-पाऊण तास चर्चा करतात, पण शेवटी निष्कर्ष एकच. हा हुंड्याचाच प्रकार आहे. समजा, मुलीकडच्यांकडे दोन लाख रुपये देण्याजोगे असले आणि ते दिले तरी ते परत मिळण्याची शक्यता फारच कमी वाटते. पुढे काय होणार ते अगदी स्पष्ट दिसतं. आपल्याच मुलीला आणि जावयाला ते पैसे दिल्यामुळे वडील ते मागणार नाहीत आणि जावई पैसे परत करण्याचं नावही काढणार नाही.

हुंडा हा शब्द न वापरता मुलीच्या वडलांकडून ज्या निरनिराळ्या कारणांनी लोकं पैसे घेतात त्यापैकी क्र.1 चं कारण म्हणजे नवा फ्लॅट घेणं. क्र.2ची त्याखालोखाल वापरात असलेली कल्पना म्हणजे मुलाच्या शिक्षणाला झालेला खर्च किंवा शिक्षणासाठी परदेशात पाठवायचं आहे त्याला होणारा खर्च. जागा आणि शिक्षण याचे आकडे मोठे असतात. त्या खालोखाल महागाची गाडी, फ्रीज, वाशिंग मशीन वगैरेचा नंबर लागतो. याखेरीज स्वतंत्रपणी घातलेली दागिन्यांची अट असते. अमुक तोळे दागिने मुलीच्या अंगावर घालणार अशा बोल्या होतात. ते शब्द पाळण्यात काही गैरसमजूत झाली तर त्यावरून पुढे भांडणंही होतात.

जीवनसाथमधे अविवाहित, विवाहित सगळ्या प्रकारची लोकं गटात किंवा वैयक्तिक समुपदेशनासाठी येतात. त्यातून स्थळं बघतानाचे अनेक किस्से कळतात. अनेक वेळा मुलाची बहीणच बोलते मुलीकडच्यांशी. मुलगा आतल्या खोलीत बसलेला असतो. तो बाहेर येतच नाही. बहीण किंवा आई सांगते तो धर्मेंद्रसारखा आहे, त्याला गाण्याची आवड आहे वगैरे. मुलगी मनात म्हणत असते की, त्या धर्मेंद्रला म्हणावं जरा समोर तर ये, पण तो ‘खूप कामात’ असल्यामुळे आता येऊ शकत नाही असं खुशाल सांगतात. आई, बहीण यांच्यात खाणाखुणा होऊन प्राथमिक फेरीत मुलगी उत्तीर्ण झाली तर बहीण आत जाऊन सांगते आणि मग धर्मेंद्र मेहरबानी केल्यासारखा 10 मिनिटं येऊन पुन्हा

कामासाठी बाहेर जातो.

एके ठिकाणी मुलाच्या आईनी सरळच मुलीकडच्यांना विचारलं किती खर्चाची तयारी आहे ते. मुलीकडचे म्हणाले, 5 लाख. मुलाची आई म्हणाली, 10 लाखाची तयारी असली तर जुळेल. सौदा फिसकटला असं ठरल्यावर मुलीकडचे जायला निघाले. जिना उतरताना मुलाच्या आईनी सांगितलं,'बरं, 8 लाख जमत असले तर बघा!' शेवटी म्हणे साडेसहा लाख दोन्हीकडून मान्य असं ठरलं.

नुकतीच बातमी वाचली की उत्तर प्रदेश सरकारनी हुंडा न घेण्याचं प्रतिज्ञापत्र करण्याची मुलग्यांना सक्ती केलीय. चांगलं वाटलं. महाराष्ट्रातही तसं लवकरच होईल अशी आशा आहे.

लग्नानंतरचं पहिलं बाळंतपण माहेरी ही कल्पना सोयीची म्हणून अमलात आणायला हरकत नाही. पण त्याचा खर्च माहेरच्यांवर टाकण्याचा बेत म्हणजे हुंडाच. दिवाळसणासाठी मुलीकडून मुलाच्या घरी स्कूटर किंवा कार आली काय, रोख आली काय एकच. मुलीकडच्या शेतावरून दाण्याचं, गव्हाचं पोतं गेलं तरी माझ्यासारख्या अभ्यासकाच्या दृष्टिकोनातून मुख्य मुद्दा आहे तो निराळाच. ज्या वस्तूला, पैशाला 'मुलीकडून मुलाकडे' अशी 'वन-वे'ची पाटी लावली असेल तो हुंडाच. मुलगा आणि मुलगी दोघं एकमेकांकडे भेटी पाठवत असतील तर आपली हरकत नाही.

आता याच सूत्राचा वापर करून मिळवत्या बायकोचा विचार करूया. जो मुलगा समानतेच्या कल्पनेतून मिळवती बायको असावी असं म्हणत असेल, त्याचं या इच्छेबद्दल आपल्याला कौतुक आहे. कारण मिळवती असेल तर त्या मुलीला घरात सन्मान, स्वातंत्र्य, नवऱ्याकडून सहकार्य मिळण्याची शक्यता जास्त आहे. सन्मान आणि स्वातंत्र्याशिवाय निव्वळ पैसे मिळविणारी व्यक्ती म्हणून कोणाला मिळवती बायको हवी असेल तर आयुष्यभर चालू असलेल्या हप्त्यांनी हुंडा असाच माझ्या दृष्टीनी त्याचा अर्थ होणार.

इथे जमलेल्यांपैकी अनेकांना माझ्या या विधानानी माझा राग येऊ शकेल. ज्यांचं आधीच लग्न झालं आहे त्यांना यापुढे कुठचीही सुधारणा करता येईल. अविवाहितांनी जास्त विचार करून अनेक बारीक गोष्टी ठरवल्या तर त्यांना फायदा होईल. आता आपण या टप्प्यातल्या तपशिलाकडे वळू.

अजूनही नव्याण्णव पूर्णांक नव्याण्णव टक्के लोकांच्या डोक्यात मुलगा

वयानी मोठा असावा हे पक्कं असतं. याच पुस्तकसंचात लग्नाचं योग्य वय नावाचं प्रकरण आहे त्यात सविस्तरपणी हा विषय मांडलेला आहे. माझं आणि शोभाचं याबाबतीत पक्कं मत आहे की, मुलगा-मुलगी आसपासच्या वयाचे असावेत. वैवाहिक आयुष्याची समज या विषयाची प्रगल्भता जुळण्याला जास्त महत्त्व आहे. ती जुळण्यासाठी 4-5 वर्षं इकडेतिकडे असली तरी चालतात. मुलगा मोठा का मुलगी मोठी, याला काही महत्त्व नाही. आमच्या घरात मी शोभापेक्षा 3 वर्षांनी मोठा आहे. ॲनस्तेसिया शोनीलपेक्षा 4 वर्षांनी मोठी आहे. आणि आभापेक्षा श्रेयस 5 वर्षांनी मोठा आहे. आता आपण या टप्प्यातली असमानतेची रूपं बघू.

1) मुलग्याचे फक्त पैसे बघणं, रूपाकडे दुर्लक्ष, गुणांकडे, स्वभावाकडे दुर्लक्ष करणं – हा विचार मुळात अगदी तोकडा आहे. खाण्या-पिण्याच्या सगळ्या गरजा पूर्ण झाल्या की तपासण्याची सगळी यादी संपली असा याचा अर्थ होतो. त्याशिवाय यात पारंपरिकता आहे, असमानता आहे. मी आणि शोभा दोघंही अशा इतक्या तोकड्या विचाराच्या विरुद्ध आहोत. शोनील-ॲनस्तेसिया, आभा-श्रेयस सगळेच विरुद्ध आहेत.

2) मुलीचं फक्त रूप बघून निर्णय घेणं – एके काळी असंच चालायचं. मुलीला मागणी येणं म्हणजे मुलीचा आणि तिच्या कुटुंबाचा बहुमान समजायचे. मागणी याचा अर्थ हुंडा मागायचा नाही. पण अशी मागणी येणाऱ्या मुली 10,000 मधे एक. बाकीच्यांचं काय? मध्यम रूप असलं तर मध्यमवर्गीय, जेमतेम वकूबाच्या मुलाची अपेक्षा धरायची. प्रत्यक्षात काय होईल ते नशीब समजायचं. मी आणि शोभानी एकमेकांशी लग्न ठरवलं तेव्हा आम्ही एकमेकांच्या रूपाचा विचार केला होता. मी अमेरिकेत नोकरी करत असल्यामुळे पैशाची काळजी नाही अशी सगळ्यांची कल्पना होती, पण आमचं कुटुंब आणि मी श्रीमंत नाही हे शोभाला माहीत होतं. तिच्या घरच्यांनादेखील माहिती होतं.

आणखी एक गोष्ट अगदी सर्रास आढळते. भारतीय लोकांच्यात गोरा, निमगोरा, सावळा, काळा आणि काळा ढुस्स एवढे त्वचेचे रंग बघायला मिळतात. जोडप्यांची पाहणी केली तर मुलगी गोरी आणि सावळा किंवा काळा मुलगा अशी लग्नं होताना दिसतात. हा ज्याच्या त्याच्या पसंतीचा प्रश्न आहे हे पूर्णपणी मान्य आहे, पण सरासरीचं वर्णन असं असतं. कामाच्या विभागणीमुळे पुरुष उन्हात जास्त रापतात. स्त्रिया त्या तुलनेत घराबाहेर, किंवा उन्हात कमी

वावरतात. त्यामुळे असं असेल. आमच्याकडे मी निमगोरा, शोभा सावळी, शोनील निमगोरा, ॲनस्तेसिया गोरी, आभा आणि श्रेयस दोघंही गोरे असं आहे.

लग्नाच्या वयातल्या मुलीबद्दलच्या अपेक्षा या शब्दात वर्णन करतात – सडपातळ, उंच, देखणी, गोरी. यापुढे चक्क म्हणतात की, 'युवर फेस इज युवर फ्यूचर'; तुमचा चेहरा म्हणजे तुमचं भविष्य. सौंदर्याच्या इच्छेबद्दल, अपेक्षेबद्दल कोणी हरकत घेऊच शकत नाही. सबंध महाराष्ट्र, सबंध भारत, आख्खं जग सुंदर स्त्री-पुरुषांनी नटलेलं असतं तरी छान झालं असतं, पण ते शक्य नाही ना!

3) उंच मुलींना जोडीदार शोधताना उंच मुलग्यांपेक्षा जास्त अडचणी येतात – आमच्या ओळखीत खरोखरच अशा मुलींना जास्त अडचणी येतात असं दिसतं.

4) मुकाटपणी ऐकून घेणारी बायको मुलगे शोधायचा प्रयत्न करतात – स्त्री पुरुष समानतेच्या दृष्टिकोनातून हे फार गंभीर आहे. मानसशास्त्रीय अंगानी याचा विचार केला तर मुलगा अशी मुलगी शोधत असतो की जिचं कशाविषयी काही म्हणणं नसेल.

आई-वडील मुलीला असं शिकवायचा प्रयत्न करतात की तिला कसलीच आवडनिवड नसावी. कुठच्याही कुटुंबात गेली तरी तिनी त्या कुटुंबाच्या रंगात मिसळून गेलं पाहिजे. प्रत्यक्षात या वर्णनाची व्यक्तीच नसते. मुलगा नाही आणि मुलगी नाही. माझा आणि शोभाचा एकमेकांना समजून घेण्याचा साधारण एक वर्ष प्रयत्न चालू होता. तेव्हा मी 24 वर्षांचा आणि शोभा 21 वर्षांची होती.

मला मुकाटपणी माझं ऐकून घेणारी मुलगी नको होती. शोनील-ॲनास्तेसिया आणि आभा-श्रेयस हे पण कोणी असे नाहीत. महाराष्ट्रातल्या छोट्या शहरात कनिष्ठ मध्यमवर्गीयांमधल्या मुली जोडीदाराबद्दल अपेक्षा सांगत होत्या,'काही अपेक्षा नाही. दोन वेळा जेवायला घातलं की पुरे.' हे ऐकलं की प्रश्नच पडतो. आपल्या आयुष्याकडून फार अपेक्षा आहेत याची प्रकर्षानी जाणीव होते. छोट्या शहरात ही स्थिती तर आणखी छोट्या गावात काय असेल?

5) हौस म्हणून वधू-वर सूचक मंडळ चालवणारी बरीच लोकं असतात. हौसेनी याचा अर्थ विनामोबदला. अश्यांमधे नव्याण्णव टक्के स्त्रियाच असतात. अगदी क्वचित नवरा-बायको मिळून काम करतात. पण नवरा त्यात शिरला की तो त्याचा धंदा बनवतो आणि पैशाच्या मागे लागतो.

6) वधू-वर सूचक मंडळांच्यात बऱ्याच ठिकाणी मुलग्यांना फी नसते.

ही कल्पना अगदी चुकीची आणि असमानतेचीच आहे. त्याच्या कारणाचा अंदाज मात्र येऊ शकतो. मुलगे येण्याची किंवा त्यांच्या स्थळाच्या नोंदणीची वधू-वर संस्थेला गरज असते. मुलांची स्थळं असली तर मुलींची नोंदणी होणार हे उघड आहे. आणि वधू-वर सूचक मंडळं हा उघडउघड धंदा असल्यानी त्यांना सगळ्या खटपटी करणं भाग पडतं. आमच्या कुटुंबासमोर हा प्रश्न मात्र कधीच आला नाही.

7) वधू-वर सूचक मेळाव्यांना मुलगे येत नाहीत. त्यांची आई बहुतेक वेळा हजर असते. अगदी संपूर्ण काठोकाठ असमानताच म्हणायची ही. दुसरं काय म्हणणार? पुढची गंमत सांगतो. मेळाव्यामधली एखादी मुलगी आवडली तर आई मुलाला बाजूला जाऊन फोन करते आणि मुलगा मेळाव्यात हजर होऊन त्या मुलीशी बोलतो. सरकारी ऑफिसमधल्या मोठ्या साहेबांचा असिस्टंट पाहणी करणार, मग साहेब येणार, तशीच सगळी अवस्था असते.

आणखी एक गंमत म्हणजे विलायतेहून 3 आठवड्याच्या रजेवर येऊन मुली बघण्याचा कार्यक्रम. 15 दिवसात सकाळ, संध्याकाळ मुलींना वेळा दिलेल्या असतात. तेवढ्या दिवसात मुलगी निवडून, साखरपुडा करून, काही वेळा लग्न करून परदेशात हजर व्हायचं असतं. जी काय धमाल चालते त्याला तोडच नाही. कसला विवाह अभ्यास नि कसलं काय!

8) मुलीकडच्यांनी मुलाच्या घरी चौकशी करायची, खेपा मारायची अशी पद्धत म्हणजे असमानता आहे. एवढंच नाही, तर लग्नाच्या आधीपासून मुलीकडच्या संपूर्ण कुटुंबाचं मानसिक खच्चीकरण करणारी ही पद्धत आहे. आमच्या घरी अशा प्रकारे कोणीच कधी वागणं शक्य नव्हतं. आम्ही लोकं एरवीच्या आयुष्यात देखील अशी वागणूक कोणाला देत नाही. परिचयोत्तर विवाह पद्धतीत दोन्ही कुटुंबांचा सन्मान राखला जातो. याला फार महत्त्व आहे.

9) जीवनसाथनी लग्नाआधी भरण्याची लेखी प्रश्नावली तयार केली आहे. 1997 सालापासून मुलं-मुली ती भरताना मी निरीक्षण केलंय. मुली सरळपणी प्रश्नावली भरतात. त्या तुलनेत मुलगे उत्तरं लिहिण्याची टाळाटाळ करतात.

10) मुलींना लग्नाची गरज जास्त असं समाजानी समजणं – हे एक जगातलं आश्चर्यच आहे. निसर्गात योगायोगानी जगभरात मिळून साधारण निम्मे पुरुष आणि निम्म्या स्त्रिया जन्म घेतात हे एक आश्चर्य. त्यापुढचंही तेवढंच आश्चर्य आहे की, हे माहिती असून पुरुषांना खरोखरचं वाटतं की स्त्रियांनाच

लग्नासाठी पुरुषाची गरज आहे. आमच्या घरी असा विकृत विचार कधीच कोणी केला नाही.

11) मुलगा आणि मुलगी लग्नाविषयी बोलताना मुलानी त्या संभाषणाकडे गंभीरपणी न बघणं – जीवनसाथ विवाह अभ्यास मंडळ मी 18 वर्षांपूर्वी सुरू केलं तेव्हापासून 'विवाह-अभ्यास' ही कल्पनाच नवीन असल्यामुळे फार लोक इकडे वळायला तयार नव्हते. आणि तरी एक गोष्ट स्पष्ट दिसत होती. मुली या विषयाकडे मुलांच्या तुलनेत जास्त गंभीरपणे बघतायत. हीच नेमकी तक्रार जवळजवळ सगळ्या मुली जवळजवळ सगळ्या मुलांविषयी तेव्हापासून अजून करतायत. लग्नाविषयी बोलताना तेच, संसारात तेच. माझी आणि शोभाची अवस्था अशी नव्हती. आम्ही दोघंही प्रत्येक गोष्ट गंभीरपणीच करत आलो आहोत.

12) अनेक मुलगे लग्न ठरवताना होणाऱ्या बायकोला असं सांगतात, 'माझं काही म्हणणं नाही. तुझं माझ्या आईशी जुळायला हवं.' हे तर असमानतेनी भरलेलं थेट विनोदी वाक्य झालं. लग्न काय मुलाच्या आईशी करायचंय?

13) लग्न ठरवण्याच्या प्रक्रियेत अधिक वेळा भेटायला मुलाचा नकार असणं – जीवनसाथमधे नियमितपणी येणारी अनेक अविवाहित मुलं-मुली आहेत. इतक्या गुंतागुंतीच्या सामाजिक परिस्थितीत मुला-मुलींना एकमेकांच्या डोक्यातले विचार कळायला 6 महिने तरी लागतात, असं नेहमी बोलणं चालतं. त्या सहा महिन्यांत अनेक विषयांविषयी चर्चा होणं माझ्या मते आवश्यक असतं आणि त्यासाठी भेटावं लागतंच. मुलींना हा मुद्दा पटण्याचं प्रमाण जास्त आहे. मुलं मात्र याला तयार नसतात. याचा खरा अर्थ असा असतो की, मुलीचा स्वभाव कसाही असला तरी तिला आपल्या साच्यात ठोकून बसवण्याची मुलांना खात्री असते.

14) विवाह अभ्यास या कल्पनेला मुलांचा नकार, टाळाटाळ असणं – या एका बाबतीतला गेल्या 18 वर्षांतला बदल मी बघितलेला आहे. अगदी सुरुवातीला मुलगे कमी यायचे. या परिस्थितीत बदल झालेला आहे. विवाह अभ्यासाला पर्याय नाही हे समजलेल्या मुलग्यांची संख्या खूप आहे. शोनीलला याचं महत्त्व समजलं आहे आणि श्रेयसला उत्सुकता निर्माण झाली आहे, अशा अवस्थेत आमच्या घरातले पुरुष लोक आहेत.

15) मुलीची माहिती, फोटो आधी पाठवण्याचीच पद्धत रूढ आहे.

मगाशी आपण म्हणालो त्याप्रमाणे लग्न हा विषय निघाला की सगळं बदलतं. कालपर्यंत मुलीचे वडील गुरगुराट करणारा वाघ असतात, ते एकदम शेळी होतात. काही आई-वडलांना आपल्या मुलीनी तिचं तिनी लग्न जुळवलं तर आवडत असतं. पण ते स्पष्ट बोललेलं नसतं. काही काळ वाट पाहून मग ते नाइलाजानी स्थळं बघायला सुरुवात करतात.

सरकारी ऑफिसेसमधे जसा तुम्ही आधी लेखी अर्ज केल्याशिवाय काही चालू होत नाही तसंच मुलीचा अर्ज आधी पोहोचल्याशिवाय पुढे कार्यवाही होत नाही. मी आणि शोभा यांचं लग्न पत्रव्यवहारानी ठरलेलं असल्यामुळे एकमेकांना आम्ही फोटो पाठवले होते, पण माझे फोटो शोभानी आधी बघितले होते. शोनील-ॲनस्तेसिया यांच्यात हा प्रश्नच आला नाही. कारण ते नियमितपणे प्रत्यक्ष भेटत होते. आभा-श्रेयसच्या बाबतीत श्रेयसचे फोटो आभानी आणि आम्ही आधी बघितले होते.

16) मुलीकडच्यांनी मुलाकडे पत्रिका मागायची नाही, असा रिवाज आहे. फक्त मुलीची पत्रिका आधी पाठवायची. मुळात पत्रिका ही गोष्ट योग्य आहे का नाही, हा स्वतंत्र विषय आहे. पण कोणी आधी, कोणी नंतर हा मानापमानाचा आणि असमानतेचा विषय आहे. मुलीनी, म्हणजे मुलीकडच्यांनी मुलाकडच्या लोकांना 'जी हुजूर' म्हणून मुजरा करायचा, असं म्हणणंच बाकी असतं. आमच्या घरी पत्रिका विषयच पूर्ण कटाप केलेला असल्यामुळे कोणाच्याच बाबतीत हा प्रश्न आला नाही.

17) मुलाकडच्यांच्या सोयीप्रमाणे मुलगी दाखवण्याची वेळ ठरवणं – आपण आत्ताच म्हणाल्याप्रमाणे एकदा असमानता मान्य केली की हे ओघानीच येणार. आमच्या घरात ही गोष्ट कायम दोघांच्याच सोयीनी ठरवली गेली.

18) अनेक वेळा मुलीकडून मुलाला नकार दिला जातो. ही गोष्ट मुलाला आणि त्याच्या सबंध कुटुंबाला अपमानास्पद वाटते. छोट्या शहरांच्यात आणखी एक गोष्ट पक्की असते. मुलीनी मुलाला नकार द्यायचाच नाही. मुलगा मुलीला नाही म्हणू शकतो. मुलानी हो म्हटलं, घरच्या लोकांचा सौदा पटला तर मुलीकडचे नकार देऊच शकत नाहीत. मुलीला मुलगा पसंत नसला तरी घरचे लोक तिला ते लग्न करायला भाग पाडतात.

19) लग्नानंतर मुलीचं आयुष्यच संपूर्णपणी बदलतं. मुलगा-मुलगी निराळ्या गावचे असले तर मुलग्याच्या गावी मुलगी स्थायिक होते. कधीकधी

राज्य बदलायला लागतं, देश बदलावा लागतो. आणि एक गोष्ट नव्याण्णव टक्के पक्की असते. मुलगा जिथे असेल तिथे मुलगी राहायला जाते.

20) मुलगी दाखवण्याचा कार्यक्रम मुलीच्याच घरी ठरवणं – ही गोष्ट असमानतेची आहेच, त्याशिवाय तर्कबुद्धीला पटणारी नाही. घर बघणं, त्याची रचना, वस्तू, सोयी बघण्याची कल्पना त्यामागे असती तर मुलाच्या घरी बघण्याचा कार्यक्रम ठरवण्याचा प्रघात असता. एकच शक्यता उरते. पाहुण्यांची सरबराई करण्याचा त्रास आणि खर्च जो व्हायचा तो मुलीकडच्यांचा होऊ दे, असा त्यामागचा अर्थ असणार. आमच्या बाबतीत हे कसलेच प्रश्न आले नाहीत.

21) लहानपणापासून आपण ज्या घरी वाढलो ते घर सोडून लग्नानंतर सासरी राहायला जायचं म्हणजे मुलीच्या मनाला कसं वाटत असेल, ही पुरुषांना कल्पनाच येत नाही. पुरुषांनी मुद्दामून कल्पना करून बघावी की आपल्याला लग्नानंतर सासरी रहायला जायचंय.

22) फक्त मुलाकडच्यांनी मुलीला प्रश्न विचारणं – हे असमानतेचं रूप आहे यात शंकाच नाही. याचा अर्थ फक्त मुलीची परीक्षा असाच होतो. आमच्या घरात अशी गोष्ट घडणं अशक्यच आहे.

23) दाखवण्याच्या समारंभात फक्त मुलीनी मुलाकडच्या सगळ्यांना वाकून नमस्कार करणं. याउलट मुलगा जागच्या जागी बसून राहतो आणि मुलीकडून नमस्कार करून घेतो. आमच्या घरात असली कसलीच गोष्ट घडणं शक्य नाही.

24) आंतरजातीय मिश्रविवाह झाले आणि त्यांना मुलं झाली की त्यांना कौटुंबिक ताणांना तोंड द्यावं लागतं. अशा मुला-मुलींना 'सोडावॉटर', 'कॉकटेल', 'म्युलॅटो' असं काय काय नासमझ लोकं म्हणतात. अशा मुलांना लग्नासाठी स्थळ शोधताना त्रास झाल्याची खूप उदाहरणं आहेत. पण त्यातल्या मुलींना त्रास जास्त होतो. मुलग्यांना तुलनेनी कमी होतो.

25) मुलानी मुलीला लग्न ठरल्याबद्दल साडी देणं – यामधे हुंड्याच्या विरुद्ध गोष्ट घडते, पण त्यामुळे असमानता संपत नाही. दोघांनी एकमेकांना काही वस्तू दिली तरच ती कृती समानतेची ठरू शकते. काहीच दिलं नाही तर सर्वांत चांगलं. आमच्या घरी यातली कुठचीच गोष्ट घडली नाही. मी जसा सगळ्याच देण्या-घेण्याच्या विरुद्ध आहे तशी आणि तेवढी शोभा नाही आणि आभाही नाही. त्यामुळे श्रेयसच्या घरचे आणि आम्ही म्हणजे शोभा यांच्यात काही देणी-घेणी

झाली. पण ती दोन्ही बाजूंनी झाली. स्त्री-पुरुष समानतेचं तत्त्व पाळून सगळे माझ्या मनाविरुद्ध वागले. थोडक्यात, मला गुंडाळलं.

26) लग्नापूर्वी शारीरिक संबंधाला मुलींचा साधारणपणे नकार, मुलगे मात्र उतावीळ, उत्सुक असतात – भारतीय परंपरेत 'योनिशुचिता' याचं महत्त्व खूप सांगितलं आहे. पण 'शिश्नशुचिता' असा विचारही केलेला नाही. अगदी त्याच परंपरेची कास धरून मुलगे वागतात. ही अगदी सरासर असमानता आहे. आमच्या घरातल्या तीनही जोडप्यांच्यात ही असमानता नव्हती.

27) 'लग्नाचं आमिष दाखवून मुलींची फसवणूक' अशा बातम्या आपण वाचतो. मुलगी मुलाला लग्नाचं आमिष दाखवून फसवते, अशी बातमी मी तरी आत्तापर्यंत वाचलेली नाही. अशी उदाहरणं मात्र ऐकलीयत, बघितलीयत की मुलीनी मुलाला जाळ्यात पकडण्यासाठी आपल्याबद्दल मुलाला वाटणाऱ्या आकर्षणाचा उपयोग केला. काही मुली याच हेतूनी लैंगिक संबंध ठेवून 'दिवस गेले' सांगून सापळा रचतानाही आढळतात. ते असमानतेचंच रूप आहे.

28) मुलीकडच्यांनी मुलाला सुटाचं कापड देणं – लग्न ठरल्यावर, पण लग्न होण्याच्या आधी मुलीच्या घरचे मुलाला सुटाचं कापड किंवा सूट भेट म्हणून देतात. मगाशी म्हटल्याप्रमाणे कुठल्याही रिवाजाला मुलाकडूनच किंवा मुलीकडूनच अशी अट लागू झाली की ती असमानताच.

माझी विचार करण्याची, वागण्याची पद्धत शोभाला समजली होती, पण तिच्या घरच्यांना माहीत नव्हती. शोभाच्या आई-वडलांना मला एक सूट किंवा सुटाचं कापड पाठवण्याची इच्छा होती. मी मात्र कोणाकडून काही घेत नसे. अजूनही तेव्हापासून मी भेटवस्तू देणं-घेणं टाळणारा असल्यामुळे स्वतःच्या वस्तू स्वतःच्या पैशानी खरेदी करतो. मुळात मी परदेशात जाताना एक सूट बरोबर नेला होता. तोच मी वापरायचो नाही. या दोन्ही कारणांमुळे मी कोडोलीकर कुटुंबाकडून सूट घेणं शक्य नव्हतं. या गोष्टी आई-वडलांना समजावून सांगताना शोभाची मात्र खूप पंचाईत होत होती.

29) लग्नाच्या बैठकीत पुरुषच बसतात. हुंडा ठरवणं, याद्या करणं या गोष्टीही पुरुषच करतात. काही पिढ्यांपासूनच्या परंपरेमधे बायका शिकलेल्याच नसायच्या. त्यामुळे याद्या पुरुष करायचे. बहुतेक आर्थिक व्यवहार पुरुष सांभाळायचे. हुंडा हा आर्थिक व्यवहार असल्यामुळे तो पुरुष सांभाळायचे. या दोन्ही कृतींमधे असमानता ओतप्रोत भरलेलीच असते. आमच्या घरात हे कसलेच प्रकार होणं

अशक्य होतं.

दोन व्यक्तींनी लग्न करण्याचा निर्णय घेतला की त्याचा खरा अर्थ म्हणजे विश्वास, सामंजस्य, मैत्री, प्रेम, समजून घेणं, शारीरिक आकर्षण आणि स्वभाव समजून घेऊन मध्य काढणं असा आहे. त्यासाठी विवाह अभ्यासाला पर्यायच नाही.

महाराष्ट्रातल्या छोट्या शहरांच्यातल्या गमती मी मघाशी सांगत होतो ना, त्यात एकदा एक मुलगा म्हणाला, 'लग्न म्हणजे इतका विचार करायचा असतो होय? मला वाटत होतं, लग्न म्हणजे घरात कामाला एक बाई आणि मुलं होण्याची सोय.'

भारतात विवाह हा कौटुंबिक निर्णय असतो. त्यामुळे विवाहाची बोलणी सर्वसाधारणपणी दोन्ही कुटुंबातली वडीलधारी माणसंच करतात. ह्यात नेमकं काय काय ठरतं, ते मुलाला किंवा मुलीला माहीतच नसतं. म्हणून आम्हाला असं वाटतं की बैठकीत मुला-मुलींनी आवर्जून हजर रहावं आणि आपली मतं आग्रहपूर्वक मांडून परंपरेत बदल करावा.

परवाच एक गोष्ट माझ्या ऐकण्यात आली. एका बैठकीत मुलाकडच्या लोकांनी अवास्तव मागण्या केल्यावर आर्थिक परिस्थिती नसताना आई-वडील खर्च करायला तयार होते. तरीही त्या मुलीनी लग्न करायला नकार दिला. अशाप्रकारे जर मुला-मुलींनी आपल्या मतावर ठाम रहायचं ठरवलं, तरच हा बदल घडेल.

30) साखरपुड्याच्या आणि लग्नाच्या जेवणाचा मेनू पुरुषच ठरवतात – कार्यालयं चालवणारेही पुरुष, जेवणातले पदार्थ ठरवणारेही पुरुष आणि थाळीच्या पैशाविषयी घासाघीस करणारेही पुरुषच. अगदी म्हणजे अगदी चुकीची गोष्ट आहे ही. आमच्या घरात अर्थात हा प्रश्नच आला नाही. अशा पद्धतीत कार्यालयही घरातले पुरुषच ठरवतात. बस्त्यातही तेच पुढाकार घेतात.

घरातले आईवडील लग्नाच्या वयाच्या मुलींना सांगताना आम्ही ऐकलंय. 'ही स्त्री-पुरुष समानतेची थेरं डोक्यातून काढून टाका. प्रत्येक बाबतीत पुरुषाशी बरोबरी करून तुम्ही आयुष्यातली गंमत घालवून बसता.' मी आणि शोभा म्हणतो, 'गंमत कोणाच्या आयुष्यातली?' अर्थात, पुरुषाच्या.

जोडीदार निवडीमधली स्त्री-पुरुष असमानता कमी करण्यासाठी उपाय आहे. आधीपासूनच पालकांशी मनमोकळी आणि वारंवार चर्चा करावी म्हणजे त्यांची मनोभूमिका तयार व्हायला मदत होईल. निदान एकाच घरात राहून पालकांना आपल्या स्वतःच्या मुलांच्या भूमिकेची कल्पनाच नाही असं तरी होणार नाही.

तुम्हाला स्वातंत्र्यप्राप्तीच्या काळातला टिळक-आगरकर वाद माहिती असेल. टिळकांचं म्हणणं, स्वातंत्र्य आधी. आगरकर म्हणत होते, समाज सुधारणा आधी. आगरकर लग्नं ठरवण्याच्या प्रक्रियेबद्दल म्हणायचे,'पालकांनी मुलांचा विवाह ठरवणं म्हणजे तो बालविवाहच म्हणायचा.'

●

7) प्रत्यक्ष लग्न समारंभातली असमानता

लग्न म्हणजे नुसत्या सह्या करायच्या असल्या तर सह्या नोंदणी कार्यालयात पूर्ण समानतेच्या वातावरणात होतात असं धरून चालायला हरकत नाही. पण त्याच सह्या घरी किंवा कार्यालयात झाल्या तर असमानता त्यात शिरायला लागते. हिंदू लग्नविधींसकट विवाह असला तर स्त्री-पुरुष समानतेचा प्रश्नच उद्‌भवत नाही. कारण हिंदू धर्मात पुरुष श्रेष्ठ हाच पाया आहे.

आभा आणि श्रेयस यांनी 15 वर्षांपूर्वी नोंदणी पद्धतीनी लग्न केलं त्याची गंमत सांगतो. मॅरेज रजिस्ट्रारला घरी बोलवायचं ठरलं. तशी सोय असते. त्याची फी, बक्षिशी मान्य केली. त्यांच्या घरी जाऊन गाडीनी त्यांना आणणं आणि नंतर पोहोचवणं मान्य केलं. इथपर्यंत सगळं ठीक होतं. घरी आल्यावर सरळ झटपट नोंदणी करण्याच्या ऐवजी रजिस्ट्रार स्वतःला पुरोहित समजायला लागला. 'आधी तुम्ही यांना हार घाला' असं आभाला म्हणायला लागला. आम्ही सगळ्यांनी मिळून त्यांना समजावून सांगितलं की, असल्या सूचना न करता निव्वळ नोंदणीवहीत सह्या करून, चहा पिऊन मी त्यांना घरी सोडणार आहे. अगदीच नाइलाजानी त्यांनी ते मान्य केलं. थोडक्यात सांगायचं म्हणजे खुद्द विवाह निबंधक देखील स्त्री-पुरुष असमानतेच्या विळख्यातून बाहेर आलेला नव्हता. आता या टप्प्याच्या तपशिलात शिरूया.

1) लग्न समारंभाचा खर्च मुलीकडच्यांनी करण्याची रीत अर्थातच असमानतेच्या वैवाहिक आयुष्याची सुरुवात करणारी आहे. खुद्द आमच्या घरात हा प्रश्न कधीच आला नाही. पण मला अशी दोन-तीन उदाहरणं माहिती आहेत की जिथे मुलाच्या वडलांनी लग्ना आधी लग्नाचा निम्मा खर्च करू असं कबूल केलं होतं. नंतर ते फिरले. काहींनी 'आता तुम्ही खर्च करा, मग मी देतो.' सांगून टाळाटाळ केली, काहींनी 'त्यात अमुक धरायचं नाही,' वगैरे वाद घालायला सुरुवात केली.

मुलीच्या वडलांनी मुलीला सासरी त्रास नको म्हणून हा विषय सोडून दिला, पण 'प्रथमग्रासे मक्षिकापात' झालाच. मुळात दोन व्याही कुटुंबांची मैत्री होणं सोपं नसतं, त्यात सुरुवात अशी झाल्यावर तर मैत्री होणं अशक्यच आहे.

त्यापेक्षा सरळ ‘आमचं कुटुंब या बाबतीत पारंपरिक विचारांचं आहे.’ हे स्पष्ट सांगितलं असतं तरी चाललं असतं. माझं मत या बाबतीत अगदी स्पष्ट आहे. खर्च 100रुपये असो नाहीतर 10लाख असो, खर्च निम्मा-निम्मा ही महत्त्वाची पहिली परीक्षा आहे. त्या परीक्षेत मुलाचे आणि त्याच्या आई-वडलांचे, संपूर्ण कुटुंबाचे स्त्री-पुरुष समानतेविषयीचे सगळे विचार ठळकपणे कळतात.

ऐकायला हे चमत्कारिक वाटेल, पण विचार करून बघा. काही लाख रुपये एका दिवसाच्या समारंभावर घालण्यापेक्षा ते रुपये मुलीला दिलेले बरे. त्याला हुंडा दिला असं म्हणावंसं वाटेल, पण ते मुलीच्या नावावर ठेवावेत. नुसते समारंभावर पैसे उडवण्यापेक्षा हे बरं, एवढंच मला म्हणायचंय.

2) खरं म्हणजे पूर्वी हिंदू कायद्याप्रमाणे मालमत्तेमधे फक्त मुलग्यांचाच वाटा असायचा. मुलींना हुंडा देण्यामागे मालमत्तेच्या विभागणीचा न्याय करणं हा हेतू होता. कायदा बदलला, पण सामाजिक रूढी बदलायला अजून खूप वेळ लागणार. या मधल्या बदलाच्या काळातला हा त्रास सध्या सगळ्यांना होतोय. या विषयावर घराघरात वादळं असतात. लोक अशी वादळं घराबाहेर कोणाला कळू नयेत असा प्रयत्न करतात. अशा बहुतेक कुटुंबांना मनातून खरी म्हणजे लाज वाटत असते.

3) स्त्रीनी मंगळसूत्र घालणं – स्त्री-पुरुष समानतेच्या अनेक पायऱ्या अनेक व्यक्ती, अनेक कुटुंब ओलांडतील, पण मंगळसूत्र हा विषय संपूर्ण भारतीय समाजाच्या सगळ्या स्त्री-पुरुषांच्या दृष्टिकोनातून सर्वांत जास्त संवेदनशील आहे. जीवनसाथमधे अनेक विवाहित स्त्रिया येतात. मंगळसूत्राचं काही महत्त्व नसलेल्या स्त्रिया 1000 मधे 1 एवढ्या कमी संख्येनी दिसतात. तो ‘साखळदंड’ त्यांनी स्वतःच्या इच्छेनी, काही प्रमाणात नवऱ्याच्या आग्रहानी, अगदी थोड्या प्रमाणात ‘वाद टाळण्यासाठी घालते’ म्हणत मान्य केलेला असतो.

पुरुषांनी पण गळ्यात बायकोच्या नावाचे मणी घातले पाहिजेत, असं म्हणणाऱ्याही स्त्रिया आहेतच. भारतीय सिनेमा, टीव्ही यांनी ‘मंगळसूत्र’ हा विषय भावनेच्या प्रांतात खूप उंचीवर नेऊन ठेवलेला आहे. जणू काही ती माळ म्हणजे प्रत्यक्ष गळ्याभोवती मिठी मारून बसलेला नवराच.

4) मुलीच्या नावात आणि आडनावात बदल करणं म्हणजे असमानतेचा फडफडणारा झेंडाच असतो. खरं तर नाव किंवा आडनाव बदलण्याची कायद्यानी जरूर नसते, संस्कारांनी असते. पण नाव हा काही पुरुषांच्या मानापमानाचाच

मुद्दा असतो. गंमत म्हणजे हा हट्ट फक्त हिंदू संस्कृतीतच असतो. आजही नाव किंवा आडनाव न बदलणाऱ्या स्त्रियांची संख्या 10,000 मधे 1 एवढी कमीच असते. मंगळसूत्राच्या खालोखाल भावनेच्या प्रांतात आडनाव बदलण्याला जागा आहे म्हटलं तरी चालेल. नाव तेच ठेवल्याची उदहारणं त्यामानानी खूप सापडतात.

माझं आणि शोभाचं लग्न झालं तेव्हा नाव, आडनावाची चर्चा झाली आणि शोभानी तिचं आडनाव बदलायचं ठरवलं. बऱ्याच वर्षांनंतर, जास्त अभ्यासानी आम्हा दोघांनाही वाटलं की हे बरोबर नाही झालं. तोपर्यंत शोभा ही शोभा भागवत नावानी गरवारे बाल भवनची संचालक म्हणून, लेखिका म्हणून, पालक शिक्षणातली एक प्रमुख व्यक्ती म्हणून इतकी प्रसिद्ध झाली होती की नाव पुन्हा शोभा कोडोलीकर करण्यात जास्त अडचणी होत्या.

वंश, नाव, आडनाव, वडलांचं म्हणजे मधलं नाव, विवाहित स्त्रीसाठी नवऱ्याचं म्हणजे मधलं नाव वगैरे विषयांवर जीवनासाथमुळे माझा जास्त अभ्यास गेल्या काही वर्षांत झाला. माझं स्पष्ट मत असं झालं आहे की, व्यक्ती ओळखण्यासाठी फक्त नाव पुरेसं आहे. आडनाव काढूनच टाकायला हवं. फक्त अडचण अशी की यापुढे हे सगळं करणं अव्यवहार्य आहे, त्यामुळे आम्ही ते करू शकत नाही. आमचा मुलगा शोनील भागवत आडनाव लावतो. सून ॲनस्तेसिया तिचं माहेरचं आडनाव इकॉनॉमू लावते. मुलगी आभा भागवत लावते आणि तिचा नवरा श्रेयस फाटक लावतो.

5) मुलाचे पाय मुलीच्या आईनी धुणं – ही एक असमानतेची रूढी अनेकांना मनातून नापसंत असते, तरी विरोध करू न शकणारे काही असतात. ही पाय धुण्याची कल्पना खुशीनी मान्य करणारे कमी असतात. स्पष्ट नकार देणारे आणि नकार मान्य करणारे संख्येनी जास्त आहेत ही समाधानाची गोष्ट आहे. आमच्या घरच्या तीनही जोडप्यांच्यात हा विषय मनातही येणं शक्य नव्हतं.

पाय धुण्याची कल्पना अपमानकारक का वाटते हे आपण समजू शकतो. लग्न समारंभाचं एकूण वातावरणच असं असतं की, मुलाकडच्या लोकांना मुलाकडचे असण्याची झिंग येते. एरवी सर्वसाधारणपणी सज्जन असणारी माणसं देखील या नशेपायी चुकीचं वागू शकतात. त्या नशेत ते मुलीच्या आई-वडलांचे अपमान देखील करतात. ते अपमान मग लोकं आयुष्यभर लक्षात ठेवतात. मुलीला त्याची सारखी आठवण करून देतात. मुलगी आणि तिचा नवरा यांच्या संसारात एरवी जे थोडे प्रश्न असतात त्यात हा एक जास्तीचा प्रश्न वाढतो.

6) कन्यादान ही कल्पना आणि विधी – या विधीबद्दल अनेक मुलींशी जीवनसाथमधे बोलणं झालेलं आहे. सर्वसाधारण परिस्थिती अशी दिसते की मुलींना 'दान' शब्द खटकतो. तरुण पिढीला कन्यादान पसंत नसतं, पण घरातले ज्येष्ठ परंपरा मोडायला तयार नसतात. असा कुटुंबातला अंतर्गत कलह जेव्हा स्पष्ट होतो तेव्हा पुरोहित मंडळींना ते फार सोयीचं असतं. घरातले ज्येष्ठ म्हणतात, 'मोठ्यांच्या मनाप्रमाणे एवढं केलं तर नुकसान तर काही होणार नाही? ' शेवटी कन्यादान हा विधी होतोच. अगदी पूर्ण असमानतेचं प्रतीक असलेली ही गोष्ट टाळण्याच्या गोष्टींच्या यादीत महत्त्वाची आहे. आमच्या घरी यातली कुठचीच गोष्ट केव्हाही घडणं शक्य नव्हतं.

कन्यादान या कल्पनेचा, शब्दाचा विचार करताना अनेकदा मनात विचार येतो, कन्यादानासारखंच मुलाच्या आई-वडलांनी पुत्रदान केलेलं असतंच ना. पूर्वी जेव्हा खूप मोठ्या एकत्र कुटुंबाचा छोटा भाग म्हणून लग्न करणाऱ्या मुलाचा संसार असायचा तेव्हा गोष्ट निराळी होती. आता छोट्या कुटुंबात किंवा विभक्त कुटुंबात राहण्याचं ठरवलेल्या जोडप्याच्या लग्नसमारंभाच्या बाबतीत तर त्याला पुत्रदानच म्हणायला हवं.

7) केवळ बायकांचीच ओटी भरली जाते. पुरुषांची नाही – अशा असमानतेच्या दिसणाऱ्या रूपाबद्दल खरं आणखीन काही सांगण्याची जरूर नाही. टाळता आलं तर बरं.

8) मानपान नावाचा एक भयंकर प्रकार लग्नसमारंभात असतो – भयंकर अशासाठी की त्याची व्याख्या अजूनपर्यंत कोणी ठरवूच शकलेलं नाही. जिथे मानपान तिथे अपमान असं म्हणता येईल. कोणी कोणाला काय वस्तू द्यायच्या, यावरून कधीच कोणाचं समाधान होत नाही. त्यावरून अपमान तर सारखा होतच असतो.

9) आणखी एक मोठी भानगड असते. ज्या बाईला मूल होऊ शकत नाही तिला निराळी, वाईट वागणूक मिळते. विधवा, घटस्फोटितांचीही तीच परिस्थिती. खरं म्हणजे एखाद्या बाईला मूल होत नसलं तर 50% शक्यता अशी असते की, तिच्या नवऱ्यात वीर्यदोष असेल. तरी बाईलाच दोषी धरून अशी वागणूक मिळते.

10) पुरुषांच्यात लग्नसमारंभात गळाभेटीचा रिवाज असतो. त्यात सुद्धा 5 पुरुषांनी गळाभेट घ्यायची अशी रीतच बनवून टाकली आहे. असमानताच.

दुसरं काय?

11) झाल (सुपात दिवे) मुलाकडच्यांच्या डोक्यावर धरतात. असमानतेचं असंच एक रूप. कारण अशी गोष्ट मुलीकडच्यांसाठी करत नाहीत.

12) मुलीकडचे लोक मुलाकडच्यांना रुखवत देतात. थेट 'वन-वे'ची पाटी रुखवताला लावलेली असते.

13) रुखवताचं जेवण मुलीकडच्यांनी मुलाकडच्यांना देण्याची पद्धत असते.

14) मुलानी लग्नसमारंभाला घोड्यावरून येण्याची पद्धत असते. मुलीसाठी घोडा नसतो. ही एक पद्धत हळूहळू कमी होतेय असं दिसतं.

15) गौरीहार मुलींनीच पूजायचा असतो. मुलानी नाही.

16) मुलाकडच्यांनी मुलीकडच्या वस्तूंची नासधूस करण्याचा रिवाज असतो. ही मला वेडेपणाची कमाल वाटते. पुणे शहराच्या आसपास अनेक गावं आता म.न.पा. हद्दीत आली आहेत. तिकडे या गोष्टी अजून होत असतात.

17) मुलाकडची नवऱ्याची मित्रमंडळी मुलीच्या मित्र-मैत्रिणींची छेडछाड करतात. अगदी पारंपरिक पद्धत म्हणून करतात. आणि मग त्यांची पुढे खरंच छेड काढतात. कमाल आहे.

18) सप्तपदीचे मंत्र फक्त स्त्रीची कर्तव्यं सांगतात. पुरुषाच्या जबाबदाऱ्यांचा त्यात उल्लेख नसतो.

19) सप्तपदीमधे स्त्रीनं पावलं कशी टाकायची, याची खास पद्धत असते.

20) सप्तपदीच्या सात फेऱ्यांपैकी पहिल्या तीन फेऱ्यांत पुरुष पुढे आणि त्यानतंर स्त्री पुढे असा रिवाज असतो. कुठच्याही कृतीमधे स्त्रीनीच किंवा पुरुषानीच अशी अट आली की असमानता त्यात आलीच. या सात फेरे प्रकरणानी पण भावनेच्या प्रांतात खूप वरचा नंबर मिळवलेला दिसतो.

21) सगळ्या धार्मिक विधींमधे मुलीला कसलाच अधिकार नसतो. तिनी नुसतं नवऱ्याच्या हाताला हात लावून 'मम' असं म्हणायचं असतं. सगळ्या विधींमधून एकच सारांश निघतो. 'वधूपक्ष म्हणजे अधूपक्ष!'

22) मुलीचा भाऊ नवऱ्याचा कान पिळतो. यामागची कल्पना अशी असते की, बहिणीशी नीट वागण्याबद्दल भाऊ नवऱ्याला तंबी देतो.

मी ज्या काळात लग्नसमारंभांना जात असे त्या काळात अशा असमानतेनी

भरलेल्या लग्नविधीकडे माझं कधी लक्ष नसायचंच आणि माझ्या अंदाजाप्रमाणे इतरही कोणाचं नसायचं. मला ही जेवढी ऐकून, कोणी कोणी सांगून माहिती आहे तेवढ्याचा मी उल्लेख केला. तुम्हाला याखेरीज लग्नसमारंभातल्या अनेक गोष्टी माझ्यापेक्षा जास्त माहिती असतील. कारण स्पष्ट आहे. माझ्या आणि शोभाच्या दृष्टीनी लग्नसमारंभाला, त्यातल्या विधींना शून्य महत्त्व आहे. आम्ही तो तीनही जोडप्यांच्या बाबतीत पूर्ण टाळल्यामुळे आम्हाला एवढंच माहिती आहे की, लग्नसमारंभ ही न करण्याची गोष्ट आहे. त्यापुढच्या संसारात मुलगा आणि मुलगी वागतात कसे, हेच सर्वांत महत्त्वाचं आहे. विवाह निबंधकाकडे नोंदणी हा एकच पर्याय आमच्या मते योग्य आहे.

●

8) लग्नानंतरचं एक ते दीड वर्ष किंवा मूल झाल्यावरची असमानता

माझ्या दृष्टीनी नवरा-बायकोनी लग्नाआधी आणि लग्नसमारंभात ज्या गोष्टी केल्या असतील त्या इतरांच्या इच्छेनी किंवा त्यांच्या दबावामुळे केल्या असतील अशी शक्यता आहे. त्यामुळे त्यातल्या असमानतेच्या कृत्यांबद्दल त्यांना माफ केलं असं समजूया. लग्नानंतर मात्र अगदी पहिल्या लग्नाच्या रात्री एकत्र एका खोलीत झोपण्यापासून समानता आणि असमानता या दोन्ही गोष्टींचे विचार आणि भावनांचे प्रत्यक्ष आचरणातले प्रयोग एकमेकांच्या लगेच समोर येतात.

पहिल्या लैंगिक संबंधात दोघांनी एकमेकांना असं म्हणणं अपेक्षित आहे की, आज रात्री आपण कुठल्याही ताणाखाली कुठलीच गोष्ट करायला नको. आपण दोघंही मन आणि शरीर यानी स्वस्थ असणं महत्त्वाचं आहे. तसं होत नाही, याबद्दल माझा सगळा आक्षेप आहे. आधीच्या काळात जी स्त्री-पुरुष असमानता अनुभवायला आलेली असेल त्याचे परिणाम लग्नानंतरही दिसतात. त्या तपशिलाविषयी आता बोलूया.

लग्नानंतरच्या पहिल्या रात्री लैंगिक संभोगाबद्दलचं अज्ञान हा गंभीर विषय आहे. या विषयात पुरुषानी जास्त ज्ञान मिळवलेलं असतं. पण ते अपुरं आणि बरंचसं चुकीचं असतं. पण स्त्रीच्या अज्ञानाच्या तुलनेत काकणभर सरस असतं. त्याबद्दलचा या पुस्तकसंचातला 'लैंगिक शिक्षण' हा लेख अवश्य वाचावा.

1) योनिशुचित्ता (व्हर्जिनिटी) – याला लग्नाच्या वेळेला खूप महत्त्व दिलं गेलंय. पण ते सगळं फक्त स्त्रीबद्दलच अपेक्षा करणारं आहे. पुरुषाबद्दल समाजाचं काहीच म्हणणं नसणं, ही धादांत अन्यायकारक गोष्ट आहे यात शंका नाही. प्रत्यक्षात स्त्रीमधे दोष असण्याचं प्रमाण फार कमी असतं. पुरुषांच्यात मात्र लिंग न ताठणं, शीघ्रपतन, इच्छा नसणं असे अनेक दोष असतात. पुरुषांच्यात अशापैकी कुठचातरी दोष असण्याचं प्रमाण स्त्रियांच्या मानानी फार जास्त आहे. या परिस्थितीचा वैदू, भोंदूबाबा अशा लोकांनी फायदा घेतल्याची उदाहरणंही अर्थातच खूप आहेत.

2) शारीरिक संबंधात पुरुषाचा पुढाकार – आत्तापर्यंतच्या सगळ्या संस्कारात जे काही करायचं असतं ते पुरुषानी करायचं असतं, या संस्कारामुळे

जी गोष्ट करण्यासाठी दोघांनी पुढाकार घ्यायला हवा तिथे फक्त नवरा पुढाकार घेतो. याचा अर्थ, असमानतेला सुरुवातच होते. मला आणि शोभाला ही गोष्ट व्यवस्थित पटलेली असल्यामुळे ही चूक आम्ही केली नाही.

3) लैंगिक संभोगात स्त्रीच्या संभोग समाधानाकडे (ऑरगॅझम) पुरुषांचं दुर्लक्ष असणं – ही सार्वत्रिक पातळीवरची महत्त्वाची असमानता आहे. पण त्याविषयी कोणीच काही बोलत नसल्यामुळे त्याची आकडेवारी उपलब्ध नाही. याचं प्रमाण प्रचंड आहे, याबद्दल मात्र माझी खात्री आहे. मी आणि शोभा साधारणपणे गेली 25 वर्षं हा विषय शिकवत असल्यामुळे आम्हाला अडचण नव्हती. पण बाकीच्या समाजाचं या विषयातलं अज्ञान अगाध आहे.

अनेक स्त्रियांना 'स्त्रीची लैंगिक तृप्ती' म्हणजे काय हेच माहिती नसतं. सर्वसाधारण कुटुंबात स्त्रीच्या वाट्याला फक्त त्याग आणि लैंगिक घुसमट आलेली असते. स्त्रीला चवीनी जगण्याचा हक्क जणू काही नाहीच. याच्या अधिक तपशिलांसाठी 'लैंगिक शिक्षण' हा लेख जरूर वाचा. स्त्री आणि पुरुष यांच्या मनोवृत्तीत एवढा फरक कशामुळे असतो याचा विचार करताना एक महत्त्वाची गोष्ट अशी आहे की, संभोगाच्या वेळी वीर्य गळालं की पुरुष मोकळा होतो आणि स्त्री मात्र नऊ महिने बंधनात अडकू शकते.

4) एकत्र कुटुंब म्हणजेच पुरुषप्रधानता – लग्नानंतर एकत्र का विभक्त रहायचं याबद्दलचे निर्णय आधी झालेले असतात. जर एकत्र असं ठरलं असेल तर असमानतेनी सुरुवात झालेलीच असते. माझं आणि शोभाचं लग्नच फिलाडेल्फिया, यू.एस्.ए.मधे झाल्यामुळे आमच्यासमोर हा प्रश्नच आला नाही. शोनील-ॲनस्तेसिया इंग्लंडमधेच होते आणि आभा-श्रेयसचा संसारही कॅलिफोर्निया, यू.एस्.ए. इथेच चालू झाला.

5) स्त्रीला बदललेल्या नावाची आणि आडनावाची सवय करून घ्यावी लागते. पुरुषाचं मात्र काही म्हणजे काही बदलत नाही.

6) नवऱ्याला अहो आणि बायकोला ए म्हणण्याची पद्धत अर्थातच असमानतेची आठवण क्षणोक्षणी करून देते. आमच्या कुटुंबात आम्ही तीनही जोडपी एकमेकांना ए म्हणूनच हाक मारतो. शोनील-ॲनस्तेसियाचा संसार इंग्लिश भाषेतला असल्यामुळे त्यात ए, अहो, तू, तुम्ही हा प्रश्नच येत नाही.

7) एकत्र कुटुंबामधे लग्न झालेल्या मुलीला घरातले आणि ओळखीचे, नात्यातले लोक 'पेढे कधी देणार' असं विचारण्याचा अतिरेक करतात. कित्येक

वेळा मुलींना हे अजिबात आवडत नाही. खरं म्हणजे असं विचारूच नये. असा प्रश्न विचारणाऱ्यांमधे स्त्रियांचं प्रमाण जास्त असतं.

8) भाषा शिकण्याच्या बाबतीत माझं आतापर्यंतच निरीक्षण सांगतो. निराळ्या मातृभाषेच्या मुला-मुलींनी लग्न केलं की मुलाची भाषा मुलीनी शिकून घेण्याचीच प्रथा आहे. कधीकधी दोघांनाही ते जमत नाही, पण मुलींनी मुलाच्या घरची भाषा आत्मसात करण्याचं प्रमाण खूप जास्त आहे. हे असमानतेचं रूप आहे.

9) लग्नानंतर मुलीची जी नोकरी-व्यवसायातली कमाई असेल ती सासरच्या मालकीची होते. या एका गोष्टीत आजकाल जरा जरा बदल दिसायला लागला आहे. काही मुली सासरी राहूनही माहेरची पैशाची जबाबदारी आपली मानतात. नवरेही त्याला हरकत घेत नाहीत. विभक्त कुटुंबात हे सोपं जातं. आमच्या बाबतीत हा प्रश्न आला नाही कारण आम्ही सगळे मध्यमवर्गीय कुटुंबामधले होतो.

10) दिवाळसणात मुलीच्या घरचे लोक मुलाकडच्यांना बोलावतात असा रिवाज आहे. मी मगाशी म्हटल्याप्रमाणे एखाद्या गोष्टीला मुलगा-मुलगी अट चिकटली की असमानतेला सुरुवात झाली समजायची. आमच्या तीनही जोडप्यांच्या घरात सण साजरे करण्याचीच पद्धत नसल्यामुळे दिवाळसण हा प्रश्नच येत नाही.

11) नवरा-बायकोमधे, सासू-सुनेचे, किंवा कुटुंबातल्या कोणाही बरोबर लग्न झालेल्या मुलीचा बेबनाव झाला तर फक्त मुलीचीच चूक असणार असं मानणं – प्रत्यक्षात, वागणुकीत चूक कोणाच्याही हातून होऊ शकते. दुसऱ्या घरून आलेल्या मुलीचीच चूक असं धरून चालणं ही असमानताच आहे. आमच्या बाबतीत असं नाही घडलं असं म्हणू शकतो. तरी अगदी कमी, काही प्रसंग असे होते की शोभावर थोडा अन्याय झाला की काय, आभावर क्वचित अन्याय झाला, असं वाटण्याजोगे ते होते. ॲनस्तेसियाच्या बाबतीत मात्र असं नाही झालं. आमचा शोनील थेट स्त्रियांच्या बाजूचा आहे. त्याला समतोल व्यवस्थित साधलाय.

12) नवरा-बायकोच्या वादानंतर रागातून नवरा एकटा वाट्टेल त्या वेळेला घराबाहेर पडतो. ही अशी गोष्ट पुरुष करू शकतो, पण स्त्रीला नाही करता येत. कारण ते सुरक्षित नाही. मुळात मतभेदानंतरचा रुसवा, अबोला ही गोष्ट कोणीही केली तरी ती चुकीचीच आहे. आम्हा तीन जोडप्यांमधे अगदी क्वचित पण असे प्रसंग घडले हे मान्यच आहे. मी एकदाच असा घराबाहेर

पडलो होतो आणि ती माझी चूकच होती.

13) भांडण झालं तरी स्वयंपाकाची जबाबदारी स्त्रीवरच, अशी घराघरात पद्धत असते. सगळा मतभेद विसरून बिचाऱ्या स्त्रीला मुकाट्यानी स्वयंपाक करावाच लागतो. हे अगदी चूक आहे. मला स्वयंपाक येत नसल्यामुळे थोड्या थोड्या प्रमाणात शोभावर असा अन्याय झाला असं मला विचार केल्यावर वाटतं. शोभा तिच्या मनाच्या मोठेपणामुळे असा काही उल्लेख करत नाही एवढंच.

14) मुलीच्या सासरी आई-वडलांनी कधीही राहायला जायचं नाही असा रिवाज – या सगळ्या परंपरांचा मला अचंबाच वाटतो. एका बाजूनी आता आपले खूप जवळचे संबंध जुळले म्हणायचं आणि दुसऱ्या बाजूनी अशा रीती सांभाळत बसायच्या. मुलगीच काय, तिच्या माहेरच्या संपूर्ण कुटुंबावरच अन्याय होतो. आमच्या तीनही जोडप्यांच्यामधे हा असा वेड्यासारखा रिवाज आम्ही कधीच पाळला नाही.

15) मुलीच्या आई-वडलांकडे जावयाचं दुर्लक्ष होणं – ही गोष्ट चूकच आहे. पण माझ्या हातून ही चूक झाली खरी. शोभाचे वडील मला भेटायच्या आतच वारले आणि तिच्या आईचं आणि माझं कधी जुळलंच नाही. माझ्या मते, या गोष्टीचा नवरा-बायकोच्या नात्यावरही वाइट परिणाम होतोच. माझ्या आणि शोभाच्यातला तो एक दुखरा कप्पा आयुष्यभरासाठी राहिला. माझ्या मनात असमानता नव्हती. त्याची निराळीच कारणं होती. आमचा जावई श्रेयस आणि आम्ही यांच्यात आमच्या मनासारखे मैत्रीचे संबंध अजूनही प्रस्थापित झालेले नाहीत. शोनील आणि त्याच्या सासूबाईंचं त्यातल्या त्यात चांगलं जमतं. गंमत अशी की, त्यांच्यात वाद होऊ शकत नाही. कारण त्यांना फक्त ग्रीक भाषा येते आणि शोनीलला ग्रीक अगदी थोडं येतं. एकूण हे नातं कठीणच असावं.

16) म्हाताऱ्या माणसांकडे बघण्याचा स्त्रियांचा दृष्टिकोन आणि पुरुषांचा दृष्टिकोन यात फरक असतो. स्त्रिया ज्येष्ठांशी जास्त सहानुभूतीनी वागतात. अगदी आजेसासरे, आजेसासूशी देखील सून जास्त चांगली वागताना दिसते.

17) नवरा-बायकोनी मिळून एखादी चूक केली तर त्याची जबाबदारी बायकोची समजणं – मी सासू-सुनांची अशी संभाषणं ऐकलीयत. 'त्याला नाही कळत, पण तुला अक्कल नव्हती का?' समजा, सरासरी स्त्रीला पुरुषापेक्षा अधिक कळतं अशी सगळ्यांची खात्री झाली असली तर हे वाक्य आपण समजू शकलो असतो. तसं नसलं तर असं बोलणं म्हणजे अन्यायच आहे. आमच्या

संसारात असं मात्र कधीच झालं नाही.

18) बाहेरख्याली पुरुषाच्या बायकोलाच दोषी मानणं – ही अन्यायपूर्ण वागणूक पूर्वी जास्त प्रमाणात असायची. त्याचं प्रमाण थोडंथोडं कमी होतंय. असं काही झालं की दोघांचा काही प्रमाणात दोष असणार हे उघडच आहे. ही अशी गोष्ट आमच्या बाबतीत शक्य नाही, एवढं मी खात्रीनी सांगू शकतो.

19) स्त्रीनीच नवऱ्याला आकर्षित करून घेण्यासाठी प्रयत्न करणं. पुरुषांनी बायकोला आकर्षित करण्यासाठी प्रयत्न न करणं – ही गोष्ट सबंध जगाला लागू आहे. इतर प्राण्यांमधे बघावं तर सगळे नर माद्यांना आकर्षित करून घ्यायची धडपड करतात. मानवाचंच प्रकरण सगळं उफराटं आहे. बायका चांगलं दिसण्यासाठी सारखे प्रयत्न करताना दिसतात. पुरुष मात्र कसेही गबाळे, ओंगळ, बेढब असतात, राहतात आणि तरी त्यांना वाटतं की, बायकांना त्यांच्याविषयी आकर्षण वाटावं.

खुद्द शोभाची आणि माझी परिस्थिती उलट आहे. शोभाचा चेहरा माझ्या तुलनेत जास्त सुबक आहे. पण ती नीटनेटकी राहण्याकडे दुर्लक्ष करते. या विषयावरचा आमचा मतभेद गेल्या 45 वर्षांत पूर्ण सुटलेला नाही, पण गेली काही वर्षं शोभात थोडा बदल दिसतो. मी दिसायला मध्यम आहे. पण मी नीटनेटकं दिसण्याचा आटोकाट प्रयत्न करतो. आभा-श्रेयस, शोनील-ॲनस्तेसिया यांच्यात हा प्रश्न आमच्या तुलनेत अगदी कमी प्रमाणात आहे.

20) शारीरिक, लैंगिक छळाचा कायदा स्त्रीप्रधान असणं – इतकी वर्षं स्त्रियांनी अन्याय सोसला हे कायद्यानी जाणलं आणि त्याप्रमाणे कायदा केला. सध्या क्वचित पुरुष त्यात भरडले जातात हे अगदी खरं आहे. हा अन्यायच आहे आणि असमानतेचंच रूप आहे.

21) स्त्रीलाच 'मॅटर्निटी लीव्ह' मिळण्याची पद्धत रूढ असणं – लहान बाळालाही वडलांची गरज असते. वडलांना देखील शक्य असलं तर त्यांनी अगदी लहान बाळाचं सगळं करावं. 'मॅटर्निटी लीव्ह' पुरुषांना मिळण्याची रूढ पद्धत नाही. स्त्रियांना भरपगारी रजा असली तर पुरुषांसाठी निदान अर्धपगारी रजा तरी समाजात रुळायला हवी. खुद्द आमच्याकडे मी स्वतःच्या व्यवसायात असल्यामुळे हा प्रश्न आला नाही.

22) मूल झाल्यावर स्त्रीला ट्रिपल ड्यूटी करावी लागते – नोकरी, घरकाम आणि मूल. या तीनही गोष्टी बायकोला सांभाळाव्या लागल्याची खूप

उदाहरणं आहेत.

23) घरकामाची समज, आवड, सवय, ज्ञान हा बहुतेक स्त्री-पुरुषांच्यातला एक मोठा फरक असतो. लग्नाआधी एकमेकांशी बोलताना देखील घरकाम ही मुलीची जबाबदारी हे गृहीत धरून सगळं बोलणं चालू असतं. लग्नानंतर त्यातले बारकावे समोर यायला लागतात. एकत्र कुटुंब असलं तर याचं प्रमाण जास्त असतं, पण विभक्त कुटुंबातही फार निराळं नसतं. माझ्या आणि शोभाच्या बाबतीत थेट अशीच परिस्थिती होती. शोनील-ॲनस्तेसिया आणि आभा-श्रेयस यांच्याकडे तीच परिस्थिती. हे म्हणताना मी स्वयंपाक आणि इतर घरकाम या दोन निराळ्या गोष्टी मानतोय. स्वयंपाकाविषयी स्वतंत्र मुद्दा आहे.

24) फार कमी पुरुषांना स्वयंपाक येतो. अगदी थोड्या प्रमाणात अशा मुलीही असतात की ज्यांना स्वयंपाक येतच नाही. विभक्त कुटुंबात अगदी सुरुवातीपासून खाणावळीचा डबा लावलेली जोडपी मी बघितली आहेत.

आमच्या संसारात एक वाईट काळ आला होता. शोभाला नोकरी, घरकाम आणि 2 मुलं अशी तिहेरी जबाबदारी पार पाडावी लागत होती. माझ्या व्यवसायात अडचणी होत्या हे खरं होतं, पण माझं या प्रश्नाकडे दुर्लक्ष झालं होतं, हे तेवढंच खरं होतं. शोभानी एक-दोन वेळा सांगून बघितलं. पण माझ्यात सुधारणा झाली नाही. त्यानंतर शोभानी मला एक सविस्तर पत्र लिहून माझ्या हातात दिलं. त्यात अनेक घटनांचा उल्लेख होता. पण सगळ्याचा सारांश होता तो एक मुख्य प्रश्न तिनी मला विचारलेला असा होता, ‘मी काय मोलकरीण आहे का?’ मी काही वाईट माणूस नाही, दारुड्या नाही. तेवढ्या पत्रामुळे मला कळलं की माझं पार चुकलं होतं. त्यानंतर मी सुधारलो.

25) मुलं लहान असल्याच्या काळात अनेक वडलांच्या हातून एक चूक होते. ते मुलांकडे पुरेसं लक्ष देत नाहीत. त्यांना वेळ देत नाहीत. पालकत्वाची समज बायकोला जास्त असते. त्यामुळे स्त्री ‘ट्रिपल ड्यूटी’ करते त्या काळात पुरुष ‘डबल ड्यूटी’लाही नकार देतो. मगाशी माझी एक चूक सांगितली तशी अनेक जण करतात. त्या तीनपैकी दोन गोष्टींकडे निदान पुरुष पालकानी लक्ष द्यावं. चरितार्थासाठी कामाच्या पाठोपाठ मुलांकडे लक्ष द्यावं. घरकाम आवश्यक आहे, पण त्याचा तिसरा नंबर लावावा. स्त्रियांनी संसारात 3 पैकी 3 गुण मिळवले तर आपण निदान 2 तरी मिळवावेत. मुलं लहान असली की 3 पैकी 2 ला ‘पासिंग’ समजावं.

26) मुलं ज्या वयात स्वतःची शी स्वतः धुवू शकत नाहीत त्या काळात नवऱ्यांची खरी परीक्षा असते. स्वतःच्या लहान मुलांची शी धुणाऱ्या नवऱ्यांची संख्या अतिशय नगण्य आहे. हेही असमानतेचं एक रूपच आहे. अनेक पुरुष खरोखर या कामाला खालच्या दर्जाचं काम समजतात. त्याच्या पुढचं वाक्य त्यांच्या ओठावर नाही, पण मनात असतं. 'हे खालच्या दर्जाचं काम नवरा-बायकोपैकी खालच्या दर्जाच्या व्यक्तीनी करावं.'

27) पुरुष मात्र पैसे मिळवण्याचं एक काम करतो नि बाकी सगळ्यातून सुटतो. खुद्द माझ्या आणि शोभाच्या संसाराची कहाणी जरा निराळी झाली खरी.

लग्न करताना शोभानी आणि मी केलेल्या चर्चांच्यात असं ठरलं होतं की अमेरिकेत बऱ्यापैकी पैसे जमवायचे, भारतात परत गेल्यावर 2 मुलं लवकरात लवकर होऊ द्यायची, त्यानंतर शोभानी तिच्या पसंतीची नोकरी, व्यवसाय करायचा, मी माझा बांधकामाचा व्यवसाय करायचा आणि मुख्य म्हणजे दोघांच्या कामाच्या वेळा जुळवून मुलांना आळीपाळीनी सांभाळायचं.

प्रत्यक्षात यातली एकही गोष्ट ठरल्याप्रमाणे घडली नाही. भारतात परतण्यापूर्वी आम्ही अमेरिका, कॅनडा, इंग्लंड, युरोप, स्कॅंडिनेव्हिया, उत्तर आफ्रिका असा खूप मोठा प्रवास केला. त्यात अपेक्षेपेक्षा जास्त खर्च झाला. भारतात येताना जेवढे पैसे गाठीला हवेत अशी कल्पना होती तेवढे प्रत्यक्षात आणता आले नाहीत. शोनीलचा जन्म अपेक्षेप्रमाणे लवकर झाला, पण आभा होईचना. खूप वाट बघितल्यावर, आभाचा जन्म झाला. माझ्या व्यवसायामधलं सत्य तोपर्यंत समोर आलं होतं. सोमवार ते शनिवार रोज 12 तास काम केलं तरी ते पुरेसं पडत नव्हतं. मुलांना सांभाळायला ठेवलेल्या मुलींचे खूप प्रश्न होते. त्या पुरेशा जबाबदारीनी काम करत नव्हत्या.

आभा साधारण अडीच वर्षाची असताना शोभानी नोकरी सुरू केली. मला पुरेसे पैसे मिळत नव्हते, त्यामुळे शोभाच्या पगाराला महत्त्व होतं. त्यातल्या त्यात चांगली गोष्ट म्हणजे आमच्या घराच्या खालच्या मजल्यावर माझं ऑफिस होतं. माझ्या साइटवरच्या चकरा, ऑफिसमधला स्टाफबरोबरचा वेळ, याच्यातून मी घरी वरच्या मजल्यावर जाऊ शकायचो. गरजेप्रमाणे जास्त वेळाही जायचो. शोभा बाहेरगावी कामानिमित्त गेली की त्याहूनही मुलांची जास्त काळजी घेऊ शकायचो. आणि तरी मुलांच्या लहानपणी एकूण विचार केला तर शोभाला ट्रिपल ड्यूटी करावी लागली.

28) नवरा-बायकोचा काही कारणानी घटस्फोट झाला तर कायद्यानी अपत्याचा हक्क स्त्रीकडेच जातो. आई अपत्याची काळजी बापापेक्षा जास्त चांगली घेते याबद्दल माझं दुमत नाही, पण हे असमानतेचं एक रूप आहे एवढाच मुद्दा आहे. घटस्फोटाच्या कायद्याप्रमाणे सज्ञान नसलेल्या मुलाचा किंवा मुलीचा ताबा म्हणजेच कस्टडी आईलाच मिळते. आई वारलेली असली किंवा ॲबनॉर्मल असली तरच बापाला ताबा मिळू शकतो.

29) मुलं सांभाळायला बाईचीच नेमणूक ही समाजव्यवस्था आहे. या असमानतेचं कारण मी समजू शकतो. मुलांशी बायका मायेनी वागण्याची शक्यता पुरुषापेक्षा अधिक असते. आणि अशा कामाला जितपत मोबदला मिळतो तो पुरुषाला मान्य होत नाही. आमच्या घरी मुलं सांभाळायला बाई लागायचीच. एक सोडून गेली की दुसरी मिळायची. पण मधल्या काळात खूप पंचाईत व्हायची. एकूण दोन्ही मुलांचं लहानपण मिळून 12 वर्षांत 24 निरनिराळ्या बायका आमच्याकडे काम करून गेल्या.

30) पाळणा घरं स्त्रियांनीच चालवणं जणू काही कायद्यानी बंधनकारक आहे असं वाटतं. कारण शंभर टक्के पाळणाघरं स्त्रियाच चालवतात. ही असमानता आहे, पण का आहे हे आपण समजू शकतो. पुरुषांनी चालवलेलं एकही पाळणाघर मी बघितलेलं नाही.

31) पुरुष वेश्यांचं प्रमाण फार कमी – ही भारतातली मोठी अडचण आहे. मी वेश्याव्यवसायाची शिफारस करत नाहीय. असमानतेचं स्वरूप वर्णन करतोय. भारतात अतृप्त पुरुषांना पुरतील एवढ्या स्त्री वेश्या आहेत, पण अतृप्त स्त्रियांच्या मानानी पुरुष वेश्या फार कमी आहेत. स्वच्छ-अस्वच्छ, सुसंस्कृत-असंस्कृत, रोगी निरोगी हे प्रश्न दोन्ही लिंगांच्या बाबतीत तसेच असतात. संख्येच्या अभावामुळे जशी उघडउघड स्त्री वेश्यावस्ती असते, तशी पुरुष वेश्या किंवा 'गिगोलों'ची वस्ती नसते. त्यामुळे अशा धंद्यातला माणूस शोधायची देखील अडचण असते.

32) मंगळागौर हा समारंभ फक्त बायकांचाच असणं ही असमानताच आहे. माझ्या लहानपणी मी आई, बहिणीबरोबर काही ठिकाणी गेलो आहे. खेळ वगैरे मधे मजा होती यात शंका नाही, पण 'फक्त स्त्रियांसाठी' पाटी लागली की असमानतेचा मुद्दा निघणारच. आमच्या घरी कधीच कोणाची मंगळागौर झाली नाही.

33) एकट्या बायको वारलेल्या पुरुषाला दत्तक मूल मिळण्यात कायद्याच्या, दत्तक देणाऱ्या संस्थेच्या सगळ्या बाजूनी अडचणी असतात. अशा पुरुषाला दत्तक मूल हवं अशी मागणी जवळजवळ नसतेच.

34) बलात्काराच्या खटल्यांचे निकाल लागतात ते बघितले की असं दिसतं की, कायदा थेट स्त्रीधार्जिणा आहे. कायद्यानी जास्त अभ्यास करावा अशी जरूर आहे, म्हणजे निदान त्यातली असमानता कमी होईल.

35) स्त्रीवर, मुलींवर बलात्कार होण्याचं प्रमाण फार आहे. लहान मुलग्यांवर बलात्कार होतात, पण फार कमी आणि मोठ्या पुरुषांवर त्याहून कमी.

36) संतती नियमनासाठी पुरुषांच्या नसबंदीचं प्रमाण फार कमी आहे. या एका असमानतेचं मला स्वतःला फार वाईट वाटतं. इतकी सोपी शस्त्रक्रिया, काही दुष्परिणाम नाहीत. त्यामानानी स्त्रियांवर इलाज खूप त्रासदायक आणि खर्चिक. आभाच्या जन्मानंतर आठव्या दिवशी मी नसबंदी स्वतः करून घेतली. आतापर्यंत या विषयावर मी अनेकांशी बोललेलो आहे, पण अजूनही परिस्थितीत फार फरक पडत नाही.

37) बायकोला सर्व बाबतीत गृहीत धरणं तर घरोघरी रोज चालू असतं. बायकोला न विचारता नवरा कोणालातरी सांगतो की, मी बायकोला अमुक ठिकाणी पाठवतो. आधी कसलीही चौकशी न करता, सोय-गैरसोय न बघता नवरा मित्रांना घरी जेवायला बोलावतो. कधीकधी त्याच वेळेला मुलांना बरं नसतं. गॅस संपलेला असतो. बायकोची मासिक पाळी चालू असते. पण बायको बिचारी काही न बोलता सगळं करते, याचा गैरफायदा घेतला जातो.

38) मी वैयक्तिक समुपदेशन करतो त्यासाठी अगदी सरळसरळ स्त्रिया जास्त प्रमाणात येतात. कित्येक वेळा प्रश्नाचं मूळ नवऱ्याची वागणूक हे असतं, पण नवऱ्याला ते मान्यच नसतं. समुपदेशकाची मदत घ्यायची तयारी या विषयात स्त्रिया थेट पुढे आहेत असं दिसतं.

रिफर्ड किंवा कॅरम बोर्ड काउन्सेलिंग हा एक निराळा समुपदेशनाचा प्रकार आहे. समोर असतात स्त्रिया, पण समुपदेशन करायचं त्यांच्या नवऱ्याचं अशांचं माझ्याकडे प्रमाण खूप आहे.

●

9) पालकत्वातली असमानता

मी आणि शोभा साधारण गेली 35 वर्षं पालक शिक्षणाचे वर्ग घेतो. पालकसभेला बघावं तर क्वचित पुरुष दिसतात. मुलं जणू फक्त आईची जबाबदारी अशी घरोघरी वागणूक दिसते. मुलांची शी शू, आजारपणं, शाळा, खेळ या सगळ्यात भाग घेणारे वडील आपण आहोत का ही तपासण्याची गोष्ट आहे. मुलं लहान असतानाच ते कदाचित जमलं तर जमतं. मोठेपणी हा बदल कठीणच. आपण पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यात मुलाच्या जन्मापासून 10 वर्षं वयापर्यंतच्या स्त्री-पुरुष असमानतेचे तपशील बघितले आहेत. त्यासंबंधीचं पालकत्वाचं कसब आणि तिसऱ्या टप्प्यातल्या अपत्याचं म्हणजे 10 वर्षापासून ग्रॅज्युएशन शिक्षणापर्यंतचं पालकत्वाचं कसब थोडं निराळं असतं. या पुस्तकसंचात पुरुष पालकत्व या लेखात दिलेल्या गोष्टी त्यासाठी उपयोगी पडतील. आता या टप्प्यातले तपशील बघू.

1) जवळजवळ सगळ्या घरांच्यात हे असमानतेचं रूप दिसतं. आईला ए म्हणतात आणि वडिलांना अहो अशी हाक मारतात. आजीला ए आजी म्हणतात आणि आजोबांना अहो म्हणतात. मामीला, काकूला, मावशीला ए म्हणतात आणि काकांना अहो म्हणतात. मावशीच्या नवऱ्याला बहुतेक ठिकाणी अहो म्हणतात. मामाला मात्र अनेक लोक ए म्हणतात. ही स्त्री-पुरुष असमानता अगदी पक्की भिनलेली आहे.

आमच्या घरी आम्ही भावंडं आईला ए आणि वडलांना अहो असंच म्हणायचो. त्यांना ए म्हणायचं का याविषयी एकदा घरात चर्चा झाली, पण वडील नको म्हटल्यामुळे तिथेच थांबली. मला आणि शोभाला मात्र सगळे जण ए च म्हणतात. आमची मुलं शोनील आणि आभा मला आणि शोभाला नावानीच हाक मारतात. आमची सून, जावईच काय, नातवंडंदेखील ए अनिल आणि ए शोभा म्हणतात. आम्हाला ते चक्क आवडतं.

2) स्त्रियांना ट्रिपल ड्यूटी खेरीज चौथी ड्यूटी असते. ती म्हणजे नवऱ्याचं मन सांभाळण्याची. मी तुम्हाला म्हणालो ना की, मी चुकीचं वागलो त्यामुळे शोभानी मला पत्र लिहून विचारलं, 'मी काय मोलकरीण आहे का.' मग

मी वागण्यात सुधारणा केली. त्याच्याआधी शोभानी मला ते सांगायचा प्रयत्न केला असं मी म्हणालो ते काय ते सांगायचं राहिलं. चेहरा नीटनेटका न ठेवण्याबद्दल शोभाच्या नि माझ्यात जुना वाद होता त्यामुळे मी नाराज असायचो. त्यावेळेला शोभा म्हणाली होती, 'काळीज काढून हातावर ठेवलं तरी तुझं समाधान होणार नाही!' त्याचा माझ्यावर परिणाम झाला नव्हता कारण माझं म्हणणं असायचं की, बाकी कितीही काहीही केलं तरी चेहरा नेहमीच चांगला दिसायला हवा, नाहीतर सगळे बाकीचे गुण, वागणूक वाया आहेत.

जोडप्यांच्या कौटुंबिक विसंवादाचं हे एक कारण असतं, पण हे लपून राहतं. या नवरा-बायकोतल्या ताणाचा परिणाम मुलांवर होतोच. माझ्या मते, दुसऱ्याला 'प्रेझेंटेबल' दिसणं या बाबतीत मुलांच्या लहानपणापासून त्यांना शिक्षण द्यायला हवं. संपूर्ण आयुष्यभरासाठी असुंदर गोष्ट टाळण्याचं शिक्षण अजिबात सोपं नाही. सौंदर्यशास्त्राचा अभ्यास पाठ्यपुस्तकांवरून करता येत नाही आणि शिकवता येत नाही.

3) एक निराळाच मुद्दा मांडतो. एके काळी अशी कल्पना होती की ज्या पालकांना फक्त मुलगेच आहेत त्यांच्या वाट्याला सगळं सुखच सुख असतं. फक्त दोन मुलगे असणाऱ्या बाईला लोक म्हणायचे, 'तुला काय बाई, चिंता नाही. फक्त दोन मुलगेच म्हणजे मज्जा.' प्रत्यक्षात हे सगळं मुलगे एकमेकांशी आणि आई-वडलांशी धड वागले तर खरं होतं, नाहीतर आई-वडलांची पार मज्जा लज्जा फज्जा होते. दोन मुलगे आणि वडील मिळून घरात असमानतेचं साम्राज्य चालवतात असं बऱ्याच घरात दिसतं.

4) बहुतेक घरात पुरुष पैसे मिळवतात. त्याशिवाय बाई गृहिणी असली तर विचारायलाच नको. तिनी तीन पुरुषप्रधान पुरुषांशी काहीही विरोधी मुद्दा उपस्थित केला की ठेवणीतलं उत्तर मिळतं,'तू आमच्याएवढे पैसे मिळवून दाखव, आम्ही घर सांभाळतो.' सुरुवातीला एकटा नवरा असं म्हणतो. मोठी झाली की मुलंही तसंच म्हणायला लागतात.

विभक्त कुटुंब म्हटल्याबरोबर आपल्याला वाटतं, नवरा-बायको, मुलगा, मुलगी असं स्त्री-पुरुष समानतेमधे नांदणारं कुटुंब असेल. प्रत्यक्षात तसं बहुतेक वेळेला नसतं. सबंध घर पुरुषाभोवती फिरत असतं. त्याच्या सोयीप्रमाणे सगळे कार्यक्रम ठरतात. आमच्या ओळखीची दोन मुली असलेली बरीच विभक्त कुटुंबं आहेत. त्यांच्या तोंडची वाक्यं अशी असतात. 'आज बाबा बाहेर जेवणार आहेत,

त्यामुळे आम्ही तिघीच आहोत. साधा वरण-भाताचा कूकर लावला फक्त.' एका दुसऱ्या घरात नवरा-बायको आणि एक मुलगा, एक मुलगी रहात होते. वडील परदेशी गेल्याबद्दल बोलणं चाललं होतं, 'सध्या कोणीच घरी नसतं ना!' म्हणजे तीन माणसं घरात आणि एक बाहेर याचचं हे वर्णन होतं. या घरातला मुलगा मोठा झाला की काय होईल सांगायलाच नको.

5) अशा सगळ्या वागणुकीमुळे पुरुष आपोआप आत्मकेंद्री बनतात. कुटुंब त्यांच्या लक्षातच नसतं. काम आणि निवडक मित्रमंडळी एवढंच त्यांचं जग असतं. आपण एखादा विशिष्ट पुरुष आत्मकेंद्री समजू शकतो. पण जवळजवळ सगळी पुरुष जमात अशी बनते हा चिंतेचा विषय आहे.

6) मुळातला एक स्त्री-पुरुषातला शारीरिक फरक सांगतो. स्त्रीचे सगळे अवयव मऊ असतात. त्यामानानी पुरुषाचे सगळे अवयव थोडेसे कठीण असतात. जननेंद्रियाच्या क्रियेतला फरक असतोच, पण त्याखेरीज मऊ आणि कठीण हा पण फरक त्यामधे असतो. असं म्हणतात की, ह्या शरीरातल्या फरकामुळे पुरुषाच्या स्वभावातही फरक पडतो.

7) पालकत्वाचा विचार करताना एका खास गुणाचा विचार आपोआप होतो. एकाच वेळेला कामाकडे आणि मुलांकडे लक्ष देण्यासाठी अष्टावधानी असावं लागतं. हा गुण निःसंशयपणी स्त्रियांकडे जास्त असतो. 'काय सांगायचं ते नीट मुद्याला धरून सांग' असं मोठ्या माणसाला म्हणता येतं, पण मुलांना नाही ना म्हणता येत! स्त्रिया एकाच वेळेला घर, पाहुणे, मुलं, खरेद्या, स्वयंपाक आणि नवरा एवढे विचार करू शकतात. अशीच काहीशी गोष्ट पुरुष त्यांच्या धंद्यात करतात हा प्रतिवाद म्हणून मान्य करता येईल, पण मुख्य फरक म्हणजे पुरुषाच्या यादीमधे मुलं नसतात!

8) मुलं मोठी होत असताना ज्या अनेक गोष्टी बघतात त्यात आणखीन एक महत्त्वाची गोष्टी ती न्याहाळत असतात. वडलांची आईखेरीज इतर स्त्रियांशी वागणूक आणि आईची वडलांव्यतिरिक्त इतर पुरुषांशी वागणूक. त्या वागणुकीतला मोकळेपणा, ठेवलेलं अंतर, अदब आणि त्याचबरोबर वागणुकीमागचा स्त्री-पुरुष समानतेचा विचार. मुलं लहान आहेत, त्यांना काय कळतंय, या गैरसमजुतीतून आई-वडलांनी लवकरात लवकर बाहेर पडायला हवं. आईला हे लवकर समजतं, पण बाबांना वेळेवर समजत नाही, ही अडचण असते.

9) सबंध देशाची आकडेवारी सांगते की भारतात अजून 40% नवरे

आपल्या बायकोला मारतात. अशा वातावरणाचा मुलांच्या मनावर फार वाईट परिणाम होतो. खरा प्रश्न असा आहे की पुरुषांना बायकोवर सत्ता गाजवायचीच सवय असते. त्यांच्या दृष्टीनी प्रेम आणि माणुसकी या मूल्यांना काही किंमत नसते.

अशा सत्तेच्या मस्तीमधे पुरुष स्त्रीवर बलात्कार करायला मागे-पुढे बघत नाही हे दुर्दैव आहे. बलात्कार करणाऱ्या पुरुषाला स्त्रीबरोबर लैंगिक संबंधाचा आनंदही मिळत नाही, जबरदस्ती केल्याचा म्हणजेच सत्ता गाजवल्याचा विकृत आनंद फक्त मिळतो. अशा बलात्कारित स्त्रीची इज्जत घेतली, इज्जत गेली असं म्हणतात. प्रत्यक्षात अशा अमानुष पद्धतीनी वागणाऱ्या पुरुषाला ते कृत्य शोभत नाही. त्यामुळे त्या पुरुषाचीच इज्जत गेली असं म्हणायला पाहिजे.

10) मूल साधारणपणी 10 वर्षाचं झालं की त्याला मोठं समजूनच त्याच्याशी वागावं लागतं. या पुस्तकातला लैंगिक शिक्षण हा लेख पण बघायला हवा. त्याखेरीज त्यांना पैशाची समज, पैसे हाताळण्याची हळूहळू वाढवलेली सवय, मित्र, नातेवाईक, पाहुणे यांच्याशी वागणूक या गोष्टी जाणीवपूर्वक शिकवाव्या लागतात. या बाबतीतली समज आईला जास्त असेल का वडलांना, हे सांगणं कठीण आहे, पण मुलांसाठी वेळ काढण्यात स्त्रिया पुढे आहेत. त्यामुळे स्त्रियांना या विषयांचा जास्त अभ्यास करावा लागतो. फक्त आईनी कुमार वयाच्या मुलांकडे लक्ष देणं आणि वडलांनीही देणं यामुळे खूप फरक पडतो. स्त्री-पुरुष समानतेचा संस्कार मुलांवर करण्यासाठी खरंच मेहनत करावी लागते. कारण आसपासचं जग याच्या थेट उलट वागणाऱ्यांचं आहे.

मुलांचा अभ्यास हा एक असा विषय आहे की ज्याचं सार दोन शब्दात सांगता येईल. 'घेऊ नका.' बास. त्यांचा त्यांना अभ्यास करू द्या. याबद्दलचे सविस्तर मुद्दे पालकत्वाविषयीच्या स्वतंत्र लेखात अवश्य वाचा.

मुलं चांगली निघणं संपूर्णपणी आपल्या हातात नसतं. ते नशिबावर काही प्रमाणात अवलंबून असतं. त्या बाबतीतली एक गंमत सांगतो. प्रत्यक्षात प्रत्येक मूल काही बाबतीत आईसारखं तर इतर बाबतीत वडलांसारखं असतं.

पण आई-वडील इतर कुठल्यातरी कारणावरून भांडतात आणि मग ते भांडण 'तू मुलांना बिघडवलंस' वर पोहोचतं. चांगलं मूल ते माझं आणि चुकीचं वागलेलं मूल तुझं असं दोघं म्हणायला लागतात.

या एका गोष्टीचं मला फार वाईट वाटतं. पुरुष घोटाळा करतात, चुकीचं वागतात, माणसांशी संबंध बिघडवतात आणि बायका संसार ओढून नेतात.

पुरुषाला कोणालातरी मारण्याची म्हणजे जुलूम करण्याची विकृत गरज भागवायची असते. ही गरज भागवायला मुलं सर्वांत सोयीची असतात. त्याच्या खालोखाल बायकांचा नंबर लागतो.

11) मी पूर्वीही म्हणलोय नि पुन्हा म्हणतो. स्वस्थपणी जगण्यासाठी माणसात जे गुण लागतात त्या बाबतीत भारतीय पुरुषांपेक्षा स्त्रिया जास्त सरस आहेत. स्त्रियांच्यात एक खास दुर्गुणही असतो. तो म्हणजे त्यागाची नशा. घरासाठी त्याग, नवऱ्यासाठी त्याग, मुलांसाठी, मग नातवंडांसाठी त्याग या पद्धतीनी त्या स्वतःच जाळी विणून स्वतःच त्यात गुरफटतात. पुरुष गुंतत नाही. हे स्त्री-पुरुष असमानतेचं मोठं जाळं आहे.

●

10) आपल्या मुलांच्या लग्नाच्या वेळची असमानता

आपण स्वतःच्या लग्नाच्या आसपास जी असमानतेची वागणूक केली असेल ती निदान आपल्या मुलांच्या लग्नाच्या वेळी आपण टाळू शकतो का, ही परीक्षा आहे. म्हणजे लग्न ठरवताना, प्रत्यक्ष विवाहबंधनाच्या वेळी आपण पालक म्हणून स्त्री-पुरुष समानतेचा अर्थ लक्षात घेऊन त्याप्रमाणे आचरण करतो का? तसे तुम्ही वागत असलात तर छान आहे. समजा, काही गोष्टी चुकीच्या घडल्या असतील तर त्या या कार्यशाळेत मोकळेपणानी बोलण्यामुळे स्वतःच्या वागणुकीत सुधारणेची शक्यता खूप जास्त वाढते.

कित्येक घरांच्यात बायकांना स्त्री-पुरुष समानतेची समज कमी पडते. मुलांच्या लग्नाच्या वेळेला ते सगळं उघड होतं. अशा बायकांच्या तुलनेत स्त्री-पुरुष समानता न कळलेले पुरुष संख्येनी जास्त आहेत. असे पुरुष स्वतःच खूप वैतागतात. बायको, मुलगा, मुलगी यांच्याशी वाईट वागतात. जमलेले लोक उघड काहीच बोलत नाहीत, पण पाठीमागे,'त्यांना वागायचं कळत नाही' म्हणतात.

आमच्या घरात माझ्या लहानपणापासून या विषयाची माझी ओळख होती. पण माझ्या आई-वडलांच्या आचरणात ती असमानता मधूनमधून दिसायची. याबद्दल बोलणं अजिबातच झालेलं नव्हतं. शोभाच्या घरी स्त्री-पुरुष समानता या शब्दाचा उच्चारही कधी झालेला नव्हता, पण वागणूक जास्त समानतेची होती, असं शोभाच्या उल्लेखांवरून कळतं. तिचे वडील फार शिकलेले नसले, ग्रामीण, पारंपरिक संस्कारात वाढलेले असले तरी त्यांच्या उपजत बुद्धीतच समानता होती. सगळ्या समानतेच्या संदर्भांपैकी लिंगभेदामुळे असमानतेनी न वागणं हा एक संदर्भ त्यात होता.

शोभाच्या वडलांना मी भेटलोच नाही, हे मी तुम्हाला पूर्वी सांगितलं. ज्या पद्धतीनी त्यांनी शोभाचा आणि माझा लग्न करण्याचा निर्णय हाताळला यावरून त्यांची समज लक्षात येते. मुख्य म्हणजे मुलीला निर्णयस्वातंत्र्य होतं. शोभाच्या मोठ्या भावानी आमच्या लग्नाला विरोध करून देखील त्यांनी शांत डोक्यानी विचार करून शोभाच्या माझ्याशी लग्न करण्याच्या निर्णयाला पाठिंबा देणं ही

गोष्ट विशेष होती.

आमच्या मुलांच्या लग्नाची वयं आली तेव्हा आमच्या कुटुंबासमोर पैशाचा गंभीर प्रश्न होता. बऱ्याच मोठ्या रकमेचं माझ्यावर ओझं असल्यामुळे मला दुबईला जाण्याखेरीज काही मार्ग नव्हता. मी दुबई, अबुधाबी, अलैन अशा ठिकाणी कामासाठी हिंडत असायचो. कितीही काम असलं तरी शुक्रवारी सुट्टी असायचीच. इतर मित्रमंडळी गुरुवार रात्रीपासून दारूत असायची. मी दारू पीत नसल्यामुळे मी सुटीच्या दिवशी वाचन, अभ्यास, चिंतन, लेखन यात असायचो.

ते चिंतन करत असताना शोनील आणि आभाचा विचार सारखा डोक्यात असायचा. त्यावेळेला मला 'विवाह अभ्यास' ही कल्पना सुचली. शोनील आणि आभासारख्या मुलांनी जोडीदार शोधताना काय गोष्टींची खात्री करून घ्यायला हवी, याची मी यादी बनवत होतो. त्यामधे महत्त्वाची जी गोष्ट सारखी समोर यायला लागली ती म्हणजे दुसऱ्याचा विचार करण्याची क्षमता. कुठच्याही दोन व्यक्ती बुद्धिमान, सज्जन असून देखील स्वभावामधल्या फरकामुळे माझ्यात आणि शोभात जर प्रश्न येऊ शकतात तर ते कोणामधेही येऊ शकतील.

शोनील आणि आभाला या गोष्टी लग्नाआधी कळण्याचा मार्ग कोणता? कुठच्या गोष्टीला सर्वांत प्राधान्य द्यायला हवं? अगदी थोडक्यात, कमी वेळेत एका मुलानी किंवा मुलीनी भावी जोडीदाराच्या स्वभावातली कुठची गोष्ट तपासायलाच हवी? याचं उत्तर मला मिळालं तेव्हा अकस्मात साक्षात्कार झाला. शोभाच्यात आणि माझ्यात मतभेद असून कुठच्या मुख्य धाग्यामुळे आमचं लग्न टिकलं? आमची दोघांची न्यायबुद्धी. न्यायबुद्धी म्हणजे समानतेची समज. या ठिकाणचा संदर्भ एक स्त्री आणि एक पुरुष हा असल्यामुळे मला आणि शोभाला असलेली स्त्री-पुरुष समानतेची समज हा तो धागा.

हे सूत्र समोर ठेवून कच्ची प्रश्नावली तयार केली. शोभाला टपालानी पाठवली. त्यावरचं आमचं, म्हणजे मुख्यतः माझं काम चालू झालं. पुढचं तुम्हाला माहितीच आहे. 1997 साली जीवनसाथ विवाह अभ्यास मंडळ सुरू झालं. 1999 साली शोनील इंग्लंडला गेला. 1999 मधेच विवाह अभ्यास मंडळाच्या माध्यमातून आभानी श्रेयसशी लग्न केलं. 2001 मधे शोनील आणि ॲनस्तेसिया यांनी लग्न करायचं ठरवलं आणि 2002 मधे लग्न केलं.

आई-वडील म्हणून आभाच्या वेळेला प्रत्येक गोष्ट समानतेच्या कसोटीवर आम्ही तपासून बघत होतोच. मुख्य म्हणजे नोंदणी विवाह केला. कार्यालय

टाळून आमच्याच घरात 10-15 लोक एकत्र येऊन लग्नानिमित्त भेटले. विधींना पूर्ण फाटा दिला. देणं-घेणं पूर्ण टाळलं. साधारण 12 ते 15 माणसं रेस्टॉरंटमधे एकत्र जेवलो. ते जेवण माझ्या कल्पनेत न बसणारं होतं, पण मी ते मान्य केलं. श्रेयसची बहीण, आभा आणि शोभा यांनी एकमेकींना पैठण्या घेतल्या. शोभानी आभाला सोन्याचे काही दागिने दिले. या दोन्ही गोष्टी माझ्या मनाविरुद्ध केल्या.

थोड्याच दिवसात श्रेयस आणि आभा अमेरिकेला गेले. आभाचं विमानाचं तिकीट श्रेयसनी काढलं. हनीमूनचा खर्च, थोडे दिवस मुंबईला राहण्याचा खर्च श्रेयसनी केला. अगदी संपूर्णपणी नाही, पण बऱ्याच अंशी स्त्री-पुरुष समानतेची आम्हाला समजलेली तत्त्वं पाळून आभा-श्रेयस संसाराला लागले.

2001 मधे मी आणि शोभा आमच्या खर्चानी प्रथम इंग्लंडला शोनीलकडे गेलो. ॲनस्तेसियाला प्रथम भेटलो. पुढे अमेरिकेत आभाकडे गेलो. श्रेयसचे आई-वडील निराळ्या गावी राहायचे. तिथे त्यांनाही भेटलो. श्रेयस-आभाकडून भारतात परत येताना शोनीलकडे इंग्लंडला दोन दिवस थांबलो. श्रेयस-आभाकडे आम्ही साधारण महिना-सव्वा महिना होतो. त्याचा प्रत्यक्ष खर्च आम्ही देतो म्हणलो पण श्रेयस-आभानी त्याला नकार दिला.

पुढे श्रेयस आणि आभा भारतात आले. चेन्नई, बंगलोरमधे राहिले. आम्ही त्यांच्याकडे अनेक वेळा आमच्या खर्चानी जायचो, त्यांच्याकडे राहण्याचे ते पैसे घ्यायचे नाहीत. हा पैशाचा उल्लेख मी एवढा वारंवार करतोय याचं कारण आहे. ज्या निरनिराळ्या गोष्टी लग्नानंतरच्या मुलीच्या आयुष्यात घडतात त्याचा आणि स्त्री-पुरुष समानतेचा संबंध खर्चाशी आहे. अनेक सुशिक्षितांच्या कुटुंबामधे अजूनही निरनिराळ्या गोष्टी चालू असतात त्या 'माहेरच्या खर्चानी' चालू असतात.

2007 साली आभाला दिवस गेल्यामुळे ती आमच्याकडे राहायला आली. श्रेयस-आभा आणि आम्ही यांच्यात ही स्पष्ट चर्चा होऊन असं ठरलं की बाळंतपण होऊन मूल 3-4 महिन्याचं झाल्यावर आभा पुन्हा बंगलोरला जाईल. त्याप्रमाणे आमचा मोठा नातू ओजस 4 महिन्याचा होईपर्यंत आभा आमच्याकडे राहिली. श्रेयस बंगलोरहून मधून मधून यायचा. त्या सगळ्या बाळंतपणाचा, आमच्याकडे राहण्याचा प्रत्यक्ष खर्च श्रेयस-आभानीच केला. त्यानंतर श्रेयस-आभा पुन्हा अमेरिकेला गेले. अर्थात ओजससकट. 2009 मधे ते भारतात परत आले. बंगलोरला राहायला लागले. 2010 मधे पुण्यात आले. कारण आभाला

बाळ व्हायचं होतं. 2010 अखेरीला धाकट्या नातवाचा – तुहिनचा जन्म झाला. गेल्या खेपेसारखाच खर्चाचा रास्त हिशेब करून देवाण-घेवाण झाली.

आम्ही मधूनमधून आमच्या खर्चानी शोनील-ॲनस्तेसियाकडे जातो. आमचा तिथे राहण्याचा, हिंडण्याचा खर्च ते खुशीनी करतात. शोनील-ॲनस्तेसिया त्यांच्या खर्चानी मधूनमधून आमच्याकडे येतात. आम्ही त्यांच्या राहण्याचा खर्च खुशीनी करतो. आभा गेली चार वर्षं पुण्यात 15 मिनिटांच्या गाडीच्या प्रवासाच्या अंतरावर राहते. आम्ही अनेक वेळा त्यांच्याकडे जातो, ते आमच्याकडे येतात. प्रत्यक्ष खर्चाची सगळी देवाणघेवाण सहजपणे करतो. आमचा सगळ्यांचा असा विश्वास आहे की दुसऱ्या कुटुंबावर पैशाचं ओझं न टाकता स्वच्छपणी रास्त देवाणघेवाण हाच प्रेमानी जगण्याचा आणि समानतेनी वागण्याचा मार्ग आहे.

मुलांच्या लग्नाच्या वेळेला अनेक आई-वडील असमानतेच्या जाळ्यात आपणहून शिरतात किंवा ओढले जातात. आम्ही दोघं हे सगळं टाळू शकलो.

●

11) म्हातारपणातली असमानता

आजारपणं, म्हातारपण आणि मृत्यू याही बाबतीत एकमेकांच्या शुश्रूषा करण्यात, काळजी करण्यात आणि मृत्युभोवतालच्या कर्मकांडात तुमच्यात समानतेची जाणीव किती, हा प्रश्नही तुम्हीच विचारायचा आणि स्वतःला मार्कही तुम्हीच द्यायचे.

आता अगदी सुरुवातीचा मूळ मुद्दा सांगतो. मी व्यक्तिशः थेट स्त्री प्रधान पुरुषांच्या गटातला आहे, पण जेव्हा मी माझ्या संपूर्ण आयुष्यातल्या 12 टप्प्यांची परीक्षा घेतो तेव्हा माझ्यासारखा तयार विद्यार्थीही 85 टक्क्यांच्यावर मार्क मिळवू शकत नाही. तुम्ही घेऊन तर बघा ही स्वतःची परीक्षा!

सगळ्या पुरुषांनी एक गोष्ट समजून घेतली तर स्त्रियांचं आयुष्य सोपं होईल आणि त्याचा कुटुंबातल्या वातावरणाला खूप फायदा होईल. स्त्रीच्या आयुष्यात बाळंतपणामुळे अनेक वर्षं वाया जातात. तिची करिअर, छंद या प्रत्येक गोष्टीवर परिणाम झालेला असतो. त्यानंतर 'मेनोपॉझ'मुळे स्त्रियांची काही वर्षं अस्वस्थतेत जातात. कोणाची 2-4 वर्षं तर एखाद्या स्त्रीची 10-12 वर्षं देखील जातात. या दोन गोष्टींची बेरीज केली तर स्त्रीच्या आयुष्यातली 10-15 वर्षं त्रासामधे जातात. या सगळ्याचा विचार करून आता आपण म्हातारपणाच्या काळातले स्त्री-पुरुष असमानतेचे टप्पे बघू.

1) स्वतःला मुलगे आणि मुली असताना मुलग्याच्या नावानी गुंतवणूक करणं ही गोष्ट अनेक वडील करताना दिसतात आणि ते ही गोष्ट बायकोशी, मुलांशी बोलत सुद्धा नाहीत. ही वागणूक पूर्णपणे असमानतेची आणि चुकीची आहे. त्याचं प्रमाण खूप आहे. मी स्वतः असं कधीही केलं नाही. पहिली गोष्ट म्हणजे शोभा, शोनील आणि आभा यांच्याशी चर्चा करून सगळ्या गुंतवणुकी केल्या आणि दोन्ही मुलांच्या नावानी सारख्या रकमांच्या केल्या.

2) एकूण स्त्रियांच्या नावानी असलेल्या मालमत्तेच्या मानानी पुरुषांच्या नावानी खूप जास्त मालमत्ता असते. पुरुषाचं मृत्युपत्र बनवण्याचं प्रमाण स्त्रियांपेक्षा साहजिकच जास्त असतं. ही असमानता आहे आणि त्याचं कारणही उघड आहे.

3) समजा, नवरा-बायकोचा वाद होऊन पुढे घटस्फोट झाला तर मुलीचाच दोष असणार असा समाजाचा समज असतो. प्रत्यक्षात नेमकं काय हे

माहिती नसलं तर गप्प बसावं, पण ते नाही. स्त्रीला दोषी धरायचं. मी तर वैवाहिक समुपदेशनाचंच काम करतो. हे मी म्हणतोय ती नेहमीची गोष्ट आहे आणि चूक आहे.

4) नवरा-बायको दोघंही म्हातारे झाले की दोघांच्याही तब्येतीला प्रत्येक पंधरवड्याला काहीतरी होत असतंच. बहुतेक घरांच्यात नवरे वयानी मोठे असतात. वयात बराच फरक असला तर आजारी नवऱ्याची बायको शुश्रूषा करेल ही शक्यता तरी आहे, कारण त्यांच्या आरोग्याच्या अवस्थेमधे बराच फरक असेल. 3-4 वर्षांनी नवरा मोठा असला तर दोघांची शारीरिक अवस्था सारखीही असू शकते. आणि तरी आजारी नवऱ्यांची सेवा स्वतः आजारी असलेली बायको करताना दिसते. हे असमानतेचं नेहमी दिसणारं रूप आहे.

5) मी 72 वर्षांचा आहे आणि शोभा 69 वर्षांची आहे हे तुम्हाला मागे सांगितलंच आहे. आमच्या दोघांच्यामधे शोभाच्या तुलनेत माझं आरोग्य चांगलं आहे. बहुधा तिच्या मधुमेहामुळे असं झालं असावं. शोभाचा मधुमेह 15 वर्षांपूर्वी चालू झालेला आहे. तोपर्यंत तिची तब्येत उत्तम होती. मलाही मधुमेह आहे, पण तो नुकताच चालू झालाय. आम्हाला दर पंधरवड्याला काहीतरी होत असतं. आमचा दोघांचाही स्वभाव असा आहे की आम्हाला दोघांनाही दुसऱ्याकडून वैयक्तिक सेवा करून घ्यायला आवडत नाही. अगदीच जी गोष्ट स्वतःला करता येत नसेल तेवढ्याच गोष्टीत आम्ही एकमेकांची मदत मागतो. थोडक्यात, जरूर तेव्हा आम्ही एकमेकांची शुश्रूषा करतो. एकमेकांची हे फार महत्त्वाचं आहे.

6) नवऱ्याच्या आजारपणानी स्त्री विधवा झाली तरी तिचाच दोष मानणं – प्रत्यक्षात या गोष्टी त्या त्या व्यक्तीच्या नशिबानी घडत असतात आणि त्या कोणाच्याच हातात नसतात. नवरा वारला हा दोष बायकोचा कधीही असू शकत नाही आणि तरी असले वेडगळपणे लोक बोलत असतात. याउलट नवऱ्याच्या नशिबानी बायको मेली तर लोक तसं म्हणत नाहीत. एकूणच भारतीय परंपरा विधवांविषयी अनेक वर्षं खूप चुकीचं वागली. कायमच ते स्त्री-पुरुष विषमतेचं भयानक रूप होतं.

7) आपल्या समाजाच्या रिवाजाप्रमाणे जवळच्या नात्यात कोणी वारलं की पुरुष गोटा करतात. स्त्रिया करत नाहीत. मला स्वतःला धार्मिक कर्मकांडांचं महत्त्व नसल्यामुळे मी या कारणासाठी कधीही चकोट केला नाही.

8) घटस्फोटित मुलींनी माहेरी राहणं, मुलानी मात्र स्वतंत्र राहणं –

समाजाची, घटस्फोटित मुलीच्या आई-वडलांची तशीच कल्पना असते. घटस्फोटित मुलगा आणि घटस्फोटित मुलगी यांच्या बाबतीत असा फरक करणं अयोग्य आहे. आपल्या माणसाला करतो तशी पाहिजे ती सगळी मदत मुलीला करावी, मुलाला करावी, पण एकत्र राहणं ही गोष्ट गृहीत धरणं चूक आहे.

9) घटस्फोटित किंवा विधवा मुलीच्या पुनर्विवाहात मुलाच्या पुनर्विवाहापेक्षा जास्त अडचणी येणं – ही गोष्ट तर्कबुद्धीला न पटणारीच आहे. जगभर, भारतभर साधारण सारख्या संख्येनी मुलं आणि मुली यांचा जन्म होतो. पुढे घटस्फोट झाले तरी घटस्फोटित स्त्री-पुरुष संख्येच्या प्रमाणात बदल होत नाही. काही स्त्रिया विधवा होतात आणि साधारण तेवढेच पुरुष विधुर होतात. मग मुलींच्या पुनर्विवाहात जास्त अडचणी असण्याचं काहीच तर्कशुद्ध कारण असू शकत नाही. घटस्फोटित किंवा विधवा मुलींपाशी त्यांना झालेली मुलं असतात हा एक फरक असतो, पण तीच मुलं त्यांच्या बापांचीही असतातच की! एकच कारण आहे, ते म्हणजे भारतीय समाजाचा असमानतेचा दृष्टिकोन. अर्थात, तो पूर्ण चुकीचा आहे.

10) वैधव्य, घटस्फोट या व्यतिरिक नवरा बायकोनी स्वतंत्र राहणं याचंही प्रमाण मोजण्याजोगं आहे. स्वतंत्र राहून पुढे घटस्फोट घेतात याचंही प्रमाण बऱ्यापैकी आहे. याखेरीज पूर्वी आणखी एक प्रकार होता. तो म्हणजे बायकोला टाकून देणं. अशा स्त्रीला परित्यक्ता म्हणायचे. नव्याण्णव पूर्णांक नव्याण्णव टक्के वेळा अशा बायका माहेरी राहायला यायच्या. पूर्वी स्त्री मिळवती नसल्यामुळे स्त्रीनी नवऱ्याला टाकलं अशी उदाहरणं जवळजवळ नसायची. त्यामुळे परित्यक्त असा पुरुषच नसायचा. त्यामुळे तसा शब्दही नव्हता.

11) अविवाहित वयस्कर स्त्रियांना समाजात पुरुषांपेक्षा जास्त त्रास होतो. त्यांना इंग्रजीत 'स्पिन्स्टर' म्हणतात. अशा स्त्रियांकडे संशयानी बघणारे आसपासचे लोक तिच्यावर लक्ष ठेवून असतात. तिच्या काळजीपोटी हे लोक तसे वागतात आणि स्वतःला 'संस्कृतिसंरक्षक' समजतात. काही लोक अशा स्त्रीकडे लैंगिक अभिलाषेनी बघतात. काही पुरुष त्याच्या पुढच्या पायरीवर जाऊन लगट करायचाही प्रयत्न करतात. हे सगळं वर्णन वाईटच आहे, पण ते पुरुषांच्या वाट्याला येत नाही इथे असमानता आहे.

12) स्त्रियांनी कोणाला तरी मुलगा मानलं, भाऊ मानलं अशी उदाहरणं सापडतातच. त्या तुलनेत पुरुषांनी कुठच्यातरी स्त्रीला बहीण मानणं, कुणाला तरी

मुलगी मानणं याचं प्रमाण खूप जास्त आहे. या आकडेवारीतले बरेच पुरुष अत्यंत सभ्य हेतूनी अशी नाती जोडत असतील, पण मनात स्त्रीविषयी आकर्षण असणारे काही असतातच. अर्थातच, ही मनातली गोष्ट कोणीच कधी कबूल करत नाही.

माझ्या आणि शोभाच्या संसारातल्या स्त्री-पुरुष समानतेच्या बाबतीत मी खूप कमी पडतो तो म्हणजे स्वयंपाकाच्या बाबतीत. पूर्वी मी याविषयी सविस्तर सांगितलं आहे, तरी त्याबद्दल एकच गोष्ट सांगतो. स्वयंपाक शिकण्याची माझी इच्छा आहे, पण त्यासाठी शोभाला वेळ असायला पाहिजे; तो नसतो. आमची दोघांची वयं, तब्येती लक्षात घेतल्या तर कदाचित ही गोष्ट कधीच घडणार नाही. माझ्या आधी शोभाचा अकस्मात मृत्यू झाला तर मी एकटा राहणार नाही हे मी आधीच स्पष्ट केलंय. त्यामुळे मी एकट्यानी स्वयंपाक करण्याचा यापुढे प्रसंगच येणार नाही. इच्छा-मरण या विषयाचा माझा अभ्यास मनापासून चालू आहे. मी आधी गेलो तर प्रश्नच नाही.

13) स्त्री-पुरुष यामधले काही फरक नैसर्गिक आहेत. त्यात आपण करण्याजोगं काही नाही, पण ते उल्लेख करण्याजोगे मात्र आहेत. बायकांचा 'मेनोपॉझ' येण्याचं सरासरी वय 40-55 असतं. पुरुषांचा 'अँड्रोपॉझ' सरासरी 55 ते 75 वयात येतो. याची सगळ्यांना माहिती हवी.

14) 'मेनोपॉझ'च्या आसपास 'हार्मोनल चेंजेस'मुळे अनेक स्त्रियांच्या गालावर काळसर डाग पडतात. 'अँड्रोपॉझ'च्या आसपास पुरुषांच्याही गालावर डाग पडू शकतात. पण अशा पुरुषांची संख्या तुलनेनी अगदीच कमी असते.

15) स्त्रीच्या शरीराची त्वचा पुरुषाच्या त्वचेपेक्षा पातळ असते. स्त्रीच्या शरीराला, चेहऱ्याला पुरुषाच्या तुलनेत लौकर सुरकुत्या पडतात.

16) स्त्रियांना टक्कल पडण्याचं प्रमाण फार कमी असतं. ही असमानता असली तरी ती निसर्गाची किमया आहे. माझं आणि शोभाचं उदाहरण अगदी असंच आहे. शोभाचे आई-वडील, माझे आई-वडील, माझी भावंडं, शोभाची भावंडं, सगळीकडे बघावं तर तेच. पुरुषांना टक्कल. बाईचे केस पांढरे होतात, पण टक्कल अगदी क्वचित दिसतं.

●

12) जोडीदाराच्या मृत्यूनंतरची असमानता

नवरा-बायको एखाद्या अपघातात एकदम सापडून गेले किंवा दोघांनी ठरवून एकत्र इच्छा-मरणाचा मार्ग स्वीकारला असे दोन अपवाद सोडले तर या व्यतिरिक्त नवरा-बायकोंपैकी एकजण आधी मरणार, एकजण नंतर हे उघडच आहे. आपल्या भारतीय परंपरेमधे मृत्यूसंबंधीची कर्मकांडं खूप आहेत आणि त्यातदेखील स्त्रीचा मृत्यू आणि पुरुषाचा मृत्यू यामधे असमानता असते. मी स्वतः गेली 45 वर्षं मयतीला जाणंही सोडून दिलंय. त्यामुळे इथे एक मुद्यांची यादी बनवलीय ती मला अनेकांना विचारून बनवावी लागली. त्या पूर्ण यादीत असमानता भरलेली आहे. मी माझ्या आयुष्यामधून ती असमानता काढून टाकू शकलो आहे. आता ते मुद्दे सांगतो. मृत्यूनंतरच्या कर्मकांडात स्त्री-पुरुष फरक असतो. त्याचे तपशील असे.

1) स्त्री मेली तर आणि पुरुष मेला तर सुतकामधे फरक करणं – स्त्री वारली तर 3 दिवस सुतक पाळतात आणि पुरुष वारला तर 10 दिवस पाळतात. याचा अर्थ, स्त्री वारली तर कमी वाईट वाटतं असाच होतो.

2) विवाहित मुलगी मेली तर अंत्यविधीचा खर्च माहेरचा असतो.

3) मृत्यूनंतरचे अंत्यविधी पुरुषानीच करायचे असतात.

4) स्त्रियांनी स्मशानात जायचं नाही असा रिवाज असतो.

5) नवरा मेल्यावर स्त्रीनी अलंकार काढण्याची पद्धत असते. मंगळसूत्र तर निर्दयपणे खेचून काढताना मी बघितलं आहे.

6) बायको मेली तर नवरा रडत नाही. नवरा गेला तर बायको मात्र मोठ्यामोठ्यांदा छाती पिटून घेऊन हंबरडा फोडते.

7) आई-वडलांच्या मृत्यूनंतर मुलींना समान मालमत्ता न मिळणं – प्रत्यक्षात कायदा बदलून बरीच वर्षं झाली. पण त्याची अंमलबजावणी होत नाही. मुलीच आपणहून हक्क सोडतात अशी उदाहरणंदेखील खूप आहेत.

8) नेत्रदान, देहदान असे निर्णय पुरुष जास्त संख्येनी घेतात. स्त्रियांचं प्रमाण यामधे कमी असतं. या माहितीसाठी मी सरकारी विभागात जाऊन स्वतः चौकशी केली तेव्हा कळलं.

९) विधवांच्या पोषाखावर समाजाची बंधनं असतात. पांढरीच साडी, रंगीत कपडे वर्ज्य, विटकरी रंगाची साडी काही ठिकाणी बंधनकारक असते. शिवाय गळा मोकळा, कुंकू नाही वगैरे बंधनं असतातच. महाराष्ट्रात सुशिक्षित समाजात या बाबतीत थोडा बदल झालेला आढळतो. थोडा बदल मी म्हणतोय कारण अजूनही माझ्या नजरेला लोकं परंपरावादीच दिसतात.

१०) पतीच्या मृत्यूच्या प्रसंगात जिचा नवरा गेला त्या स्त्रीच्या वागणुकीवर अनेक बंधनं असतात. तशी बंधनं बायको वारलेल्या पुरुषावर नसतात.

११) मयतीच्या विधींचं पौरोहित्य फक्त पुरुषच करतात असा रिवाज आहे.

●

13) स्त्री-पुरुष समानतेच्या प्रवासाच्या अभ्यासाचा निष्कर्ष

चर्चेत भाग घेण्यामुळे आणि जनमताबद्दलच्या स्पष्ट कल्पनेमुळे कोणाच्या विचारात बदल होईल असं एरवी खरं वाटणार नाही. परंतु गटचर्चेची हीच तर खुबी आहे. कोणाशीही वाद न घालता मतांच्यात बदल होत जातो तो कसा याचं हे उदाहरण आहे. स्त्रिया मंगळसूत्र घालतात आणि मंगळसूत्र ही वस्तू म्हणजेच जणू काही नवरा असल्याप्रमाणे मंगळसूत्र जपतात. कुंकू लावणं याचंही अतिशयोक्त महत्त्वाचं रूप समाजात दिसतं. शहरी, निमशहरी आणि ग्रामीण भागात काही फरक असतो, परंतु मूळ कल्पनेचं अवास्तव महत्त्व लक्षात आणून देणाऱ्या चर्चा झाल्यामुळे विचारात फरक पडतो. आणि तरीही संपूर्ण शंभर टक्के लोकांच्यात बदल होत नाही, कारण बदलाचा वेग हा कमीच असतो. प्रत्यक्ष गटचर्चेत भाग घेतल्यामुळे व्यक्तींच्या विचारात (विशेषतः मंगळसूत्र आणि कुंकू याबद्दल आणि पारंपरिक रीतिरिवाजंबद्दल) डोळ्यादेखत बदल दिसू लागले ही फार विशेष गोष्ट आढळली.

स्त्री-पुरुष समानतेच्या विचार-आचाराचे अनेक टप्पे असतात. प्रत्येक स्त्री आणि पुरुष कुठच्या तरी टप्प्यावर असतो. समानता, संसारात नुसती 'मानणं' नाही तर 'प्रत्यक्षात आणणं' याची पुढच्या पिढीत अतिशय आवश्यकता असणार आहे. स्त्रिया शिकल्या, पुरुषांच्या बरोबरीनी कामं करायला लागल्या असं कौतुक करत करत आमच्या पिढीनी स्त्रियांची घरकामातून, मुलांच्या जबाबदारीतून फार काही सुटका केली असं दिसत नाही. ''वडलांना वेळ नसतो.'' हे पुढच्या पिढीत कोणी ऐकून घेणार नाही. या दृष्टीनी लग्नाच्या मुला-मुलींना एकमेकांना घरात पुरुषांनी काम करण्याची गरज, दोघांनीही पैसे मिळवण्याची गरज, मुलं सांभाळण्यात, वाढवण्यात पुरुषाचा सहभाग, घरकाम येणं आणि करणं याबद्दल गंभीर चर्चा व्हायला हव्यात. याबद्दल समज नसलेल्या, बेपर्वाई असलेल्या बेजबाबदार मुलांना मुलींनी नाकारलं अशी उदाहरणं घडायला हवीत. त्याचबरोबर शिकलेल्या या मुलींनी मी घरातच राहीन, हाऊसवाईफ होईन असं म्हणणं ही पण चिंतेची बाब आहे. अशा मुलींना मुलांकडूनही समंजस नकार मिळायला हवेत. अशा संसारात बायकोला 'समान' दर्जा कधीही मिळत नाही. त्याचा पुढे तिलाच त्रास व्हायला लागतो. स्त्री-पुरुष समानतेविषयी एवढं बोलल्यावर थोडा बदल व्हावा, अशी माझी आकांक्षा आहे.

समजा एखाद्या स्त्रीनी किंवा पुरुषानी शोध घ्यायचा प्रयत्न करायचा ठरवला तर त्यासाठी म्हणून सांगतोय्. या लेखातल्या 12 टप्प्यात मिळून 385 मुद्दे आहेत. त्यासाठी कुठची गोष्ट तुम्ही अमलात आणता, कुठची पटते पण वळत नाही तो स्कोअर स्वतःपुरता तरी मोजून बघण्यात खूप फायदा आहे. स्त्री-पुरुष समानतेच्या कुठच्या स्टेशनवर तुम्ही आहात एवढं तर कळेल.

●●●

जीवनसाथ पुस्तक संच
संपूर्ण यादी

पुस्तक क्र.	पुस्तकाचं नाव
1.	विवाह अभ्यास म्हणजे नेमकं काय ● कौटुंबिक विसंवाद
2.	जोडीदाराची निवड ● लैंगिक शिक्षण
3.	व्यक्तिमत्त्व विकासाचा खरा अर्थ ● पुरुष पालकांचं शिक्षण
4.	आर्थिक व्यक्तिमत्त्व ● करीअरचं नियोजन
5.	व्यवस्थापनशास्त्र – वैवाहिक आणि रोजच्या आयुष्यातलं
6.	स्वावलंबन, आत्मसन्मान ● स्त्री-पुरुष असमानतेची रूपं
7.	उत्सवी प्रवृत्ती ● लग्नसमारंभ

8.	खरे उपयोगी संस्कार ● सर्वांनी करण्याजोगं समाजकार्य	
9.	रोजच्या आयुष्यातलं तत्त्वज्ञान ● समतोल विचारांचं महत्त्व	
10.	ज्येष्ठांशी संवाद ● मृत्यूसंबंधी स्पष्ट विचार	
11.	समुपदेशनाच्या अनेक नव्या पद्धती ● जीवनसाथ समुपदेशन संस्था	
12.	कौटुंबिक स्वास्थ्यासाठी उपाय ● जीवनसाथमधले खेळ	

जीवनसाथ संचामधली अनिल भागवत यांची इतर पुस्तकं

पुस्तक-1

विवाह अभ्यास म्हणजे नेमकं काय

●

कौटुंबिक विसंवाद

या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

---

1) विवाह अभ्यास मंडळ म्हणजे नेमकं काय?

1. या कल्पनेची थोडक्यात ओळख 2. विवाहाचा तत्त्वज्ञानाशी संबंध 3. वैवाहिक आयुष्यासाठीची काही महत्त्वाची तत्त्वं 4. रोजच्या आयुष्यातली साधी तत्त्वं 5. भावनांविषयीचा अभ्यास 6. विचारांचं भावनेत रूपांतर 7. भावनांवर नियंत्रण 8. कुटुंबाबरोबरच्या आयुष्याचं महत्त्व 9. व्यवस्थापनशास्त्राचा उपयोग 10. कुटुंबाचं समुपदेशन 11. आपुलकी, प्रेम, या भावना व्यक्त करणं 12. नाती सांभाळण्यासाठीची तत्त्वं आणि तंत्रं 13. प्रश्न सोडवण्याची पद्धत– मिश्रगट कार्यशाळा म्हणजेच 'ग्रुप काउन्सेलिंग' वर्कशॉप्स 14. खरं बोलणं 15. पैशाबद्दलची विचारसरणी 16. स्वावलंबन आणि आत्मसन्मान 17. स्त्री-पुरुष समतेची आणि समानतेची समज 18. लोकशाहीचं मूल्य आणि स्वतंत्र किंवा एकत्र कुटुंब 19. उत्सव, समारंभ याबद्दल भूमिका 20. असणं, दिसणं आणि दाखवणं 21. आधुनिक आणि पारंपरिक 22. वैयक्तिक समुपदेशन 23. या पुस्तकासंबंधीच्या सूचना

2) कुटुंबातले आणि नवराबायकोमधले मतभेद म्हणजेच कौटुंबिक विसंवाद

1. प्रश्नाचा नेमका शोध आणि उपायाचा शोध 2. विवाहाच्या इतिहासात आणि तत्त्वज्ञानात काय सांगितलंय 3. कौटुंबिक विसंवाद या विषयातली आकडेवारी 4. विचार, भावना यांचे गट आणि नवरा-बायकोचं नातं 5. कुटुंबातली इतर नाती / एकत्र कुटुंब 6. पैशावरून वाद 7. आत्मसन्मानावरून वाद 8. मुलांसंबंधीचे वाद 9. सासर-माहेर याविषयी वाद 10. स्त्री-पुरुष समानतेची समज नसण्यावरून विसंवाद 11. आधुनिक किंवा पारंपरिक विचारांमुळे विसंवाद 12. व्यसनं आणि भांडणं 13. नवराबायको आणि कुटुंबातले समाईक धागे 14. कुटुंबासाठी वेळ देणं 15. व्यवस्थापन कौशल्यांचा वापर 16. विवाहाचा अर्थ कळणं 17. सर्वात महत्त्वाची गोष्ट– संवाद 18. राग, धमक्या, रागवारागवी, रुसणं 19. मारहाण– हिंसेचे प्रकार 20. लग्न ठरवण्याची पद्धत– सगळ्याचं मूळ 21. लग्नाचा करार 22. मानसशास्त्राची मदत 23. करण्याजोग्या गोष्टी 24. खरं प्रेम म्हणजे काय ते न समजणं 25. भांडणांचं टोक– घटस्फोट

3) मी आणि शोभामधले विसंवाद

4) मी आणि शोभा यांचं सहजीवन, आम्ही काढलेले उपाय

5) राग आवरण्याचे मार्ग

6) आभार

●

पुस्तक-2

जोडीदाराची निवड

●

लैंगिक शिक्षण

या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

प्रश्नावलीच्या देवघेवीची कल्पना 5. प्राथमिक प्रश्नावली 6. सविस्तर प्रश्नावली– बाह्यरूप 7. सविस्तर प्रश्नावली– पत्रिका 8. सविस्तर प्रश्नावली– शिक्षण/व्यासंग 9. सविस्तर प्रश्नावली– आरोग्य 10. सविस्तर प्रश्नावली– स्वभाव 11. सविस्तर प्रश्नावली– पैशांबद्दलची विचारसरणी 12. सविस्तर प्रश्नावली– मासिक प्राप्ती 13. सविस्तर प्रश्नावली– स्त्री-पुरुष समानता 14. सविस्तर प्रश्नावली– स्त्री-पुरुष लैंगिक संबंध 15. सविस्तर प्रश्नावली– कुटुंब 16. सविस्तर प्रश्नावली– मुलं 17. सविस्तर प्रश्नावली– लग्न समारंभ 18. सविस्तर प्रश्नावली– वैवाहिक आयुष्याचं सार 19. सविस्तर प्रश्नावली– महत्त्व कशाला? 20. त्रोटक सविस्तर माहिती 21. भावी जोडीदाराच्या प्रत्यक्ष भेटीपूर्वीचे पर्याय 22. जोडीदाराबद्दल अंतिम निर्णयप्रक्रिया 23. जीवनसाथची कार्यशाळा नेमकी कशी असते? 24. निवडक गटाचं जोडीदाराच्या निवडीसाठी समुपदेशन 25. जोडीदार ठरल्यावर लग्नापूर्वीची बौद्धिक चाचणी (मॅरेज मॅच्युरिटी इंडिकेटर) 26. अविचाराची शक्यता 27. लग्न ठरल्यानंतरची कर्तव्यं 28. जोडीदाराची निवड या कार्यशाळेत वापरायचे खेळ

9) लैंगिक शिक्षणाची गरज

1. या लेखाची पार्श्वभूमी 2. भारतातलं पारंपरिक कामशास्त्र आणि जगातली परिस्थिती 3. तत्त्वज्ञान आणि मानसशास्त्राची लैंगिक संबंधाबद्दलची भूमिका 4. सध्याच्या प्रश्नाचं स्वरूप 5. लैंगिक शिक्षणाची कार्यशाळा 6. लैंगिक संबंधातलं समुपदेशन

10) लैंगिक शिक्षण– जन्मापासून 5 वर्षांपर्यंतच्या मुलामुलींबद्दल

11) लैंगिक शिक्षण– 5 ते 10 वर्षांपर्यंतच्या मुला-मुलींसाठी

12) लैंगिक शिक्षण– 10 ते 16 वयापर्यंतच्या मुला-मुलींसाठी

13) लैंगिक शिक्षण – तरुणांसाठी – लग्नापूर्वी

1. सध्याची परिस्थिती 2. लैंगिक भावनांचा गोंधळ 3. मुलग्यांच्या विकृत गप्पा 4. हस्तमैथुन 5. वेश्येकडे जाण्याचा मोह 6. मुलींच्या मनातल्या कल्पना 7. मुलगे आणि मुली यांची चांगली मैत्री 8. लैंगिक शिक्षणाची अविवाहितांसाठी कार्यशाळा 9. चुकीच्या गोष्टींची शक्यता– रेव्ह पार्टी 10. प्रेमभंग आणि लग्नापूर्वी लैंगिक संबंध 11. लग्नापूर्वी लैंगिक संबंधाबद्दल वैयक्तिक समुपदेशन 12. परदेशातली परिस्थिती 13. लैंगिक संबंधांमागची मानसशास्त्रीय बैठक

●

पुस्तक-3

व्यक्तिमत्त्व विकासाचा खरा अर्थ

●

पुरुष पालकांचं शिक्षण

या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

---

1) संवादकला

1. संवादामागचं तत्त्वज्ञान 2. मानसशास्त्रातला एक महत्त्वाचा प्रयोग 3. चांगला संवाद म्हणजे काय? 4. आयुष्यभरातल्या सगळ्या नात्यांचे फक्त 3 गट 5. जोडीदाराबरोबरचा किंवा जवळच्या व्यक्तीबरोबरचा संवाद 6. संवादातल्या चुकांची उदाहरणं 7. व्यवसाय, धंदा, दुकानदारी यामधले संवाद 8. चांगला संवाद– त्यासाठीचे मार्ग आणि तंत्रं 9. संवादकलेबद्दलच्या गटचर्चा 10. संवादातल्या भाषेचा प्रश्न आणि हावभाव, हालचाली यांच्यामधून संवाद

2) व्यक्तिमत्त्व विकास

1. आत्मविश्वास– व्यक्तिमत्त्वाचा पाया 2. बाह्यरूप 3. बोलणं 4. चेहऱ्यावरचे भाव 5. चुकीच्या लकबी 6. फसवेगिरी - खोटेपणा 7. कुचाळक्या - एक विकृती 8. अंगचे कलागुण 9. छंदापासून व्यसनापर्यंत 10. शिस्त आणि व्यवस्थापन 11. आयुष्याचा संतुलित दृष्टिकोन 12. अष्टपैलू– चतुरस्त्र– अष्टावधानी व्यक्ती 13. विकासाचे दोन मार्ग 14. मिश्रगट समुपदेशनाचे व्यक्तिमत्त्वासाठी फायदे

3) खरं बोलणं – अठ्ठ्याण्णव टक्के

4) नकार देण्याची कला

5) मी केलेल्या चुका

6) मी जोडीदाराकडून/विशिष्ट व्यक्तीकडून काय शिकलो/शिकले

7) इ.क्यू. (इमोशनल कोशंट) म्हणजेच भावनिक गुणांक

1. भावनिक गुणांकाची (इ.क्यू.) मूळ कल्पना 2. स्त्रियांच्या आणि पुरुषांच्या भावनांकातला फरक 3. भावनांक सुधारण्याचं शिक्षण 4. समुपदेशनातले अनुभव 5. शोभा आणि मी यांचं उदाहरण 6. भावनांक आणि समाजकार्य यांचा संबंध 7. भावनांकावर वय, आरोग्य यांचा परिणाम

8) पुरुष पालकांचं शिक्षण

1. माझं स्वतःचं लहानपण 2. पालक शिक्षणाची थिअरी आणि प्रॅक्टिस 3. शोभाचं आणि माझं पालक-शिक्षणातलं काम 4. मूल कशासाठी? 5. मुलाची शारीरिक वाढ 6. सर्वसाधारण पुरुष पालकाची सध्याची वागणूक 7. पालकत्वाचे नवे प्रश्न / उपायांचा शोध 8. मुलांना अपमानास्पद वागणूक 9. मुलं बिघडण्याची कारणं 10. आईवडलांचं एकमेकांशी नातं 11. आजोबांची भूमिका 12. शिक्षण-शाळा-अभ्यास-समुपदेशन 13. मुलांचा भाषाविकास 14. मुलांना केलेल्या शिक्षा 15. मुलांना स्वच्छतेचं शिक्षण 16. मुलांसाठी लैंगिक शिक्षण 17. मुलांसाठी वेळ काढणं 18. मुलांची पैशाबद्दलची समज 19. मुलांचे खेळ - आरोग्य 20. मुलांमुळे करिअरमधे खंड 21. भावंडांचे संबंध 22. समाजाचं मुलांकडे दुर्लक्ष 23. संस्कार 24. 'स्पेशल' मुलं 25. तरुणांचे पालक म्हणून जबाबदाऱ्या 26. पालकत्वामागचा समतोल विचार

9) आभार

●

पुस्तक-4

आर्थिक व्यक्तिमत्त्व

●

करीअरचं नियोजन

या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

●

पुस्तक-5

व्यवस्थापनशास्त्र – वैवाहिक आणि रोजच्या आयुष्यातलं

या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

●

टीप : जीवनसाथ पुस्तक संचातल्या पुस्तक क्र. 6 चा सविस्तर अनुक्रम या पुस्तकाच्या सुरुवातीच्या भागात दिला आहे.

पुस्तक-7

उत्सवी प्रवृत्ती

●

लग्नसमारंभ

या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

●

पुस्तक-8

खरे उपयोगी संस्कार

●

सर्वांनी करण्याजोगं समाजकार्य

या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

इत्यादी 6. खाण्यापिण्याबद्दलच्या रूढी 7. लग्नसमारंभाशी जोडलेल्या रूढी 8. पोषाखाच्या रूढी 9. हिंसा-अहिंसा 10. नमस्कारासंबंधी रूढी 11. सामाजिक कार्यक्रमातल्या रूढी 12. रूढीमधले झालेले आणि करण्याजोगे बदल 13. पाप-पुण्य, मृत्यूसंबंधीच्या रूढी 14. कुटुंबकारणातल्या आणि सामाजिक अधिकाराच्या रूढी 15. काय बदल करता येतील?

9) आधुनिक-पारंपरिक म्हणजे नेमकं काय?

1. या लेखामागची कल्पना 2. बाह्यरूपातली पारंपरिकता किंवा आधुनिकता 3. मनातली आणि विचारातली पारंपरिकता किंवा आधुनिकता 4. निष्कर्ष

10) खरे संस्कार म्हणजे नेमकं काय?

1. आहाराविषयीचे संस्कार 2. आरोग्याविषयीचे संस्कार 3. पोषाखाविषयीचे संस्कार 4. निवाऱ्यासंबंधीचे संस्कार 5. विवाहासंबंधीचे संस्कार 6. मुलांवरचे संस्कार 7. पैशांबद्दलचे संस्कार 8. कामाबद्दलचे संस्कार 9. अभिरुचीचे संस्कार 10. मृत्युसंबंधीचे संस्कार 11. संस्कारांबद्दल करण्याजोग्या गोष्टी

11) स्वतःची होकारांची आणि नकारांची यादी

12) समाजकार्याच्या दिशा

1. या लेखामागची कल्पना 2. 'फंडिंग' असलेली कामं 3. सामाजिक प्रथा बदलण्याची कामं 4. धार्मिक प्रकारची सामाजिक कामं 5. शिक्षणक्षेत्रासाठी सामाजिक कामं 6. बालकांच्या हक्कांसंबंधी कामं 7. पत्रकारितेमधून सामाजिक काम 8. ग्राहकहितासाठी सामाजिक काम 9. शहरी सुविधांसाठी चळवळ 10. वैद्यकीय क्षेत्रातली सामाजिक कामं 11. शिष्यवृत्त्यांसाठी, पारितोषिकांसाठी पैशाची सोय 12. नैसर्गिक आपत्तीनंतरची कामं 13. शहरांमधल्या झोपडपट्ट्यांच्यामधे काम 14. पर्यावरण रक्षण-शिक्षण 15. कोणालाही जमतील अशी साधी कामं

13) आभार

●

पुस्तक-9 (नऊ)

रोजच्या आयुष्यातलं तत्त्वज्ञान

●

समतोल विचारांचं महत्त्व

या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

---

1) रोजच्या आयुष्यातलं तत्त्वज्ञान

1. मूळ कल्पना 2. तत्त्वज्ञान विवेकनिष्ठ विचारसरणी आणि आयुष्य 3. तत्त्वज्ञानाचा इतिहास 4. ज्ञान देण्याचा आणि घेण्याचा आनंद 5. डॉ. ह. ना. फडणीस यांच्याबरोबरचा अभ्यास 6. ए. नागराज यांची मध्यस्थ दर्शनाची कल्पना

2) पर्यावरण – साधी राहणी आणि आरोग्य वगैरे

1. पर्यावरणाशी निगडित तत्त्वचिंतन 2. साधी राहणी 3. स्वच्छता 4. आरोग्य आणि व्यायाम 5. वैद्यकीय क्षेत्र आणि सामान्य माणूस 6. ऊर्जेची गणितं 7. पर्यावरण विषयाबद्दलचे प्रश्न 8. पर्यावरणातलं संशोधन आणि अंमलबजावणी

3) सावकाश काम करणारे अपायकारक घटक आणि त्यावर उपाय

1. या लेखामागची कल्पना 2. हवा 3. पाणी 4. अन्न 5. पेय 6. मलमूत्र 7. झोप 8. व्यसनं 9. औषधं आणि आरोग्य सुविधा 10. व्यायाम 11. शिक्षण 12. कपडे 13. सौंदर्यप्रसाधनं 14. काम 15. प्रवास 16. पैसे 17. उपकरणं 18. तंत्रज्ञान 19. करमणूक 20. प्रसारमाध्यमं 21. कुटुंबातला बेबनाव 22. सारांश

4) इतर महत्त्वाचे प्रश्न

1. शहरीकरण 2. जनमानस ट्रस्ट 3. तज्ज्ञसत्ता 4. माणसांचे वैचारिक प्रकार – सा प बं द 5. देशाटन 6. भाषा 7. प्रसारमाध्यमं 8. खरं आणि न्याय्य 9. दुष्टाशी गाठ 10. सामाजिक संघटनांमागचं तत्त्वज्ञान

5) सरकार

6) राजकीय लोकशाही

7) बहुमत

8) सहकारी संस्था

9) राजकारण

10) निवडणूक

11) राष्ट्र

12) राष्ट्रीय एकात्मता, विश्वबंधुत्व/विश्वशांती

13) कायदा आणि पोलीस यंत्रणा

14) स्वतःच्या आयुष्याविषयी समतोल विचार

15) आभार

●

पुस्तक-10

ज्येष्ठांशी संवाद

●

मृत्यूसंबंधी स्पष्ट विचार

या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

●

पुस्तक-11

समुपदेशनाच्या अनेक नव्या पद्धती

●

जीवनसाथ समुपदेशन संस्था

या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

---

5) वैयक्तिक समुपदेशन

1. या लेखाची मूळ कल्पना 2. घरातल्या किंवा ओळखीतल्या ज्येष्ठांचा सल्ला 3. मार्गदर्शन आणि समुपदेशनातला फरक 4. समुपदेशनातली मूलतत्त्वं किंवा गृहितं 5. भारत आणि पाश्चात्त्य देशातली परिस्थिती 6. समुपदेशकाची खास कौशल्यं– ऐकणं, बोलणं 7. समुपदेशनाची सुरुवात आणि प्रगती 8. समुपदेशकानी स्वतःविषयी सांगणं 9. समुपदेशनाचे प्रकार 10. क्रिटिकल अ‍ॅनॅलिसिस पद्धतीचं समुपदेशन 11. आत्मविश्वास वाढविण्यासाठी समुपदेशन 12. समुपदेशनातली तंत्रं 13. समुपदेशनातली पथ्यं 14. समुपदेशनातल्या अडचणी 15. समुपदेशकांच्या श्रेणी 16. विवाहपूर्व समुपदेशन 17. घटस्फोटापूर्वीचं समुपदेशन 18. ग्रुप काऊन्सेलिंग– एक उत्तम पर्याय 19. निष्कर्ष

6) रिफर्ड काऊन्सेलिंग ऊर्फ अप्रत्यक्ष समुपदेशन किंवा कॅरम बोर्ड काऊन्सेलिंग

7) जागा-पद्धत-व्यवहार, सूत्रधार तयार करणं वगैरे

8) या पुस्तकाचा उपयोग

9) अभ्यास मंडळात न येण्याची कारणं

10) आभार

●

पुस्तक-12

कौटुंबिक स्वास्थ्यासाठी उपाय,

●

जीवनसाथमधले खेळ

या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

●

अनिल भागवत यांनी लिहिलेली आणखी पुस्तकं

पुस्तक-1

घर पाहावं बांधून (पाचवी आवृत्ती)

- प्रस्तावना
- प्रमोटर बिल्डर्सविषयी
- आर्किटेक्टस्‌विषयी
- बिल्डिंग कॉन्ट्रॅक्टरविषयी
- आर. सी. सी. डिझायनरविषयी
- मटेरियल सप्लायरविषयी
- बांधकाम कामगारांविषयी
- पेटी कॉन्ट्रॅक्टर्सविषयी
- गळणारं छप्पर
- ॲग्रीमेंटवर सही
- सिस्टिम बिल्डिंग
- बांधकाम आणि सरकार
- बांधकाम, कर्ज, सरकारी कर आणि आपण
- कन्स्ट्रक्शन मॅनेजमेंट कन्सल्टंटविषयी
- बांधकामातले तांत्रिक शब्द आणि चेकलिस्ट

पुस्तक-2

लग्न पाहावं करून (उपलब्ध नाही)

पुस्तक-3

व्यवस्थापनशास्त्र तुमच्यासाठी (दुसरी आवृत्ती)

- मॉनिटरिंग मॅनेजमेंट - एक आवश्यक व्यवस्थापनशास्त्र
- मॉनिटरिंग मॅनेजमेंटची मूलतत्त्वं
- मॉनिटरिंग मॅनेजमेंटमधल्या महत्त्वाच्या गोष्टी आणि फायलिंग
- मॉनिटरिंग मॅनेजमेंट आणि कामगार
- क्वालिटी मॅनेजमेंट आणि सुपरवायझर
- स्पीड मॅनेजमेंट - एक जादूसारखं तंत्र
- कॉस्ट मॅनेजमेंट
- मॉनिटरिंग मॅनेजमेंट आणि इतर तज्ज्ञ
- मॉनिटरिंग मॅनेजमेंट आणि मालक
- डिझास्टर मॅनेजमेंट - आपत्ती निवारणशास्त्र
- मॉनिटरिंग मॅनेजमेंट - मोहीम फत्ते करण्याचं शास्त्र
- मॉनिटरिंग मॅनेजमेंट - बहुउपयोगीशास्त्र
- तुम्ही कोणीही असा - ते वापरता येईल

●

लेखक अनिल भागवत यांचे ऋणी आहेत.

- डॉ. उल्हास लुकतुके - 1997 साली जीवनसाथ सुरू करताना स्पष्ट विचारांची जीवनभर साथ हा उद्देश स्पष्ट होता, पण त्याची सुरुवात करण्यासाठी यांची खूप मदत झाली.
- जीवनसाथ - मुंबई शाखा माझ्या आईसाठी सुरू केली. मुंबईतल्या लोकांना या अभ्यासाची प्रचंड गरज होती, अजूनही आहे. तिच्या घरीच कार्यक्रम व्हायचे.
- मुंबई जीवनसाथचा भक्कम आधार होता सुशील आणि विनीता हाटे. त्यांची निष्ठा, संयोजनकौशल्य आणि आमची वैयक्तिक मैत्री मला खूप महत्त्वाची वाटते.
- पुण्यातलं जीवनसाथ अभ्यास मंडळ पहिल्या दिवसापासून जोरातच चाललं. बरीच वर्षं ते शनिवार पेठेतल्या आमच्या घरी होतं. आता आमच्याच कर्वेनगरच्या घरी अभ्यास मंडळ चालतं. गेली दोन वर्षं मी हा पुस्तकसंच लिहीत असताना मला अनेकांनी मदत केली. त्यातल्या काहींनी या पुस्तकांसाठी काही विषयांसाठी मजकूर लिहिला, काहींनी टायपिंगची, डिक्टेशन घेऊन लिहिण्याची मदत केली. मजकुरावरच्या त्यांच्या प्रतिक्रियादेखील महत्त्वाच्या होत्या. त्यांची नावं मी आडनावाच्या आद्याक्षरांच्या क्रमानी देतोय. ती आद्याक्षरं इंग्लिश अल्फाबेटाप्रमाणे रचली आहेत.

  बोकील डॉ. आशा, बोरोटीकर तुषार, भोइटे आमोद, दंडवते मानसी, डिंबळे रामभाऊ, देगवेकर दिलीप, देशपांडे केशव, देवराज शिल्पा, गोवित्रीकर सुनीति, जाधव विजय, कानेटकर श्रद्धा, कुळकर्णी पौर्णिमा,

क्षेमकल्याणी ममता, लिमये हर्षद, लिमये गौरी गोळे, मेढेकर शैवल, मोहाडीकर डॉ. लीना, मुद्‌गल दीपा, मुद्‌गल स्मिता, मुळे अंजली, म्हैसकर मकरंद, नागपूरकर माधव, पाटणकर राजेश, पाटील मोहिनी, पाटील स्मिता, पाटील विक्रांत, राऊळ श्यामल, रावराणे गीता, साठे आशा, शुक्ल डॉ. भूषण, संचेती अपूर्वा, संचेती आदिती, वळसंगकर अनिल, तेलंग डॉ. नीलू.

- जीवनसाथ अभ्यास मंडळाचे सगळे सभासद. जीवनसाथ समुपदेशन केंद्राचे सगळे समुपदेशनार्थी.
- शोभा तर या पुस्तकसंचाच्या थोड्या भागाची सह-लेखिकाच आहे. मी आमच्या वैवाहिक आयुष्यात तिच्यावर केलेल्या अन्यायाचा मी अनेक ठिकाणी उल्लेख केलाच आहे. शिवाय या पुस्तक-प्रक्रियेच्या दोन वर्षांच्या काळातही तिच्या मदतीशिवाय, टीकेशिवाय, सूचनांशिवाय आणि प्रोत्साहनाशिवाय मी इथपर्यंत पोचलोच नसतो.

  शोनील आणि आभामुळे तर जीवनसाथ संस्था सुरू झाली. अनास्तेसिया, श्रेयस आणि आमची नातवंडं ओजस, तुहिन आणि डॉमिनिक यांना पुढे त्यांच्या आयुष्यात माझ्या या कार्यशाळांचा आणि त्याबद्दलच्या लिखाणाचा उपयोग व्हावा हा माझा ऊर्जास्रोत होता.
- हे पुस्तक या अवस्थेपर्यंत आणण्यात श्री. हेमंत जोशी आणि सौ. संगीता सरदेसाई यांचा मोठा वाटा आहे.
- मी पुस्तकसंचात म्हटलं आहे तेच पुन्हा सांगतो. वाचकांच्या प्रतिक्रिया नाव, फोटो पत्त्यासह पुढच्या आवृत्तीत छापणार आहे. कौतूक, टीका दोन्हीचं स्वागत असेल. अशा प्रत्येकाचं माझ्यावर ऋण असणार आहे.

– अनिल भागवत
वैवाहिक आणि कौटुंबिक समुपदेशक

'आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक प्रश्नाचं खरं मर्म एकच – चांगल्या-वाईट अनेक घटना तुमच्या वाट्याला आयुष्यभर येणार. त्यांची हाताळणी कशी करायची हे दुसरी कुठचीही शक्ती किंवा व्यक्ती ठरवणार नसते. ते तुम्ही स्वतः ठरवायचं असतं. त्यासाठी त्या घटनेच्या सर्व अंगांचा अभ्यास स्वतःला करावा लागतो. त्या अभ्यासासाठी जीवनभर स्पष्ट विचारांची साथ लागते. म्हणजेच जीवनसाथ.'

या पुस्तकाविषयी

स्वावलंबन पटलं, आचरणात आणलं तरी आत्मकेंद्री होऊ नये, याची काळजी सतत घ्यायला पाहिजे. अहंकारापासून दूर राहिलं पाहिजे. स्वाभिमान आणि अहंकार यातला फरक ओळखण्याचा एक सोपा मार्ग आहे. ज्याला आत्मसन्मान महत्त्वाचा वाटतो त्याला दुसऱ्याचा सन्मानही तेवढाच महत्त्वाचा वाटतो. हे ज्याच्या वागणुकीत दिसेल तो स्वाभिमान. नाहीतर अहंकार.

राजकारणातल्या लोकशीहीची कल्पना लोकांच्या ओळखीची असते. पण कुटुंबात लोकशीहीची मूलतत्त्वं वापरण्यासंबंधी विचार करणं गरजेचं आहे हे लेखक यात सांगतो.

स्त्री-पुरुष समानतेविषयीचा एका पुरुषाने इतक्या तपशिलात केलेला विचार क्वचित आढळतो. स्त्री मुक्ती चळवळीबद्दल एक फार सुरेख स्पष्टीकरण आहे. 'स्त्री मुक्तीची चळवळ असं नाव असलं तरी ती स्त्रियांच्या उद्धारासाठी नाही, तर पुरुषांच्या उद्धारासाठी आहे.' हा विचार फार महत्त्वाचा वाटतो.